ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | मधुमक्षिका |
| लेखक | : | विनायक कोंडदेव ओक |
| प्रकाशक | : | गव्हर्नमेंट सेन्ट्रल बुक डेपो, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १८७१ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

म. म. दत्तो वामन पोतदार

ग्रंथ संग्रह

दुर्मिळ ग्रंथ

(हे पुस्तक अत्यंत जपून हाताळावे)

मंडळी कार्यालय,

आवार,

पुणे=३०.

म|४११०

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00937

Published for the Educational Department.

# THE BEE

OR

# MADHUMAKSHIKÁ

BY

VINÁYAK KONDDEV OKE,

HEAD MASTER, ANGLO-VERNACULAR SCHOOL, NEWASAY.

*Registered under Act XXV. of* 1867.

**BOMBAY:**

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1871.

*Price ten Annas.*

BOMBAY:

PRINTED BY BABU MORESHVAR AT THE
"INDU-PRAKASH" PRESS.

विद्या खात्या करितां.

---

# मधुमक्षिका

अथवा.

अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांचा संग्रह.

हें पुस्तक,

अनेक इंग्लिश ग्रंथांच्या आधारानें

## विनायक कोंडदेव ओक

ह्यांनीं तयार करून

मेहेरबान दक्षिणाप्रैज कमिटी ह्यांस

नजर केलें.

मुंबई.

गव्हर्नमेंत सेन्त्रल बुक दिपो.

---

इसवी सन १८७१—शके १७९३.

---

हें पुस्तक सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिस्टर केलें असे.

किंमत १० आणे.

मुंबई.

इंदुप्रकाश छापखान्यांत बाबु मोरेश्वर यांणीं छापिलें.

# प्रस्तावना.

लोकांस वाचण्याची गोडी लागून, अनेक चमत्कारिक विषयांची माहिती व्हावी, अशा पुस्तकांची आवश्यकता सांप्रतकाळीं ह्या देशामध्यें फार आहे. हें समजून हें लहानसें पुस्तक रचून जनांस नजर केलें आहे. इष्ट हेतु, अंशत: तरी ह्या ग्रंथाच्या द्वारानें सिद्धीस गेल्याचें जर सुदैवेंकरून माझे कानीं पडेल, तर माझे सर्व श्रम सफल झाले, असें मी मानीन.

हें पुस्तक मीं यथामति शुद्ध केलें आहे. तरी ह्यांत अनेक दोष राहिले असतील, असें मला वाटतें. ह्यास्तव त्यांबद्दल मी विद्वज्जनांपाशीं क्षमा मागतों.

# सूचना.

ह्या पुस्तकांत 'मोहनलालाचें प्रवासवर्णन' ह्मणून दोन तीन धडे आहेत. मोहनलाल हा पुरुष मोठ्या कुळांतला होता. त्याच्या आजाचें नांव मणिराम; तो दिल्लीच्या दरबारीं ब-याच प्रतिष्ठेनें असे. त्याचा पुत्र बुधशिंग. हा मौंतस्टुअर्त एल्फिन्स्तन साहेबांबरोबर पर्शियन शिरस्तेदारीच्या हुद्यावर असून पेशावरास गेला होता. ह्याचा मुलगा मोहनलाल. अगदीं प्रथमारंभीं दिल्लीमध्यें ६ विद्यार्थी इंग्लिश शिकूं लागले, त्यांत हा एक होता. ह्याची बुद्धि चांगली असल्यामुळें हा थोड्या काळांत बराच विद्वान् झाला; व त्याला लवकरच काम मिळालें. त्यावर असतां तो पंजाब, अफगाणिस्तान, तुर्कस्तान, बल्क, बुखारा, हिरात, विलायत, इत्यादि ठिकाणीं साहेबलोकांबरोबर फिरला. तेव्हां त्यानें आपले प्रवासाचें वर्णन लिहिलें. त्यांतील कांहीं वेंचे माहितीकरितां, व नमुन्याकरितां, येथें घेतले आहेत.

ह्या पुस्तकांतले दोन तीन लहान लहान धडे खेरीज करून बाकी सर्व इंग्रजीवरून लिहिले आहेत.

माहे जुलै १८६७ इ०. मुक्काम नेवासें.

# अनुक्रमणिका.


| धडा. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | विद्याभ्यास. | १ |
| २ | विश्व. | ८ |
| ३ | अलूकंदर आणि सेप्तिमियस. | १४ |
| ४ | ब्रितन देशांतील राज्यव्यवस्था. | २० |
| ५ | न्याय. | २६ |
| ६ | द्रव्याचा व्यय. | ३२ |
| ७ | अकबर. | ३५ |
| ८ | इतिहासांचें संक्षिप्त टिपण. | ४१ |
| ९ | मनुष्याचा स्वभाव. | ५१ |
| १० | क्राको आणि स्ताकहोम. | ६० |
| ११ | निद्राश्रम. | ७० |
| १२ | इंग्रजांचें राज्य. | ७४ |
| १३ | मोहनलालाचें प्रवासवर्णन. | ७८ |
| १४ | मातापितरें आणि मुलें. | ८५ |
| १५ | नीतीवर निष्ठा. | ८९ |
| १६ | वाक्यरत्नावली. | ९५ |
| १७ | तसबिरीची साक्ष. | १०३ |

१८ मोहनलालाचें प्रवासवर्णन. ...... १०९
१९ हिंदुस्थानाची सुधारणा. ........ १२०
२० मोहनलालाचें प्रवासवर्णन (विलायत). १२९
२१ ग्रेतब्रितन व ऐरलंद ह्यांचा संक्षिप्त इतिहास. १३३
२२ असत्य भाषण. .............. १४०
२३ मोहनलालाचें प्रवासवर्णन (हिरात). .. १४४
२४ नवी रीति. ............... १४९
२५ हिंदुस्थानांतील कांहीं संस्थानांचें वर्णन. १५४
२६ आसम. ............... १५७
२७ कोळी. ............... १६८
२८ सिसरो. ............... १७४
२९ उष्णतेच्या मानावरून देशाचें वर्णन. .. १८१
३० नारायणराव पेशवा ह्याचा शेवट..... १८४
३१ चमत्कारिक गोष्टी. .......... १८७
३२ सूड उगवणें............... १९२
३३ गरीबी. ............... २००
३४ मृत्यु. ............... २०५
३५ जन. ............... २०८
३६ ज्ञानसंपादन. ............. २११
रसिकजनांची व परमेश्वराची प्रार्थना. २१६

# मधुमक्षिकेचें शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | २५ | कोणी | कोणीं |
| ७ | ४ | बहुश्रत | बहुश्रुत |
| ११ | ७ | दर्ष्टीस | दृष्टीस |
| १४ | १७ | मनतां | मनांत |
| १९ | ४ | न्यायाधिश | न्यायाधीश |
| २४ | ९ | चलतात. | चालतात. |
| ३० | २२ | मी | मीं |
| ३१ | १० | मी | मीं |
| ४१ | २४ | ये | येथें |
| ५६ | २५ | आडवत | आवडत |
| ६२ | १७ | ह्यांचें | ह्यांचे |
| ६३ | २६ | आम्हीं | आम्ही |
| ६५ | २६ | पराकष्टेची | पराकाष्ठेची |
| ७९ | १३ | रणजितशिंग | रणजितशिंग |
| ८० | २६ | अम्ही | आम्ही |
| ८३ | २५ | नेहमी | नेहमीं |
| ८४ | ९ | पराकष्टेची | पराकाष्ठेची |
| ८४ | २६ | त्यांनें | त्यानें |
| ८५ | ३ | सोबत्यास | सोबत्यांस |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ८६ | ९ | त्याचीं | त्यांचीं |
| ९२ | ८ | बजाऊन | बजावून |
| ९९ | १ | निदा | निंदा |
| १०० | २३ | पोंहल्यावर | पोंचल्यावर |
| १०१ | ८ | ह्याचे | ह्याचें |
| १०१ | २६ | नेहमी | नेहमीं |
| १३० | १ | फेंच भाषा | फ्रेंच भाषा |
| १४८ | ८ | धातू | धातूं- |
| १४८ | २० | चिखलसारखा | चिखलासारखा |
| १६२ | ३ | नाही | नाहीं |
| १६३ | १३ | यत्किचित | यत्किंचित् |
| १६५ | १२ | खेंर | खरें |
| १६९ | २४ | नागी | नांगी |
| १८३ | २४ | नेहमी | नेहमीं |

# मधुमक्षिका.

## विद्याभ्यास.

अंतःकरणास आल्हाद होणें, हा विद्याभ्यासापासून एक उत्कृष्ट लाभ होय. ह्याचा अनुभव विद्वज्जनांच्या मनांस मात्र येतो. इतर मनुष्यांस त्याची रुचि समजणें कठीण. ठीकच आहे. अंधळ्यास सुरेख तजबिरीपासून अथवा बहिऱ्यास मंजुल गायनापासून काय आनंद होणार आहे? एकांतामध्यें, ह्मणजे जेव्हां कामेंकाजें आटपून मन थकून जातें, तेव्हां सुखानें कालक्रमण होण्यास विद्या फार उपयोगीं पडते. दुसरा लाभ कीर्ति आणि प्रतिष्ठा. सर्व काळीं व सर्व देशीं लोक विद्वानांस पुष्कळ मान देतात व वाखाणितात; सभादिकांचे ठायीं त्यांपुढें सगळे निरुत्तर होतात; आणि त्यांचे ह्मणण्यास माना डोलवितात; ह्यावरून ह्या दुसऱ्या लाभाविषयीं कोणास संशय घेण्याचें कारण राहिलें नाहीं. आतां शाहाणपण ह्मणजे अक्कल, हा विद्याभ्यासाचा तिसरा लाभ होय. ह्याचा उपयोग कामकाजांत फार पडतो. सामान्य मनुष्यही एकाच कामांत बहुत दिवस वागत असला, तर रावत्यामुळें त्याला तें चांगलें करतां येतें. परंतु, त्याची बुद्धि तितक्यापुरतीच; ती दुसऱ्या कामांत तशी चालावयाची नाहीं. आतां विद्वानांचें पाहा. त्यांस तुह्मी कोणत्याही का-

मांत घाला; फार थोडक्या वेळांत ते त्यामध्यें तर्बेज होतात; आणि तें उत्कृष्ट रीतीनें बजावितात; कारण, पुष्कळ ग्रंथावलोकनानें व विचारानें त्यांस प्रत्येक गोष्टीचीं कारणें, उपयोग, ती सिद्धीस नेण्यासाठीं तिचे भाग कसे कल्पावे, आरंभ कोठें करावा, साधनें कोणतीं योजावीं, व मधलीं विघ्नें कशीं निवारावीं, हें सर्व त्यांस स्पष्टपणें कळत असतें. तेणेंकरून कोणत्याही कामीं त्यांची मति फार लवकर शिरते, व तें त्यांचे हातून उत्तम प्रकारें होतें. तेव्हां अर्थात्, इतर सर्व लोकांस ते उपयोगी व चांगले वाटतात; व त्यांस द्रव्यादि सुखप्रद पदार्थही यथेच्छ मिळतात. मनुष्याचें दुःख निवारणें, व त्याच्या सुखाची वृद्धि करणें, हा विद्याभ्यासाचा उत्कृष्ट परिणाम होय. हें न समजतां केवळ शिकण्यामध्यें अतिशयित काळ घालविणें हें चागलें नव्हे. विद्या हें एक यंत्र आहे. तें केवळ जवळ असल्यानें मनुष्य मोठा होत नाहीं. तर, त्याचा उपयोग कसा करावा, हें समजून घेऊन, जो त्याप्रमाणें करितो, तोच थोर व सुखी असा निपजतो. विद्या हें एक अत्युत्तम भूषण आहे खरें; तथापि तेवढ्यावरच फुशारून डौल मिरविणें, हें मूर्खपण आहे. ह्यापासून लाभ कांहीं एक न होतां, उलटा उपहास होतो. वास्तव सुज्ञ पुरुष त्या दुर्गुणाची छाया सुद्धां आपणांवर पडूं देत नाहींत. इतर सारासार विचार न पाहतां, केवळ पुस्तकीय ज्ञानावरून कोणत्याही गोष्टीचा निर्णय करणें, हें बालिश कर्म होय.

अनुभवानें विद्या परिपक्व होते. ह्मणजे असें कीं, जी गोष्ट, विद्याभ्यास करीत असतां ग्रंथांवरून समजते,

तिची साक्षात् प्रतीति आली असतां तिजविषयीं शंका राहात नाहीं; हीच विद्येची परिपक्वता होय. आणखी असें आहे कीं, विद्येच्या परिपक्वतेनें मनुष्याचा स्वभाव पूर्णता पावतो. ह्याचें तात्पर्य हेंच कीं, ज्याचा जो मूलस्वभाव बरा किंवा वाईट असतो, त्यास त्याप्रमाणें बिनधोक वागतां येतें; ही स्वभावाची पूर्णता जाणावी. ह्यावरून, विद्या ही खरोखर उत्तम वस्तु असतां, ती ज्यास लाभते, त्याचे हातून कधीं कधीं अत्यंत घोर कर्में घडतात, ह्याचें कारण ती अमोल विद्या नव्हे, तर त्याचा अंगस्वभाव आहे, असें खचीत समजावें. अग्नि हा एक ह्या पृथ्वीवर अत्युपयोगी पदार्थ आहे; त्यापासून पाकनिष्पत्यादि फार सुखावह कामें होतात. तीं करून घ्यावयाचीं टाकून कोणी दुष्ट, लोकांचीं घरें दग्ध करण्याचे कामीं जर त्यास लावील, तर तेथें अग्नीनें काय करावें.? तो त्याचा दोष आहे काय.? ज्याचे सन्निध जावें, त्यास जाळावें, इतकें मात्र तो जाणतो. त्याप्रमाणें जो आपला स्वीकार करील, त्याचे मनोरथ, कसेही युक्तायुक्त असले तरी ते यथाशक्ति पूर्ण करावे, एवढें विद्येला ठाऊक आहे; ती जास्ती कांहीं ओळखीत नाहीं. आपण बाग करतों. त्यामध्यें अनेक झाडें आपोआप उगवतात. त्यांमध्यें कितीएक चांगलीं व उपयुक्त असतात; आणि कितीएक वाईट, विषारी असतात. आपण चांगलीं तेवढीं ठेवून त्यांची आणखी मरामत राखितों; आणि वाईट असतात तीं सगळीं समूळ खणून टाकितों. त्याप्रमाणें, मनामध्यें ज्या अनंत वासना उत्पन्न होतात, त्यांपैकीं, चांगल्या अस-

तील, त्या सफल होण्याविषयीं झटणें, आणि वाईट असतील त्या सोडणें, हें मनुष्याचें मोठें कर्तव्य आहे. हें साधण्यास विचार पाहिजे, आणि विद्येवांचून विचार नाहीं. तेव्हां, ह्या लोकीं, विद्येपासून मनुष्यास अनिर्वचनीय लाभ आहेत, हें उघड आहे.

पुस्तकांतही कितीएक गोष्टी अशा सांगितलेल्या असतात कीं, त्यांप्रमाणें प्रसंगविशेषीं वागलें असतां मात्र हित होतें; सर्वदा होत नाहीं. तर त्यांविषयीं फार जपलें पाहिजे. त्यांवर विश्वास ठेवून उपयोगीं नाहीं. ह्मणजे, त्या असत्य मानाव्या, असें आह्मी सांगत नाहीं. परंतु, आपले स्थितीशीं त्यांची अनुकूलता नसल्यास त्या वर्जाव्या. दुग्ध हा पदार्थ निरोग्यानें सेविला असतां बलप्रद होतो खरा; तथापि तोच पदार्थ संनिपात किंवा कफदोष झाला असतां सेविल्यास प्राण हारक होतो. हीच गोष्ट सर्वत्र लागू करावी.

मूर्खजन विद्येचा तिरस्कार करितात. ठीकच आहे. कुत्र्यानें कस्तूरी कर्दम मानिली, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. कांकीं, तिच्या गुणाचा अनुभव त्याला स्वतः घेतां येत नाहीं; व इतरांनीं घेतलेला समजण्याचीही त्याला शक्ति नाहीं. तेव्हां त्याजकडे काय बोल. ? कितीएक मूढ लोक, " कोल्हा आणि द्राक्षें, " ह्या न्यायानेंही विद्येस वाईट ह्मणतात. परंतु विद्येस मनापासून वाईट ह्मणणारा असा मनुष्य फार विरळा. कांकीं, ती पाहिजे त्या कामास साह्य देण्यास सिद्ध असते. भील, कोळी वगैरे लोक, कीं ज्यांच्या वंशांत कधीं कोणीच पांढऱ्यावर काळें केलें नाहीं, व जे स्वतः तसेच

अक्षरशून्य राहण्याचा निश्चय धरून चालतात, ते देखील, ज्यांस सामान्य लिहिणें वाचणें व अल्पस्वल्प गणित येतें, त्यांस मोठे दैववान मानितात; ह्यावरून पाहा. खरोखर चांगल्या गोष्टीस वाखाणणें, ह्यास फारसा सुज्ञपणा लागतो, असें नाहीं; तर जें चांगलें व उपयुक्त आहे, त्याचें हरप्रयत्नानें संपादन करून, त्याचा यथायोग्य उपयोग करणें, हेंच शाहाण्याचें लक्षण होय.

विद्येचा उपयोग केवळ पुस्तकें शिकल्यानें होत नाहीं. त्यास पुस्तकांबाहिरचें व्यवहारज्ञान पाहिजे. तें ज्ञान, विचारपूर्वक अवलोकनानें व अनुभवानें प्राप्त होत असतें. पुस्तकांवरून शिकलेल्या अनेक विषयांवर वाक्पांडित्य करणारे असे विद्यार्थी शाळांत पुष्कळ तयार होतात. पण सगळें साहित्य पुढें ठेवून, जें बोलतां तें करून दाखवा, असें सांगितलें असतां, पुढें सरणारा शतांमध्यें एकादाच निघेल. संकटांतून पार पडण्याच्या, व उद्योगानें स्वहित करून घेण्याच्या पुष्कळ युक्ति, विद्यार्थी जनांनीं पुस्तकांत वाचिलेल्या असतात; व त्या त्यांस आठवतही असतात. परंतु, त्यांचा उपयोग कोठें कोणत्या प्रकारें करावा, हें व्यवहारज्ञान त्यांस नसल्यामुळें, ते विद्वान् असूनही त्यांस अविद्वानांपेक्षां कधीं जास्त विपत्ति भोगाव्या लागतात. ह्याचें कारण असें कीं, त्यांचें बहुतेक आयुष्य केवळ ग्रांथिक ज्ञान संपादण्यांत गेलेलें असतें; आणि, त्याचा उपयोग करण्यास आवश्यक जें व्यवहारज्ञान तें संपादण्यास त्यांस मुळींच अवकाश होत नाहीं. तर असें करूं नये. कोणतीही उत्तम वस्तु महा प्रयासानें मिळविली, पण तिचा उपभोग जर आपणास घेतां येत नाहीं, तर

ती मिळविली आणि न मिळविली सारखीच. एकादा मनुष्य चांगला वैद्यक पढलेला असतो; त्याला रोगांचीं लक्षणें, व निदानें मुखोद्गत असतात; व जवळ रसायनें सिद्ध असतात; तरीं त्याच्यानें रोगी बरा होत नाहीं. हें सर्वांस ठाऊक आहे. ह्यावरून विद्येपासून होणारा लाभ केवळ पुस्तकज्ञानानें प्राप्त होत नाहीं, हें स्पष्ट आहे.

दुसऱ्यास कुंठित करण्यासाठीं, अथवा घोंटाळ्यांत पाडण्यासाठीं, अथवा बोलायाला कांहींतरी विषय असावा एवढ्यासाठींच वाचूं नये. पुस्तकांत जें आढळलें, तें निर्विवाद खरें आहे, असें मानूं नये. ज्या गोष्टी अवलोकनांत येतात, त्यांची सत्यता, कार्यकारणभाव, परिणाम, आणि त्यांपासून ग्राह्य तात्पर्य कोणतें निघतें, ह्यांविषयीं विचार करावा. सगळीं पुस्तकें एकाच योग्यतेचीं असतात असें नाहीं. कितीएक कारणपरत्वें पाहायाचीं असतात; ह्यांत कोशादिकांचा समावेश होतो. कितीएक साद्यंत वाचण्याजोगीं असतात, पण तीं अगदीं पूर्ण लक्ष देऊन वाचिलीं पाहिजेत अशीं नसतात; मनोरंजक गोष्टी, नाटकें, हीं या वर्गांतलीं होत. आणि कितीएक अशीं असतात कीं, तीं मुळापासून शेवटापर्यंत एकाग्र चित्तानें वाचून, त्यांतील विषय पूर्णपणें मनांत बिंबवून घेऊन, त्यांवर पुष्कळ विचार व शोध करून, त्यांतील मतलब झटल्यावेळेस आठवे असा त्यांचा अभ्यास करावा लागतो; न्यायशास्त्र, पदार्थविज्ञान शास्त्र, इत्यादिकांचा हा वर्ग जाणावा. ज्या भाषेंत जे ग्रंथ आरंभीं निर्माण होतात, तींत ते वाचिले

असतां जसे गोड व सुरस लागतात, तशीं त्यांचीं भाषांतरें, कितीही चातुर्य खर्चून केलेलीं असलीं, तरी मधुर लागत नाहींत.

पुष्कळ ग्रंथावलोकनानें मनुष्य बहुश्रुत होतो. वारंवार वादप्रतिवाद करीत असल्यानें अंगीं समयसूचकता येते. आणि कोणताही विषय हातून अनेक वेळा लिहिला गेला, ह्मणजे तो मनांत बरोबर ठसतो, व ध्यानांत चांगला राहातो. इतिहासाच्या अभ्यासानें मनुष्य शाहाणा आणि दूरदृष्टि होतो ; काव्याच्या अभ्यासानें रसिकता प्राप्त होते ; गणिताच्या अभ्यासानें कावेबाजपणा वाढतो ; पदार्थविज्ञानानें सूक्ष्मदृष्टि येते, व पाताळयंत्रीपणा वृद्धि पावतो ; धर्मशास्त्र व नीतिशास्त्र ह्यांनीं बुद्धिगांभीर्य, व नेमस्तपणा हीं येतात ; आणि तर्कशास्त्र व पांडित्यकला, यांहींकरून वादविवाद करण्याचें सामर्थ्य मनुष्यास प्राप्त होतें. असे निरनिराळ्या विषयांचे निरनिराळे उपयोग आहेत. शारीररोगांस जसे कांहीं नियमित उपाय असतात, तसे मानसिक रोगांसही विद्वानांनीं कांहीं उपाय शोधून काढिले आहेत. मन स्थिरता पावून कोणत्याही एका गोष्टीकडे लागेना, तर भूमितीचा अभ्यास करावा. त्यांत असें असतें कीं, कोणत्याही एका सिद्धांताची सिद्धता खरी करून दाखविण्यास आरंभिल्यावर ती, आतां अर्धीमुर्धी करूं आणि राहिलेली मग करूं, असें ह्मणून चालत नाहीं; एका बैठकीस आरंभून शेवटास नेली पाहिजे. आणि ती अर्धवट सोडिली तर पहिले श्रम व्यर्थ जाऊन पुनः पहिल्यापासून आरंभ करावा लागतो. ह्मणून

ह्या विषयांवरील उदाहरणांच्या सवईनें चित्ताची एकाग्रतां पुनः स्थापित होते. कोणत्याही गोष्टीचा अगदीं सूक्ष्मरीतीनें विचार करतां यावा, व तिच्या सिद्धतेस नानाविध प्रमाणें देण्याची शक्ति आपणास प्राप्त व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें मोठमोठ्या न्यायसभांत ठरलेले फैसले, त्यांतील विद्वान वकिलांच्या भाषणासहित पाहावे; ह्मणजे त्याची इच्छा पूर्ण होईल. असे अनेक मनोव्याधींवर अनेक उपाय सांगितले आहेत.

---

## विश्व.

प्राचीन काळीं जे अति विख्यात पुरुष होऊन गेले, त्यांनीं आपली कीर्ति मागें राहावी, ह्मणून कितीएक मोठमोठीं कृत्यें करून ठेविलीं आहेत. तीं पाहून आपणास त्यांचें स्मरण होतें, व त्यांचें मोठेपण आपले मनांत येतें. जो जो कोणी मुशाफर आग्राशहरीं जातो, तो तो तेथला प्रख्यात ताजमहाल पाहिल्यावांचून बहुतकरून तेथून निघत नाहीं. ती इमारत पाहातांक्षणींच तो अत्यंत आनंद पावतो आणि ती सारी पाहाण्यापूर्वींच ती बांधविणाऱ्याची हकीकत विचारण्याची त्याला इच्छा होते. तेव्हां तेथें सहजच शाहाजहान बादशाहाचें नांव निघतें. आतां विश्वरचनेच्या मानानें पाहिलें असतां, तें काम, खंडीस रती अथवा सिंधूस बिंदु, ह्यापेक्षां देखील कमी मानाचें आहे. परंतु, मनुष्याचें मन सृष्टिरचनेकडे न लागतां, अशा क्षुल्लक पदार्थांकडे लागतें, ह्याचें कारण काय, असें कोणी विचारील, तर त्याला उत्तर हेंच कीं, पदार्थांतील चमत्कारिकपणा मनु-

ष्याचें चित्त वेधीत नाहीं; तर ज्या गुणावरून त्याचें लक्ष वस्तूकडे लागतें, तो गुण नवेपणा होय. ह्या सृष्टीमध्यें, नेहमीं डोळ्यांपुढें असणारा, अति तेजःपुंज, आणि चित्तवेधक, असा पदार्थ, विचारांतीं पाहूं गेलें असतां, सूर्यासारखा दुसरा नाहीं. पण, त्याविषयीं कधीं कोणी आश्चर्यभरित होऊन कांहीं विचारीत नाहीं. ह्याचें कारण काय.? ह्याचें कारण हेंच कीं, तो नेहमीं पाहाण्यांत येतो ह्मणून. एरवीं त्यास एकीकडे ठेवून ताजमहालाची विचारपूस लोक करितात, ह्यावरून त्यापेक्षां ताजमहाल अधिक चमत्कारिक झाला, असें नाहीं.

ताजमहालासारख्या इमारती पाहून जर आपणास इतका अचंबा वाटतो, तर, ह्या विश्वाचा अवाढव्य विस्तार मनांत आणिला असतां आपण केवढ्या चमत्कारसागरांत बुडून जाऊं बरें.? विश्वविस्ताराची कल्पना मनांत येणें मनुष्यास अशक्य आहे. पहा. आमचा हा तेजस्वी दिनकर, आपल्या ग्रहमालेसुद्धां ह्मटला तरी, सर्व विश्वाचा अत्यल्पांश होय. हा सबंद नाहींसा झाला तर, दाहा खंडी बाजरींतून एक दाणा गेल्या इतकी देखील त्याची दाद विश्वांत लागावयाची नाहीं. विश्वाच्या तुळनेनें पाहिला असतां हा रवि, ग्रहमालेसह जरी इतका क्षुल्लक वाटतो, तरी त्या विषयींची देखील कल्पना मनांत आणायास कठीण पडते. पाहा. विद्वान लोक आपणास सांगतात कीं, सूर्य हा ग्रहमालेचा मध्य होय; त्याचें उदरसूत्र ८८३२४६ मैल आहे; व तो २५ दिवस, १४ तास, आणि ८ मिनिटें, इतक्या काळांत आपले आंसाभोंवती फिरतो. त्याचे अगदीं जवळचा ग्रह बुध;

त्याचें उदरसूत्र ३२२४ मै०; त्याचें सूर्यापासून अंतर ३७०००००० मै०; तो २४ तास आणि साडेपांच मिनिटें इतक्या काळांत आपले आंसाभोंवती फिरतो; आणि त्याला सूर्याभोंवती प्रदक्षिणा करण्यास ८७ दि०, २३ ता०, १५ मि०, आणि ४४ से०, इतका काळ लागतो. ही ग्रहमाला आतां एका कोष्टकांतच दाखवितों:—

| ग्रहांचें नांव. | उदरसूत्र. मैळ. | सूर्यापासून. अंतर, मैळ. | सूर्याभोंवती प्रदक्षिणा. होण्यास काळ. |
|---|---|---|---|
| बुध. ................ | ३२२४ | ३७०००००० | ८७·२३·१५·४४* |
| शुक्र. ................ | ७६८७ | ६९०००००० | २२४·१६·४९·११ |
| पृथ्वी. ................ | ७९१२ | ९५०००००० | ३६५·६·९·८ |
| चंद्र. ................ | २१६५ | ९५०००००० | ३६५·६·९·८ |
| मंगळ. ................ | ४१८९ | १४४०००००० | ६८६·२३·३०·३५ |
| व्हेस्ता. ................ | २३८ | २२५०००००० | १३३५·४·५५·१२ |
| जूनो. ................ | १४२५ | २५०००००० | १५९०·२३·५९·७ |
| सीरिस. ................ | .. | २६००००००० | १६८१·१२·५६·१० |
| पालाज. ................ | .. | २६००००००० | १६८१·१७·०·५८ |
| गुरु. ................ | ८५९५० | ४९००००००० | ४३३२·१४·२७·११ |
| शनि. ................ | ७९०४२ | ९०००००००० | १०७५९·१·५१·११ |
| हर्शेल. ................ | ३५११२ | १८०००००००० | ३०६८९·०·० |

* ह्मणजे, ८७ दिवस, २३ तास, १५ मिनिटें, आणि ४४ सेकंद.

इतका शोध विद्वज्जनांनीं बुद्धिचातुर्यें करून लाविला आहे; आणि तो ते सप्रमाण खरा करून दाखवितात, त्यावेळेस आपण निरुत्तर होतों. परंतु, ह्या ग्रहमंडळाची नुसती कल्पना तरी आपणास करवते काय ? केवढा हा अवाढव्य विस्तार. ! तरी ही एका सूर्याची गोष्ट झाली. विद्वान् लोक आणखी असें ह्मणतात कीं, जी जी चांदणी आपल्या दृष्टीस पडते, तो तो एक एक सूर्य असून, त्याला त्याची वेगळी ग्रहमालाही असण्याचा संभव आहे. हें ऐकिलें ह्मणजे तर बुद्धि चकित होऊन जाते; व कांहींच तर्क चालत नाहीं. धन्य त्या सर्वशक्तिमान् कारागिराची. ! हे राजाधिराजा, ह्या महा पसाऱ्यापुढें तुझीं मोठमोठीं राष्ट्रें, वाडे, बागा, व इतर संपत्ति ह्यांचा काय पाड. ? सामान्य मनुष्या, तूं तर आपल्या शेताभातांची, घरवाड्यांची, व तूटपुंजीच्या पैशाची गोष्ट देखील काढूं नको व त्यांविषयीं काडीमात्र गर्वही वाहूं नको.

परमेश्वरानें एवढें अकटोविकट विश्व रचिलें आहे, पण त्यांत अव्यवस्था, अथवा कांहीं चूक राहिली आहे काय. ? एका रती इतकी देखील नाहीं. जें जें पाहावें, त्यांत त्याचें अपार चातुर्य दिसून येतें. त्यानें जीं यंत्रें एकदा लावून ठेविलीं आहेत, तीं कधीं बिघडत नाहींत; सूर्य व चंद्र ह्यांचे उदयास्त, ग्रहणें, ऋतु, हीं कधीं आगें मागें होत नाहींत.

ह्या सृष्टींतल्या प्राण्यांच्या पोषणाविषयींही जी त्यानें तजवीज लावून ठेविली आहे, ती लक्षांत आणिली असतां, त्याच्या दयालुत्वाविषयीं आपली खातरी होते. व्याघ्र, सिंह,

इत्यादि हिंस्र पशूंचें उपजीवन वनस्पतींच्या फळांमुळांवर चालायाजोगें नाहीं; त्यांस मांस अवश्य पाहिजे; ह्मणून त्यांस अद्भुत शक्ति व भयंकर नखें आणि अक्राळ विक्राळ दांत दिले आहेत. हबसी देशांत पर्जन्य मुळींच नाहीं, तेथें नैल नदीस यथाकाळीं पूर येऊन धान्य पिकावें, अशी योजना करून ठेविली आहे. लापलंद देशामध्यें थंडी अतिशयित; ह्मणून तेथें गायी, ह्मशी, बैल, घोडे, व धान्यें हीं अगदीं नाहींत; ह्यास्तव, रेनदीर नामक प्राण्यांची जात देवानें तेथें उत्पन्न करून ठेविली आहे; तिच्या योगानें लापलंद येथील लोकांस सर्व कांहीं निर्वाहाच्या वस्तु प्राप्त होतात; त्यांचें कांहीं एक अडत नाहीं. फार लांब जाणें कशास पाहिजे. लहान मूल उपजतें, तेंव्हां त्यास अन्नादिकाचा कोणताच रस पचण्यासारखा नसतो, ह्मणून जगदीश्वरानें, त्याच्या मातेच्या स्तनांत त्याचेसाठीं दूध उत्पन्न व्हावें अशी व्यवस्था करून ठेविली आहे. ह्या वरून, तो आपणां प्राण्यांविषयीं किती कनवाळू आहे, हें स्पष्ट लक्षांत येतें. ज्याची कांहीं एक सोय देवानें करून ठेविली नाहीं, असा एकही जीव ह्या सृष्टींत सांपडणें कठीण. आतां, असें मात्र कधींकधीं घडतें कीं, त्याची योजना अतर्क्य असल्यामुळें ती आपल्या लक्षांत येत नाहीं, तेणें करून, देव दीनाची उपेक्षा करितो, असें आपले तोंडांतून प्रसंगोपात निघतें.

सृष्टीमध्यें मनुष्य हा ईश्वराच्या कृपेंतला प्राणी आहे. त्याच्या सुखार्थ त्यानें एकेका पदार्थामध्यें असे असे चमत्कारिक व उपयोगी गुण ठेवले आहेत कीं, त्यांवि-

षयीं जितकें सांगावें तितकें थोडेंच. ते गुण मनुष्यानें स्वबुद्धिचातुर्यें करून जाणावे, आणि आपले कामीं लावावे, एवढें मात्र त्याजकडे सोंपिलें आहे; व त्यासाठीं त्यानें त्यांस विचारशक्ति दिली आहे. तिच्या साह्यानें त्यानें स्वहित साधून घ्यावें. वाफेनें मोठ्या जोराचीं कामें करावीं; विजेनें बातमी पोंचवावी; समुद्रानें तक्के कापावे; वायूनें दळावें; तेलावातीवांचून नुसत्या धुराचा दिवा लागावा; इत्यादि गोष्टी पदार्थांचे धर्म मनुष्यास कळून आल्यानें घडल्या, व अशा आणखीही घडत आहेत. तेव्हां, कोणत्या वस्तूमध्यें काय गुण आहे, व तो मनुष्यास समजल्यावर त्यापासून त्यास कोणतीं सुखें प्राप्त होतील, ह्याचा अजमास करील, असा चतुर कोण आहे. ?

आज हजारों वर्षें मनुष्यें पदार्थांच्या धर्मांचा शोध करीत आहेत. तरी, जिचेविषयीं आतां कांहीं एक कळावयाचें राहिलें नाहीं, अशी एक देखील वस्तु ह्या पृथ्वीच्या पाठीवर सांपडावयाची नाहीं. दररोज नव्यानव्या वस्तु सांपडत चालल्या आहेत, व जुन्या वस्तूंमध्यें चमत्कारिक चमत्कारिक गुण दृष्टीस पडताहेत. ह्यावरून, ह्या सृष्टीमध्यें कोठें काय आहे, व कोणत्या पदार्थांत केव्हां कसा गुण आढळेल, ह्याचा कांहीं निश्चय करतां येत नाहीं. परमेश्वराची करणी अगाध आहे. त्यानें कोठें काय करून ठेविलें आहे, ह्याचा कोणास अंत लागायाचा नाहीं. प्राप्त झालेल्या अल्प ज्ञानाविषयीं कितीएक मनुष्यें मोठा गर्व वाहातात, व इतर प्राण्यांस अगदीं तुच्छ मानितात.

परंतु, त्यांनीं मनांत असें पक्कें समजावें कीं, गर्भसंभवादि गोष्टी, ज्या, मनुष्यास त्यांचीं लक्षणें बाहेर दिसूं लागल्यावांचून कळत नाहींत, त्या, पशुपक्ष्यादिकांस उत्पन्न झाल्याबरोबर समजतात. तेव्हां, ते सर्वोपरी आपणांपेक्षां नीच आहेत असें नाहीं. त्यांचे ठायींही परमेश्वरानें असे कितीएक गुण ठेविले आहेत कीं, ते कोणत्याही उपायानें मनुष्यास प्राप्त व्हावयाचे नाहींत. धागे, दोरे, शेवाळ, माती, इत्यादि साहित्य मनुष्यापुढें ठेविलें, तर त्याच्यानें, आपली सगळी अक्कल खर्चून तरी चिमणीसारखें घरटें बांधवेल काय? नाहीं! तर मग एवढा गर्व तो कशास पाहिजे?

असो भगवंताच्या लीलेचें वर्णन करावें तितकें थोडेंच. त्याचे ह्या जगावर अनंत उपकार आहेत. उत्पत्ति, स्थिति, आणि लय, हीं त्याचीं साहाजिक कर्में होत. सर्व विश्वचालक तो आहे. आणि परिणामीं सर्वांस त्यापाशीं जाणें आहे. ह्यास्तव, विश्वावलोकनावरून त्याचें चातुर्य, दयालुत्व, आणि सर्वशक्तित्व हीं मनतां आणून त्याला अनन्य भावें शरण रिघावें, हेंच सुज्ञ जनांस उचित होय.

## अलक्‌दर आणि सेप्तिमियस.

ग्रीस देशामध्यें अथेन्स ह्मणून एक प्रख्यात शहर आहे, तेथें प्राचीन काळीं एक मोठें विद्यालय होतें. त्यांत अलक्‌दर आणि सेप्तिमियस ह्या नांवांचे दोन विद्यार्थी होते. ह्यांतील पहिला अथेन्सचा राहाणारा होता; व दुसरा रोम शहराहून तेथें विद्याभ्यासाकरितां आला

होता. ते दोघे सहाध्यायी होते. अलक्‍दर ह्याची बुद्धि तीक्ष्ण असून त्याचे विचार गहन असत; आणि सेप्तिमियस हा मोठा वक्ता होता. दोघांच्याही विद्वत्तेची चोंहींकडे मोठी प्रसिद्धि होती. ते एकमेकांवर पराकाष्ठेची प्रीति करीत असत.

बराच विद्याभ्यास झाल्यावर अलक्‍दरास वाटलें कीं, आतां आपण घरदार करावें. ह्मणून त्यानें हैपाशिया नामक एका रूपवती तरुण स्त्रीशीं लग्न करण्याचा बेत ठरविला. लग्नाची सगळी तयारी होऊन राहिली; वेळ नेमिली; आणि लग्न लागण्यापूर्वी जे कांहीं शिष्टाचार व्हावयाचे, तेही होऊन गेले. पुढें लग्न लागणार, इतक्यांत, ह्या समारंभास आपला जिवलग मित्र सेप्तिमियस ह्यास बोलवावें, असें अलक्‍दराच्या मनांत आलें; आणि त्यानें लागलेंच त्याला बोलावून आणिलें. सेप्तिमियस तेथें येऊन बसतो सवरतो इतक्यांत, नवरी मुलगी, हैपाशिया, वस्त्रभूषणांनीं मंडित अशी त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच त्याचे मनांत तिजविषयीं कामवासना अशी प्रबल उत्पन्न झाली कीं, ती सांगतां पुरवत नाहीं. तिनें त्याची अगदीं उचल केली. विद्या, ज्ञान, शाहाणपण, मानापमान, लोकरीति, हें सर्व तो अगदीं विसरून जाऊन वेड्यासारखे चाळे करूं लागला. आणि त्याला तापही पराकाष्ठेचा भरला. त्याची प्रकृति पुष्कळ वैद्यांनीं पाहिली; पण त्यांस कांहींच परीक्षा होईना. तेव्हां, आतां हा हातीं लागत नाहीं, असें सर्वांस वाटलें. अलक्‍दराचें लग्नही खोळंबलें. आपला मित्र मरतो, त्या अर्थीं आपण

त्याची शेवटची चाकरी करावी, ह्मणून तो आपल्या भावी पत्नीसहवर्तमान त्याजपाशीं जाऊन बसला. ती जवळ येतांच सेप्तिमियसाचे चर्येंत फरक पडला तो जवळच्या वैद्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला. तेव्हां, तुझ्या दुखण्याचें कारण हेंच काय? असें त्यांनीं त्याला खोदखोदून विचारिलें. त्यावेळीं त्यानेंही तें, हो, ना, ह्मणत कबूल केलें.

ह्या प्रसंगीं अलक्झंदराच्या मनाची जी स्थिति झाली असेल, ती लिहिलेली वाचण्यापेक्षां वाचणारांस सहज लक्षांत आणितां येईल. आतां करावें काय, हें त्याला सुचेना. त्यावेळेच्या सुमारास अथीनियन लोकांच्या अंगच्या सद्गुणांची इतकी पराकाष्ठा झाली होती कीं, परोपकारार्थ ते आपल्या जीवांकडे किंवा प्रतिष्ठे-कडे सुतरां पहात नसत. अलक्झंदरानें, आपल्या सु-खाकडे व अब्रूकडे लक्ष्य न देतां, मित्राचा जीव वांचवि-ण्यासाठीं, हेपाशिया हिचें लग्न सेप्तिमियस ह्याशीं लाव-ण्यास अनुमत दिलें. त्याप्रमाणें तें गुप्तपणें लागलें. सेप्तिमियस खडखडीत बरा झाला. आणि तो लागला-च आपल्या प्रियेसहवर्तमान मोठ्या आनंदानें रोम शहरास गेला. तेथें त्याच्या विद्वत्तेप्रमाणें त्याला सर-कारचीं कामें मिळत जाऊन, चढतां चढतां तो मुख्य न्यायाधीशाचें पद पावला.

इकडे अलक्झंदराला, आपल्या हातची बायको गेली, व ती ज्या साठीं खर्चिली तो मित्रही सोडून गेला, ह्याचें परम दुःख झालें, इतक्यानेंच संपलें नाहीं. तूं पैसा घेऊन बायको विकली, अशा आरोपानें त्याचे

ग्रामस्थ त्याला छळूं लागले. त्यांची त्यानें नाना प्रकारें समजूत केली; तरी ते कांहींच ऐकेनात. त्यांनीं त्याला जातिबहिष्कृत केलें, आणि त्याजपासून पुष्कळ दंड घेण्याचें ठरविलें. तो त्याच्यानें देववेना ह्मणून त्यांनीं त्याची जिनगी जप्त केली. तिजपासूनही पुरती रकम उत्पन्न झाली नाहीं. तेव्हां त्यांनीं त्यालाच थ्रेस येथील एका व्यापाऱ्यास विकलें, आणि दंडाची रकम भरून घेतली. ह्या प्रमाणें अलूकंदर गुलाम होऊन राहिला.

अलूकंदराचा धनी फार निर्दय होता. त्यानें त्याला आपलीं गुरें राखण्याचे कामास लाविलें; आणि सांगितलें कीं, तुला खायाप्यायाला घरांतून कांहीं एक मिळावयाचें नाहीं; तूं आपली उपजीविका पाहिजे तशी शिकारीवर कर. ह्या आज्ञेप्रमाणें वागणें त्याला भाग पडलें. दररोज उजाडलें ह्मणजे, आज कांहीं पोटाला मिळेल कीं नाहीं, ह्या चिंतेंत तो असे. हिंवाळा आणि पावसाळा हे तर त्याला प्रति मृत्युच वाटत असत. कां कीं, आंग आच्छादण्याला त्याजवळ एक देखील धड वस्त्र नव्हतें. तीन तीन दिवस खडखडीत उपास काढावे लागत; तेणेंकरून आंगांत शक्ति नाहींशी झाली. तेव्हां ह्या अशा दास्यापेक्षां मरण पुरवलें, असा विचार करून, त्यानें पळून जाण्याचा निश्चय केला; आणि त्याप्रमाणें धन्याचा डोळा चुकावून संधि साधिली. दिवसास गुहांत लपून बसावें, आणि रात्रीं मजल करावी, असें करीत करीत तो रोम शहरीं आला. त्याच दिवशीं त्याचा जिवलग मित्र, सेप्तमियस, हा शहरच्या एका अफाट प्रसिद्ध जागीं आपलें दरबार भरून इनसाफ करीत होता.

तेथें अल्कंदर जाऊन, इतर गरीब लोकांच्या गर्दीं-त उभा राहिला. त्याला विचारतो कोण? माझा मित्र मला ओळखील अशी आशा धरून तो त्याजकडे एक-सारखा टक लावून पाहात होता. पण ती सर्व आशा व्यर्थ गेली. संध्याकाळ झाला. तेव्हां, आपणच जा-ऊन त्याला आतां ओळख द्यावी, अशा बेतानें तो हळू-हळू न्यायासनाकडे चालला. त्याला शिपायांनीं मज्जाव ह्मणून, दोन गचंड्या देऊन हांकून लाविलें. नंतर अंधार पडला; तेव्हां, आतां निजावें कोठें, आपणाला जागा कोण देतो, हा विचार त्या बिचाऱ्यास प्राप्त झाला. रस्त्यांत पडावें, तर काय होईल कोण जाणे, असें मनांत आणून तो, गांवाबाहेर एक जुनी मशीद होती, तींत जाऊन निजला.

तेथें निजावयास खालच्या फरसबंदीवांचून दुसरें कांहीं त्याला नव्हतें. तथापि, 'भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा' ह्या ह्मणीप्रमाणें त्याला तेथें गाढ झोंप लागली. मध्यरात्र झाली, जिकडे तिकडे सामसूम होऊन गेलें. इतक्यांत, दोन चोर, एका माणसाचें घर फोडून आंतील सर्व द्रव्य घेऊन, वांटे करण्याक-रतां त्या भयाण मसीदीच्या पुढच्या मैदानांत आले. त्यांचें लहान मोठ्या भागांविषयीं भांडण लागलें. तेव्हां एकानें आपली तलवार उपसून दुसऱ्यावर वार केला. तेणेंकरून तो तात्काळ मरण पावला; आणि पहिला सर्व द्रव्य घेऊन पळून गेला. पुढें उजाडलें. तरी तें प्रेत तेथेंच पडलें होतें. तें जवळच्या लोकांनीं पाहून, मसीदींत कोण आहे, ह्याची चौकशी केली. तों आंत

हे बुवा निजलेले होते, ते आयतेच सांपडले. मग अलूकंदराची अवस्था काय पुसावयाची आहे? त्याला प्रथमतः खूब मारिलें; चतुर्भुज केलें, आणि चौकशी होऊन शिक्षा करण्यासाठीं, मुख्य न्यायाधिश जो सेप्तमियस ह्याच्या कचेरीकडे चालविलें. तेव्हां त्यानें आपले जीवाची आशा सोडिली; आणि, माझ्या प्रारब्धीं अशीं च दुःसह दुःखें भोगावयाचीं आहेत, तर कसा तरी लवकर एकदां जीव जावो, असें तो मनांत आणूं लागला. स्वसंरक्षणाविषयीं मी एकही शब्द बोलिलों नाहीं, ह्मणजे मजवर अपराधाची शाबिदी होऊन, माझें इच्छित कार्य लवकर सिद्धीस जाईल, असें मनांत आणून त्यानें मौन धरण्याचा निश्चय केला. अशा स्थितींत तो न्यायाधीशापुढें उभा राहिला. तो त्याचा अन्याय पाहून त्याला आतां मरणाची शिक्षा सांगणार, इतक्यांत, त्याची नजर कैदीच्या तोंडाकडे गेली. तें उपासांनीं व दुःखांनीं अगदीं वाईट होऊन गेलें होतें. तेणंकरून तो सेप्तिमियस ह्यास प्रथमतः ओळखतां आला नाहीं. परंतु, अंधारांतल्या एकाद्या पदार्थावर, प्रकाशकिरण जरी अंधक पडले असले, तरी त्याजकडे टक लाविली असतां, तो सहज ओळखतो; त्याप्रमाणें सेप्तिमियसानें अलूकंदराचें तोंड ओळखिलें. आणि तात्काळ सिंहासनावरून खालीं उडी टाकून त्याचे गळ्यास गच्च मिठी मारिली. तेव्हां अलूकंदराचा आनंद त्रैलोक्यांत मावेना! उभयतांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या; हें पाहून लोकांस फार नवल वाटलें. नंतर, सेप्तिमियसानें आपल्या प्रिय मित्रापासून त्याची

सर्व हकीकत विचारून घेतली; आणि त्याला मोठें काम सांगून सुखी केलें. पुढें खऱ्या खुनी मनुष्याचाही पत्ता लागला. त्याला धरून आणून त्याजवळचें सगळें द्रव्य घेतलें; आणि त्याला जिवें मारिलें. अलूकंदराचें पुढचें सर्व आयुष्य सुखांत गेलें. त्यानें आपल्या समाधीच्या दगडावर खोदण्यासाठीं एक वाक्य लिहून ठेविलें होतें; त्याचें तात्पर्य येणें प्रमाणें:—

आर्या.

विश्वंभर जीपासुनि, पाडूं न शके सुदीन जन पार
ऐशी दुःखावस्था, लोकीं नाहींच फार अनिवार ॥ १॥

---

## ब्रितन देशांतील राज्यव्यवस्था.

ह्या देशाचा बहुतेक भाग हल्लीं इंग्लिश लोकांच्या ताब्यांत आहे. त्याचा राज्यकारभार ते कसा चालवितात, हें नेहमीच्या वहिवाटीवरून व इतिहासावरून समजतच आहे. आतां, जेथें आपला मुख्य राजा राहतो, व जेथून ह्या देशाच्या राज्यव्यवस्थेचीं सूत्रें हालतात, त्या इंग्लंद देशाच्या राज्यसत्तेचें संक्षिप्त वर्णन करितों.

इंग्लंदची राज्यसत्ता ही, राजा, बडेलोकांची सभा, व साधारण लोकांचे मुक्त्यारांची सभा, ह्या तिघांचे मिळून हातीं आहे.

राजा.—नार्मन लोकांनीं इंग्लंद काबीज केल्यापूर्वी काय असेल तें असो, पण त्यांनीं तें काबीज केल्यावर पुढें त्या देशाचा राजाधिकार वंशपरंपरेनें चालत आला आहे. तो असा. राजा मरेल आणि त्याला अनेक

मुलगे असतील, तर वडिलास गादी मिळावी; जर एक मुलगा आणि एक मुलगी असेल, तर मुलग्याला मिळावी; सगळ्या मुलीच असतील, तर थोरलीस मिळावी; एक मुलगी आणि एक बहीण असेल, तर मुलीस मिळावी; मुलें मुळींच नसलीं तर, भाऊ आणि बहिणी, ह्यांत वयानें व नात्यानें ज्याचा विशेष हक्क पोंचेल, त्यास मिळावी; ह्याप्रमाणें राजाची गादी देण्याची वहिवाट चालू आहे. तथापि, योग्य दिसल्यास, हे नियम मोडून व्यवस्था करण्याचा अधिकार, पूर्वीं सांगितलेल्या दोन सभांस ह्मणजे पार्लमेंतास आहे.—राजकुलांतील मनुष्यानें क्याथलिक मताच्या माणसाशीं लग्न लावूं नये; राजकुलांत उत्पन्न झालेल्या कोणाचेंही लग्न राजाच्या अभिप्रायावांचून होऊं नये; लग्न होण्यापूर्वीं कांहीं दिवस ज्याला लग्न कर्तव्य असेल त्यानें त्याविषयींचा आपला बेत प्रसिद्ध केला पाहिजे. इतकें करूनही तो त्याचा लग्नसंबंध पार्लमेंत सभा नापसंत करील, तर तें लग्न लागावयाचें नाहीं; अशा लग्नाच्या अटी आहेत.— राजा लहान असल्यामुळें अथवा कांहीं कामानिमित्त तो परदेशीं गेल्यामुळें, अथवा दुसऱ्या एकाद्या योग्य कारणामुळें, तो कारभार चालविण्यास असमर्थ असेल, तर त्याचें काम करण्यास योग्य मनुष्य नेमण्याचा पार्लमेंत सभेस अधिकार आहे.—राजा प्रातेस्तंत पथाचा असला पाहिजे.—राजास राज्याभिषेक होतो त्यावेळीं, "मी सर्व राज्य पार्लमेंताच्या कायद्यांप्रमाणें व देशरीतीप्रमाणें चालवीन; न्याय आणि कायदे ह्यांच्या अनुरोधानें वागेन; प्रातेस्तंत पथ आच-

रीन; आणि ह्या पंथाच्या उपदेशकांस भजनालयें वगैरे जें कांहीं दिलेलें आहे, तें तसेंच चालवीन" अशी शपथ त्याला सर्व लोकांसमक्ष घ्यावी लागते.—कायदे ठरविणें, ते अमलांत आणणें, न्याय, तह, लढाया वगैरे करणें, पदव्या देणें हीं कामें राजाच्या नांवानें होतात; तथापि अगदीं स्वतंत्रपणें त्यांपैकीं एकही काम करण्याचा त्याला अकत्यार नाहीं. तो मुख्याधिकारी नांवानें मात्र आहे.—राजाज्ञेवरून प्रधानानें किंवा दुसऱ्या एकाद्या मोठ्या अधिकाऱ्यानें कांहीं कृत्य केलें, आणि त्याचा परिणाम वाईट झाला, तर त्याचा दोष लोक राजाला लावीत नाहींत; तर, त्या प्रधानाला किंवा अधिकाऱ्याला लावतात. "राजाच्या हातून कधीं अपराध घडत नाहीं" अशा अर्थाची जी एक ह्मण इंग्लिश लोकांत आहे, ती ह्यावरूनच पडली असावी.—सरकारी फौजेस व आरमारास जो पैसा लागतो, त्याची सगळी लगाम साधारण लोकांच्या मुक्त्यारांच्या सभेच्या हातीं असते. तेणेंकरून राजाला प्रजेच्या अनुमतानें वर्तावें लागतें; व तिचें हरएक प्रकारच्या जुलमांपासून संरक्षण करावें लागतें.— इंग्लंदच्या राजाच्या अधिकाराविषयीं एका विद्वान ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, " इंग्लंदच्या राजास फौजेवर व आरमारावर हुकूम चालविण्याचा अधिकार आहे; परंतु, पार्लमेंताच्या संमतीवांचून तो त्यांस नौकरीस ठेवण्यास मुखत्यार नाहीं. तो लोकांस पदव्या देण्यास मुक्त्यार आहे; परंतु, त्या अंमलांत आणण्यास पार्लमेंताचें अनुमत पाहिजे. लढाई करण्याचें ठरविणें हें राजाकडे आहे; परंतु, ती चालविणें हें

पार्लमेंताच्या मान्यतेवांचून व्हावयाचें नाहीं. सारांश, प्रजेवर कर बसविण्याचा व तो वसूल करण्याचा अधिकार राजास स्वतंत्रपणें नसल्यामुळें, तो अगडबंब, परंतु स्वतःसिद्ध चलनवलनास असमर्थ, अशा शरीराप्रमाणें आहे. अथवा, राजा हें एक मोठें जाहाज उत्कृष्ट प्रतीच्या माळानें भरून तयार असें आहे; त्याला पार्लमेंत सभा, हा समुद्र आपणावर येऊं देईल, तरच तें चालेल; नाहीं तर खडकावर पडलें राहील; अशी कल्पना केली तरी शोभेल."— पार्लमेंत सभा भरविण्याचा अधिकार राजाला आहे. ती भरण्याबद्दल अगोदर चाळीस किंवा पन्नास दिवस त्याला जाहिरात प्रसिद्ध करावी लागते. प्रसंग पडल्यास राजाच्या संमतीवांचूनही पार्लमेंत सभा भरते.— राजाच्या खुद्द खासगी खर्चाकडे पूर्वीं भारी पैसा दिलेला असे. परंतु विकतोरिआ महाराणी सिंहासनावर बसली, तेव्हां तिच्या खर्चाकडे दरसाल ३८५०००० रु० नेमणुकीचा ठराव झाला. ह्याखेरीज तिच्या कुटुंबांतील मनुष्यांच्या नेमणुकी वेगळ्या आहेत. ही राणी हिच्या पूर्वीं जो राजा इंग्लंदाच्या गादीवर होता त्याची पुतणी. ही इ० स० १८३७ त गादीवर बसली. इ० स० १८४० त हिचें लग्न प्रिन्स आल्बर्त ह्याशीं झालें; तो इ० स० १८६४ त मरण पावला. ह्या राणीला नऊ मुलें आहेत, व राज्यकारभार चालविण्यासाठीं हिजपाशीं १६ प्रधान आहेत; सरकारी कामासाठीं मोठमोठे कचेऱ्यांचे वाडे ४२ आहेत; शिवाय, इनसाफाचीं सात कोर्तें आहेत. ह्या कोर्तांत सर्वांत वरिष्ठ कोर्त पार्लमेंत

सभा ही होय. तींत दोन भाग आहेत. १ ला, बडे लोकांची सभा; व २ रा सामान्य लोकांच्या मुक्त्यारांची सभा. बडे लोकांच्या सभेंत सुमारें ४६२ गृहस्थ आहेत; व लोकांच्या मुक्त्यारांच्या सभेंत सुमारें ६०० लोकांहून अधिक आहेत.

बडे लोकांची सभा.— ह्या सभेंत मुख्यत्वें दोन प्रकारचे बडे लोक असतात. ते हे कीं, सरदार अथवा उमराव लोक; आणि धर्माध्यक्ष अथवा पाद्री लोक. ह्या सभेंतील सभासदांच्या जागा वंशपरंपरेनें चलतात. ह्या सभेंत पाद्री लोकांस जागा आहे, तिचें कारण ते धर्माध्यक्ष आहेत ह्मणून नव्हे; तर, त्यांच्या कामाच्या संबंधानें त्यांजकडे जमीन पुष्कळ असते, ह्मणून त्यांस सभेंत बोलाविण्याचा प्रघात पडून गेला आहे. ह्या सभेंत बसणाऱ्या इंग्लंदच्या उमरावांच्या संख्येची कांहीं इयत्ता नाहीं. परंतु, स्कातूलंदचे १६ असावे, असा पूर्वापार पाठ चालत आला आहे. सभेच्या दिवशीं स्वतः जाण्यास न बनल्यास कोणी चांगला मनुष्य आपल्या वतीनें पाठविण्यास सभासदास अधिकार आहे. ही सभा सर्वांत मोठी न्यायाची कचेरी आहे, असें सर्व इंग्लिश लोक मानितात. स्कातूलंदांतील जस्तिशियर न्यायसभा खेरीजकरून, बाकी सर्व न्यायाधीशांचे निवाड्यांवर अपील घेण्यास व त्याचा योग्य निकाल करण्यास ह्या सभेला अधिकार आहे. तथापि बडे लोक खुद्द बसून न्याय निवाडितात असें नाहीं. अपिलें घ्यावीं, पुरावा पाहावा, पूर्वीं ज्यांनीं त्याचा फैसला केला असेल, त्या न्यायाधीशांचे अभिप्राय आणवावे, सर्व गो-

ष्टींचा विचार करावा, आणि जें बहुमतें ठरेल तें, सभासदांपैकीं एका विद्वान पुरुषानें बोलून दाखवावें, अशी वहिवाट आहे. एकाद्या सभासदावर कांहीं आरोप आल्यास, त्याची चौकशी, त्याच्या बरोबरीच्याच कांहीं सभासदांनीं करावी, असा पाठ आहे.

साधारण लोकांच्या मुक्त्यारांची सभा.—हिजमध्यें सध्या ६५८ लोक आहेत. त्यांपैकीं ५०० इंग्लंदाच्या वतीचे, ५३ स्काटूलंदाच्या वतीचे, व १०५ ऐरलंदाच्या वतीचे, असे आहेत. हे लोक निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळ्या लोकांनीं पाठविलेले असतात. तथापि, एकंदर सर्व रयतेस सुख होईल, अशा गोष्टी त्यांनीं केल्या पाहिजेत, असा समज आहे. ह्या सभासदांच्या नेमणुका कोठें कोठें लोकांच्या हातीं आहेत, व कोठें कोठें सरकारी नौकरांच्या हातीं आहेत. ज्यांस दरसाल पांचसात हजार रुपयांचें उत्पन्न असेल, व जो अब्रूनें मोठा असेल त्यासच ह्या सभेंत जागा प्राप्त होते. कोणत्याही सरकारि कामास पैसा देणें झाल्यास त्याजविषयीं प्रथमतः ह्या सभेची मान्यता घ्यावी लागते; नंतर तें प्रकरण बडे लोकांची सभा व राजा ह्यांचे पुढें जावें, अशी वहिवाट आहे.

पार्लमेंत सभा.—राजा व पूर्वीं सांगितलेल्या दोन सभा ह्यांस, पार्लमेंत, असें एकवट नांव आहे. फक्त त्या दोन सभांसही पार्लमेंत असें ह्मणतात. हा दुसरा अर्थच ह्या ठिकाणीं ग्राह्य आहे. एकादा कायदा दोन्ही सभांनीं मंजूर केला, परंतु तो जर राजास पसंत नाहीं, तर तो कदापि अमलांत यावयाचा नाहीं. राजा

आपली मंजुरी स्वमुखानें सांगतो, अथवा ती लिहून प्रकट करितो. एकादा कायदा पार्लमेंतानें पसार करूनही जर, तो राजास आवडला नाहीं, तर आपणाला तो न आवडल्याबद्दलचा आपला अभिप्राय तो "मला हा साफ आवडत नाहीं" अशा उद्धत भाषणानें दर्शवीत नाहीं; तर 'ह्याविषयीं मला कांहीं बोलायाचें आहे' असें सौम्य व सभ्य रीतीनें तो दर्शवितो. ह्यावरून पार्लमेंताचा मान व दर्जा हे केवढे आहेत ते पाहा!! असो.

न्याय करणें, राज्यकारभार चांगले रीतीनें चालविण्यास राजास मदत करणें, व हरएक प्रसंगीं त्यास सल्ला व मसलत देणें, हें पार्लमेंताचें मुख्य कर्त्तव्य कर्म आहे.

## न्याय.

कोणा एका मुसलमान बादशाहाची स्वारी फिरतां फिरतां अलवार नामक शहरीं गेली होती. तेथें त्याच्या मोठ्या सैन्याचा तळ बरेच दिवस पडला होता. त्यामध्यें कोणी एक लष्करी अंमलदार फार अविचारी व दुराचारी होता. तो नित्यशः रात्रीं शहरांत जाऊन एका शेतकऱ्यास त्याचे घरांतून मारहाण करून हुसकून लावून त्याच्या सुंदर व तरुण स्त्रीचा उपभोग घेत असे. शेतकऱ्यानें त्याला नाना प्रकारांनीं बोध केला, व त्याचे पायही धरिले, तरी तो कामांध कांहींच ऐकेना. शेवटीं त्यानें खुद्द बादशाहाची गांठ घेऊन त्यास ती सर्व हकीकत सांगितली. बादशाहा त्याला त्याच्या खुणामुद्रा विचारूं लागला. तेव्हां त्यानें त्याचें सर्व यथास्थित वर्णन

केलें. तें ऐकून बादशाहा अत्यंत खिन्न झाला, आणि उष्ण श्वास टाकून त्यास बोलिला, "बरें आहे; जा तूं आतां; कांहीं फिकीर करूं नको; इतकें मात्र कर कीं, तो आज रात्रीं तुझे घरांत आला ह्मणजे तूं तात्काळ येऊन मला कळीव, ह्मणजे मी सर्व बंदोबस्त करीन." नंतर प्रहर रात्रीच्या सुमारास तो दुष्ट नित्याप्रमाणें त्या शेतकऱ्याच्या घरांत शिरून त्याच्या स्त्रीशीं रत झाला. हें पाहून, संकेताप्रमाणें, तो शेतकरी बादशाहाकडे गेला, आणि त्याला त्यानें सूचना केली. तेव्हां बादशाहा आपणाबरोबर फक्त २५ स्वार व मशाला घेऊन मोठ्या लगबगीनें निघाला तो थेट शेतकऱ्याच्या घरापाशीं येऊन उभा राहिला. बादशाहानें स्वारां-कडून लागलाच घरास वेढा घालविला; व सगळ्या मशाली विझवविल्या; आणि घरांतील मनुष्यांस दरवाजा उघडण्याविषयीं पुष्कळ हाका मारविल्या, तरी कोणी ओ देईना कीं दार उघडीना. तेव्हां बादशाहानें कुऱ्हाडी घालून दरवाजा फोडविला, आणि आंत जाऊन प्रथमतः दिवे मालविले. नंतर त्या मनुष्यास पकडून एकदम ईश्वराच्या नांवानें मोठा जयजयकार करून त्या गडबडींत त्याला ठार मारिलें.

इतकें झाल्यानंतर, दिवे लाववून बादशाहानें तें प्रेत पाहातांच त्याच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. आणि हात जोडून व गुढगे टेंकून व डोळे मिटून तो परमेश्वराची प्रार्थना करूं लागला. ती आटो-पल्यावर त्या शेतकऱ्याकडून त्यानें थोडीशी भाकर आणवून ती कोरडीच खाल्ली, आणि पाणी प्यालें.

हें बादशाहाचें कृत्य पाहून जवळच्या लोकांस मोठा अचंबा वाटला. आणि ते आपसांत कुजबुजूं लागले. तथापि असें करण्याचें कारण काय, असें बादशाहाला विचारण्यास कोणाला धीर होईना. तेव्हां तो निष्कपटी व भला शेतकरी बादशाहापुढें येऊन हात जोडून ह्मणाला, "महाराज, एक विनंती आहे; ती अभय असल्यास करीन" बादशाहा बोलला, "बोल कायतें; अभय आहे." शेतकरी मोठ्या आदबीनें ह्मणाला, "खुदावंत, माझी गरीबाची दाद घेऊन आपण तसती घेऊन येथवर येऊन दुष्टाचा नाश केला, येणेंकरून आपले मजवर अपरिमित उपकार झाले आहेत. परंतु, प्रभूंनीं, येथें आल्याबरोबर सगळा उजेड नाहींसा केला, परमेश्वराच्या जयघोषाचे गडबडींत दुष्ट मारला, त्याचें प्रेत पाहिल्याबरोबर डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागून परमेश्वराची प्रार्थना केली, आणि राजाधिराज असून कोरडीच भाकर खाल्ली, ह्या कृत्यांचीं कारणें आह्मां मूढ जनांस अज्ञात आहेत, तवढीं राजमुखानें ऐकावीं, अशी सेवक जनांची इच्छा आहे. ती पुरविणार प्रभु समर्थ आहेत." हें ऐकून घेऊन बादशाहानें उत्तर केलें, "अरे चतुर पुरुषा, त्यांचीं कारणें मी यथाक्रम सांगतों तीं ऐक. ग्रीस देशामध्यें प्राचीन काळीं सात महाविद्वान पुरुष होऊन गेले. त्यांच्या मध्यें एके दिवशीं असा प्रश्न निघाला कीं, "लोकांस हितावह असें राज्य कोणतें?" त्याचीं उत्तरें साहा असामींचीं वेगवेगळालीं पडलीं. नंतर त्यांच्या मधला मुकुटमणी जो सोलन नामा तत्वज्ञानी, त्यानें असें उत्तर दिलें कीं, 'ज्यांत गरीबगुरिबांची दाद चांगली लागते

तेंच राज्य सर्वोत्तम होय;' हें उत्तर बिनमोल आहे. आणि ह्या गुणावरूनच माझे राज्यास लोकांनीं वाखाणावें, असें मी इच्छितों. मी तुझी दाद घेऊन ह्या दुष्टास मारिलें, ह्यांत मी मोठा पुरुषार्थ केला असें नाहीं. मी असें करावें असा माझा राजधर्मच आहे. तुझी दाद घेतली नसती, आणि हा जुलूम असाच चालूं दिला असता, तर मात्र मी दोषास पात्र झालों असतों. तर त्याचा मी बंदोबस्त केला हें मोठें पुण्यकर्म मी केलें, असें मला वाटत नाहीं. पहा बरें, आमच्या पाहारे-कऱ्यानें आमचा खजीना बरोबर राखला, तर त्यानें मोठें पुण्य जोडिलें किंवा आह्मांवर उपकार केले, असें आम्ही समजतों काय? नाहीं. कां कीं, तें त्याचें कर्त्तव्यच आहे. तें तो न करील, तर मात्र तो गुन्हेगार होईल; परंतु तें करील तर तो मोठा पराक्रमी किंवा पुण्यशील, असें आह्मीं समजत नाहीं. त्याचप्रमाणें आह्मी राजांनीं प्रजांचें हरएक जुलमापासून रक्षण करावें हा आमचा धर्मच आहे, तो आह्मीं पाळिला, तर मोठा शतक्रतु केला असें नाहीं. आतां उजेड कां नाहींसा केला ह्मणून ह्मणतोस, तर त्याचें कारण ऐक. न्याय बरोबर करण्यास सर्व साक्षित्व, निष्पक्षपातीपणा, आणि पूर्णसामर्थ्य ह्या तीन गोष्टी अवश्य पाहिजेत. सर्व साक्षित्वाच्या योगानें अपराध्याची कच्ची हकीकत समजते; निष्पक्षपातीपणानें अपराध्यास योग्य शासन, व निरपराध्यास शासनापासून मुक्तता, हीं करतां येतात; आणि पूर्ण सामर्थ्याच्या योगानें केलेले ठराव बजावितां ह्मणजे अमलांत आणितां येतात; असें आहे. जे अप-

राध आह्मांस समक्ष पाहाण्यास सांपडत नाहींत, त्यांच्या चौकशीमध्यें सर्वसाक्षित्वाचा जो अंश आह्मांस अवश्य पाहिजे, तो आह्मीं साक्षीदार मनुष्यें व मुद्याचा माल, ह्यांच्या द्वारें संपादवेल तितका संपादितों. आजच्या चौकशींत तशा प्रकाराचें मुळींच कारण पडलें नाहीं; कां कीं, गुन्हेगार मुद्यासुद्धां आह्मीं खुद पकडला. दुसरा गुण निःपक्षपातीपणा; तो साधण्यासाठीं मी दिवे व मशाला विझविल्या; ह्यांतलें तात्पर्य असें. माझा वडील पुत्र, शाहाजादा, हा तरुण असून कांहीं बाहेरख्याली आहे. तो तर हा अपराधी नसेलना, अशी मला शंका प्राप्त झाली. आणखी असा विचार मनांत आला कीं, जर दुर्दैवेंकरून तोच हा असला आणि त्याचें रूप पाहिलें अथवा शब्द ऐकला, तर पुत्रवात्सल्य कदाचित माझ्या न्यायबुद्धीत खाऊन टाकील, आणि तेणेंकरून तो महान् अपराधी असतांही निर्बाध सुटून जाईल, हें बरोबर नाहीं. आणि हा अपराधी माझा पुत्र तर नसेलना अशी जशी मला भीति होती, तशी कदाचित् तो त्याहून निराळा असेल, अशी आशाही होती. ह्मणून, तो कोण हें त्यास शिक्षा करण्यापूर्वी आपणाला समजूं नये, ह्या हेतूनें मनुष्य ओळखण्याचे जे दोन तथ्य मार्ग, स्वरूपावलोकन व शब्दश्रवण ते नाहींतसे करण्याकरितां मी मशाली विझवविल्या व मोठा जयशब्द करविला. ह्या जगामध्यें उघड अपराधी दंड न पावतां सुटून जातात, व उघड निरपराधी दंड भोगितात, ह्याचें एक मुख्य कारण असें आहे कीं, माझी चौकशी करणारा कोण, हें अपराध्यास ठा-

ऊक असतें, व अमक्या खटल्याची चौकशी माझे हा-
तून व्हावयाची, हें न्यायाधीशास माहीत असतें,
हें ज्ञान जर उभयपक्षींही नसेल, तर पूर्वोक्त
अन्याय व्हावयाचा नाहीं. ह्मणजे न्यायाधीश आणि
आरोपित जन, हे जर एकमेकांस अश्रुत असले, तर
त्यांच्या मनांत लांच, लोभ, प्रीति, ममता, दया, ह्यांस
मार्ग मिळत नाहीं; आणि ह्यांस मार्ग मिळाला नाहीं,
ह्मणजे केवळ पुराव्यावरहुकूम न्याय होण्याला अटकाव
होत नाहीं. प्रेत पाहिल्याबरोबर माझे डोळे पाण्यानें
भरले, व मी परमेश्वराची प्रार्थना केली, ह्याचें कारण
असें कीं, जगत्कर्त्या न्यायी प्रभूनें, माझे हातून योग्य न्याय
करवून, माझ्या प्रिय पुत्राचा वध मजकडून घडविला
नाहीं, असें मनांत येऊन माझा कंठ भक्तिरसानें दाटून
गेला, तेव्हां सहजच माझे नेत्रांतून अश्रु वाहूं लागले,
व माझ्या दयाळू मायबापा परमेशाची प्रार्थनाकरण्या-
विषयीं मला बुद्धि झाली. तर ह्यावरून जगत्रा-
त्याचें कौतुक किती अगाध आहे बरें! असो. आतां
भाकर खाण्याचें कारण कायतें सांगतों ऐक; अरे, तूं म-
ला हें वर्तमान सकाळीं सांगितलें, तेव्हांच माझे मनांत
आलें कीं, हें कर्म शाहाजाद्याचें असावें, ह्मणून त्याचें
पारिपत्य करण्यांत माझे हातून पुत्रवध झाल्यावांचून रा-
हात नाहीं. ह्या काळजीनें तेव्हां पासून ह्या वेळेपर्यंत
मला अन्नपाणी कांहींच गेलें नाहीं. तेणेंकरून मला
पराकाष्ठेची भूक लागली होती, ह्मणून मी ती भाकर
खाल्ली. ती नुसती भाकर होती, तरी हा आनंदाचा
प्रसंग देवानें मला दाखविला, त्याच्या योगानें ती मला

केशरी बर्फीपेक्षांही अधिक गोड लागली. अस्तु. अगदीं बरोबर न्याय करण्यास पूर्वीं बोललों ते गुण पूर्णपणें प्राप्त झाले पाहिजेत. तसे गुण ह्या मृत्युलोकीं मानवांचें ठायीं असणें अशक्य आहे. ते माझ्या कृपाळू न्यायी देवाचे ठायीं मात्र पूर्णत्वेंकरून वास करीत आहेत, आणि सर्वांचा वाजवी न्याय करणारा तोच आहे.—आपण मनुष्यांनीं अपराध संबंधें पुरावा होईल तितका मिळवून, केवळ त्याच्या आधारानें, ह्मणजे, द्रव्यलोभ, ममता, ह्यांचें कांहीं चालूं न देतां, शास्त्राप्रमाणें देवाला भिऊन न्याय करावा, हेंच आपलें कर्तव्य आहे." येणेंप्रमाणें बादशाहाचें भाषण ऐकून सर्व लोक फार खुष व आभारी झाले. नंतर ते तेथून उठून आपापले घरीं गेले.

## द्रव्याचा व्यय.

सत्कृत्यामध्यें व सन्मानार्थ पैसा खर्चणें, हा द्रव्याचा सद्व्यय होय. प्रसंगविशेषीं खर्च करणें तो त्या प्रसंगाची योग्यता व आपली प्राप्ति ह्यांच्या तारतम्यानें केला पाहिजे. नित्य खर्च नेहमींच्या प्राप्तीच्या मानानेंच केला पाहिजे. आदा पाहून खर्च करावा, अशी जी उपदेशपर उत्कृष्ट ह्मण आहे, ती लग्न समारंभाच्या वगैरे दिवसांस लावावयाची नाहीं असें कोणी समजतात, ही त्यांची चूक आहे. एकंदर प्राप्तीची सरासरी करून पाहतां सर्वकाळीं व सर्व प्रसंगीं ह्या ह्मणीचा अर्थ खरा आहे. ह्मणून आपला खर्च प्राप्तीपेक्षां कदापि जास्त होऊं देऊं नये. आपल्या ताब्यांतील नोकरांस पैशाची

लबाडी करण्यास सांपडूं नये, असा बेत ठेवावा. आणि प्राप्तीपेक्षां खर्च कमी होत आहे कीं नाहीं, हें हरहमेष पाहात जावें. मध्यम रीतीनें खाऊन पिऊन स्वस्थ राहावें, असें ज्याचे मनांत असेल, त्यानें आपल्या प्राप्तीच्या अर्धाइतका खर्च ठेवावा. श्रीमंत होण्याची इच्छा ज्यास असेल, त्यानें प्राप्तीचा तिसरा वांटा खर्चाकडे लावावा, व दोन वांटे शिलकेस राखावे. मनुष्य कितीही मोठा असला, तरी, आपले जमाखर्च तपासणें हें काम त्याला हलकें वाटूं नये. आपला खर्च प्राप्तीपेक्षां पुष्कळ फाजील होतो, व आपणास कर्ज होत चाललें आहे, असें ठोकताळ्यानें माहीत असतांही, कर्जाची रकम पाहिल्याबरोबर छाती दडपेल, ह्या भीतीनें, परंतु आळसाचा बाहाणा करून, कितीएक पुरुष आपले हिशेब पाहात नाहींत. परंतु, जखम पडली आहे, ती पाहून, तिला मलमपट्टी लाविल्यावांचून ती भरावयाची नाहीं, हें त्यांच्या लक्षांत कसें येत नाहीं नकळे. ज्या मोठ्या लोकांस आपले हिशेब तपासण्याची कटकट वाटत असेल, त्यांनीं असें तरी करावें कीं, नौकर लोक चांगले विश्वासू आणि खातरीचे ठेवावे; आणि त्यांच्या कामांच्या बदल्या वारंवार कराव्या; तेणें करून लबाडी होण्यास फार थोडी जागा राहाते. कां कीं, कोणालाही एकादें काम नवीन मिळालें ह्मणजे तो तें, कांहीं दिवस पर्यंत तरी, भिऊन इमानानें करीत असतो; कारण, त्यांतील कोणती लबाडी उघाडीस येईल व कोणती येणार नाहीं, हें त्याला अवगत नसतें. जे कोणी आपले हिशेब कधींच पाहात नाहींत, त्यांनीं आणखी असें तरी

करावें कीं, एकादे दिवशीं एक मधलेंच प्रकरण काढून तपासावें; ह्मणजे, नोकर लोक कांहीं तरी भीत जातील. मनुष्य कितीही संपन्न असला, तरी त्याला सर्वच प्रकारच्या खर्चांत उधळेपणा करणें उपयोगीं नाहीं. जर वस्त्राचा षोक त्याला फार असला, तर त्यानें खाण्यापिण्याच्या खर्चांत हात आंखडावा; जर घोड्याचा षोक असला, तर इतर सामानाच्या कामीं खर्च बेताबातानें करावा; अशा सवडीच्या गोष्टी अनेक काढतां येतील. तथापि एकंदरींत हें लक्षांत ठेवावें कीं, जो सर्वच प्रकारचा खर्च उधळेपणानें करितो, तो कितीही श्रीमान असला तरी, भिकेस लागल्यावांचून राहणार नाहीं. कोणा एकाद्याला कर्ज झालें असलें तर तें कर्ज फेडण्याविषयीं त्यानें उताविळपणा करूं नये. आपलें सामानसुमान विकून टाकण्याची जलदी मांडिली तर, त्यांत आपलें फार नुकसान होतें. कां कीं, आपण गरजू असल्यामुळें, आपणास मालाची योग्य किंमत मिळत नाहीं. ह्यास्तव, लोक गरजू होत तों पावेतों थोडा दम धरावा, ह्मणजे त्यांत हित होतें. हळूहळू कर्ज फेडण्यांत आणखी एक नफा आहे, तो असा. लवकर एकदम कर्ज फेडून मनुष्य मोकळा झाला तरी, कर्जाचें कारण जी ढिलाईनें खर्च करण्याची त्याची बहुत दिवस जडलेली सवय, ती, त्या त्वेषानें, कर्जाबरोबर जाते, असें नाहीं. त्या त्वेषाबरोबर ती कांहीं दिवस कमी झाली तरी तो त्वेष गेला, ह्मणजे पुनः त्याच्या बुद्धीवर, ती सवय आपला पगडा चालवून त्यास संकटांत पाडिते. हें संकट टाळण्याचा उपाय हाच आहे

कीं, आपलीं खर्चांचीं खातीं, जीं विनाकारण वाढलीं असतील, तीं दमादमानें कमी केलीं पाहिजेत. ह्मणजे त्याच्या योगानें आपला व्यर्थ खर्च कमी होईल, कर्ज फिटेल, आणि कर्ज न होऊं देण्याची मुख्य युक्ति जी बाताबेतानें खर्च करण्याची सवय, ती अंगीं जडेल. ज्याला ऋण फेडावयाचें आहे, त्यानें आपले बारीकसारीक देखील खर्च, होतील तितके कमी करावे. घरांतील हलके सलके खर्च कमी करून अडचण भोगणें पुरवलें; परंतु तसें न केल्यानें लोकांमध्यें दैन्य भोगणें हें फार अपमानास्पद आहे. एकादा नित्यखर्च सुरू करतेसमयीं, हा खर्च आपणाच्यानें अखेरपर्यंत चालवेल किंवा नाहीं, ह्याचा आधीं विचार करावा. तसाच प्रसंगविशेषीं खर्च करणें तोही दूरवर दृष्टि देऊन झेंपण्यासारखा असल्यास करावा; नाहीं तर विपत्ति आणि अप्रतिष्ठा हीं जिणें नकोसें करतात.

---

## अकबर.

ह्या बादशाहाचें नांव, त्याच्या शाहाणपणावरून अथवा मोहरेवरून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानाचें पालन करण्याचा अधिकार, यावत्कालपर्यंत, जगदीशसंकेतानुरूप ज्या अनेक प्रभूंच्या हातीं गेला, त्यांमध्यें ह्या प्रभूची उपमा ह्यालाच शोभते. विद्या, अनुभव, इत्यादि गोष्टींचा फारसा संस्कार नसतां, ह्या पुरुषानें पंचविशीचे आंत, प्रचंड राजभार स्वशिरीं धरून, तो, नव्याणव वर्षांच्या आनुभविक आणि विद्वान राजाप्रमाणें वाहून नेला; ह्यावरून ह्याची बुद्धि खचीत अलौकिक होती,

असें ह्मटलें पाहिजे. अकबराचें चरित्र फार मनोरंजक आहे. ह्मणून तें संक्षेपतः लिहून वाचकांस सादर करितों.

अकबराचा बाप हुमायून बादशाह, ह्यास शीर शाहानें पदच्युत करून पळायास लाविलें. तेंव्हां तो राज्याची आशा सोडून, सांपडलें तितकें द्रव्य बरोबर घेऊन, कुटुंबासहवर्तमान अमरकोट येथें आला. तेथील राजा राणाप्रसाद ह्यानें त्याचा अत्यादरपूर्वक स्वीकार केला; आणि सिंध देशांत राज्य मिळविण्याचे कामीं त्यास मदत देण्याचें पथकरिलें. त्याप्रमाणें तो तिकडे निघून गेल्यावर, दुसरे दिवशीं, ह्मणजे ता. १४ अक्तोबर सन १५४२ रोजीं, बादशाहाची राणी पुत्र प्रसवली. ही पुत्रजन्माची सुवार्ता हुमायुनास स्वारींत समजली. मुसलमान लोकांत अशी चाल आहे कीं, अशा प्रकारची आनंदकारक बातमी समजली ह्मणजे तेंव्हां जे कोणी इष्टमित्र जवळ असतील, त्यांस स्वसामर्थ्यानुरूप नजराणे द्यावे. ह्यावेळीं हुमायुनापाशीं एक कस्तूरीची कुपी खेरीज करून दुसरें कांहींएक नव्हतें. ह्मणून ती कुपी फोडून त्यानें तींतील कस्तूरी तेथच्या मंडळीस वांटली; आणि असें ह्मटलें कीं, ह्या कस्तूरीच्या सुवासाप्रमाणें माझ्या पुत्राची कीर्ति ह्या जगांत पसरो. हें त्याचें ह्मणणें, परमेश्वर कृपेकरून, सर्वथैव खरें झालें.

हुमायून मृत्यु पावल्यानंतर, इ० स० १५५६ ह्या वर्षी अकबर त्याचे गादीवर बसला. तेंव्हां तो तेरा वर्षें चार महिने इतक्या वयाचा होता. नव्या बादशाहाचें वय लहान, ह्मणून सगळ्या राज्याचा कारभार,

बहिरामखान नामक हुमायुनाचे वेळचा प्रख्यात व बलिष्ठ सरदार होता, तो पाहात असे. हा सरदार जसा मोठा शूर होता तसा महत्वाकांक्षीही होता. अकबर सिंहासनारूढ झाला त्याच वर्षीं हेमू नामा एक मोठा अफगाण सरदार, मोंगल लोकांस हाकून देण्याच्या उद्देशानें सैन्य घेऊन आला. त्यास बाणप्रहारानें निश्चेष्ट करून बहिरामानें अकबराच्या डेऱ्यांत आणिलें; आणि आपल्या नव्या अल्पवयी बादशाहास सांगितलें कीं, " महाराज, ह्या आपल्या शत्रूचा आपण स्वहस्तें तरवारीनें वध करून टाकावा." हें ऐकिल्यावर जरासा विचार करून अकबरानें उत्तर दिलें, "घायाळ झालेल्या शत्रूवर मी हात टाकणार नाहीं." तेव्हां तें बहिरामास अमळसें वाईट लागलें. आणि त्यानें तत्काळ तरवार घेऊन हेमूचा वध केला. ही गोष्ट ता० ५ नोवेंबर रोजीं घडली. हिजवरून, अकबर केवळ सवातेरा वर्षांचा असतांही, त्यास शूराचें खरें यश कोणतें हें चांगलें कळत होतें असें दिसतें.

बहिराम हा स्वभावानें मानी, कठोर, तुसडा, दांडगा, आणि आपले पुढें कोणाचीही मात्रा न चालू देणारा असा होता. तेणेंकरून लोक त्रासले होते व तो अकबरास अगदीं बाळ समजून त्यास न पुसतां यथेच्छ जुलूम व माराहाणी करीत असे. दिल्लीचा जुना सुभेदार तारदीबेग, हुमायुनाचा मित्र, ह्याचा त्यानें प्राण घेतला. पुढें एके दिवशीं अकबर हत्तींच्या झोंब्या लावून गंमत पाहात बसला असतां, एक हत्ती, दुसऱ्या हत्तीस भिऊन जो एकसारखा पळत

निघाला, तो बेधडक बहिरामाच्या तंबूंत शिरला. त्यामुळें कितीएक तंबू पडले; व बहिरामही त्या भयंकर संकटांत घाबरून गेला. पण त्यास कांहीं इजा झाली नाहीं. तथापि त्या हत्तीवरच्या महाताचा त्यानें तत्काळ प्राण घेतला. व हें सर्व कपट मला ठार मारण्यासाठीं बादशाहानें रचिलें, असें त्याच्या मनांत पक्कें ठसलें. तेव्हां पासून तो अकबराशीं फार सावधगिरीनें वागूं लागला. बादशाहाच्या मनांतही कपट आलें; व त्यानें बहिरामास काढून टाकून राज्यकारभार स्वतः चालविण्याचा निश्चय केला. इ० स० १५६० च्या मार्च महिन्यांत त्यानें आपला हेतु उघडपणें शेवटास नेला. तेव्हां सहजच बहिराम बिथरला. त्यानें लागलेंच बंड केलें; व बादशाहास पकडण्याचा घाट घातला. सप्तंबर महिन्यांत अकबरानें स्वतः त्याजवर स्वारी केली. बहिराम हटला, पराभव पावला, आणि बादशाहास शरण आला. अकबरानें सरदार लोक सामोरे पाठवून त्याचा सत्कारपूर्वक स्वीकार केला. तो पुढें आल्या बरोबर बादशाहाच्या पायां पडून स्फुंदून स्फुंदून रडला. बादशाहानें त्यास उठवून आपले उजवे बाजूस बसविलें, नवे पोशाख दिले, आणि दरबारामध्यें मोठ्या इतमामानें राहावें, अथवा खर्चास घेऊन पाहिजे असल्यास मक्केच्या यात्रेस जावें, असें सांगितलें. ह्या गोष्टीवरून, अकबर किती क्षमाशील, किती कृतज्ञ, आणि किती शाहाणा होता तें पाहा ! ज्यानें त्यास पकडून कदाचित् मारलेंही असतें त्यास त्यानें त्याच्या अपराधांची माफी केली. बहिराम आपले बापास फार

उपयोगीं पडत असे, तर त्याचें चांगलें चालविणें हें आपलें कर्तव्य आहे, असें समजून तो त्यास पुष्कळ द्रव्य देण्यास तयार झाला. परंतु, हा राज्यकारभारांत आला असतां आपलें कांहीं चालूं देणार नाहीं, हें पक्कें समजून, त्यानें त्याला दुसऱ्या गोष्टींनीं संतुष्ट करून, मोठ्या चतुराईनें दरबारांतून काढून यात्रेस लाविलें.

सर्व प्रजेची आपणावर चांगली निष्ठा असणें, हीच आपल्या राज्याची मजबुदी आहे, असें अकबर जाणत होता. ह्मणून त्यानें हिंदू वगैरे स्वजातिबाह्य लोकांसही मोठमोठ्या हुद्याचीं कामें दिलीं. ही तरी मोठी शाहाणपणाची गोष्ट होय.

अकबर गादीवर बसल्यावर देखील, शीरशाहानें आपलें राज्य पुनः घेण्यासाठीं, इ. स. १५६० त, मोठें सैन्य पाठविलें होतें. त्याचा मोड, बादशाहाचा सरदार खानझमान ह्यानें केला, आणि पुष्कळ लूट मिळविली. तिचा वांटा तो अकबरास देईना; व त्याला पोर ह्मणून तुच्छ मानून उलट्या गोष्टी सांगूं लागला. तेव्हां हा कदाचित् बंडाई करील, असें जाणून बादशाह त्याचे घरीं गेला; तेणेंकरून तो कांहींसा मार्गावर आला. अकबराच्या निराभिमानीपणाची व प्रसंगानुसार वागण्याच्या शाहाणपणाची ही एक गोष्ट आहे.

तसाच माळव्यामध्यें बाजबहादूर ह्याचा पराभव अदमखान ह्यानें केला. तेणेंकरून तो पराकाष्ठेचा गर्विष्ट होऊन अकबराशीं वांकडा वागूं लागला. त्याच्या छावणीवर अकस्मात हल्ला करून बादशाहानें त्यास जे-

रीस आणिलें. तेव्हां तो शरण आला. अकबरानें त्यास अपराधांची क्षमा केली, परंतु कामावरून काढून टाकिलें.

मवजीम ह्मणून कोणीएक मनुष्य अकबराचा दूरचा आप्त होता. तो आपल्या बायकोचे अतिशयित हाल करी. हें गाऱ्हाणें तिचे नातलगांनीं अकबरास सांगून त्याचा कांहीं बंदोबस्त करण्याविषयीं विनंती केली. तेव्हां बादशाहा एके दिवशीं शिकारीस जात असतां त्याच्या घरीं गेला. त्यास पाहातांच त्याच्या येण्याचा मतलब समजून, मवजीम धांवत धांवत आपले माडीवर गेला, आणि तेथें त्याची बिचारी बायको बसली होती, तिचा कट्यारीनें गळा कापून त्यानें प्राण घेतला. अकबर आंत शिरत आहे तों मवजीम तरवार बांधून त्याशीं लढण्यास तयार झाला; व त्याच्या गुलामानें बादशाहावर तरवारही उगारली. थोडें चुकलें, नाहींतर अकबर त्यादिवशीं खचीत प्राणास मुकता. हें दुष्ट कर्म पाहून बादशाहास फार राग आला, व त्यानें मवजीम ह्यास यमुनेमध्यें, खालीं डोकें वर पाय करून ढकलून द्यावें, असा हुकूम केला. त्याप्रमाणें लोक तत्काळ करूं लागले. तें पाहून अकबरास त्याची दया आली; आणि त्यानें तें शासन त्या प्रसंगीं न करतां त्यास कैदेंत ठेविलें. तो तेथेंच वेड लागून मरण पावला.

अकबरानें गुजराथ, सिंध, कंदाहार, दक्षिण वगैरे प्रांत जिंकून घेतले, ह्यावरून तो शूर होता, ह्याविषयीं कोणीही संशय घेणार नाहीं. ह्यांतील लढायांतही त्यानें धूर्तता, सहनशीलता, व निरभिमानीपणा, हे आपले गुण

अनेकवेळां प्रकट केले. प्रत्यक्ष त्याच्या मुलानेंही बंड केलें होतें, तें त्यानें मोठ्या युक्तीनें मोडिलें. इतक्या गोष्टींवरून अकबर हा कोण आणि कोणत्या प्रकारचा मनुष्य होता, हें थोडेंबहुत तरी वाचणारांच्या लक्षांत येईल. तो इ० स० १६०५ च्या अक्तोबरच्या १३ व्या तारखेस, स्वस्थ चित्तानें, आपल्या कुटुंबाच्या माणसांचा व दरबारच्या सरदारांचा निरोप घेऊन, आपल्या अपराधांबद्दल त्यांची क्षमा मागून, आणि मोठ्या धार्मिक मुसलमानाप्रमाणें निमाज पढून मरण पावला. अकबराचा बांधा मजबूद व सुंदर, मुखचर्या मनोरंजक, व चालचर्या चित्तवेधक अशीं असत. विद्येची गोडी त्याला फार होती. तो रात्रीच्या रात्री शास्त्रीय विषयांवर संभाषण करण्यांत घालवी. जनावरांच्या झोंब्या व पैलवानांच्या कुस्त्या त्यास पाहण्यास फार आवडत. हा एकदां लगत २ दिवसांत ११० कोस घोड्यावर बसून गेला. प्रसंगोपात्त तो १५ किंवा २० कोस एका दिवसांत पायीं मजल करी. तो खाणें मध्यम प्रतीचें खाई. अकबराची बरोबरी करणारे असे राजे ह्या भूमंडलावर प्राचीन काळीं फारच थोडे होऊन गेले असतील, हल्लीं थोडेच असतील, व पुढेंही थोडेच होतील, असें ह्मटल्यास कांहीं चिंता नाहीं.

## इतिहासांचें संक्षिप्त टिपण.

इतिहास हें अनुभवशास्त्र आहे. आणि अनुभव सर्वांस पाहिजे. तेव्हां, इतिहासाच्या मोठेपणाविषयीं येथें लिहिण्याचें कारण नाहीं. ज्यांचीं टिपणें आतां आह्मी

देणार आहों, त्या इतिहासांवर अनेक मोठमोठे ग्रंथ झालेले आहेत. ते पाहण्याविषयीं इच्छा होण्यास कांहीं अनुगम असावा. हें मनांत आणून हा लेख संक्षेपानें लिहिला आहे.

फ्रान्स.—ज्या प्राचीन केल्त लोकांस रोमन लोक गाल असें ह्मणत, ते लोक ह्या देशाचे मूळचे राहणारे होत. रोमचा बादशाह जूलियस सीझर, ह्यानें ख्रिस्ती सनापूर्वीं सुमारें ६० वर्षें ह्या देशावर स्वारी करून तो जिंकिला. तेव्हांपासून तों फ्रांकांचा राजा क्लोव्हिस, हा तो देश जिंकून घेईपर्यंत त्याजवर रोमन लोकच राज्य करीत होते. क्लोव्हिस हा प्रथमतः ख्रिस्ती नव्हता. परंतु त्याची बायको क्लोतिलदा ही त्या धर्माची होती; एके संकटसमयीं त्यानें खिस्ती लोकांचे देवास नवस केला व त्याप्रमाणें दैववशात् तो त्या संकटांतून पार पडला. तेव्हां त्याला वाटलें कीं, तो देव ( ख्रिस्त ) पावला. त्यावरून त्यानें स्वतः व त्याचे अनुयायी सुमारें ३००० लोक ह्यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला. हाच फ्रान्साचा पहिला ख्रिस्ती राजा होय. येथील लोक आपणांस फ्रांक ह्मणवीत. त्यावरून ह्या देशास फ्रान्स हें नांव पडलें. हा राजा इ० स० ५११ ह्या वर्षीं मरण पावला. त्यानेंच पारिस हें राजधानीचें शहर स्थापिलें. इ० स० ८०० ह्या वर्षीं शार्लमेन ह्मणजे थोरला चार्लस हा सिंहासनारूढ झाला. त्यानें स्पेन, जर्मनी, व इतालीचा बहुतेक भाग हे जिंकून आपले राज्यांत सामील केले होते. परंतु, तो मेल्यानतर जर्मनीचें राज्य फ्रान्सापासून तुटून राहिलें. पुढें नार्वे

देशांतील लोक नार्मन, हे, इ० स० ९१२ त फ्रान्सावर स्वारीचा झेंडा उभारून आले. त्यांनीं त्यांतील न्यूस्त्रि-या प्रांत जिंकून घेऊन तेथें आपली वसाहात केली. त्याच प्रदेशाला कांहीं कालानंतर नार्मंदी हें नांव प्राप्त झालें. इ. स. १०६६ त, नार्मन लोकांनीं इंग्लंद देश जिंकला, असें इतिहासांत आढळतें, तेथील लोक ह्याच लोकांचे वंशज होत.— ह्यूक्यापेत ह्मणून कोणी एक मनुष्य पारिस येथें मोठ्या अधिकारावर होता. त्यानें गादीवरच्या राजकुळाचा समूळ नाश करून राज्यपद बळकाविलें. ही गोष्ट इ. स. ९८७ त घडली. फ्रान्सच्या इतिहासांतील प्रख्यात गोष्टी येणें प्रमाणें:— ह्या देशास इंग्लंदचा राजा तिसरा एदवर्द व पांचवा हेनरी, ह्या दोन राजांपाशीं लढाया कराव्या लागल्या; व त्यांपासून त्याचें फार नुकसान झालें. एद-वर्दाबरोबरच्या लढाईंत तर फ्रेंच राजा जान ह्यास इंग्लिशांनीं कैद केलें. आणि हेनरी बरोबरच्या युद्धाचा शेवट असा झाला कीं, फ्रान्स देशच्या राजपदावर त्याचा वारसा आहे असें ठरलें; ही गोष्ट इ० स० १४२० त घडली; आणि त्याचे मागून साहावा हेनरी आपणास फ्रान्सचा बादशाह ह्मणवूं लागला.— जोन अफ् आर्क नामें फ्रेंच स्त्री हिनें, मला स्वदेशहित करण्या विषयीं ईश्वरी प्रेरणा झाली आहे, सबब मला सेंतपालच्या देव-ळांतली पवित्र तरवार व सेना द्यावी, मी इंग्लिश सैन्या-चा मोड करून टाकून जय मिळवितें, असें तेथील तेव्हांचा राजा सातवा चार्लस ह्यास सांगितलें. त्याप्रमाणें तिची सिद्धता करून दिल्यावर तिनें उत्साहजनक

संभाषणानें व आंगच्या विजातीय शौर्याच्या योगानें आपल्या लोकांस वीरश्री उत्पन्न करून त्यांच्या हातून ओर्लीन्सच्या वेढयांत इंग्लिशांचा सर्वथा पराजय करून टाकिला. व दुसरे कित्येक प्रसंगीं तिनें त्यांजवर जय मिळविले. तेणें करून त्यांस तो देश सोडून स्वदेशीं परत जाणें भाग पडलें; इ० स० १४५० त हें घडलें.— बुर्बोन घराण्यांतला पहिला राजा व नव्हारीचा अधिपति चवथा चार्लस हा इ० स० १५९७ त फ्रान्सच्या गादीवर बसला. हा राजा चांगला होता. क्याथलिक पथाचा अधिकारी व अभिमानी हा असल्यामुळें, प्रातेस्तंत मताभिमानी लोकांकडून त्यास बरेच धक्के सोसावे लागले. व त्याचा शेवटही त्यांतच झाला. एके दिवशीं पारीस शहरांतून तो गाडींत बसून जात असतां राव्हेलाक नामक एका मनुष्यानें त्याला ठार मारिलें. हें इ० स० १६१० त घडलें. तेव्हां त्याच्या वयास ५२ वें व कारकीर्दीस २२ वें वर्ष होतें. चवदावा लुई राजा इ०स० १६४३ त पांच वर्षांचा असतां गादीवर बसला. तो इ० स० १७१५ त ७७ वर्षांचा होऊन मरण पावला. त्याच्या कारकीर्दींत फ्रान्स देशांत कला कौशल्याची व ज्ञानाची पुष्कळ वृद्धि झाली. व तो देश युरोप खंडांत त्या काळीं मोठ्या योग्यतेस चढला. १६ वा लुई हा राजा गादीवर असतां, अमेरिकनांचा पक्ष फ्रेंचांनीं धरिल्यामुळें त्यांचें व इंग्लिश लोकांचें युद्ध लागलें. त्याकडे पुष्कळ पैसा खर्चून लुई राजाचें भांडार रिकामें पडण्याचा प्रसंग आला. तेव्हां पैसा जमविण्यासाठीं त्यानें प्रजेवर नवा कर बसविला. तो त्याचे पार्लमेंतास मान्य नव्हता,

ह्यामुळें मोठें बंड उत्पन्न होऊन, इ० स० १७९३ त तो राजा प्राणास मुकला. नंतर फ्रान्सांत प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें. तेंही थोड्याच काळांत मोडून प्रख्यात युद्धधुंधर नेपोलियन बोनापार्त हा, फर्स्ट कौन्सिल ही पदवी घेऊन इ० स० १८०४ त, सर्व देशाचा राजा झाला. तथापि इ० स० १८१५ मध्यें, वातर्लू येथें तो पूर्ण पराभव पावून इंग्लिशांचे हातीं लागला. त्याला त्यांनीं कैद करून एका बेटांत ठेविलें. आणि फ्रान्सच्या मूळच्या राजकुळास त्याचें पद प्राप्त झालें. ह्या नंतर घडलेल्या गोष्टी प्रसिद्धच आहेत.

रुशिया.—ह्याचें प्राचीन नांव सार्माशिया. ख्रिस्ती शकाच्या नववे शतकांत साल्व्हानिक जातीचे रोसि ह्मणून लोक होते; त्यांवरून रुशिया हें नांव पडलें. ह्या देशांत यथानुक्रमें सीथियन, गाथ, व्हांदल, हन्स, इत्यादि रानटी लोकांचें प्राबल्य होतें. ते रोमन लोकांच्या राज्यांत स्वाऱ्या करीत असत. इ० स० ८६२ त, रुसिक नामक एका स्कांदिनेवियनानें त्या देशांतील लहान लहान सर्व नाईक एकत्र करून एक मोठें राज्य स्थापिलें. व्हलाडामर नामक राजानें, इ० स० ९७६ त, ग्रीकचर्च नामक धर्मपंथ स्वीकारिला; व तो आपले प्रजेस स्वीकारायास लाविलें. ते लोक पूर्वीं मूर्तिपूजक होते. मोंगलांचा खानबातो, ह्यानें इ० स० १२३७ त, हा देश काबीज करून घेतला. तो, त्याचे व त्याचे वंशजांचे ताब्यांत मिळून एकंदर अदमासें २५० वर्षें पर्यंत राहिला. परंतु, इव्हानवासिलो व्हिच ह्यानें आस्त्राखान व तातार लो-

कांचीं दुसरीं शहरें घेऊन, देशाचें स्वातंत्र्य पुनः स्थापिलें. इव्हान मरण पावल्यावर, त्याचा भाऊ पीतर धिग्रेत हा इ० स० १६९६ त गादीवर बसला. हा राजा मोठा पराक्रमी होता. त्यानें आपला देश सुधारून स्वकर्तृत्वानें उत्तम दशेस आणिला. त्याचे पूर्वीं रुशियन लोक केवळ रानटी होते. पीतरानें स्वदेशाहितार्थ जे श्रम केले, ते पुस्तकांत पुष्कळ जागीं वर्णिले आहेत.

प्रुशिआ.—ह्या देशांत प्राचीन काळीं गाथ लोकांचे मागून प्रुझि लोक राहिले होते, त्यांवरून हें नांव पडलें. त्या लोकांस त्यूतोनिक सरदारांनीं जिंकून इ० स० १२२७ त तो देश आपणांकडे घेतला. त्यांचे हातून तो देश जाऊन पुढें पोलंद देशच्या राजास मिळाला. तो इ० स० १५५६ पावेतों, ह्मणजे फ्रेदरिक विलियम, हा तो देश त्या पारतंत्र्यापासून सोडवी पावेतों, त्याच राज्याखालीं होता. नंतर त्याचा पुत्र फ्रेदरिक धिग्रेत इ० स० १७४० त गादीवर बसला. त्यानें आपल्या बुद्धिचातुर्यें करून व निरंतर परिश्रम घेऊन प्रुशिआ देश उत्तमावस्थेंत आणला.

आस्त्रिया.—पश्चिम युरोपाचा राजा शार्लमेन, ह्याच्या राज्याच्या पूर्वेस हा देश आहे, ह्मणून त्यास आस्त्रिया हें नांव पडलें. ह्याचा अर्थ पूर्वेकडील असा होतो. इ० स० ९१२ मध्यें, फ्रांकोनिया येथील नबाब कानराद, ह्यास जर्मनीचें आधिपत्य मिळालें. तोंपर्यंत तो मुलूख फ्रेंचांकडे होता. पुढें ओथो धिग्रेत ह्यानें बोहिमिया व इताली जिंकून, इ० स० ९६२ त आपणा-

स जर्मनीचा व इतालीचा बादशाह ह्मणविलें. आस्त्रि या देशांतील राजकुळाचा मूळपुरुष रोदाल्फ हा इ० स० १२७३ त सिंहासनावर बसला. त्यानंतरचा बादशाह माक्सिमिलियन ह्यानें, बर्गंदीचा दूक चार्लस ह्याची वारसदारीण मेरी हिशीं लग्न केलें; तेणें करून नेदर्लंद देश आस्त्रियाच्या राज्याखालीं सहजच आला. (इ० स० १४७७). आणि त्याचाच पुत्र फिलिप ह्यानें, इ० स० १४९६ त, स्पेनचा राजा फेर्दिनांद आणि राणी इस्साबेला, ह्यांची कन्या हेन, हिशीं लग्न केलें. तेव्हां त्याही देशावर आस्त्रिया देशाचा हक्क पोंहोंचूं लागला. माक्सि मिलियनाचा नातू पांचवा चार्लस, इ० स० १५१६ त स्पेनच्या गादीवर बसला; आणि पुढें तीन वर्षांनीं आस्त्रिया देशाचें स्वामित्व पावला. त्यानें राज्यत्याग केल्यावर स्पेन व नेदर्लंद हे देश, त्याचा पुत्र दुसरा फिलिप ह्यास मिळाले; व आस्त्रिया, बोहिमिया, आणि हंगारी हे देश, त्याचा भाऊ फेर्दिनांद ह्याजकडे राहिले. हाच पुढें जर्मनीचा बादशाहा झाला. इ० स० १७४० त, ह्या राजकुळांतला साहावा चार्लस मरण पावल्या मुळें गादीला वारसदार पुरुष नाहींसा झाला. तेव्हां त्याची मुलगी मेरिया थेरीसा, ही सर्व राज्याची मालकीण झाली. तें राजपद तिला मिळावें, किंवा न मिळावें ह्या वादावरून युरोपांत मोटी लढाई सुरू झाली. तींत बहुत राजांचें अंग होतें. शेवटीं, इ० स० १७४८ त, एशला चापेल येथें तह ठरून तिचा शेवट झाला. मेरिया हिची मालकी सर्वांनीं कबूल केली; व तिच्या भ्रतारास

पहिला फ्रान्सीस असें नांव देऊन सिंहासनावर बसविलें. पुढें, दुसरा फ्रान्सीस गादीवर असतां, नेपोलियनानें त्याचें पुष्कळ राज्य जिंकून घेऊन, त्याजकडून जर्मनीचा बादशाह हा अधिकार काढून, त्याबद्दल, नुसता आस्त्रियाचा राजा इतकामात्र अधिकार ठेविला.

**स्पेन.**–ह्या देशामध्यें प्राचीन काळीं ऐबीरियन व दुसरे कित्येक एशिया खंडांतले लोक राहात असत. त्यांच्या जुन्या जाती व भाषा ह्यांचा बराच अंश अद्यापि बास्कनामक प्रांतामध्यें दिसून येतो. फार प्राचीन काळीं फिनिशियन लोकांनीं त्या देशाचा बहुतेक भाग आपलेकडे जिंकून घेतला होता. त्यांस रोमन लोकांनीं तेथून घालवून दिलें; आणि स्पेन देश आपले राज्यास जोडिला. रोमचें राज्य नाशाप्रत पावल्यावर ह्या देशामध्यें व्हिंडल, सुव्ही, आणि आलन्स ह्या लोकांचा अंमल झाला. नंतर इ० स० ४७७ त पश्चिमे कडील गाथ लोकांनीं त्या सर्वांस जिंकून एक नवेंच राज्य स्थापिलें तें, इ० स० ७१३ ह्या वर्षीं सारासन ह्मणजे मूर लोकांनीं जिंकून आपले स्वाधीन करून घेतलें. कांहीं डोंगरी प्रांत खेरीज करून त्यांनीं सर्व देशाची धूळधाण केली; आणि सुमारें ८०० वर्षें पर्यंत ते ह्या देशाच्या उत्कृष्ट भागीं आपला अंमल चालवून होते, असें इतिहासावरून कळतें. त्यांस स्पेनचा प्रख्यात राजा फर्दिनांद व विख्यात राणी इसाबेला ह्यांनीं, इ० स० १४९२ च्या सुमारास देशाबाहेर काढून लावून सर्व राज्य आपले हातीं घेतलें.

हालंद—रोमन लोकांच्या राज्याच्या भरभराटीचे वेळीं, बतेव्ही व फ्रिसी हे लोक ह्या देशांत राहात असत. रोमन राज्य लयास गेल्यावर गाथ वगैरे लोकांनीं त्यावर हल्ला करून त्यामध्ये आपलीं लहान लहान संस्थानें स्थापिलीं. तीं ख्रिस्ती शकाच्या आठव्या शतकांत चार्लस मार्तल ह्यानें जिंकिलीं; आणि पुढें सहजच तीं शार्लमेनाच्या राज्यांत मोडूं लागलीं. दाहवे शतकापासून तों चवदावे शतका पावेतों ह्या देशांत अनेक वेगवेगळीं संस्थानें होतीं. पुढें लग्नादिकांच्या संबंधानें त्या सर्वांचें स्वामित्व बर्गंदीच्या डूकाकडे आलें. नंतर तें आस्त्रियाच्या राज्याकडे गेलें. शेवटीं तें स्पेनास प्राप्त झालें. इ० स० १५७९ त, स्पेनाचा अधिकार टाकून देऊन तीं संस्थानें स्वतंत्रता पावलीं. त्यांचीं नांवें १ हालंद; २ फ्रेसलंद; ३ ग्रोनिंजन; ४ ओव्हरसेल; ५ अत्रेच; ६ ग्वेलदरलंद; आणि ७ झीलंद. बाकीचे १० प्रांत, इ० स० १७०० मध्यें, आस्त्रियाच्या राजकुळींतील जर्मनीमध्यें राज्य करणाऱ्या पुरुषांच्या ताब्यांत जात तों पर्यंत स्पेनच्या राज्याखालींच होते.

स्वीदन.—ह्या देशांत प्रथमतः फिन्स व त्यांचे मागून गाथ ह्यांचें प्राबल्य होतें. त्यावरूनच फिनमार्क, फिनलांद, गाथनबर्ग, हीं नांवें पडलीं असावीं. देन्मार्कामध्यें मार्गरेत राणी राज्य करीत असतां, स्वीदन व नार्वे हे देश, इ० स० १३९७ त तिचे राज्यांत सामील झाले. गस्ताव्हस ह्यानें, इ० स० १५२३ त स्वीदन देश देन्मार्काच्या दास्यांतून सोड-

वून स्वतंत्र केला, तों पावेतों तो त्याच राज्याचा भाग होता. ह्या राजकुळांत पुढें गस्ताव्हस ओदाल्फस आणि बारावा चार्लस हे राजे फार मोठे व प्रख्यात होऊन गेले. इ० स० १८१० त, नेपोलियनाचा सरदार बर्नादोटी, ह्यास त्या देशाचें राजपद मिळालें. नार्वे देश इ० स० १८१४ त देन्मार्काच्या ताब्यांतून निघून स्वीदनांत सामील झाला.

नार्वे.—ह्या देशामध्यें प्रथमतः फिन्स व लाप्स हे लोक राहत असत. त्यांस कांहीं काळानंतर गाथ लोकांनीं उत्तरेकडे घालवून दिलें. इ० स० ८७५ त हार्फझर नामक पुरुषानें ह्या देशांतील सर्व लहान लहान संस्थानें एकत्र करून नवें राज्य स्थापिलें. तें, इ० स० १३९७ त, देन्मार्काच्या राज्यांत सामील होईपर्यंत स्वतंत्रतेनें चाललें होतें; तें इ० स० १८१४ त स्वीदनच्या राज्यांत मिळालें. तथापि तेथील राज्यकारभार तेथल्या कायद्यांप्रमाणें वेगळा चालतो.

युरोपांतील तुर्कस्थान.—तुर्क हे तार्तार लोकांचे वंशज होत. इ० स० ८०० च्या सुमारास त्यांनीं आर्मिनिया देशाचा कांहीं भाग जिंकून घेतला. त्यावरून त्यास तुर्कोमानिया असें नांव पडलें. नंतर त्यांनीं, सीरिया, एशियामैनार, ईजिप्त, आणि युरोप ह्यांत प्रवेश करून मुलूख मिळविला. त्यांनीं इ० स० १३६० ह्यावर्षीं आद्रिआनोपल, आणि १४५३ त कान्स्तांतिनोपल हीं घेतलीं. तोच रोमन लोकांच्या पूर्वेकडील राज्याचा शेवट होय. क्रिमिया व मोरिया

हींही त्यांनीं लवकरच घेतलीं. इ० स० १४४० त इतालींतील ओत्रांतो त्यांच्या हस्तगत झालें. सर्व युरोप ज्यास थरथरां कांपत होतें, त्या सोलिमानानें इ० स० १५२२ त ऱ्होदीस घेतलें; व इ० स० १५२९ त बुदा घेतलें. ह्याच वर्षीं त्यांनीं विएना शहरास वेढा घातला होता. परंतु, तितक्यांत पांचवा चार्लस आल्यामुळें त्याचा बचाव झाला. पुनरपि १६६३ त ते विएना शहरावर २००००० लोकांनिशीं येऊन पडले. तेव्हांही त्यांचा फार नाश होऊन ते परत गेले.

ह्याप्रमाणें प्रत्येक देशाच्या इतिहासाचें दिग्प्रदर्शन करतां येईल. ह्यांचीं मूळ पुस्तकें पाहिलीं असतां, अनेक चमत्कार समजण्यांत येऊन, चित्तास आल्हाद प्राप्त होईल.

## मनुष्याचा स्वभाव.

मनुष्याचा खरा स्वभाव बहुधा गुप्त असतो. ह्मणजे, जो वास्तविक असतो तो व बाहेर दिसतो तो, हे परस्परांपासून भिन्न असतात. मनुष्यें जनामध्यें जीं कर्मे उघडपणें करण्यास अथवा करावींसें ह्मणण्यास धजत नाहींत, तीं कर्मे तीं लोकांच्या नजरे आड खुशाल करितात, हें सर्वांस ठाऊक आहे. ह्यावरून खऱ्या स्वभावाच्या गुप्तत्वाविषयीं खातरी होईल. कित्येकांचा स्वभाव कांहींसा त्यांचे स्वाधीन असतो. ह्याचीं प्रसिद्ध उदाहरणं ह्मटलीं ह्मणजे, रामदास, तुकाराम वगैरे आपले प्रख्यात साधु होत. संसाराम-

ध्यें कनककांतादिकांहीं जें सुख इतरजनांस प्राप्त होतें, व ज्यासाठीं आज कोट्यवधि मानवप्राणी तळमळून राहिले आहेत, तें ह्मणजे त्यांस केवळ दुःखवत् वाटलें असेल असें ह्मणतां येत नाहीं. कांकीं, त्याचे योगानें शरीरास व चित्तास फार समाधान होतें, हें सर्वानुभवसिद्ध आहे. तेव्हां त्यांचीही चित्तवृत्ति त्याकडे वळली असेल; परंतु, नरजन्माचें सार्थक्य जें परमार्थसाधन त्यास तें विघ्नभूत होय, असें समजून त्याचा त्यांनीं त्याग केला असावा; ही गोष्ट स्वभाव स्वाधीन असल्यावांचून घडणें नाहीं. ह्यावरून प्रयत्नेंकरून स्वभाव स्वस्वाधीन ठेवितां येतो हें सिद्ध होतें. परंतु, मनुष्याचा मूळचा स्वभाव असेल, तो नाहींसा होऊन नवा होणें हें अशक्य आहे. सक्तीनें स्वभाव पालटत नाहीं. युक्तिप्रयुक्तीनेंच तो पालटला तर पालटतो. जबरदस्तीनें एकाद्याची कांहीं खोड एकदम दाबिली, तर तिजवर दाब आहे तों पावेतों मात्र ती तशी दवली राहते. परंतु, कारंजाच्या नळीवर एकाएकीं हात ठेवून पाणी बंद करावें आणि हात काढावा ह्मणजे जसें तें पहिल्याच्या दुप्पट उंच उडतें, त्याप्रमाणें दाब गेल्याबरोबर ती खोड द्विगुणित वाढते. श्रीमंत लोकांचे उधळये मुलगे, व बाल्यावस्थेस्तव उत्तम कारभाऱ्यांच्या धाकांत ठेविलेले राजे, हे स्वातंत्र्य पावल्यावर कसे वागतात, हें विचारदृष्टीनें पाहील त्यास आह्मी सांगतों ह्याच्या खरेपणाविषयीं संशय येणार नाहीं. वारंवार बोध केल्यानें व वारंवार वादप्रतिवाद केल्यानें मन कांहींसें वळतें व थोडा तरी विचार करूं लागतें.

परंतु, स्वभाव पालटणें अथवा आपले स्वाधीन होणें, हें केवळ अभ्यासानें किंवा नित्याच्या सहवासानें मात्र घडूं शकेल; दुसरा उपाय नाहीं. ह्मणूनच, "सुसंगति सदा घडो", "होवो संतजना भेटी न हो अंगसंगतुटी" असें मागणें कविजन परमेश्वरापाशीं निरंतर मागतात. मूळचा स्वभाव एकदम सोडण्याविषयीं जो कोणी यत्न करील, तो फसेल, ह्यांत संशय नाहीं. कांहीं वेळ पर्यंत त्याचा निर्धार चालेल; परंतु शेवटपर्यंत तो टिकणार नाहीं. ह्यास्तव हा स्वभावजय हळूहळूच केला पाहिजे. त्यांत, आपण कांहींच केलें नाहीं असें आपणास प्रथमतः वाटेल खरें; तथापि, "थेंबेंथेंबें तळें सांचे" ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन स्वोद्योग सतत चालवावा. मनुष्याला स्वभावतः पोहोंतां येत नसतें. ह्मणून तो प्रथमतः भोंपळ्याचा आश्रय करितो. त्याच्या साह्यानें जराजरा हात टाकतां येऊं लागले, ह्मणजे तो त्याला टाकून देऊन स्वतःच पोहूं लागतो. सारांश जो धर्म अंगीं नाहीं, तो धर्म मनुष्यानें दुसऱ्याच्या सहवासानें व अभ्यासानें संपादिला पाहिजे; दुसरा उपाय नाहीं. भोंपळ्याच्या साह्यानें पोंहतो तो पोंहणारा कनिष्ठ; भोंपळ्यावांचून हातपाय हालवून पोंहतो, तो मध्यम; आणि आसनमांडी भिडवून, अथवा एका हातावर तपकिरीची डबी घेऊन ती न भिजूं देतां, एक दोन माणसें कांसेस लावून जो पूर पार जातो, तो पोंहणारा उत्तम जाणावा. तेव्हां, जें कर्म ज्या साधनांवांचून व्हावयाचें नाहीं, तें कर्म त्यांच्या साह्याशिवाय करतां येणें, हाच पटाईतपणा होय.

असा पटाईतपणा साधण्यास अतिशयित कष्ट लागतात; आतां, जरी त्यांच्या मानानें त्यांचा उपयोग नसतो तथापि, अशा गोष्टी अनेक आहेत कीं, त्यांत "वाघाच्या शिकारीची तयारी करावी तेंव्हां कोल्हा हातीं लागतो." स्वभाव स्वाधीन ठेवणें अथवा थोडा तरी पालटणें ही गोष्टही त्यापैकींच आहे. ह्या कारणास्तव आपला मूळचा कुस्वभाव टाकावा अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें तद्विपरीत स्वभावांत पट्ट होण्यास झटलें पाहिजे; तरच त्याचा हेतु पूर्ण होईल. ज्या प्राचीन साधूंनीं संसारसुखाचा त्याग व वैराग्याचा स्वीकार केला, त्यांस स्वस्त्रीभोग, स्वधनोपभोग, इत्यादि गोष्टी दोषार्ह वाटल्या ह्मणून त्यांनीं सोडिल्या असें नव्हे; तर त्यांचें सेवन करतांकरतां मनुष्यांस त्या सुखाची अनिवार्य गोडी लागून ते त्यासाठीं विचाराविचार न पाहतां अनंत पातकें करण्यास प्रवर्ततात, असें त्यांस जनांमध्यें दिसून आलें; तेंव्हां ज्या कर्मेंकरून साक्षात् पाप घडत नाहीं, परंतु पाप करण्याची वासना मनाचेठायीं उत्पन्न होते, असें कर्म जरी न्याय्य असलें तरी त्याचा परिणाम वाईट, असा विचार मनांत आणून त्यांनीं संसाराचा त्याग केला असावा असें दिसतें. ह्यांतही "कोल्याच्या शिकारीस वाघाची तयारी" दृष्टीस पडते. दुर्व्यसन सोडण्यासही एकदम प्रयत्न करूं नये. ज्याला दररोज एक शेर दारू पिण्याची खोड लागली आहे, त्यास ती टाकायाची असल्यास, त्यानें दररोज संध्येची एकएक पळी ती कमी करीत जावें, ह्मणजे त्यास जड न पडतां त्याचा हेतु पूर्ण

होईल. ह्याप्रमाणेंच स्वभावाचें आहे. ह्मणजे, तो तीळतीळ धरीत किंवा सोडीत गेलें पाहिजे. निश्चयबलेंकरून एकदम स्वभाव टाकण्याची किंवा धरण्याची शक्ति अंगीं असेल तर फारच चांगलें; परंतु तें साधणें फार कठीण. नवी सवय लागावी ह्मणून तिची अहोरात्र तरी पाठ घेऊन उपयोगीं नाहीं. तर मध्यें थोडीथोडी विश्रांतिही घेतली पाहिजे. तेणेंकरून दोन गोष्टी होतात. एक ही कीं, आपण थकून कंटाळत नाहीं; व श्रम झाल्यावर जरा विसावा घेऊन कामाला लागलों ह्मणजे चांगली उमेद येऊन त्याजकडे चांगलें लक्ष लागतें. आणि दुसरी ही कीं, ज्या कामीं आपण अपूर्ण व अनभ्यस्त आहों, तें एकसारख्या उत्कंठेनें धूम करीतच चाललों, तर त्यांत चुकी झाल्यावांचून राहात नाहीं, व तेंणकरून आपले श्रम वांया जाऊन उलटी भलतीच खोड लागण्याचा संभव असतो, तो टळतो. अडचणी विचारावांचून दूर होत नाहींत; विचार करण्यास चित्ताला स्थिरता पाहिजे; आणि ती स्थिरता विश्रांतीशिवाय होणें नाहीं; तेव्हां विश्रांति घेणें हें आवश्यक आहे, असें सिद्ध झालें. स्वेच्छेनुरूप आपला स्वभाव आपले हातीं लागला, असें जरी आपणास वाटलें, तरी त्यावर अतिशयित भरंवसा ठेवून बेसावध राहूं नये. प्राचीन काळचे प्रख्यात विरक्त भक्त, जरी दृढनिश्चयानें कनककांतेचा त्याग करून अनेक तपें अरण्यांत एकांतामध्यें बसत, तरी त्यांचीं देखील मनें पुनः बिघडत. अशा कथा आढळतात, व तशा गोष्टी कधींकधीं संसारांतही

दृष्टीस पडतात. तेव्हां त्यावर विश्वास कोणीं ठेवावा? स्वभाव हातीं येण्याला दोन उपाय आहेत. एक असा कीं, ज्या मोहक वस्तूंनीं आपलें व्रत भंगण्याची भीति आहे, त्या आपले नजरेपुढें घडोघडी आणून, व त्या समयीं दृढतम निश्चयानें वासना आंवरून धरावी, तर एक आपणास त्यांपासून भय नाहीं; अथवा दुसरा उपाय हा कीं, त्या वस्तूंची व आपली आजन्मांत गांठ न पडे अशी कांहीं तजवीज योजावी, तर एक त्यांपासून आपला बचाव होईल; तिसरा मार्ग नाहीं. ह्यांतला पहिला फारच कठीण आहे, ह्मणून तो कोणी करीत नाहीं; आणि दुसरा सोपा आहे, ह्मणून बहुतेक लोक तो अवलंबितात. मनुष्याचा खरा स्वभाव एकांतांत समजतो. चोरी, व्यभिचार, हीं कर्मै करूं नयेत, असें सर्व लोक ह्मणतात, व त्याप्रमाणें आपण वर्ततों असें होईल तितक्या तजविजीनें जनांत ते दाखवितात. परंतु, सोन्याची रास व सुंदर ललना ह्यांशीं एकांतीं गांठ पडून जो त्यांपासून अलिप्त राहील, तोच खरा साधु समजला पाहिजे. केवळ बाह्यात्कारें जें आचरण असतें, तें लोकांस भिऊन प्रायः असतें; मनापासून असत नाहीं. आणि एकांतांत एकटे आपणच, दुसरा कोणी नांहीं, तेव्हां तेथलें आचरण तें मात्र खऱ्या स्वभावानुरूप आहे, असें उघड दिसतें. जसा ज्याचा स्वभाव असतो, तसा त्याला व्यवसाय करण्यास सांपडला ह्मणजे तोच सुखी; नाहींतर स्वभावास आडवत नाहीं तो उद्योग करणें भाग पडलें, ह्मणजे त्या दुःखाला जोडा नाहीं.

परंतु, काम पडेल त्याप्रमाणें होण्याजोगा ज्याचा स्वभाव आहे, तो फार सुख भोगितो. विद्याभ्यासादि कठीण कामें, जीं मनुष्यास स्वभावतः करावींशीं वाटत नाहींत, तीं करण्याचे काळ मनुष्यानें नेमून ठेवावे; आणि त्याप्रमाणें तीं नेमानें करावीं. परंतु जीं कामें त्यांच्या स्वभावास आवडतात, त्यांची इतकी तजवीज ठेवण्याचें कारण नाहीं; कां कीं, वेळ फावला कीं, हीं केल्यावांचून तो राहायाचाच नाहीं. ज्यामध्यें स्वहित साधत नाहीं, तें काम मनुष्य करीत नाहीं; जें जें तो करितो, त्यांत त्याचें साक्षात् किंवा परंपरया कांहींना कांहीं तरी हित असतें, असा मनुष्याचा स्वभाव आहे; व मनुष्यास स्वप्रीति अति आहे. त्याविषयीं, आपले प्रख्यात कवि वामन पंडित, ह्यांचा एक पद्यात्मक लेख फार चमत्कारिक आहे. तो आतां आह्मी आपल्या प्रिय वाचकांस आदरपूर्वक सादर करितों.

## प्रियसुधा

### श्लोक.

पतिनिमित्त पती तुजला प्रिये,
प्रिय असें सहसा ह्मणतां नये,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १ ॥
पुरुषही स्वसुखार्थ सुखें स्त्रिया,
ह्मणतसे सकळांहुनि त्या प्रिया,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ २ ॥

सुनयने सदनें विविधें धनें,
निजसुखार्थ समस्तहि साधनें,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ३ ॥
सकळ आवडि काळबळें तुटे,
परि निजीं निजता न कधीं विटे,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ४ ॥
प्रियहि अप्रिय होय घडीघडी,
परि कदापि न ये निज नावडी,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ५ ॥
वळखिनें भलतें प्रिय मानिती,
नवल कीं प्रिय हें जन नेणती,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ६ ॥
निजबळें सुखही तरि सांपडे,
बहुत जो प्रिय तो बहु आवडे,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ७ ॥
स्वसुख तेंचि सुषुप्ति जसें उरे,
सदितरीं विषयांतहि तें स्फुरे,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ८ ॥
सुख सुधाकर राहु अहंकृती,
निज ह्मणोनि तरी प्रिय मानिती,

परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ९ ॥
नयनिं राहु शशी करितां दिसे,
तसि अहंकृति त्यास्तव उल्लसे,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १० ॥
इतर ईश्वर मानिति त्यां जनां,
निजसुखार्थचि कीं तदुपासना,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ ११ ॥
हरिकृपेचि करूनि निजात्मता,
मिळलि त्यासचि तो प्रिय तत्वतां,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १२ ॥
नभ मठांतिल तेंचि मठांतरीं,
प्रिय असा कळल्या उपरी हरी,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १३ ॥
सहज तो मल जोचि अहो हरी,
प्रिय मुकुंद असें कळल्यावरी,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १४ ॥
कळालिया हरिची सकळात्मता,
मग कळे हरिभक्तिअखंडता,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १५ ॥

जड शरीरचि आपण या भ्रमें,
प्रियतमे कळलें स्थिरजंगमें,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १६ ॥
भ्रमकपाटहि तें जरि ऊघडे,
सुख उदंड अखंडचि सांपडे,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १७ ॥
प्रियसुधा उपदेश गिराप्रती,
करुनि वामन तीस ह्मणे सती,
परम आवडि आपुलि आपणा,
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १८ ॥

---

## क्राको आणि स्ताकहोम.

ऑलिव्हर गोल्दस्मिथ ह्मणून एक नामांकित इंग्लिश ग्रंथकार होऊन गेला. तो इ० स० १७३१ त ऐरलंदामध्यें जन्मला. त्यास दवलीन, एदिंबरा, आणि लीदन येथील विद्यालयांत पुष्कळ ज्ञानप्राप्ति झाली. तो शाळेंतून निघाला तेव्हां त्याजपाशीं कांहींएक नव्हतें. तथापि, ज्ञानवृद्ध्यर्थ यूरोपखंडांत पायीं प्रवास करण्याचा त्यानें निश्चय केला. फ्लांदर्स, फ्रान्स, स्वित्सर्लंद, जर्मनी, इताली, इत्यादि देश त्यानें पाहिले. त्या प्रवासांत त्याला आपली किनरी वाजवून व अन्यप्रकारें लोकांस रमवून उदरनिर्वाहाच्या वस्तु मिळवाव्या लागल्या. पुढें इ०स०१७५८ त हा इंग्लंदांत परत आल्यावर, त्यास राजाश्रय मिळून

त्याची चांगली चलती झाली. ह्याचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. लिहिण्याच्या सरलतेविषयीं ह्याची मोठी आख्या आहे. त्याच्या एका पुस्तकांत त्याचीं दोन पत्रें छापलेलीं आढळलीं. तीं चांगलीं मनोरंजक वाटल्यावरून, त्यांतील तात्पर्य येथें उतरतों. ह्यांपैकीं एक पत्र क्राको मुक्कामचें व दुसरें स्ताकहोम मुक्कामचें आहे.

मुक्काम क्राको, ता. २ आगष्ट स० १७५८ इ.

प्रिय मित्रा, विनंती विशेष.—मी पोलंदांत येऊन दाखल झालों आहें, हें सदरील मुक्कामावरून सहजच तुझ्या लक्षांत येईल. माझा हा प्रवास संपेल तरी कधीं? मी केंव्हांतरी अमळ हायसा बसेन; मी लयोन्सामध्यें होतों, तेंव्हां मला वाटे कीं, सर्व सुख काय तें आल्प्स पर्वताच्या पलीकडे आहे. पुढें इतालींत आलों, तेथेंही चैन पडेना, आणि मनांत येई कीं, रोमिलिया-मध्यें गेलों ह्मणजे हें औदासिन्य नाहींसें होईल. हल्लीं येथें आहें, तरी तीच अवस्था; जिवाला बरें वाटत नाहीं. आज सात वर्षें झालीं, इतक्या अवकाशांत मी मेलों आहें किंवा जींवंत आहें, ह्याची वास्तपुस्त करणारा एकही प्राणी माझ्या दृष्टीस पडला नाहीं. सोयरे धायरे इष्ट मित्र ह्यांजपासून दूर राहिल्यामुळें मला वनवासी तपस्व्यांच्या एकांताचें दुःख भोगावें लागतें; पण त्यांच्या समाधानवृत्तीचा एक लेशही माझ्या वांट्यास येत नाहीं.

सध्या मी एका राजपुत्राच्या समागमें आहें. तेंव्हां उपासमरीचें तूर्त मला भय वाटत नाहीं. त्याचा कार-

भारी उद्धत, ढोंगी, आणि मूर्ख आहे; आणि त्याचा गुरु लबाड दुराचारी आहे. ह्यावरून राजपुत्राची स्थिति कशी असेल, हें सांगावयास नको. विद्याभ्यासेंकरून व सृष्ट्यवलोकनेंकरून जो ज्ञानांश मला प्राप्त झाला आहे, तो येथें दाखविण्याविषयीं मीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु, त्यांनीं मला एकाद्या मूर्ख आगंतुकासारिखें लेखिलें. हें मी आतां खातरीनें सांगतों कीं, मीं कितीही परिश्रम केले, तरी आपले विचार स्वभाषेखेरीज दुसऱ्या कोणत्याही भाषेनें स्पष्टपणें मला सांगतां यावयाचे नाहींत; व मजसारिख्यास परक्या देशांमध्यें दांभिक पंडित ह्मटल्यावांचून कोणी राहणार नाहीं.

हा देश पूर्वीं पराक्रमी पुरुषांनीं भरलेला होता, व ह्याच्या धाकानें एवढें रोमचें अवाढव्य राज्य, पण तें थरथरां कांपत होतें. असें असून ह्यांत लोक इतके दुर्बळ, अजागळ, आणि भित्रे कसे झाले, हें मला समजत नाहीं. ज्यानें पाहिजे त्यानें येऊन ह्यांचें धनी व्हावें, ह्यांस सावकाश लुटावें, आणि ह्यांनीं अवलांप्रमाणें पळून छपून आपला लाजिरवाणा बचाव करावा, अशी अवस्था ह्यांस प्राप्त झाली आहे. स्वतः मीच दुर्दशेंत आहें; तरी त्यांची अशी दीन दशा पाहून मला फार वाईट वाटतें. येथें सगळा बेबंद कारभार आहे. राजपुत्राबरोबर आह्मी सगळे तेरा असामी आहोंत. कितीएक शहरांमध्यें आमचे मुक्काम पडले. परंतु, एकाही ठिकाणीं आह्मांस सोईची जागा मिळाली नाहीं. एका शहराहून दुसरे शहरीं जाण्यास आह्मांस

वाटाड्ये मिळत नसत; त्यामुळें बायाबापड्यांचे हातून-च आपलीं कामें करून घेणें आह्मांस भाग पडे. एक बायको आह्मांबरोबर आपल्या घोड्यावर बसून दररोज पंधरा पंधरा कोस चाले; आणि तिला तिच्या मजुरीबद्दल दीड किंवा दोन आणे दिले ह्मणजे, ती आमच्या दाहादाहावेळ पांयांपडून फार उपकारी होई. ह्या कामीं आह्मांस पुरुषांपेक्षां बायकाच बऱ्या वाटल्या. पुरुष नेहमीं कवडी कवडी करीत असतात; व ते सर्वदा आपल्या घोड्याच्या शुश्रूषेंत मग्न असतात. त्यांस जलदी करण्याविषयीं सौम्य भाषणानें सांगून फळ नाहीं. रागानें पांचचार शिव्या हांसडून बोलावें, तेव्हां ते अंमळ शुद्धीवर येतात; आणि त्यांनीं मनापासून झटून काम करावें अशी इच्छा असल्यास, त्यांस थप्पड लगाविल्यावांचून दुसरा उपाय नाहीं. आह्मां इंग्लिश लोकांपासून हे लोक किती भिन्न आहेत पाहा! अशी थप्पड इंग्लंडांत कोणी सोशील काय? नांव देखील काढूं नका! सोसण्याचें एकीकडेसच असूंद्या. उलट्या दाहा थप्पडा जर तो न लगावील तर मी आपलें नांव बदलीन. हे लोक इतक्या नीचावस्थेस आले आहेत कीं, स्वाभिमान कसा असतो, हें ह्यांच्यामध्यें कोणास ठाऊक देखील नाहीं, असें दिसतें. बलात्कारास मान्य होणें हें आपलें कर्तव्य आहे, असें ह्या लोकांस वाटतें. आह्मी त्यांस गोड शब्द बोलून ममताळूपणानें वागवूं लागलों ह्मणजे, ते लागलेच हरबऱ्याच्या झाडावर चढून आमची बरोबरी करायास लागतात. क्रुद्ध शब्दांनीं व कधींकधीं देहदंडनानें आह्मीं त्यांस

दावीत गेलों नसतों, तर ते आमच्या डोक्यांवर बसून आह्मांस त्रास देते, ह्यांत संशय नाहीं. परंतु, उठतां लात आणि बसतां बुक्की दिली कीं, लागलेच ते आपल्या मर्यादेप्रमाणें वर्तूं लागतात.

ह्या लोकांकडे पाहिलें ह्मणजे स्वातंत्र्यसुखाच्या महत्वाची कल्पना आह्मां इंग्लिश लोकांचे मनांत जशी येते, तशी दुसऱ्या कोणत्याही उपायानें यावयाची नाहीं. इंग्लंदामध्यें मला उपास काढावे लागोत, अथवा दारिद्र्यामुळें तेथें माझी हेळणा होवो, तरी तो माझा जन्मदेश स्वतंत्रतेचें माहेरघर आहे, असें मनांत येऊन जो मला आनंद होतो, व जें सुख होतें, तें अनिर्वाच्य आहे. लोभ असावा हे विनंती.

मुक्काम स्ताकहोम.

विनंती विशेष, दोन देशांतील लोकांच्या रीतिभातींत अंतर काय आहे, हें पाहणें असल्यास, दोहोंकडच्या वरिष्ठ प्रतीच्या लोकांची तुलना करून पाहून उपयोग नाहीं; कारण, त्यांत बहुतेक साम्यच आढळतें. तर तो भेद समजण्यास उभय पक्षांकडील खालच्या प्रतीच्या लोकांची रीत ताडून पाहिली पाहिजे. ह्या पत्रांत मीं स्वीदनच्या लोकांचें थोडेंसें वर्णन करण्याचें योजिलें आहे.

पाहूं गेलें असतां हे लोक जुलुमाखालीं अगदीं जेर आहेत. तरी ते इतर तशा लोकांप्रमाणें खुनशी व द्वाड नाहींत. तर त्यांच्यामध्यें सत्य व प्रामाणिकपणा हे गुण बरेच असून एकादें घोर कृत्य करण्यास त्यांचे हात वाहात नाहींत. आपण ऐकत होतों तितके दरोडे स्वी-

दनांत पडत नाहींत, हें तुह्मांला खरें तरी वाटेल काय? मी आपल्या स्वतःच्या माहितीवरून खचीत सांगतों कीं, ह्या सर्व देशामध्यें फांस असा मला कोठेंही आढळला नाहीं. त्यांच्या धर्माधिकाऱ्यांवर त्यांचा भाव आहे. ते त्यांस अति पवित्र, देवाचे प्रधान, व जनास सत्पथीं लावणारे असे मानितात. व तेही त्यांस उत्तम प्रकारचा हितकारक बुद्धिवाद सांगतात.

हे शरीरानें बरेच सुदृढ व देखणे आहेत. त्यांत स्त्रियांपेक्षां पुरुष विशेष सुंदर आहेत. पुष्कळ लहान मुलगे मीं पाहिले. त्यांत बहुतेकांचे केंस पांढरे शुभ्र होते. ते मला केवळ मदनाच्या पुतळ्यासारखे दिसले. त्यांच्या मुखचर्या फार मनोरम होत्या. मुली पाहिल्या तों त्या सरासरीच होत्या. त्यांचीं शरीरें मुलांच्या शरीरांइतकीं नाजूक व कोमल नव्हतीं. ही गोष्ट सगळ्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर मोठी विलक्षणच समजली पाहिजे. कांकीं, असा प्रकार दुसऱ्या कोणत्याही देशांत पाहण्यांत येत नाहीं. शिवाय बायकांचे आंगावर बहुधा खरूज असते. त्यांमध्यें स्कानिया येथील बायकांची तर खरजेविषयीं मोठी आख्या आहे. ह्याचा प्रत्यक्ष मला एकदां अनुभव आला. वाटेनें जातांना आह्मी एका भटारखान्यांत उतरलों. तेथची धणीन तेथें बसलेली माझ्या दृष्टीस पडली. ती इतकी सुस्वरूप होती कीं, तिचें वर्णन माझ्यानें करवत नाहीं. आपले तान्यास स्तन पाजण्यासाठीं तिनें आपला पदर जरासा एकीकडे सारिला. तेव्हां तो अंतःकरणमोहक प्रदेश मीं पाहिला. तों तेथेंही पराकष्ठेची खरूज माझ्या

नजरेस पडली. तो रोग, तिनें बिलकूल न लाजतां आमच्या दृष्टीस येऊं दिला, ह्यावरून तिला त्याचें फारसें कांहीं वाटत नव्हतें, असें स्पष्ट दिसतें.

ह्या शहरांत तोफखाना आहे. ही इमारत फार मोठी व सुशोभित आहे. परंतु हिजमध्यें युद्धसाहित्य फारसें नाहीं. प्राचीन काळीं जय मिळवून शत्रूंपासून हिरावून घेतलेलीं राजचिन्हें वगैरे ह्यांनीं हा बहुतेक तोफखाना भरला आहे. देनिश, पालिश, साक्सन, आणि रुशियन, ह्या लोकांच्या निशाणांनीं तर खोल्यांच्या खोल्या भरल्या आहेत. तीं दाहा पांच हजार सैन्यास पुरून उरतील, असें मला वाटतें. पुष्कळ नवीं निशाणें करणें फार कठीण नाहीं; नवीन सैन्य ठेवणें हें फार कठीण आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अनेक नामांकित पुरुषांचें बहुमोल जवाहीर, उंची वस्त्रें, वगैरे पुष्कळ सामान त्यांत भरलें आहे. त्यांत गस्ताव्हस अदोलफस ह्मणून जो स्वीदनचा राजा, जर्मनीमध्यें लुटइने येथील लढाईंत इ. स. १६३२ ह्या वर्षी पतन पावला, त्याचीं, व तेथचाच राजा १२ वा चार्लस ह्याचीं, ह्मणजे जो इ. स. १७१८ मध्यें नार्वे देशांत फेदरिकशालच्या हल्ल्यांत गोळी लागून मरण पावला त्याचीं, अशीं दोघांचीं अंतकाळचीं वस्त्रें त्यामध्यें आहेत. आतां, ह्या देशाचा पराक्रमी, परंतु सध्या दरिद्रदशेस मिळालेला राजा दुसरा चार्लस, ह्याच्या एकदोन चमत्कारिक गोष्टी सांगतों.

धैर्य आणि दृढ निश्चय हे गुण ह्या पुरुषाचेठायीं पूर्णपणें वसतात. ह्यांचीं चिन्हें त्याच्या बालपणांत-

च दिसून आलीं. तो साहा सात वर्षांचा असतां एके दिवशीं आपल्या आईजवळ जेवावयास बसला होता. तेव्हां कुतऱ्यास भाकरीचा तुकडा द्यावा ह्या हेतूनें त्यानें तो आपले हातांत धरून त्याच्या पुढें केला. त्या अधाशी प्राण्यानें तो त्याचे हातांतून घेतांना दातांनीं त्याची करांगळी फोडिली. रक्ताची धार लागली. हें आपले आईला समजलें तर आपले मोत्यास मार बसेल, असें मनांत आणून त्या धीट मुलानें हात तसाच आपल्या रुमालानें बांधिला; आणि आपण स्वस्थ बसला. जेवीत कां नाहींस, असें त्याचे आईनें त्यास विचारिलें; तेव्हां तो बोलला, आईग, मला आतां भूक नाहीं, माझें पोट भरलें. त्याची कांहीं प्रकृति बिघडली असेल, असें तेथच्या जवळच्या माणसांस वाटून, तीं त्याला वारंवार विचारूं लागलीं. तरी तो सांगेना. तथापि रक्त फार गेल्यामुळें त्याचें तोंड अगदीं फिकें दिसूं लागलें. इतक्यांत ती जखम एका नौकराच्या दृष्टीस पडली. ह्या प्रसंगीं चार्लसास असें वाटलें कीं, कुतऱ्यानें मला दुखापत करण्यासाठीं, बुद्ध्या दंश केला नाहीं; त्याजकडून तो चुकून झाला आहे, त्या अर्थीं त्याला शिक्षेस पात्र करण्यापेक्षां आपणाला मरण आलें तरी बेहतर.

हे दोन गुण जर मनुष्याच्या अंगीं असले, आणि जर त्यांचा उपयोग त्याला नीट करतां आला, तर त्यांपासून किती चांगले परिणाम घडून येतील बरें! चार्लसाला सुशिक्षण मिळालें असतें तर तो लोकांस अत्यंत आनंददायक होऊन त्या काळीं महान कीर्ति-

मान होता. ज्या राजांस सुशिक्षक मिळाले, ते धन्य होत. गुरु तरी विद्वान असून सद्गुणी पाहिजे. त्यानें दुःखें पाहिलेलीं असावीं; ह्मणजे, सुख ह्मणजे काय, दुःख ह्मणजे काय, सत्कीर्तीची खरी योग्यता काय, राजत्वापेक्षां सज्जनत्व श्रेष्ठ आहे, स्वकर्तव्य कर्म करणारा शेतकरी जुलमी राजापेक्षां श्रेष्ठ आहे, इत्यादि गोष्टी तो आपल्या राजशिष्याच्या अंतःकरणांत बिंबवितो; परंतु असें घडतें कोठें? राजेलोकांस गुरु प्रायः त्यांचे सारखेच अल्पज्ञ, ढोंगी, मूर्ख, व दुराग्रही मिळतात. त्यांस मानवस्वभावाचें ज्ञान ह्मणजे विद्येचें मूळतत्व, तें मुळींच ठाऊक नसतें. जे निर्धन ते मूर्ख, व जे श्रीमान् ते शाहणे, असें त्यांस वाटत असतें. हलक्या प्रतीच्या लोकांत ह्मणजे कोणी सुज्ञ असेल, असें त्यांचे मनांत देखील येत नाहीं. आणि हेंच ते आपल्या विद्यार्थ्यांस पढवितात; आणि ते सर्वदा त्यांची स्तुति करीत असतात. तेव्हां ते कसे चांगले निपजतील बरें?

ह्या राजपुत्राची आणखी एक गोष्ट सांगून हें पत्र पुरें करितों. प्रवासाची आवड त्याला पराकाष्ठेची होती. चोवीसचोवीस तास एकसारखा घोड्यावर बसून तो आपल्या राज्यांत फिरे. एके दिवशीं त्यानें आपला घोडा भरधांव काढिला, तेव्हां त्याचे बरोबरचे सरदार वगैरे सर्व मागें राहिले; आणि राजपुत्र एकटाच लांब गेला. त्याचे जवळ एक चोतकर भाकर मात्र होती; दुसरें कांहीं नव्हतें. जातां जातां अकस्मात् त्याचा घोडा, थोडी धडपड करून मेला. दुसऱ्या कोणालाही मार्गामध्यें असा प्रसंग पडता, तर खचीत तो

पंचाइतींत पडता. परंतु, चार्लसाला त्याचें कांहींएक वाटलें नाहीं. कदाचित् दुसरा ह्यासारखा घोडा मिळेल, परंतु, असें छानदार खोगीर व पिस्तुल पुनः लाभणें कठीण, अशी गोष्ट मनांत आणून, त्यानें त्याचें सगळें एक गांठोडें बांधिलें; आणि तें पाठीवर घेऊन वाट धरिली. सुदैवेंकरून एक धर्मशाळा जवळच लागली, तींत तो गेला. आणि तबेल्यांत जाऊन पाहतो तों, एक उत्कृष्ट घोडा त्याच्या मनासारखा त्याच्या नजरेस पडला. त्याची कांहीं विचारपूस न करितां, त्यानें खुशाल त्याजवर खोगीर ठेविलें, लगाम घातला, आणि रिकाबींत पाय घालून आतां तो वर बसणार, इतक्यांत घोडा चोरीस जात आहे अशी बातमी मूळ मालकास कळून तो तेथें आला. तो राजास न ओळखून ह्मणतो, "अरे, ए, घोडा कोणाचा कोठें चालविला रे ?." राजपुत्र उत्तर देतो, "हो, हा घोडा मी नेतों; कांकीं, सध्या मजपाशीं दुसरा घोडा मुळींच नाहीं. हा जर मी न नेईन तर, हें खोगराचें वगैरे ओझें मला स्वतः डोक्यावर वाहून न्यावें लागेल". हें ऐकतांच घोड्याच्या मालकास राग येऊन त्यानें आपली तरवार उपसली. राजपुत्रही आतां तसेंच शस्त्र काढणार, इतक्यांत तेथें राजाच्या गारदीचे लोक आले; त्यांनीं हा राजपुत्र आहे असें त्या मनुष्यास सांगितलें, तेव्हां त्याला सलज्जाश्चर्य वाटलें. तथापि राजपुत्र त्याचा हात धरून त्याला असें ह्मणाला कीं, शाबास, तूं शूर आहेस, तुला मी चढवीन. पुढें कितीएक दिवसांनीं खरोखरच त्यास

त्यानें सेनापतीचीं वस्त्रें दिलीं. कळावें लोभ असावा हे विनंती.

## निद्राभ्रम.

इताली देशांत पाद्युआनामक एक गांव आहे. तेथें सिरिलोपादोव्हानो ह्मणून कोणीएक मनुष्य रहात होता. तो जागृतावस्थेमध्यें साधा, इमानी, धर्मनिष्ठ, आणि स्पष्टवक्ता असा असे; परंतु झोंपेंत इकडे तिकडे हिंडून चौर्यादिक पापकर्में करी. त्याच्या पुष्कळ गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत. त्यांपैकीं मोठमोठ्या कांहीं येथें सांगतों.

तो लहानपणीं शाळेंत जात असे. एके दिवशीं त्याच्या गुरूनें त्याला एक लांबचलांब गोष्ट घराहून उतरून आणावयास सांगितलें. ती फारच मोठी होती ह्मणून, रात्रीं लिहितां लिहितां अगदीं थकून जाऊन आतां आपणाच्यानें लिहिवत नाहीं, आणि उद्यां शिक्षा झाल्यावांचून राहात नाहीं, असा विचार मनांत आणून तो फार खिन्न झाला, आणि गोष्ट तितकीच अर्धवट टाकून तो आपले बिच्छान्यावर जाऊन निजला. आणि सकाळीं उठून पाहूं लागला तों, जो धडा रात्रीं तो अर्धाच टाकून निजला, तो त्याच्याच हातचा पूर्ण लिहिलेला त्याला त्याच्या मेजावर सांपडला. तेव्हां, हें झालें कसें, ह्याचा त्याला मोठा अचंबा वाटला. आणि ती हकीकत त्याच दिवशीं त्यानें आपले गुरूला कळविली. तिचें त्यालाही मोठें नवल झालें. परंतु, ह्या गोष्टीचें मर्म काय, ह्याचा पक्का शोध लावावा, असें मनांत आणून

त्यानें सिरिलो ह्यास, पुनः एके दिवशीं, पहिलीपेक्षांही मोठी गोष्ट घराहून उतरून आणायास सांगितलें; आणि त्या रात्रींत तो काय करतो, तें पहाण्यासाठीं, आपण त्याच्या शेजारच्या खोलींत जाऊन जागत बसला. हे राजश्री पूर्वीं प्रमाणेंच लिहितां लिहितां कंटाळून आपल्या आंथरुणावर जाऊन निजले. आणि झोंपेंतच पुनः एक तासानें आंथरुणावरून उठून, धडा पुरता करून परत जाऊन निजले.

नंतर ही त्याची खोड लोकांत प्रसिद्ध झाली. तेव्हां तिची त्याला फार लाज वाटूं लागली. तो प्रौढ झाला, तेव्हां त्याचे मनांत असा विचार आला कीं, आपल्या मनाची स्थिति अशी वाईट आहे, त्यापेक्षां सर्वसंगपरित्याग करून एकाद्या मठांत जाऊन राहावें, हें फार चांगलें. त्या प्रमाणें तो अवधूत होऊन, एके मठांत जाऊन राहिला. तेथें त्याच्या धार्मिकपणाची प्रथमतः फार कीर्ति झाली; पण ती त्याला फार दिवस लाभली नाहीं. कां कीं, तो जितकीं सत्कृत्यें दिवसास करी, तितक्यांचा वचवा, तो रात्रीं जिकडेतिकडे हिंडून वाईट कर्मांत काढी, तेणें करून सर्वांचें त्यावरचें मन उडालें. त्या मठांत तो प्रथमतः नुसता ह्या खोलींतून त्या खोलींत आणि त्या खोलींतून ह्या खोलींत, ह्याप्रमाणें रात्रीं झोंपेंत धांवून वेड्यासारखा वडवड करूं लागला. तरी त्याचा इतर मठवाशांनीं त्रास केला नाहीं.

एके रात्रीं एक तास पावेतों तो आपले विच्छान्यावर स्वस्थ निजून, झोंपेंत एकाएकीं उभा राहिला, आणि कांहीं बोलणें ऐकिलेंसें करून मोठ्यांनीं गदगदां हंसला.

नंतर हाताचीं बोटें बाहेर झाडल्यासारिखीं करून, जें ऐकिलें त्यांत कांहीं हांशील नाहीं, असें त्यानें दाखविलें. मग दुसऱ्या कोणा माणसाकडे वळल्यासारिखें करून तपकिरीकरितां चिमूट पुढें केली. पण तेथें शेजारीं कोणी नव्हतें; तेव्हां तो अमळसा हिरमुसल्या सारखा होऊन मागें वळला. नंतर त्यानें आपली डबी काढिली, तींत कांहीं नव्हतें; तरी तींत बोटें घालघालून चिमटी काढण्यास त्यानें पुष्कळ यत्न केला, तो सर्व व्यर्थ गेला; तेव्हां संशयमुद्रेनें चोहींकडे पाहून, ती डबी चटकर आपले खिशांत टाकिली. पुढें कांहीं वेळ स्तब्ध बसून कांहीं उघड कारण नसतां एकाएकीं तो परा-काष्ठेचा संतापला, आणि शिव्या शाप देऊं लागला, व तडातड शपथा वाहूं लागला. इतकी कृति दुरून पाहून इतर मठवासी कंटाळून उठून गेले.

तो पुनः एके रात्रीं निद्राभ्रमांतच उठून, मोठ्या लगबगीनें, त्या मठांतील पवित्र यज्ञशाळेंत गेला. तो, तेथें एक ताट ठेवीत असत, तें चोरून आणण्याच्या बेतानें गेला असावा असें वाटतें. परंतु आदले दिवशीं तें घांसण्याकारितां बाहेर टाकिलें होतें, ह्मणून तेथें त्याला कांहीं सांपडलें नाहीं. तेणेंकरून त्याला फार संताप आला; आणि, रिक्तहस्तें आपल्या खोलींत परत जावयाचेंच नाहीं; असा पक्का निश्चय करून, तेथें जवळच कांहीं मठवाशांचे यज्ञकर्में करतेवेळीं घालण्याचे उंची उंची रेशमी झगे होते, त्यांतले दोन तीन हळूच उचलून घेऊन, स्वारी भयभीत होत्साती, पळतपळत आपल्या खोलींत आली, आणि ते कपडे

आपल्या गादीखालीं लपवून ठेवून, वर स्वस्थ निजली. हें ज्यांनीं पाहिलें होतें, ते, हा सकाळच्या प्रहरीं काय करतो, हें पाहण्यास फार उत्सुक झाले होते.

तो सकाळीं जागा होऊन पाहातो तों, त्याचे आंथरुणाला मध्येंच एक गोळा आलेला त्याचे दृष्टीस पडला. तेणेंकरून त्याला मोठें आश्चर्य वाटलें; आणि ते झगे आहेत, असें पाहून तर त्याची बुद्धिच गुंग होऊन गेली. तो बाहेर जाऊन लोकांस विचारूं लागला कीं, हें झालें तरी कसें? तेव्हां मठवाशांनीं त्याला कच्ची हकीकत कळविली. ती ऐकून, तो लाजून, मान खालीं घालून एक अक्षरही न बोलतां चालता झाला; आणि ते झगे त्यानें तात्काळ जिकडचे तिकडे पोहोंचविले.

सिरिलोची आणखी एक गोष्ट सांगतों ह्मणजे झालें. एका श्रीमान् धार्मिक स्त्रीनें त्या मठास बहुत दिवस पर्यंत चांगला आश्रय दिला होता. ती एकाएकीं मरण पावली. तिला, मठाजवळच एक जागा तयार केलेली होती, तींत, तिच्या सांगण्याप्रमाणें तिच्या अलंकारभूषणांसह पुरलें. तेव्हां मठवाशांस फार दुःख झालें; त्यांत सिरिलो तर पराकाष्ठेचा दुःखित झाला. नंतर रात्र होऊन सर्व निजल्यावर, हे विलक्षण पुरुष, निद्राभ्रमांत हळूच उठून तिच्या समाधीपाशीं गेले; त्यांनीं तिचें प्रेत उकरिलें; बोटें तोडून आंगठ्या, व इतर अवयव छिन्नविच्छिन्न करून बाकीचे अळंकार काढून घेतले, ते आणून आपल्या खोलींत ठेविले, आणि मग शयन केलें. उजाडल्या-

वर आपल्या आश्रयदातीचें तें छिन्नभिन्न प्रेत जेव्हां मठवाशांनीं पाहिलें, तेव्हां त्यांस किती वाईट वाटलें, तें लिहिण्याचें कारण नाहीं. कां कीं, त्याची कल्पना वाचणारांचे मनांत सहज येण्यासारिखी आहे. त्यांत सिरिलो हा जितका दुःखित झाला, तितका दुसरा कोणी झाला नाहीं. त्यावरून, तें कर्म त्याचे हातून झालें असेल, असें कोणाच्याही मनांत आलें नाहीं. परंतु पुढें थोडक्याच दिवसांनीं तिचे दागिनें त्यालाच त्याचे घरांत सांपडले; तेव्हां त्याला असें झालें कीं, ह्या वेळीं पृथ्वी पोटांत घेईल तर फार चांगलें. पण करतो काय? त्यानें ते दागिनें, लज्जेनें मान खालीं घालून, डोळ्यांचें पाणी पुशीत पुशीत, मठवाशांच्या मंडळींत नेऊन दिले; आणि तो मठ सोडून दुसरे मठांत जाऊन राहिला. पहा ईश्वराची लीला काय अगाध आहे ती.

---

## इंग्रजांचें राज्य.

ज्या महापराक्रमी लोकांच्या राज्यांत आपण आहों, त्यांच्या राज्याचा विस्तार पृथ्वीवर केवढा आहे, हें समजणें फार उपयोगी व मनोरंजक आहे. ह्मणून त्याजविषयीं माहिती संक्षेपानें लिहितों.

ह्यांचा मूळ देश व राज्य ह्मटलें ह्मणजे, ग्रेतब्रितन व ऐर्लंद, हीं दोन बेटें होत. ग्रेतब्रितनाचे, इंग्लंद, स्कातुलंद, आणि वेल्स, असे तीन विभाग केले आहेत. ऐर्लंद हें ग्रेतब्रितनाच्या पश्चिमेस आहे; ह्मणून त्याला कोणी पश्चिम ब्रितन असेंही ह्मणतात.

हीं बेटें युरोपाच्या वायव्येस आतलांतिक महासागरांत आहेत. हीं व ह्यांच्या जवळचीं दुसरीं लहानलहान बेटें, ह्यांस ब्रितिशबेटें असें एक वेगळेंच नांव आहे. ह्यांखेरीज इंग्रजांकडे मुलूख आहेत ते येणेप्रमाणें.—

एशिआखंडांत.—हिंदुस्थानाचा बहुतेक भाग; आराकान, हा हिंदुस्थानाच्या पूर्वेकडे आहे, तो इ० स० १८२६ त ब्रह्मी लोकांकडून मिळाला; सिंहलद्वीप ह्मणजे लंका; ह्याच्या पूर्वेकडचें मलाका; त्याच्या पश्चिमेकडचे प्रिन्स अफ वेल्स बेट; सिंकापूर; आणि चिनी लोकांकडून मिळालेलीं हांगकांग बेटें; इतका प्रदेश इंग्रजांकडे आहे.

युरोपखंडांत.—जर्मन समुद्रांतील हेलिगोलांद बेटें; जिब्रालतरचा किल्ला स्पेनांत आहे तो; भूमध्यसमुद्रांतील मालता बेट; आणि ग्रीसच्या पश्चिमे कडील अयोनियन बेटें; हीं इंग्रजांकडे आहेत.

आस्त्रेलियांत.—न्यूहालंदाचा बहुतेक भाग; व्हांदिमन्सलांद; न्यूझीलंद; आणि नार्फाक बेटें; हीं इंग्रजांकडे आहेत.

आफ्रिका खंडांत.—केप अफ गुद होप; सीरा लोन; फरनांदोपो; सेंतहेलिना; असेंशन; मारिशास; आणि ऐल अफ फ्रान्स; हीं इंग्रजांकडे आहेत.

उत्तर अमेरिकेंत.—लाब्रादोर; हदसनच्या सामुद्रधुनीच्या भोंवतालचा प्रदेश; वरचा कानडा; खालचा कानडा; न्यूब्रनजिक; नोवास्कोशिया; न्यूफाउंदलांद; प्रिन्सएदवर्दस बेट; केप ब्रितन; बरमुदाज़ आणि सोमर बेटें; आणि हांदुरास अखातांतील बेलिज वगैरे वसाहाती; हीं इंग्रजांकडे आहेत.

दक्षिण अमेरिकेंत;–देमिरारा; एसेक्किबो; बरबिस; हीं गिनियापैकीं आहेत; आणि शिवाय फाकलंद बेट; हीं इंग्रजांकडे आहेत.

वेस्तइंदीज बेटांत.–बहामा; जमेका; बार्बादोस; त्रिनिदाद इत्यादि बेटें इंग्रजांकडे आहेत.

ग्रेतब्रितन आणि ऐर्लंद ह्यांचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें १२०००० चौरस मैल आहे; आणि लोकसंख्या सुमारें २८००००० आहे.

सामान्य गणनेवरून असें समजलें आहे कीं, हे इंग्रजलोक खुद आपल्या ग्रेतब्रितनाच्या साठपटी इतक्या प्रदेशावर राज्य करीत आहेत; व त्यांच्या ताब्यांत ग्रेतब्रितनच्या प्रजेच्या साहापटीपेक्षांही अधिक, इतकी प्रजा आहे. तेव्हां 'इंग्रजांच्या राज्यावर सूर्य कधींही मावळत नाहीं,' असें जें ह्मणतात, तें खरें आहे. कांकीं वर सांगितलेले अनेक देश एकाच गोलार्धांत आहेत असें नाहीं; दोहोंतही आहेत. ह्यास्तव, एका गोलार्धांतील देशांवर सूर्य मावळला, तर तो दुसऱ्या गोलार्धांतील देशांवर प्रकाशित असलाच पाहिजे.

हिंदुस्थानांतील एतद्देशीय स्वार खेरीज करून, इंग्रजांचें सैन्य सुमारें १००००० आहे; लढाऊ गलबतें ५०० पेक्षां अधिक आहेत; त्यांपैकीं शंभरांपेक्षां अधिक गलबतांवर, प्रत्येकांत, ७२ पासून १२० पर्यंत तोफा असतात. इंग्रजांचीं व्यापारांचीं जाहाजें सुमारें ३०००० आहेत; आणि त्यांवर खलाशांची संख्या, एकंदर सरासरी, १८०००० हून अधिक आहे.

ग्रेतब्रितन आणि ऐर्लंद ह्यांचें सरासरी उत्पन्न दरसाल ५०००००००० रुपये आहे. ही रकम, युरोपांतील इतर सर्व राज्यांच्या दरसालच्या उत्पन्नांच्या बेरजेच्या सुमारें तृतीयांशाइतकी आहे.

इंग्रज सरकारास कर्ज सुमारें ८,००,०ा,००,००० रुपये आहे. ही रकम, युरोपांतील इतर सर्व राजांस जें कर्ज आहे, त्याच्या एकंदर बेरजेच्या निमेहून जास्त आहे. केवळ ग्रेतब्रितन आणि ऐर्लंद ह्यांत सरकारची मालमत्ता सुमारें ३७०००,०००,००० रुपयांची आहे; हींत जर बाहेरच्या ताब्यांतील देशांतली मालमत्ता मिळविली, तर एकंदर बेरीज ५५०००००००००० रुपये होते. प्रजेची दरसालची प्राप्ती, ह्मणजे, त्यांच्या कलाकौशल्याचें व उद्योगाचें उत्पन्न अजमासें ५०००००००००० रु० आहे.

ब्रितिश बेटांची लोकसंख्या, इ० स० १८२१ त २१२८२९२६ होती; आणि इ० स० १८५१ त, २७६१४८६६ होती; ह्या मानानें ती वाढत चालली आहे. तसेंच इंग्रजांच्या बाहेरच्या देशांतल्या त्यांच्या राज्यांतील लोकसंख्या सुमारें १८००००००० आहे.

## मोहनलालाचें प्रवासवर्णन.

### दिल्लीपासून पेशावरापर्यंत.

### विशेष गोष्टी.

पाणिपत.— येथें बुवाली कलंदर नामक प्रख्यात प्राचीन साधूची कबर आहे. तिच्या जवळ काळ्या दगडाचे दोन मोठे स्तंभ आहेत. ते सुमारें १२ फूट उंच असून त्यांस लोक सागमूसा असें ह्मणतात. ....ता० २३ दिसें० १८३१.

सुगा.—येथून रात्रीं ५०० स्वार व २ तोफा लाहोराकडून येऊन निहांग लोकांच्या पारिपत्याकरितां चालत्या झाल्या.

शीखजाट लोकांत अशी वहिवाट आहे कीं, एकादे बायकोचा नवरा जर मरण पावला, तर ती त्याच्या भावास वरित्ये. नवरा कोठें प्रवासास गेला, तर त्याची बायको त्याचे भावाशीं नवऱ्याप्रमाणें खुशाल वहिवाट करिते, तरी नवऱ्याला राग मुळींच येत नाहीं. आणखी असें ऐकिलें कीं, हिमालय पर्वतावर एकाशींच लग्न लागलेली अशी स्त्री, एक देखील नाहीं. तर प्रत्येकीला एका घरांतले तीन तीन चार चार देखील नवरे असतात. ........ता० १३ जाने० १८३२.

लाहोर.—महाराज रणजितशिंग ह्याचा निरोप आल्यावरून आह्मी त्यास भेटण्याकरितां बागामध्यें त्याच्या तंबूंत गेलों. तो केवळ इंद्रभुवनासारखा आह्मांस वाटला. रणजितशिंगानें पुढें येऊन आमचा आदरसत्कार केला. बर्न आणि जिरार्द ह्या साहेबांस

त्यानें सोन्याच्या खुर्च्यांवर बसविलें; आणि चार घटि-
का त्यांशीं चांगलें भाषण केलें. त्यावरून असें
दिसून आलें कीं, तो इंग्लिश सरकारचा दोस्त आहे.
रणजितशिंग हा आंगानें सडपातळ असून एका
डोळ्यानें त्यास दिसत नाहीं. वयपरत्वें पिकलेली
त्याची लांब डाढी त्याच्या बेंबीवर पडते. तो आपलें
राज्य एकटा चालवितो. त्याचा एक डोळा धड
आहे; तो नेहमीं अमलानें लाल झालेला असतो.
नाचाचा षोक त्याला अतिशयित आहे. नर्तन कर-
णाऱ्या तरुण रूपवती स्त्रिया त्याच्यापुढें हरघडी झुलत
असतात.— त्याच्या एका प्रधानानें त्याची एक अशी
चमत्कारिक गोष्ट सांगितली कीं, हिराशिंग नामक तेरा
वर्षांच्या एका खूपसुरत मुलावर रणजितशिंग पराका-
ष्ठेची प्रीति करितो. आणखी असें ह्मणतात कीं,
ह्याच गुणावरून महाराजानें हिराशिंगाचा बाप दिना-
शिंग ह्यास त्याच्या तारुण्याचे भराचे वेळीं मोठी जाहा-
गीर दिली. महाराज शेजेवर गेले ह्मणजे तिकडे
इतर कोणास जाण्यास परवानगी नसते; परंतु, हिरा-
शिंगास मात्र कोणी आडकाठी करूं नये, असा हुकूम
आहे. हिराशिंग अलौकिक सुस्वरूप आहे असें नाहीं.
तरी, रणजितशिंग दरबारामध्यें त्याला आपले
बरोबर सोन्याच्या खुर्चीवर बसवितो; आणि दिनाशिंग
तेथें जमिनीवर बसतो.— लाहोरास मोठा किल्ला आहे,
व त्या भोंवती खंदक आहे. शहरांतील रस्ते ओंगळ
आणि इतके अरुंद आहेत कीं, दोन घोडींही जाण्यास
पंचाईत पडते. पेंठा चांगल्या ओळींनीं वसलेल्या

नाहींत. हवा स्वच्छ आहे. उन्हाळ्यांत उष्णता व हिवाळ्यांत थंडी, हीं दोन्हीं अतिशयित होतात. जमीन पिकाऊ आहे. गहूं वगैरे धान्यें विपुल पिकतात. कधींकधीं धरणीकंप होतात. गेल्या रात्रीं एक लहानसा धक्का बसला.····(२३ जाने.)

—लाहोरांतले लोक शीखधर्मी ह्मणजे नानकपंथी आहेत. ते बावानानक ह्यास गुरु ह्मणून भजतात. त्यांच्यांत डुकरें खाण्याचा पाठ आहे. मुसलमान लोकांस ते पाण्यांत पाहतात.— लाहोरचा सर्व कारभार एकटा रणजितशिंग चालवितो. त्यानें एक असा कायदा केला आहे कीं, जो कोणी खून करील, त्याचे कान व नाक कापून टाकून, त्यापासून दोन किंवा तीन हजार रुपये दंड घ्यावा. राजा गुलाबशिंग, राजा दिनाशिंग, आणि राजा सचेतशिंग, ह्या तिघां नीच मनुष्यांवर महाराजांची मेहेरबानी आहे. कामाकाजांत ते त्यांची मसलत घेत असतात.

—शाद्रा येथें जाऊन दिल्लीचा बादशाह जाहांगीर ह्याची आह्मीं कबर पाहिली. ती रावी नदीच्या उजव्या तीरावर आहे. ती उत्तम प्रतीच्या दगडांनीं बांधिलेली असून, तिजवर नक्षीही फार चांगली काढिलेली आहे. नूरजाहान हिची, ह्मणजे शाहाजाहानाच्या राणीचीही कबर तेथेंच होती. पण ती मोडून गेली.—सुमारें दीड कोसावर माधुलाल हुसेन ह्याच्या कबरीजवळ वसंताची जत्रा भरली होती, ती पाहावयास अह्मी गेलों. तेथें माधुलालहुसेन हा कोण होता, अशी अह्मी चौकशी करूं लागलों. तेव्हां

लाहोरच्या एका वृद्ध पुरुषानें त्याची दंतकथा सांगितली. ती अशी. माधू हा हिंदू मुलगा होता. तो फार सुंदर असल्या कारणानें लालहुसेन नामक एका अवलियाच्या मनांत भरला. त्याला आपला चेला करण्याकारितां त्यानें त्यास त्याचे बापापाशीं मागितलें. तो देईना. पुढें थोड्या दिवसांनीं माधू एकाएकीं मरण पावला. तेव्हां त्याचीं आईबापें दीन होऊन तें प्रेत घेऊन लालहुसेनापाशीं आलीं. तेव्हां जीवंत करीन पण हा माझा चेला झाला पाहिजे, अशी त्यांपासून त्यानें आणभाक घेऊन माधूस उठविलें. नंतर तो त्याचा चेला झाला. ( ६ फे. १८३२ ). पंजाबी लोक फार अमंगळ राहतात. ते कधीं स्नान करीत नाहींत, व तोंडही धूत नाहींत. तेणें करून ते हरहमेषा ज्वरानें आजारी पडतात.

बिकि.— येथें बायका फार देखण्या आहेत. एका महंतिणीनें बांधिलेली गोडे पाण्याची विहीर मोजण्याकरितां मी गेलों होतों; तेथें अनेक स्त्रिया पाणी शेंदीत होत्या. त्यांचीं शरीरें ज्वान पुरुषांच्या प्रमाणें पुष्ट आणि वळणदार होतीं. एक स्त्री तर केवळ देवांगनाच मला भासली. तिच्या शरीराचा बांधा, तोंडाचा डौल, आंगाचें तेज, उभें राहण्याचा झोंक, आणि मंजुल शब्द, हीं खरोखर परम चित्तवेधक होतीं.•• •• •• •• •• ता० २३ फे०१८३२.

दादलखानाची पिंड.— हें शहर सुंदर आहे. मिठाच्या खाणीवरून हें प्रसिद्ध आहे. सुमारें ४०० यार्दांची एक खाण आह्मीं जाऊन पाहिली. तींत

जाण्याचा रस्ता केवळ एका माणसाचा आहे. आंत पुष्कळ बायका व पुरुष काम करीत होते. मीठ तांबूस व फार कठीण असतें. तें हातोड्यांनीं व पाहारांनीं खणतात. खाणींत ओलावा मुळींच नाहीं. आंतलीं माणसें अगदीं पिवळीं पडून गेलीं होतीं, व तीं रोगी दिसत होतीं. सर्व खाणींचें दरसालचें उत्पन्न अठरा लक्ष रुपये आहे. शिवाय दोन लाख रुपये मिठावरच्या कराचे उत्पन्न होतात. मीठ खेंचरांवरून व उंटांवरून पंजाबांत जातें.......( २५ फे. )

दारापूर.– येथें बायकांचें प्राबल्य आहे. त्या नवऱ्यांचें मुळींच ऐकत नाहींत, व त्यांस मानीत नाहींत. त्यांस त्या आपल्या आज्ञेंत वागवितात. त्याअर्थीं, त्या गांवास दारापूर हें नांव योग्य. !! ......( २८ फे० )

रावळपिंडी.– येथें आह्मीं आलों. पुढें आह्मांस अफगाणिस्थानांत प्रवेश करावयाचा होता, ह्मणून आह्मीं आपलीं नांवें बदललीं, तीं अशीं. बर्न साहेब आपणांस शिकंदरखान ह्मणवूं लागले; आणि मी हसनजान हें नांव घेतलें. येथील हवा चांगली आहे; व शेतें चांगलीं येतात.........( ८ मार्च. )

पेशावर–हें शहर साफ मैदानावर वसलेलें नाहीं. समुद्राच्या सपाटीपासून ह्याची उंची सुमारें १७०० फूट आहे. ह्याच्या सभोंवतीं कोट नाहीं. परंतु एक बाजू खेरीज करून बाकी सर्व दिशांकडे डोंगर आहेत. घरें कच्च्या विटांचीं बांधिलेलीं आहेत. रस्ते लाहोरच्यां पेक्षां मोठे व निर्मळ असून त्यांवर फरसबंदी केली आहे. शहरांत ओढे पुष्कळ वाहतात. मसीदी

अनेक आहेत. परंतु, दिल्लीच्यां इतक्या चांगल्या नाहींत. शहराच्या उत्तर भागीं एक मोडका बाले-किल्ला आहे. त्यावर उभें राहिलें असतां फार लांब पर्यंत सुंदर प्रदेश दृष्टीस पडतो. राहिवासी लोक बहुधा अफगाण ह्मणजे दुराणी आहेत. लोकसंख्या सुमारें ८०००० आहे. बडे लोक खेरीज करून बाकीचे लोक निर्दय व क्रूर आहेत.—पेशावरची हवा वारंवार बदलणारी आहे. तरी तिजपासून तेथच्या उत्पन्नास धक्का पोंहचत नाहीं. दुष्काळ सहसा कधीं पडत नाहीं. कृषिकर्माकडे लोकांचें लक्ष्य इतकें आहे कीं, पंजाब हा उत्कृष्ट पिकाऊ देश आहे तरी त्यासही पेशावरानें मागें टाकिलें आहे, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. द्राक्षें, सीताफळें, अंजीर, लिंबें, नारिंगें, इत्यादि फळें तेथें पुष्कळ चांगलीं होतात.

ह्या देशावर अंमल वेगवेगळे जागीं वेगवेगळे सर-दार करितात. त्यांस न्याय हा कसा तो मुळींच ठाऊक नाहीं. ऐषआरामांत त्यांचे सर्व दिवस जा-तात. त्यांजपाशीं सैन्य वरेंच असतें. त्यांतील लोक मोठ्या आवेशानें लढतात.—पेशावरावर ज्या राजाचा हल्लीं अंमल आहे, त्याचें नांव सुलतान महंमदखान. तो वांध्यानें मध्यमसर असून उतारवयांत आला आहे. तो मोठा विषयी पुरुष आहे. त्याचे सभोंवतीं बहुतेक तरुण व सुस्वरूप बायकांचा वेढा असतो. राज्य-व्यवस्थेची काळजी तो बिलकूल करीत नाहीं. नेह-मी नाना तऱ्हेचे पोषाक करून नटण्यांत मग्न असतो. त्याला सध्या तीस मुलें आहेत, पूर्वीं तीस मरण पाव-

लीं.—पेशावरामध्यें एक मौलवी असे. तो एका शिंप्याचे बायकोशीं लागू होता. तो तिशीं स्वस्थपणें गप्पा मारीत असतां शिंपी अकस्मात् घरांत आला. त्यास तो प्रकार समजतांच, त्याला असा त्वेष आला कीं, त्यानें त्या उभयतांचेही तुकडेतुकडे करून ते, सुलतानमहंमद बर्न साहेबापाशीं गोष्टी सांगत बसला होता, तेथें नेले. राजानें सर्व हकीकत ऐकून घेऊन शिंप्याची वाहवा केली ........ (२३ मार्च.)

आज पाऊस आणि गारा ह्यांची पराकष्ठेची वृष्टि झाली. तेव्हां, मजपाशीं एक बाळगलेलें माकड होतें त्यानें गारा अतिशयित गार असतांही पटापट टिपून खाण्याचा सपाटा चालविला. तें पाहून बर्न साहेबास मोठें आश्चर्य झालें. (१ एप्रिल.)—बर्न साहेब व सुलतानमहंमद हे बरोबर शिकारीस गेले. मागें मला एक जवाहिऱ्या भेटला. तो एशिया खंडांत पुष्कळ देश फिरला होता. त्यानें मला तुर्कस्थानांतल्या पुष्कळ चमत्कारिक गोष्टी सांगितल्या. त्यांत तो असें ह्मणाला कीं, तुर्कस्थानांत अफगाण लोकांपेक्षां हिंदूस लोक चांगले चाहतात. ह्याचें कारण मीं त्यास पुसिलें. तेव्हां त्यानें मला एक गोष्ट सांगितली. ती अशी. एक अफगाण, एक सिंधी, आणि एक हिंदू, असे तीन असामी मक्केस जात होते. ते आरबस्थानाच्या सीमेवर येऊन मार्ग चुकले. तेथें एक शेतकरी काम करीत होता, तो त्यांस भेटला. त्याला त्यांनीं आपली वाट चुकल्याची सर्व हकीकत सांगितल्यावर त्यानें त्यांस मार्ग दाखविण्यास आपली

मुलगी त्यांचे बरोबर दिली. ती सुस्वरूप होती. अं-मळसे दूर गेल्यानंतर, त्यांत अफगाण होता, तो आपल्या सोबत्यास ह्मणतो, "कसेंरे गड्यांनो, ही तर खूप छान आहे! मला परवानगी देतां?" सिंधी बोलला, "हूं, ठीक आहे, मी तिचा तेवढा घोडा उपटतों ह्मणजे पुरे." हें भाषण ऐकून हिंदूस वाईट वाटलें. त्यानें आपल्या सोबत्यांस नानाप्रकारें बोध केला. परंतु सर्व व्यर्थ. त्यांनीं करावयाचें तें केलें. तिचें पातिव्रत्य भंगलें, व घोडेंही गेलें. ती रडतरडत बापाकडे गेली आणि कच्ची हकीकत सांगती झाली. तेणेंकरून त्याला इतका संताप आला कीं, त्याच्या नेत्रांतून टपटपां रक्ताचे थेंब पडले. त्यानें लागलेंच आपले नोकर पाठवून त्या तिघांसही पकडून आणिलें. अफगाण आणि सिंधी ह्या दोघांच्या आंगांचीं कातडीं सोलून काढिलीं, आणि त्यांस मारिलें. व त्या हिंदूशीं तिचें लग्न लाविलें, व त्याच्या नांवानें एक गांव वसविलें. तेव्हांपासून आरबलोक हिंदूंस इमानी मानून चाहतात.

## मातापितरें आणि मुलें.

मुलांपासून जें समाधान होतें, तें केवळ मातापितरांच्या अंतःकरणांसच समजतें. तशींच मुलांविषयींचीं भयें आणि दुःखेंही त्यांच्यांच मनांस पुशिलीं पाहिजेत. मुलांच्या योगानें उद्योग व श्रम करण्याची उमेद अधिकाधिक येते; व कितीही कष्ट झाले, तरी त्यांचा शीण वाटत नाहीं. परंतु, विपत्ति असली ह्मणजे त्यांचे हाल पाहून अतिशयित दुःख होतें.

त्यांच्यासाठीं संसाराची काळजी फार वाहावी लागते; उत्पत्तीपासून वंश वाढावा, हें यावत्प्राणिमात्रास लागलेंच आहे. त्यांत अब्रू, कीर्ति, सन्मान, सत्कृत्यें इत्यादि गोष्टी मानवजातीस मात्र लागू पडतात, इतरांस पडत नाहींत. प्रायः असें आढळून येतें कीं, निःसंतान मनुष्यांचे हातून मोठमोठीं कृत्यें घडतात. ह्याचें कारण असें वाटतें कीं, आपलें नांव मरणोत्तर राहावें असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. ज्यांस मुलें असतात, त्यांस त्यांची नांवें पुढें चालण्याविषयींची कांहीं शंका नसते. परंतु, ज्यांस पोरेंबाळें नसतात, त्यांचे मनांत येतें कीं, आपण कांहीं एकादें मोठें लोकोपयोगी कृत्य केलें, तर त्यावरून तरी आपले पश्चात् आपलें नांव लोक काढितील. अशा विचारानें ते महत्कृत्यांस प्रवृत्त होतात. ह्मणजे आपण कसे होतों, हें पुढें सांगण्यास संतानद्वारा चालताबोलता पदार्थ (मानवदेह) पैदा करण्यास असमर्थ आहोंत, त्यापेक्षां, तें काम अंशतः तरी संपादणारा कांहीं दुसरा पदार्थ त्याचे जागीं उत्पन्न करावा, ह्या मतलबानें, बहुकाळ राहणाऱ्या अशा गोष्टी त्यांचे हातून घडत असतात. त्या पुढच्या पिढ्यांच्या फार उपयोगीं पडतात. ह्यावरून असें झालें कीं, ज्यांस पुढें वंश नाहीं, ते दुसऱ्यांच्या वंशजांची स्वतः त्यांचेपेक्षांही अधिक काळजी वाहतात. कुळामध्यें जो पुरुष दिग्विजय करितो, तो आपल्या मुलांस अतिशयित जपतो. ह्याचें कारण असें कीं, हीं मुलें केवळ माझा वंशाच चालविणारीं आहेत, असें नव्हे; तर आपल्या

कुळाची ख्याति वृद्धिंगत करणारींही आहेत, असें त्याला वाटतें.

आईबापांची ममता सर्व मुलांवर सारखी असते असें नाहीं. पंतांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे.

"सुविद्य धन मेळवी वचन आयके आंवरी
प्रपंच भर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी
असा जरि नसे रुचे तरि न तो अभद्र क्षण."

हें खरें व सर्वानुभवसिद्ध आहे. तसेंच सालोमन नामा एक साधु ह्मणतो, "शाहाण्या पुत्राच्या योगानें पिता हर्ष पावतो; परंतु, कुपुत्र हा, आपले आईलाही जड होतो." भावंडें पुष्कळ असलीं ह्मणजे, त्यांपैकीं वडील असतात त्यांचें घरामध्यें चांगलें चालतें व त्यांचा बराच मान असतो; अगदीं धाकटीं असतात तीं फार लाडकावलेलीं आणि बिघडलेलीं असतात; आणि मधल्यांची कांहींच फारशी दाद नसते. तथापि बहुतकरून त्यांतलाच एकादा मोठा कावेबाज आणि पटाईत निपजतो. मुलांच्या खाण्यापिण्याच्या, वस्त्रप्रावरणाच्या, अथवा दुसऱ्या कोणत्याही हौसेच्या कामांत पैसा खर्चण्याविषयीं कंजूसपणा केला असतां तीं बिघडतात, लबाड होतात, कपट शिकतात, दुष्टांची संगत धरितात, आणि पैसा हातीं लागला ह्मणजे ह्याचें काय करूं आणि काय न करूं असें त्यांस होऊन तीं भिकेस लागतात. ह्यासाठीं आईबापांनीं त्यांस चांगलें धाकांत ठेवावें, परंतु त्यांच्या सुखाचे कामीं पैसा खर्चण्यास जिवाची काढाओढ करूं नये. मातापितरें व शिक्षक ह्यांस संवय पडून गेलेली असते कीं, मुलांमध्यें कांहीं

बक्षिसावरून ईर्ष्या उत्पन्न करून एकामेकांच्या चढाओढीनें त्यांजकडून त्यांचीं कर्तव्यकर्में व चांगलीं कामें करून घ्यावीं. परंतु हें योग्य नाहीं. कां कीं, ही हेवा करण्याची खोडी त्यांच्या वयाबरोबर वाढत जाते; आणि तिच्या योगानें मोठेपणीं संसारांत मोठमोठीं वैमनस्यें पडतात, व भांडणें होतात. बक्षिसाच्या लालुचीनें अथवा आपल्या सोबत्यांवर आपला वरचष्मा व्हावा ह्या हेतूनें मुलांस चांगलीं कामें करण्याची खोडी लावूं नये; तर जें चांगलें तें आपणांस केलेंच पाहिजे, असें त्यांच्या मनांत भरून त्यांजकडून तें करवावें. ह्मणजे, बक्षीस मिळविण्यासाठीं चांगलें वागायाचें असा मुलांचा समज होऊं नये, तर चांगलें वागलें असतां बक्षीस मिळतें, असें त्यांचे मनांत पक्कें बिंबलें पाहिजे.

आपल्या मुलांस पुढें कोणत्या धंद्यांत घालावयाचें, ह्याचा विचार आईबापांनीं तीं लहान असतात, तोंच करावा. तो त्यांजवर टाकून उपयोग नाहीं. कां कीं त्यांचीं मनें अगदीं अशाश्वत असतात. ह्मणजे तीं आज एक धंदा करण्याचा निश्चय करितात, आणि उद्यां भलत्याच धंद्यास लागतात. तेणें करून त्यांचें फार अहित होतें. ज्याच्या इच्छेस जो धंदा येईल तो त्यानें करावा, ही गोष्ट खरी आहे. तथापि तें केव्हां ? मुलें प्रौढ झाल्यावर; आधीं नाहीं. कां कीं, लहानपणीं त्यांस आपलें बलाबल, व कामाचें महत्व, पुरतें कळत नसतें. तीं लहान आहेत तों त्यांस आवश्यक आणि उपयुक्त विद्येंत तरबेज करावें, आणि चरितार्थापुरतें एकादें चांगलें काम शिकवावें, एवढेंच आई-

बापांचें काम आहे. मुलें मोठीं झाल्यावर आपल्या अकलेनें त्यांनीं कसाही बरावाईट धंदा धरिला, तरी त्यांचा दोष आईबापांकडे नाहीं. कांहीं एका प्रकारचें काम शिकण्याविषयीं मुलाची पराकाष्ठेची इच्छा असली, आणि तें करण्याचें सामर्थ्य त्याचेठायीं येण्याजोगें आहे, असें जर असेल, तर मातापितरांनीं त्याच्या इच्छेचा भंग करूं नये. तथापि ज्यापासून आपलें पुष्कळ हित होईल, तें काम जरी प्रथमतः कठिण वाटलें, तरी, 'मनुष्याला काम शिकवितें' ह्यावर आईबापांनीं व तसें मुलांनींही लक्ष्य ठेवून प्रयत्न करावा, हें योग्य आहे.

## नीतीवर निष्ठा.

### श्लोक.

निस्सीम सज्जन महा व्यसनीं बुडाला;
सोडी न तो तरि कधीं निज निश्चयाला;
अंतीं तयास परमेश सुखी करीतो;
सिद्धांत हा न विसरा भ्रम जो हरीतो ॥

जर्मन समुद्राच्या कांठीं पिकाऊ आणि सधन असा एक देश आहे. त्यांत साबिनस ह्या नामेंकरून कोणी तरुण, श्रीमान्, आणि विद्वान् पुरुष राहात असे. त्याचें स्वरूप, भाषण, राहण्याची ढब, आणि स्वभाव हीं इतकीं मनोरम होतीं कीं, ज्या मनुष्यापाशीं त्याचा परिचय व्हावा, त्यानें त्याचें अगदीं अंकित होऊन राहावें. त्यानें तेथील, ओलिंदानामक तरुण

रूपवती स्त्रीची प्रीति संपादिली; आणि लागलेंच तिशीं लग्न लाविलें. त्यांची प्रीति एकमेकांवर पराकाष्ठेची जडली; आणि स्त्रीपुरुषसुखोपभोगी जोडा ह्यासारखा कोठें दुनयेंत नाहीं, असें सर्व लोक ह्मणूं लागले. परंतु मानवस्वभाव किती विलक्षण आहे! ह्या जगांतील कितीएक मनुष्यांस सर्वदां असें वाटत असतें कीं, जें सुख आपणांस अप्राप्त आहे, तें कोणालाही मिळूं नये; आणि तें दैवयोगेंकरून एकाद्यास प्राप्त झालें, तर तें नाहींसें करण्याविषयीं त्यांचा एकसारखा यत्न चालू असतो. अशा मनुष्यांच्या समाजांत राहून स्वकष्टार्जित सुख उपभोगणें किती दुष्कर आहे बरें! परमेश्वरा, अशा दुष्ट प्राण्यांचें वारें देखील नसावें! ह्या प्रकारची, आरिआनानामक एक स्त्री त्या देशामध्यें होती. तिचें साबिनसाशीं कांहीं थोडें नातें होतें. ती चांगली जाणती स्त्री होती; व साबिनस ह्याला फार चाहात असे. पण त्याचें लग्न झाल्यापासून तिच्या मनांत असें वेड भरलें कीं, हा आतां मला कांहीं विचारीत नाहीं, हा ओलिंदेच्या अगदीं स्वाधीन झाला, ह्याला दुसरें कोणतेंही माणूस दिसत नाहीं, ह्यास्तव हें जोडपें फुटेल तर बरें, असें तिला वाटलें, आणि त्यासाठीं ती रात्रंदिवस जपून नानाप्रकारचे उपाय योजूं लागली. ते सगळे व्यर्थ गेले.

परंतु शेवटीं एक दिवस तिच्या मनोदयाप्रमाणें प्राप्त झाला. तो असा. साबिनस ह्याला कर्ज झालें होतें. त्याची फिर्याद करून सावकारानें त्याजवर

तुरुंगाचें वारंट आणिलें. तेव्हां, आतां अब्रू जाते, ह्या प्रसंगीं आपणास आपली आरिआना साह्य करील, असें त्याला वाटून त्यानें तिची प्रार्थना केली. तिनें त्याला तात्काल असें सांगितलें कीं, तुला पुरून उरण्यासारखें द्रव्य मजपाशीं रोख आहे, व शिवाय दरसालचें उत्पन्नही बरेंच आहे. पण जर तूं ओलिंदेला सोडून देशील, तर तें मी सर्व तुला देईन; नाहीं तर एक कवडी देखील मिळावयाची नाहीं. हें ऐकतांच साबिनसाच्या आंगावर रोमांच उभे राहिले. आणि तो ह्मणाला, "छी, छी, आरिआना बाई, हें तुमचें भाषण माझ्या हृदयात वज्रासारखें वाटतें; असें पुनः बोलूं नका; नाहीं मला तुमच्या द्रव्याची गरज; तुरुंगांत पडलों तर अब्रू जाईल, जावो; नापत होईल, होवो; लोक तुच्छ मानितील, मानोत; जें होईल तें होवो; पण मी जिवांत जीव आहे तों पावेतों ओलिंदेला अंतर देणार नाहीं. जिचे धर्म, अर्थ, काम, पुरविण्याविषयीं, मी सर्व जनांसमक्ष, सर्वांतरसाक्षी जो परमात्मा त्याची शपथ वाहिली, जिनें आपली मान माझ्या हातांत दिली, जी माझ्या अंतरात्म्यानें माझीशी ह्मटली, जी माझ्या सुखदुःखास आजपावेतों वांटेली झाली, व जिनें आपलें तनमन माझ्या सुखार्थ खर्चिण्याचा निश्चय केला आहे, अशा माझ्या प्रियकर ओलिंदानामक सजीव तेजःपुंज रत्नराशीस, ह्या तुझ्या यःकश्चित् निर्जीव धातूंच्या तुकड्यांच्या लोभानें म्यां टाकावें काय.? हर हर !! आरिआना बाई, हे शब्द तुमच्या तोंडांतून निघाले तरी कसे.? असो; आपण

खुशाल असावें; बोलण्याचा राग धरूं नये; आतां मी जातों." असें बोलून तो चालता झाला.

आपला बेत ह्याप्रकारें निष्फळ झाला असें पाहून, भारिआना बाईला मोठी खिन्नता प्राप्त झाली. आणि रागानें तिनें असें तोंड सोडिलें कीं, साबिनस हा विचारशील होता तरी, तोही अगदीं वर्दळीस आला. दुसरे दिवशीं मोठीच चकमक झडणार होती; तों त्याच दिवशीं सावकारानें दरखास्त बजाऊन साबिनसाला तुरुंगांत नेऊन बसविलें. ह्या दुःखांत सुख एवढेंच होतें कीं, त्याची प्रियपत्नी ओलिंदा, हिलाही त्याबरोबर जाण्यास परवानगी मिळाली. ती त्याचें गरीबीचें जेवण तयार करी, व इतर गृहकृत्यांत गुंते तेव्हां तो तिला नानाप्रकारच्या रमणीय गोष्टी वाचून दाखवी, तेणेंकरून तिला त्या कामांचे फारसे श्रम वाटत नसत. त्या उभयतांची परस्पर प्रीति, व दैवानें प्राप्त झालेल्या स्थितींतील तृप्ति, ह्या पाहून इतर कैदींस फार चमत्कार वाटे व संतोष होई. त्या बंदीखान्यांत एकाद्याकडे जरा कांहीं कमजास्त असलें, ह्मणजे त्यानें इतर मंडळीच्या आधीं, साबिनस व त्याची स्त्री ह्यांस बोलावावें. इतकें दारिद्र्य होतें, तरी तीं एकमेकांवर कधींही रागावत नसत. माझेमुळें तुला कारागृहवास भोगावा लागला, असें ह्मणून, साबिनस कधींकधीं आपल्या बायकोपाशीं फार कष्टी होत असे. तेव्हां ओलिंदेनें त्याचें समाधान करावें कीं, "अहो, काय सांगावें;? मला ह्या कारागृहापेक्षां आपलें असें भाषण फार दुःख देतें; आपण असें कधींही मनांत आणूं नये.

हा कारागृहवास आपले योगानें माझे कपाळीं आला आहे असें नव्हे; तर ह्याच्या उलट, ह्मणजे, माझ्यामुळें हा आपणांस भोगावा लागत आहे. हें माझें ह्मणणें खरें किंवा खोटें ह्याचा आपण विचार करा. आपण मला सोडतां, तर आरिआनाबाईचें द्रव्य आपणांस मिळालें नसतें काय ? परमेश्वरानें जी स्थिति दिली आहे, ती फार चांगली आहे. तींत आपण तृप्त राहावें. हीस वाईट ह्मणणें हें ईश्वरास वाईट ह्मणण्याप्रमाणें आहे. आपणांस कारागृहवासाचें इतकें दुःख होऊं नये. आपण खून, चोरी, मारामारी, इत्यादि परम दुःखद अपराध बुद्धिपुरःसर करून तुरुंगांत पडलों आहों असें नाहीं; ज्यानें आपणांस धरून बसविलें आहे, त्याची रकम बुडवावी अशी आपली वासना नाहीं. परंतु पैसा जवळ नाहीं, त्यास आपण काय करावें? दुसऱ्याची हानि व्हावी, असा हेतु मनांत धरून जें कृत्य मनुष्य करितो, तो अपराध होय, हें नीतिशास्त्राचें ह्मणणें जर खरें आहे, तर आपण अपराधी नाहीं. असो. आपण किमपि दुःख करूं नये. मी आपली सेवा करावी, आपण मजवर प्रीति करावी, आणि उभयतांनीं सदाचरण व परमेशभजन ह्यांत काळ घालवावा, हीच माझी इच्छा व आपणांस विनंती आहे. आपलें हास्यमुख तेंच माझें सुख, आणि आपलें औदासिन्य तेंच माझें दुःख होय."

असें भाषण ऐकून साबिनस फार संतुष्ट होई; आणि आपणास इतकी रूपवती, बुद्धिमती, आणि नीतिमती बायको मिळाली, ह्मणून वारंवार तो ईश्वराचे

आभार मानी. ह्याप्रमाणें दिवस लोटतां लोटतां, त्यांनीं जी पोटगी घराहून आणिली होती, ती सरून गेली. उपास पडूं लागले. एके दिवशीं तर असें झालें कीं, तीं उभयतां उपाशीं असून, त्यांचा एकुलता एक लहान मुलगा होता, त्यालाही कांहीं खावयास नसल्यामुळें, त्यानें भूकभूक ह्मणून एकच आकांत केला. आईबापें स्तब्ध बसलीं. त्यांच्या पोटांतून दुःखाचे उमाळे येत; पण करतील काय ? अशा अवस्थेमध्यें कोणी एक हुजऱ्या त्यांच्या खोलींत आला. आणि त्यानें साबिनसास असें सांगितलें कीं, 'आपली आरिआनाबाई मरण पावली; तिनें एका दुसऱ्या मनुष्याचे नांवाचें मृत्युपत्र करून ठेविलें आहे; तो दूर देशीं आहे; आणि तें मृत्युपत्र तुमच्या हातीं लागण्यासारखें आहे. तेवढें घेऊन जर तुह्मी जाळून टाकाल, तर तिची सर्व दौलत तुह्मांस लाभेल; कारण, तुमचे इतका जवळच्या नात्याचा तिचा येथें दुसरा कोणी नाहीं.' हे शब्द कानीं पडतांच त्या दोघांच्या आंगांवर रोमांच उभे राहिले. साबिनसानें, त्या जासुदाकडे रागानें पाहून ह्मटलें, जा, जा, जा; जा येथून तूं निघून लवकर. हें ऐकतांच तो निघून गेला. नंतर तीं दादलाबायलें एकमेकांच्या गळां पडून फार शोक करतीं झालीं. आतां आपणांस साह्य मिळण्याची आशा देखील करावयास जागा उरली नाहीं, असें साबिनस ह्मणाला.

हें सर्व कृत्य, शेजारच्या खोलींतून आरिआना हिनें पाहिलें. हुजऱ्या तो तिनेंच पाठविला होता. साबि-

नसाची निष्ठा नीतीवर किती आहे, तें पाहण्याकरितां तिनें एवढी खटपट केली होती. परंतु, शेवटीं तिची अशी खातरी झाली कीं, एक वेळ हत्ती सुईच्या नेढ्यांतून निघून जाईल, पण हा साबिनस नीतिच्युत होणार नाहीं. त्याची धर्मनिष्ठा पाहून तिला मोठें आश्चर्य वाटलें. आणि ती मनांत ह्मणाली कीं, आजपावेंतों जो मी ह्यांचा छळ केला, तो केवळ अन्याय होय; हा मोठा पुण्यशील आहे. ह्याजवर ममता करणें आणि ह्यास साह्य देणें हेंच माझें कर्त्तव्य होय. असा विचार करीत, ढळढळां आसवें गाळीत, ती त्यांच्या खोलींत गेली, आणि साबिनस ह्यास पोटाशीं धरून त्याचें तिनें समाधान केलें; व त्यास त्या कारागृहांतून सोडवून आपले सर्व दौलतीचा मालक केलें. नंतर, साबिनस आणि ओलिदा ह्यांनीं आपलें सर्व आयुष्य सुखांत घालविलें.

## वाक्यरत्नावली.

थोरांचीं वचनें केवळ ज्ञानभांडारें होत. त्यांचा ठसा मनुष्याच्या मनावर चांगला होतो. हें सर्वानुभवसिद्ध आहे. ह्मणून, ह्याविषयीं प्रस्तावना फार न लांबवितां, कितीएक विद्वान् जनांचीं बोधादि प्रकरणीं वाक्यें इंग्रजी ग्रंथांतून येथें मराठींत उतरून घेतों. त्यांत कितीएकांचे कर्ते खालीं सांगितले आहेत, व कितीएकांचे सांगितले नाहींत.

सुशिक्षण.—दगड दिसण्यांत प्रथमतः अगदीं ओबड धोबड असतो. तो जर उत्तम मूर्तिकाराचे हातीं

लागला, तर त्यांतूनच तो एक अत्युत्कृष्ट पुतळा बाहेर काढितो; नाहीं तर तो तसाच फुटून तुटून नाहींसा होतो. तद्वत् जीं मनुष्यें रानटी, अज्ञान, आणि मूर्ख असतात, तींच उत्तम गुरूच्या सुशिक्षेनें, कदाचित् उत्तमोत्तम होतील.

स्पेक्तेतर.

मौन.—झेनो ह्मणून एक ग्रीक तत्वज्ञानी होता. तो ह्मणत असे कीं, "मौन हा मोठा सद्गुण आहे ; कां कीं त्याच्या स्वीकारानें, इतरांचे दोष आपणास कळतात, पण आपले इतरांस समजत नाहींत."

शाहणे व मूर्ख.— मला कांहीं ज्ञान नाहीं असें ज्या शाहण्या मनुष्यास वाटतें, तो शाहाण्यांत शाहणा होय; आणि, माझेसारिखें ज्ञान कोणालाही नाहीं, असें ज्या मूर्खाला वाटतें, तो मूर्खांत मूर्ख होय.

परीस.—त्युरीबचा बादशाह महंमद बाय, ह्यास त्याच्या प्रजेनें पदच्युत केलें. त्याजपाशीं परीस आहे, अशी लोकांत प्रसिद्धि होती. त्याच्या आशेनें व तो देण्याचा करार करून घेऊन, अलजियर्सच्या सुभेदारानें महंमदास पुनः गादीवर बसविलें; तेव्हां त्यानें त्या सुभेदाराकडे एक नांगर मोठ्या समारंभानें पाठवून दिला.

तोंडपुजे लोक.—ग्रीसच्या विद्वत्सप्तकांत बियास नामें करून कोणी तत्ववेत्ता होता. त्यास एकानें विचारिलें, अतिभयंकर जन कोणते ? त्यानें उत्तर दिलें, "परक्यांतला प्रबळ वैरी, आणि ओळखीच्यांतला तोंडपुजा, हे भयंकर शत्रु होत."

कायदे.— कायदे हीं कोळ्यांचीं जाळीं होत. त्यांत माशांप्रमाणें साधे भोळे जे कोणी असतात, ते मात्र बिचारे गुंततात. पण गांधीलमाशीप्रमाणें जे अस्सल पटाईत लुच्चे असतात, ते त्यांतून तेंव्हांच निसटून जातात. स्विफ्त.

दुष्कर्म.— "परमेश्वर पाहत नसला, आणि मनुष्याकडून शिक्षा होण्याचेंही भय नसलें, तरी मी पापकर्म करणार नाहीं." असें, सेनिकानामक रोमन तत्ववेत्ता आपले ग्रंथीं लिहितो.

मनोवृत्ति.—आपल्या कितीएक मनोवृत्ति आपण आंकळितों, हा आपला पराक्रम नव्हे; तर, त्या मनोवृत्तींचें दुर्बलत्व होय.

पीतराधिग्रेत राजा.—रुशिआ देशचा बादशाह पीतराधिग्रेत, हा हालंद देशामध्यें सार्दम ह्या गांवीं गलबतें बांधण्याच्या कारखान्यांत वेष बदलून गलबतें बांधण्याचें काम शिकत होता. तेंव्हां एके दिवशीं त्यानें दुसऱ्या एका कामगाराचें एक हत्यार, त्यास न विचारितां कामास घेतलें. तें त्या कामगारास समजलें तेंव्हां त्यानें क्रोधाविष्ट होऊन राजास न ओळखितां त्याच्या एक ताडकन तोंडांत दिली. त्या समयीं तो परम नीतिमान आणि सहनशील राजा, मोठ्या गांभीर्यानें त्या कारागिरास ह्मणाला, "अरे शाबास; मीं अपराध केला, त्याचें योग्य शासन तूं मला दिलें." असें बोलून त्यानें त्याला बक्षीसही दिलें.

अनेक भाषा.—ज्याला अनेक भाषा समजत नाहींत त्याला फारसें ज्ञान नसतें, असें समजणें हें अगदीं

अज्ञानमूलक आहे. कांकीं, ज्यांस एकच भाषा येत होती, असे अनेक तत्वज्ञानी पूर्वींच्या काळांत होऊन गेलेले प्रसिद्ध आहेत. आणखी, लातिन, ग्रीक, हीब्रू, संस्कृत, हींच गृहें केवळ ज्ञानास आवडतात, दुसरीं आवडत नाहींत, असें मानणेंही अप्रशस्त आहे.

फुलर.

श्रीमंत आणि गरीब.—ज्याची मिळकत खर्चाहून जास्त, तो श्रीमंत; आणि ज्याचा खर्च मिळकतीहून जास्त, तो गरीब.

ब्रूयर.

स्थिति—प्रकृतीस मानण्यासारखी स्थिति ज्याला प्राप्त असेल, तो सुखी खरा; परंतु, प्राप्त झालेल्या स्थितीप्रमाणें जो आपली प्रकृति करितो, तोच शाहणा जाणावा.

ह्यूम.

संगति.—जनाच्या द्वाडपणाविषयीं तुह्मी पाहिजे तितके कां बोलाना; परंतु जन्मास येण्यापूर्वीं कोणीही द्वाड नसतो, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. मनुष्य जन्मतो, तेव्हां त्याचा स्वभाव ऊन लाखेप्रमाणें अगदीं मऊ असतो. तो ज्या प्रकारच्या मंडळीच्या सांचांत दैवयोगानें पडतो, त्याप्रमाणें त्याची आकृति बनते.

वार्धक्य—वार्धक्य हें एक मोठें जुलुमी सरकारच आहे. त्याच्या ताब्यांत आलेलें मनुष्य तरुणपणाचे ढंग करूं लागलें, तर त्याला तात्काळ देहांतशासन होतें. ........... राचीफोकल्ट.

स्तुति आणि निंदा.—मनुष्य जवळ असतां त्याज-पाशीं जसे तुह्मी वागता, तसे त्याच्या पश्चात्‌ही वागा. बिशप बिल्हरिज्ज ह्मणतो, "मीं कोणाही मनुष्याची तोंडावर स्तुति व पश्चात् निंदा न करण्याविषयीं निश्चय केला आहे." हा निश्चय सर्वोत्कृष्ट होय. हा जर सर्वांनीं पाळिला, तर तोंडपुजेपणा आणि निंदा ह्यांस ह्या जगामध्यें थारा मिळणार नाहीं.

गरीबी.—श्रीमंतास बाकी सगळ्या कल्पना करतां येतील. परंतु, गरीबींत दुःखें कोणतीं सोसावीं लागतात, ह्याविषयीं त्याला बरोबर कल्पना करतां येणार नाहीं. •• •• •• •• •• आनन.

अहिल्याबाई होळकरीण.—दुसऱ्या बाजीरावाचा बाप रघुनाथराव ह्यानें अहिल्याबाईवर स्वारी करण्याचा बेत केला, तो तिला कळला. तेव्हां तिनें त्यास सांगून पाठविलें कीं, "मी स्त्री अबला आहें. मजवर स्वारी करून आपण मला पराजित केलें, तर त्यांत आपला मोठा पुरुषार्थ आहे असें नाहीं. परंतु, ईश्वरकृपेनें जर आपण माझे हातून पराभव पावलां, तर मात्र त्या अपकीर्तीला जोडा नाहीं. ह्याचा विचार करून करणें तें करावें." हा निरोप पोहोंचतांच राघोबानें स्वारीचा बेत रहित केला.

फ्रेदरिकाधिग्रेत.—हा प्रुशियाचा बादशाह मोठा पराक्रमी होता. त्याचे नांवाचा कांहीं बीभत्स जाहीरनामा कोणीं दुष्ट मनुष्यानें त्याचेच वाड्याच्या एका भिंतीस उंच चिकटविला होता. तो पाहण्यासाठीं लोक जमले, तेथें बादशाहही गेला. जाहीरनामा फार वर

होता, ह्मणून तो लोकांस चांगला वाचतां येईना. ह्मणून बादशाहानें तो आपले नौकरांकडून तेथून काढून खालीं, वाचतां येईसा डकविला. आणि फ्रेदरिक ह्मणाला, "माझा व माझ्या प्रजेचा तह झाला आहे; तो असा कीं, त्यांनीं मनास येईल ते बकावें, आणि मीं माझ्या मर्जीस येईल तें करावें. हा तह आह्मांस कबूल आहे."

ज्ञानप्रीति.—शिकंदर बादशाहा ह्याचा लहानपणीं थोडासा अभ्यास झाल्यावर, त्याला नीतिशास्त्र व तर्कशास्त्र शिकविण्याविषयीं, त्याचा बाप फिलीप ह्यानें, आरिस्तातल् नामक एका महाज्ञानी पुरुषास पत्र लिहिलें. त्यांत तो असें ह्मणतो कीं, "ज्या युगांत आपण आहां, त्या युगांत परमेश्वरानें मला पुत्र दिला, ह्यासाठीं मी त्याचे जितके आभार मानितों, तितके, त्यानें मला केवळ पुत्र दिल्याचे मी मानीत नाहीं."

अनुभव.—प्राचीन काळीं कायकाय गोष्टी घडल्या हें न जाणतां जगांत राहणें, हें सर्व आयुष्य बाळपणांत घालविण्यासारखें आहे. गतकाळीं झालेल्या श्रमांचा जर कोणी कधींच उपयोग न करता, तर हें जग आरंभापासून शेवटपर्यंत अगदीं बाल्यावस्थेंतच राहिलें असतें.......................सिसरो.

आरोग्य—पर्शिया देशच्या एका बादशाहानें एक उत्कृष्ट वैद्य एके गांवीं पाठविला. तो तेथें पोंहल्यावर तेथील लोकांस विचारूं लागला कीं, "तुह्मीं कसे काय राहतां?" तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, "आह्मीं भूक लागल्याशिवाय कांहीं खात नाहीं; आणि भूक लाग-

ल्यावर तरी जें खातों, तें फार बेतानें, थोडीशी भूक शिलक राही असें खातों." हें ऐकून वैद्य बोलला, "तर मग माझें येथें कांहीं काम नाहीं; हा मी आपला गाशा गुंडाळून निघालों पाहा."

विद्येची किंमत.—सादी ह्मणून एक मोठा विद्वान होता. त्याला एकानें विचारीलें, "महाराज, विद्वानलोक श्रीमंतांचे दारोदार हिंडतात; पण श्रीमंत जे आहेत ते विद्वानांच्या घरीं देखील कधीं जात नाहींत, ह्याचे कारण काय.?" तेव्हां तो ह्मणाला, "धनाची किंमत विद्वानांला समजते; परंतु, विद्येची किंमत श्रीमंतांला कळत नाहीं, ह्मणून असें होतें."

वादप्रतिवादाची हौस.—आदिसन आणि तेंपल ह्या दोन विद्वान साहेबांचें मोठें सख्य होतें. त्यांची गांठ पडली, ह्मणजे ते एकामेकांच्या मतांविषयीं वादविवाद करीत बसत. एके समयीं तेंपल साहेबास १०००० रुपयांची गरज लागली; ती आदिसन साहेबानें रुपये उसने देऊन चालविली. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर तेंपल साहेब आदिसन साहेबापाशीं, पहिल्याप्रमाणें मन मोकळें करून बोलेनासा झाला; व प्रतिवाद करून आपलें मत खरें करून दाखविण्याविषयीं फार संकोच करूं लागला. एकदा तर असें झालें कीं, ज्या विषयांत त्यांचीं मतें नेहमीं विपरीत असत, त्याविषयीं वाद चालला असतां, जें जें आदिसन बोलला, तें तें तेंपलसाहेबानें निमूटपणें मान्य केलें. हें पाहून आदिसन साहेबास फार वाईट वाटलें. आणि तो तेंपलसाहेबास ह्मणाला, "मित्रा, ह्या प्रसंगीं, नेहमीप्रमाणें

माझ्या मताचें खंडन कर; नाहींतर माझी रकम मला ह्या क्षणीं परत दे."

आतां, बेकन नामक महाज्ञानी पुरुषाचीं कांहीं स्फुट वाक्यें घेऊन हा लेख संपवितों.

फार वांकविल्यानें धनुष्य मोडतें; तसें, फार मोकळें सोडल्यानें मन बिघडतें. फारच दुःख दिलें तर निरपराधी मनुष्य देखील लबाडी कबूल करतो. छानदार मुखचर्या ही मुकी शिफारस आहे. लक्ष्मी ज्याला हातीं धरते, त्याला वेडें करून सोडते. ज्यांवर फिर्याद करतां येत नाहीं, त्यांजकडून इजा होणें हें अत्यंत दुःखकारक आहे. संकटांतून मुक्त होण्याची आशा फक्त सद्गुणी जनांस मात्र असते. सूड उगविण्यांत जलदी घात घेते. गरीबीमध्यें, सहज हंसणें, हा देखील अपराध आहे. उशीर हा वाईटच; तथापि, कोणतेंही काम करण्यास जितका जितका उशीर होतो, तितकें तितकें, तें काम करण्याविषयीं आपण वाकिफ जास्त होतों. अरे देवा मला मरण दे, असें ह्मणण्यापूर्वीं जो मरतो तो सुखी. लबाडानें साधुत्वाचें सोंग घेतलें, ह्मणजे त्याच्या दुष्टत्वाची कमाल झाली. सर्वांचा डोळा ज्या वस्तूवर असेल, तिचें रक्षण केवळ कुलूपकिल्लीनें होणें नाहीं. ज्याला पुष्कळ लोक भितात, त्यानेंही पुष्कळांस भ्यालें पाहिजे. भितरा मनुष्य आपणास सावध ह्मणवितो; व कवडीचुंबक, आपणास मितव्ययी ह्मणवितो. जें मोठ्या आर्जवानें नाहीं ह्मटलें, तें अर्धवट दिलें, असें समजावें. हे आयुष्या, तूं दुःखितास तपांसारखें आणि सुखी जनांस पलवत् आहे

स. जर दैव अनुकूल नाहीं, तर मनुष्य आणि किडा सारखाच. अतिशयित स्वार्थबुद्धि मनुष्य आपलें वांगें भाजून घेण्यासाठीं लोकांच्या घरांला देखील आग लावील. नव्या गोष्टी व पाहुणे ह्यांजवर लोक वाखाणणीची मात्र वृष्टि करितात; त्यांजवर त्यांची मनांतून प्रीति नसते. देशांतील लोकांची आपसांत लढाई, ही तापाच्या आगीसारखी होय; तिनें शरीर क्षीण होतें; परंतु, परके देशाशीं लढाई ही, उद्योगानें आंगांत उष्णता येते, तीप्रमाणें आहे; ती शरीरास आरोग्यकारक होते. जो तसबिरींत दाखवितां येत नाहीं, तो सौंदर्याचा सर्वोत्कृष्ट भाग होय.

## तसबिरीची साक्ष.

जन्मांधाला जशी रंगाची कल्पना मनांत आणितां येत नाहीं, त्याप्रमाणें ज्यास मुलें झालीं नाहींत त्यास त्यांचें सुखदुःख, कोणीं कितीही खरें सांगितलें, तरी बरोबर समजावयाचें नाहीं. ह्यांत कांहीं विशेष नाहीं. कां कीं, श्रद्धाग्राह्यज्ञानांत आणि अनुभवजन्यज्ञानांत सर्वदा महदंतर असतें. आई आपल्या मुलाशीं बोलत आहे, तें बोबडीं भाषणें करीत आहे, आणि त्यांच्या श्रवणानें तिला परम आल्हाद होत आहे, असें पाहून कोणाही सज्जनास आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. मुलांविषयीं आईबापांच्या मनांत परमेश्वरानें जी अप्रतिम प्रीति ठेविली आहे, तिचें वर्णनही करणें फार कठीण आहे. तिचा अनुभव केवळ आईबापांसच येऊं शकेल; इतरांस तो अप्राप्त

आहे. ही प्रीति इतकी बलवत्तर आहे कीं, मनुष्याच्या मनांत ज्या शतशः वाईटबऱ्या वासना उत्पन्न होतात, त्या सर्व हिजपुढें तृणवत् भासतात. ह्याची सत्यता पाहणें असल्यास, आईबापें, मुलांवरचें संकट निवारण्यासाठीं कोणकोणतीं दुःखें भोगण्यास तयार होतात, त्यांजकडे सूक्ष्म दृष्टि पोहोंचवावी, ह्मणजे तात्काळ खातरी होईल.

हे विचार आमचे मनांत उभे राहण्यास, एक गोष्ट आमच्या वाचण्यांत आली. ती बरीच चमत्कारिक आहे, ह्मणून येथें लिहितों.

कोणी एक फ्रेंच सरदार फ्रान्स देशच्या राजकन्येबरोबर पोलंद देशास गेला. तो मोठा विषयी आणि तऱ्हेवाईक मनुष्य होता. पोलंदांत राजकन्येच्या नवऱ्यानें त्याचा चांगला सन्मान ठेवून, तेथील एका मानकऱ्याच्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें. त्या ठिकाणीं कांहीं वर्षें लोटल्यावर त्याची बायको एकाएकीं मृत्यु पावली. तेव्हां तो तेथून निघून स्वदेशीं आला. तेथें बापाच्या हातची जी कांहीं मालमत्ता होती, ती चैनबाजींत उडवून, तो अगदीं दरिद्री झाला. आतां दुसरा कांहीं उपाय चालत नाहीं, असें पाहून, तो विलक्षण पुरुष, बायकोची कांहीं जिनगी पोलंदांत असेल, ती पाहावी असें मनांत आणून तिकडे जावयास निघाला. पोलंदाची राजधानी वार्सा येथें पोहोंचण्यापूर्वींच चोर लोकांनीं त्याला वाटेंत लुटिलें. आणि तो ज्वरानें आजारी पडला. ह्यापुढची हकीकत यानें स्वतःच लिहून ठेविली आहे. ती अशी.

"माझे ज्वरास चार दिवस झाल्यावर, व्हेनोस्कीची सुभेदारीण त्या मार्गानें चालली होती, तिला माझी दीन दशा कोणीं सांगितली. ती ऐकून ती मजकडे आली. तेव्हां, ती माझ्या बायकोची कोणी अगदीं जवळची आप्त असून, तिजकडे ती हमेषा येतांना मीं पाहिली होती, असें तिच्या मुद्रेवरून मला पक्कें स्मरलें. परंतु तिनें आपणास ओळखिलें नाहीं, त्यापक्षीं आपणही तिला ओळख देऊं नये, असा मी निश्चय केला. आणि मी जर्मन मनुष्य असून वाटेंत लुटला गेलों, व आजारी पडलों आहें, कृपा करून मला वार्सा येथें आपण पोहोंचता कराल, तर हे उपकार, राणीसाहेब माझ्या ओळखीचीं आहेत, त्यांजपाशीं देखील मी मोठ्या आनंदानें वर्णीन, असें मीं तिला सांगितलें. तिला माझी दया आली. तिनें मला डोलींत घालून वार्सा येथें नेऊन, मी बरा होईं तोंपर्यंत, पथ्यापाण्याची सोय करून आपले घरीं ठेविलें"

"वार्सा येथें पोहोंचल्यावर, वाटेच्या हालांमुळें बरे-च दिवस मला ताप येत होता. सुभेदारीणबाई माझ्या समाचारास हरहमेष येत असे. तेव्हां तिजब-रोबर, सतरा अठरा वर्षांची एक छानदार तरुण स्त्री, लावण्याची केवळ खाण, अशी माझ्या नजरेस पडत असे. मी इतका आजारी होतों, तरी त्या तरुणीकडे माझें लक्ष लागे. तिला पाहिल्याबरोबर माझ्या सर्व दुःखांचें भान मला नाहींसें होई. माझे दुखण्यामुळें तीही फार दिलगीर आहे, असें तिच्या चर्येवरून मला दिसे. तिनें नित्यशः माझे खोलींत यावें, माझी प्रकृति

विचारावी, आणखी इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगाव्या, अशा तिच्या आचरणावरून मला तिचा मोठा नाद लागला. तूं कोणाची कोण, असें मी तिला विचारीं, तेव्हां, मी सुभेदारिणीची भाची आहें, असें ती मला सांगे."

"मला वाटतें कीं, मी बरा झालों, तो औषधापेक्षां तिच्या योगानें फार लवकर सांवरलों. माझा ताप गेला, तेणेंकरून मला तर आनंद झालाच झाला; पण त्या तरुण रूपवतीस पराकाष्ठेचा हर्ष झाला. ती वारंवार मजकडे येई; तेणें करून मला अधिकाधिक बरें वाटे. आणि तिच्या अशा मनोरम आचरणावरून माझें अंतःकरण तिजवर इतकें फिदा झालें कीं, तितकें दुसऱ्या कोणत्याही स्त्रीवर पूर्वीं झालें नव्हतें. परंतु, कांहीं दिवसांनीं, तिच्याच वयाचा एक छानदार तरुण मनुष्य तिच्या मागें मागें हिंडतांना मीं पाहिला. तेव्हां तो तिचा आवडता दोस्त असावा, असें मला वाटलें. आणि असें मनांत आलें कीं, ही जी मजवर इतकी प्रीति दाखवितें, ती सर्व खोटी कपटाची आहे. आणि विशेष संशय प्राप्त होण्यास कारण असें झालें कीं, तीं उभयतां माझ्या खोलीच्या एका दूरच्या कोपऱ्यांत जाऊन कुजबूज करीत, हंसत, व थट्टा करीत, हें मीं स्वतः नजरेनें पाहिलें होतें. तथापि तो पुरुष इतका सुस्वरूप आणि भला दिसे कीं, माझ्या मनांत भरलेल्या सुंदरीवर त्याची पापदृष्टि नाहीं, असें जर मला पक्कें वाटलें असतें, तर हरप्रयत्न करून मी त्याशीं स्नेह संपादिला असता."

"एके दिवशीं तीं उभयतां एकत्र उभीं असतां, त्यांनीं

मला प्रश्न केला कीं, "आपण खरोखर जर्मनच आहां काय.?" तेव्हां मीं होय ह्मणून सांगितलें. तेणें करून त्यांस अंमळसें वाईट वाटलें, असें त्यांच्या चर्येवरून मला दिसलें. पुनः एके दिवशीं त्या दोघांनीं एक तसबीर आणिली; आणि ती एके खिडकींत ठेवून तीं पाहात उभीं राहिलीं. नंतर, एकदां तसबिरीकडे पाहावें, पुनः मजकडे पाहावें, असा प्रकार त्यांनीं आरंभिला. तेव्हां, मीं मनांत ह्मटलें, त्या तसबिरींत आणि माझ्यांत कांहीं सादृश्य तर नाहींना? इतक्यावरही माझ्यानें राहावेना. तेव्हां, 'तुह्मी एकदां मजकडे आणि एकदां त्या तसबिरीकडे कां पाहतां?' असें मीं त्यांस स्पष्ट विचारिलें. त्या वेळीं त्या तरुणीनें उत्तर केलें कीं, 'जर आपण फ्रेंच असतां, तर ही तसबीर आपली नाहीं, असें कोणाच्यानेंही ह्मणवतेंना, इतकी ती तुमच्या स्वरूपाशीं मिळत आहे.' हें ऐकतांच मला मोठें नवल वाटलें. आणि ती तसबीर पाहण्याकरितां मीं तिजपाशीं मागितली. ती तिनें माझे हातांत देतांच, मीं ती मोठ्या उत्कंठेनें पाहिली. तेव्हां, ती माझीच तसबीर, सुमारें पांच वर्षांपूर्वीं, राणी साहेबांच्या सांगण्यावरून, मीं आपले मुलांस पाहण्याकरितां पाठविली होती, अशी माझी पुरी ओळख पटली. नंतर मीं त्या उभयतांकडे दृष्टि लाविली. तेव्हां माझ्या शरीराच्या कितीएक खाणाखुणा त्यांच्यांत मला दिसून आल्या. तेणेंकरून मला जो आनंद झाला, व जें आश्चर्य वाटलें, त्याचें मला वर्णन करितां येत नाहीं. 'हीं मुलें माझीं नव्हत काय' असें मनांत येऊन पोटामध्यें

जो प्रेमाचा लोट आला, तो माझ्यानें सांवरवेना. माझ्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. आणि त्या प्रेमभरामध्यें मी त्यांस आलिंगन देण्यांस पुढें सरलों. इतक्यांत मनांत कांहीं संशय आणि भीति उत्पन्न झाल्यावरून 'ही तसबीर कोणाची' असें मीं त्यांस पुसलें. माझ्या अश्रुधारा पाहून त्या मुलीचाही कंठ दाटून आला. तिच्यानें उत्तर देववेना. तिचेही डोळे पाण्यानें भरले. तेणें करून माझे मनांतला संशय दूर झाला. आणि मीं तिला पोटाशीं धरून कुरवाळून ह्मटलें, 'हे माझे लाडके प्रियकर मुली, मीच तुझा पिता आहें.' ह्याहून अधिक माझ्यानें बोलवेना. तो मुलगाही माझे पायां पडून, डोळ्यांत आंसवें आणून मजजवळ येऊन बसला. तेव्हां जो हर्ष झाला, तसा माझे जन्मांत मला कधीं झाला नव्हता. आणि हें खचीत आहे कीं, मनुष्यास त्याच्या मुलांपासून जो हर्ष होतो, तो दुसऱ्या कोणत्याच प्रकारच्या सुखोपभोगापासून होत नाहीं."

पहा मनाचा काय चमत्कार आहे तो! नातें समजण्यापूर्वीं ज्या स्त्रीविषयीं पापवासना उत्पन्न झाली होती, तिजकडे भलत्याच दृष्टीनें पाहणें हें महत्पाप आहे, असें त्या पुरुषास वाटूं लागलें. आणि जो वैरी किंवा प्रतिस्पर्धीसा डोळ्यांत खुपत होता, तो जीवाहूनही जास्त भासूं लागला.

## मोहन लालाचें प्रवासवर्णन.

### पेशावरापासून बुखाऱ्यापर्यंत.

काबूल.–एका प्राचीन इराणी ग्रंथकारानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, काबुलाचें मूळचें नांव बक्त्यार असें होतें. त्यालाच युरोपियन लोक बाक्त्रिया असें ह्मणत. पेशावरास पूर्वी बाग्राम असें नांव होतें; व त्याचे खालींच काबूल मोडत असे. दंतकथेवरून कळतें कीं, हल्लीं ज्यास काबूल अशी संज्ञा प्राप्त झाली आहे, तो देश पूर्वीं केवळ अरण्यमय होता.

आणखी असें सांगतात कीं, इराणची परमरूपवती राणी सिरिन, हिचा राखलेला यार कोखान, हा एकदां बाक्त्रियामध्यें आला, आणि त्यानें पुष्कळ रान तोडविलें. तेथें एक स्फटिकवत् स्वच्छ पाण्याचा झरा आढळला. त्या ठिकाणीं कोखानानें थोडेसे इराणी लोक ठेवून एक खेडें वसविलें. तेंच मोठें गांव झालें. तेथें पुष्कळ लोक येऊन राहिले. व थोडीबहुत सुधारणा झाली. त्या वेळीं तेथें झाबूल ह्या नांवाचा सरदार अंमल करीत होता, त्याचेंच नांव त्या प्रदेशास पडलें. तो मरण पावल्यावर पुढें कालें करून, झाबूल ह्यांतला झकार नाहींसा होऊन त्याचे जागीं ककार आला. आणि ह्याप्रमाणें त्या प्रदेशाचें नांव काबूल असें पडलें.–सांप्रत काबूलच्या गादीवर दोस्त महंमदखान आहे. हें शहर फारसें देखणें आहे असें नाहीं. ह्यांत बाजार मोठा आहे. ह्यांत बहुतेक सर्व जातींचे लोक रस्त्यांत जातांयेतां दृष्टीस पडतात.

व्यापार पुष्कळच चालतो. दुकानें व इमारती फारच उत्कृष्ट बांधिलेल्या आहेत. ह्या पेंठा अल्ली महंमदखान ह्यानें वसविल्या असें सांगतात.— दोस्त महंमदखान हा शरीरानें सडपातळ, आग्रही, साधा पोशाक घालणारा आणि उग्र मुद्रेचा असा आहे. त्याचा कोणावरही विश्वास नाहीं, ह्यामुळें त्याचे घरांत व दरबारांत त्याला पुष्कळ शत्रु आहेत. तो राज्यव्यवस्थेंत हुशार व व्यापारास उत्तेजन देणारा आहे. तो विश्वास ठेवण्यासारखा मनुष्य नाहीं. ज्यांच्या रक्षणाविषयीं त्यानें कुराणाच्या शपथा दहा लोकांसमक्ष वाहिल्या, त्यांचे प्राण घेण्यासही तो चुकला नाहीं. सर्व अफगाणिस्तानाचें राज्य आपणास मिळावें, असें त्याच्या मनांत आहे; परंतु, पैशाच्या कमताईमुळें त्याचा इलाज चालत नाहीं. ब्रितिश सरकाराशीं त्याचा स्नेह आहे, असें दिसत नाहीं. त्याला पुष्कळ बायका व पुष्कळ मुलें आहेत. त्यांपैकीं तीन मुलगे तीन प्रांतांचे सुभेदार आहेत; तथापि त्यांस तो फार सत्ता करूं देत नाहीं. कां कीं, ते कदाचित् आपणावर उठतील, असें त्याला भय वाटतें.— काबुलांत सुनी, शिया आणि हिंदू ह्या तीन जातींचे लोक राहतात. शिया लोकांची निराळीच आळी आहे; तिला खंदाल असें ह्मणतात. लोक सुस्वरूप नाहींत. बायका फारच व्यभिचारिणी आहेत. त्यांविषयीं त्यांच्यांत एक ह्मण आहे; तिचें तात्पर्य असें कीं, "पेशावरची कणीक जवसावांचून नाहीं, आणि काबूलची बायको यारावांचून नाहीं." लोक बहुधा इराणी भाषा बोलतात. परंतु कितीएक

खेड्यांत अफगाणी भाषा चालते.— येथें बाबराची कबर आहे. ती आह्मीं जाऊन पाहिली. शिकारपूरच्या एका व्यापाऱ्यानें मला सांगितलें कीं, काबुलामध्यें इंग्लंदांत तयार झालेला माल दरसाल सुमारें ३००००० रुपयांचा खपतो, व रुशियांतला सुमारें २००००० रुपयांचा खपतो. काबुलाचें एकंदर उत्पन्न २५००००० रुपये आहे.— काबुलांत वसंतऋतूची मोठी मजा असते. जिकडे तिकडे तऱ्हतऱ्हेच्या रंगांचीं फुलेंचफुलें होऊन जातात. हिंवाळ्यांत थंडी फार असून बर्फही पडत असतें. तेव्हां लोक बकऱ्यांचीं कातडीं पांघरतात. आणि कधींकधीं चाळीस चाळीस दिवसपर्यंत त्यांस घरांच्या बाहेर पडवत नाहीं. तेणेंकरून गरीब लोकांस निर्वाहाची मोठी मारामार पडते. • • मे, १८३३.

बामियन.— ह्याच्या दक्षिणेस टेंकडीवर शंभर शंभर फूट उंचीचे तीन दगडी पुतळे कोरलेले आहेत. व ह्यांच्या डावे बाजूस गुहेमध्यें सुंदर कोरींव लेणें आहे. हें पांडवकृत असावें, असें सांगतात.— बामियनच्या ईशान्येस शहरगुलगुला ह्मणून एक किल्ला आहे. तो बहुत वर्षांपूर्वीं काफरानें बांधिला. बदकशान येथील वातारानें तो घेण्यासाठीं त्यास वेढा घातला. त्याचे होते तितके उपाय सरले. आणि आतां वेढा उठवून निघून जाणार, इतक्यांत त्याला आंतल्या काफर सरदाराच्या मुलीचें पत्र पोंचलें. तिचें मन त्यावर फिदा झालें होतें. ह्मणून तिनें त्या पत्रांत, किल्ला सर करण्याची युक्ति त्यास लिहिली होती. तें पत्र असें.

" हे प्रिया, तुमचें नांव आणि रमणीय स्वरूप हीं माझे ऱ्हदयांत अक्षय वतनदार होऊन बसलीं आहेत. त्यांच्या योगानें मला तुमचें विरहदुःख किती होत आहे, व तुह्मांविषयीं मी किती कामातुर झालें आहें, हें माझ्यानें वर्णवत नाहीं. हल्ल्यानें किंवा छाप्यानें हा किल्ला तुमचे हातीं लागणें नाहीं. ज्या एका नळानें पाणी आंत येतें, तो बंद करा, कीं हे आंतले लोक तान्हेनें तडफडून तुमच्या स्वाधीन झालेच.— हे प्राणवल्लभा, लोभ असों दे."

त्याप्रमाणें त्या तार्तारानें नळ बंद केला, आणि किल्ला घेतला. पुढें थोड्याच दिवसांनीं काफराच्या मुलीशीं त्यानें लग्न लाविलें. परंतु, तिजविषयीं त्याचे मनांत अविश्वास उत्पन्न होऊन, एके दिवशीं त्यानें तिला जिवें मारिलें. तेव्हां तो ह्मणाला, "जी आपल्या प्रत्यक्ष बापाचा घात करण्यास चुकली नाहीं, ती नवऱ्याचा करण्यास चुकेल काय. ?" गोष्ट खरी आहे. घातकी मनुष्याचा परिणाम कसा होतो, तो पाहा.— बामियन हा गांव दोस्त महंमदाचे ताब्यांत आहे. ह्यावर त्यानें हाजीखान काकर ह्मणून एक सुभेदार नेमिला आहे. तो ह्या प्रांताचें उत्पन्न जमा करितो. नुसत्या जकातीची ७०००० रूपयांची रक्कम त्यास मिळते. . . . . . . . . . . . . . . . . . . २३ मे १८३३.

सैघान.—हें अफगाणिस्थानांतून निघून तुर्कस्थानांत गेलें असतां प्रथमच लागतें, तेथें आह्मी गेलों. तेथचा सुभेदार अल्लीबेग ह्या नांवाचा होता. हझारा येथील लोक लुटून गुलाम करावे, ह्मणून त्यानें अनेक

प्रयत्न चालविले होते. त्यास त्याचा मित्र एके दिवशीं ह्मणूं लागला कीं, प्रजेस लुटून गुलाम करणें हें महत्पाप आहे, तें परमेश्वरास आवडत नाहीं, ह्यास्तव आपण त्याचा त्याग करावा. अल्लीबेगानें उत्तर दिलें, "अरे, जर असें आहे, तर परमेश्वर माझ्या स्वप्नांत येऊन तसें मला कां सांगत नाहीं?" सुभेदार गरीब वाटसरांस लुटतो, आणि त्यांच्या द्रव्यानें मसीदी बांधितो. काय धर्मवासना ही. !!!

लर्मस्त.—येथच्या स्त्रियांइतक्या सुंदर स्त्रिया, सगळ्या हिंदुस्थानांत माझे कोठें पाहाण्यांत आल्या नाहींत. थोडे वर्षांपूर्वीं येथचा खान येथें नव्हता, तेव्हां जवळच्या प्रांताच्या एका सरदारानें ह्या प्रदेशावर चाल करून खानाची बायको धरून नेली. हें खानास समजल्यावर त्यानें लोक जमवून सात वर्षांनीं शत्रूचे हातून आपली बायको परत घेतली. तेव्हां ती त्यापासून गरोदर राहिली होती. तिला पुढें मुलगा झाला, त्याजवर खान फार प्रीति करितो. काय विलक्षण चाल.?

खलम.—येथील तुर्कलोक गुलाम पुष्कळ बाळगितात. एथें चाहाचा व्यापार मोठा चालतो. रेशीम विपुल उत्पन्न होऊन काबूल आणि मुलतान येथें जातें. च्मिणदास नामक गृहस्थाच्या घरीं मी सकाळच्या प्रहरीं फराळ करीत असतां धरणी हालावयास लागून खोलीच्या दारांच्या झडपा फडफडफडफड वाजूं लागल्या. तेव्हां, आतां खोलीच कोसळून खालीं पडते कीं काय, ह्या भयानें मी तटकर घराबाहेर पडून

उघड्या आंगणांत उभा राहिलों; तों धरणीकंप थांबला. चिमणदासानें मला सांगितलें कीं, सुमारें एक महिन्यापूर्वीं बदकशान येथें धरणीकंप झाला. तेव्हां सुमारें १२००० मनुष्यें प्राणांस मुकलीं. जून.

बल्क.—हें शहर पूर्वीं फार मोठें होतें. तें आतां मोडकळीस आलें आहे. पेंठ बरीच आहे; पण चांगली बांधलेली नाहीं. मंगळवार खेरीज करून बाकी सर्व दिवस दुकानें बंद असतात. व्यापारी बहुधा मुसलमान आहेत. शहराबाहेर एक चिखली किल्ला आहे. त्याचें नांव चिहलगाजी. लोक ह्मणतात कीं हा किल्ला रात्रीं फार उंच होत असतो. हें शहर प्राचीन आहे. हें माझारगांव पावेतों पूर्वीं दाट वसलेलें होतें, असें सांगतात.—आक्सस नदी आह्मीं उतरलों. तिजमधील होड्या ओढण्यास घोडे लावितात.—तुर्कलोक तंबूंत राहातात, व गुरें पुष्कळ पाळितात. थंडीचें त्यांस कांहींच वाटत नाहीं. त्यांजपाशीं गुलाम पुष्कळ असतात. ते त्यांच्या बायकांशीं लागू होऊन त्यांच्या मेहेरबानीनें सुटका पावतात.

बुखारा.—ह्याच्या चारी बाजूंस वाळवंट आहे. सभोंतीं कोट आहे. शहरांत शिरतांच तद्देशी आचाऱ्यांचीं दुकानें लागतात. बर्नसाहेब कुशबेग नामक प्रधानास भेटले. त्यानें त्यांस सांगितलें कीं, तुह्मीं येथें आहां तोंपर्यंत कांहीं एक लिहूं नये. कां कीं, तेणेंकरून राजास तुमचा वहीम येईल. राजाचे हेर चोंहींकडे फिरत असतात.—बाजारांतून जातांना दोन मुसलमान उंटांवर बसलेले, व त्यांच्या पाठी-

मागें चार शिपायी हातांत चाबूक घेऊन उभे असे मीं पाहिले. त्यांची आह्मीं चौकशी केली, तेव्हां असें कळलें कीं, त्या दोघां मुसलमानांनीं प्रातःकाळीं निमाज पढण्याची उपेक्षा केली, व ते सूर्योदय झाल्यावरही निजून राहिले, ह्या अपराधांवरून काजीनें त्यांस ती शिक्षा दिली होती. हा प्रकार बुखाऱ्यास प्रायः दररोज घडतो. तमाखू ओढण्यावरून, दारू पिण्यावरून व तपकीर ओढण्यावरूनही काजी लोकांस शासनें करितो. उंटांवर बसलेले अपराधी उंच स्वरानें ओरडत असत कीं, "ऐका हो लोक, निमाज न पढेल, तमाखू ओढील, तपकीर ओढील, अथवा दारू पिईल, त्यास अशी नश्यत भोगावी लागेल." चमत्कार पाहा कीं, तमाखू पिण्यास मात्र प्रतिबंध; पण विकण्यास प्रतिबंध नाहीं. !—शहराबाहेर मुसलमानांचा इदगा आहे. तो मीं जाऊन पाहिला. ती इमारत फार पसंत आहे. व तींत दोन पाण्याचे उत्कृष्ट झिरे आहेत. सायंकाळीं येतांना मीं याहुदी लोकांची आळी पाहिली. ते लोक, व विशेषेंकरून त्यांच्या बायका फार सुंदर व नाजूक आहेत; इतक्या कीं, त्यांस पाहिल्याबरोबर मन भुलतें. हे लोक तेथें सुमारें २००० आहेत.—बुखाऱ्यांतील लोक बहुत करून दांडगे, धीट, आणि घोड्यावर बसणारे मोठे पटाईत असे आहेत. इतर लोकांचा दाहा दिवसांचा प्रवास हे दोन दिवसांत करितात. व हे इतके निग्रही आहेत कीं, नेमल्या मुक्कामीं पोहोंचत पर्यंत ते कोणत्याही कारणासाठीं आपल्या घोड्यांवरून उतरत नाहींत. ते लोक अमंग-

ळ राहतात. हल्लींचा राजा प्रजेच्या नीतीकडे फार लक्ष देतो. हिंदू आणि याहुदी ह्या लोकांस घोड्यावर बसण्यास व आपले चालीचे पोषाक करण्यास परवानगी नाहीं. हिंदू आणि याहुदी ह्या लोकांस तेथचे लोक इतके नीच मानितात कीं, ते ह्मणतात त्यांस कोणी फुकट देखील घेणार नाहीं. येथील लोकसंख्या सुमारें १७०००० आहे. बुखाऱ्याचा राजा स्वतंत्र आहे. तो स्वेच्छ कारभार करितो. तरी मुसलमानी शास्त्र शर्यात ह्यांतील नियम त्यास पाळावे लागतात. चोरास कडेलोट करण्याची अथवा कानाखाना नामक कोठडींत कोंडून ठेविण्याची शिक्षा होते. त्या कोठडींत विषारी किडे त्याला तोड तोडून दोन दिवसांत ठार मारून टाकितात. दिवस मावळल्यावर रस्त्यावरची वाग बंद होते. शहरांत ३००० कोतवाल आहेत. ते रात्रभर 'हुशार' असें ओरडत फिरत असतात. लढाईच्या वेळीं प्रत्येक मनुष्यानें राजास पैसा दिला पाहिजे. राजा बोलेल तोच कायदा, असें लोक समजतात.—हवा चांगली आहे. लोकांस नारूखेरीज दुसरा रोग बहुधा होत नाहीं. परंतु, त्या रोगापासूनच त्यांचे फार हाल होतात. हा रोग, मांजरें, कुतरे, पक्षी, ह्यांसही होतो. हिवाळ्यांत थंडीचा कडाखा पडतो. बर्फ देखील पडतें. तें घरांवर तीन महिनेपर्यंत असतें. लोक चाहा पितात. आणि बहुतकरून शेकोट्यांचे सभोंवती बसलेले असतात.—बुखाऱ्याचा हल्लींचा राजा नासरुल्ला खान आहे. तो पंचविसांच्या उमरींत असून

चांगला देखणा आहे. तो धर्माचे कामांत फार सक्त नजर ठेवितो. त्यानें गादीवर बसल्यावर थोडक्याच दिवसांनीं कुशबेग ह्याज कडून आपले भावास मारविलें. त्यानें, आपणावर राजबंधुहत्येचा दोष लोकांनीं घालूं नये, व आपला द्वेष करूं नये, ह्मणून शर्यताचा पाठ करण्यास आरंभ केला, आणि महान् धार्मिकाचें स्वरूप धरिलें. हा राजा मोठा पराक्रमी आहे सबसेहर, समर्कंद, आणि बल्क येथील सुभेदार त्यास खंडणी देतात. त्याला इराणाचें मात्र थोडेंसें भय आहे. तथापि तिकडच्या सैन्याच्यानें त्याचें कांहीं होणें नाहीं; कांकीं, त्यास बुखाऱ्यास येण्यास मार्ग परम दुर्गम आहे. देशांतील बंदोबस्त हा राजा चांगला राखितो. तो वस्त्रालंकारांनीं नटत नाहीं. त्याच्या स्वारिबरोबर माणसें फार नसतात. फावला वेळ ईश्वरभजन, विचार, आणि कुराणपठण ह्यांत हा राजा घालवितो.—तुर्कस्थानामध्यें बुखारा हें शहर सर्वांत मोठें आहे. ह्यांत श्रीमान् लोक पुष्कळ राहतात. ह्यामध्यें मशीदी व पाठशाळा ३६० आहेत. त्यांत फारसी व आरबी भाषा शिकवितात. घरें प्रायः एकमजलीच आहेत. दुकानें सकाळीं प्रहर दिवसानंतर उघडतात, आणि तिसऱ्या प्रहरीं बंद होतात. कांकीं, तेव्हां दुकानदार लोक रेजिस्तानच्या बाजाराला जातात. हा बाजार ह्याच्या मागच्या राजानें वसविला. त्याची शोभा फार मनोरम आहे. रस्ते मध्यम प्रतीचे आहेत. शहरांत विहिरी आहेत, पण त्यांचें पाणी कोणी पीत नाहीं. समर्कंद नदीचा

प्रवाह शहरामध्यें महिन्यांतून दाहा दिवस वाहतो. त्याचें पाणी टांक्यांत भरलेलें असतें, तें लोक पितात. तें वीस दिवसांत इतकें नासतें कीं, त्यापासून माणसांस नारू होतात.—बुखारा हें मुसलमानी धर्माचें पवित्र स्थान मानिलेलें आहे. त्याच्या भिंती नीट नाहींत, इतकेंच जरी कोणी माणूस बोलिला, तरी त्याला लोक नास्तिक ह्मणतात.—घोडे, खेंचरें, गाढवें, उंटें, मेंढ्या, हीं जनावरें पुष्कळ आढळतात. वाघ आणि लांडगे कोठें दृष्टीस पडत नाहींत—बुखाऱ्याचें दरसालचें उत्पन्न २०००० तिल, ह्मणजे सुमारें १३०००० रुपये आहे. मालावर जो कर घेतात त्याचें सर्व उत्पन्न लंगडे, आंधळे, पांगळे, अशा अनाथांस धर्मार्थ वांटितात. शहरांतील प्रत्येक हिंदूवर आठआठ आणे कर बसविला आहे. त्याचे उत्पन्नांत राजाचा अन्नवस्त्राचा खर्च भागतो.—ह्या राजाजवळ २०००० स्वार तयार असतात. त्यांपैकीं कितीएकांस पगाराबद्दल रोख पैसा मिळतो, व कितीएकांस धान्य मिळतें. कवाईत त्यांस ठाऊक देखील नाहीं. येथें ६० तोफा आहेत. पण त्यांचा उपयोग कोणाला करतां येत नाहीं. बंदुकीची दारू फारच वाईट आहे. प्रसंग पडल्यास हा राजा १००००० सैन्य जमवील, असें ह्मणतात. परंतु त्यांचा पराभव करण्यास कवाईत शिकलेले १०००० लोक बस आहेत.—राजाचा वजीर कुशबेग हा मोठा न्यायी आणि श्रीमान् व्यापारी आहे. त्याचे मूलानें दारूच्या अमलांत एका स्त्रीवर जुलूम केला. त्याचा न्याय काजीपुढें

होऊन, ७५ फटके व धिंड ह्या शिक्षा ठरल्या. त्याप्रमाणें फटके मारून, त्यास एका रोडक्या उंटावर बसवून भर बाजारांत त्याची धिंड काढिली. तेव्हां त्याचा बाप पायीं अनवाणी त्याचे बाजूनें चालत होता; पुढें वाजेत्रें वाजत होतीं; आणि "व्यभिचाराचें हें फळ" हे शब्द तो वजीर मोठ्यानें बोलत चालला होता. ( १८ जुलै, १८३३ ).– बुखाऱ्यास व्यापार मोठा चालतो. रेशमी माल मुलतान आणि रुशिया ह्या देशांत पाठविल्यानें सुमारें २०००० तिल, तेथील व्यापाऱ्यांच्या घरांत जातात. हातरुमाल आणि कलघी नामक एक प्रकारचें कापड, हीं रेशमाचीं तयार होऊन पुष्कळ खपतात.– काबुलाहून बुखाऱ्यास काश्मिरी शाली व इंग्रजी सामान येतें. त्याबद्दल साखर, कागद, आणि घोडे, हीं तिकडे जातात. बुखाऱ्याचें लमाण ४ किंवा ५ हजार उंटांचें असतें. मुल्लारहीमशाह ह्मणून एक काबूलचा व्यापारी आहे, त्यानें काश्मिराहून १७००० रुपयांच्या शाली रुशियांत मास्को येथें नेऊन ३४००० रुपयांस विकल्या. बुखाऱ्यांत पलंगपोस फारच उत्कृष्ट तयार होतात.– खुदिबेगीखान हा ह्या शहरांत उत्तम कवि आहे. येथची मूळची भाषा ह्मटली असतां तुर्की; परंतु सांप्रत लोक प्रायः फारसी बोलतात. ••••( जुलै, १८३३. )

## हिंदुस्थानाची सुधारणा.

ज्या मनुष्याला स्वदेशाभिमान नाहीं, तो जीवंत आणि मेला सारखाच समजावयाचा. हें बोलणें ह्या हिंदुस्थानांतील लोकांस लागू करण्यास आह्मांला कांहीं शंका वाटत नाहीं कांकीं, त्यांची सध्याची स्थितिच तशी आहे. पृथ्वीच्या पाठीवर आजपावेतों पुष्कळ राष्ट्रें परके लोकांच्या तावडीस सांपडून अगदीं दुर्दशेस मिळण्याच्या रंगास आलीं होतीं; तथापि, तेथच्या मूळच्या लोकांनीं, आपलें सर्व वेडेपण एकीकडे ठेवून, विद्या व शौर्य ह्यांच्या बळानें, परके लोकांस जेरीस आणून स्वदेश स्वतंत्र केला; अशीं अनेक उदाहरणें जगाच्या इतिहासांत आढळतात. तें सामर्थ्य आमच्या लोकांत आहे काय ? त्यांस दास्य इतकें गोड लागलें आहे कीं, त्याचें वर्णन देखील करवत नाहीं. पहा एकाद्यास आपणा पैकींच जरा उचलून बोलिला, ह्मणजे लगेच तो तांबडा लाल होऊन सरकारांत फिर्याद जातो. परंतु, त्यालाच यःकश्चित् एकाद्या साहेबानें जरी लाथांखालीं तुडविलें, तरी तो त्याचें फारसें दुःख न मानितां, कदाचित् उलटें कौतुकही करितो. आपणांमध्यें कितीही शाहणा विद्वान् पुरुष निपजूंद्या. त्याला, साहेबांच्या हाताखालीं नौकरी पतकरून त्यांजपासून शाबासकी मिळविणें, हेंच काय तें भूषण वाटतें. शेतकी आणि व्यापार हीं तो अगदीं तुच्छ मानितो. आणखी दासपणाची आवड ती कशी असावयाची ? ह्या आवडीनें आमचे देशाचा मोठा घात झाला आहे. तो ह्याचकीं, स्वा-

भिमान ह्मणून जो एक अमूल्य गुण मनुष्याचेठायीं असतो, तो तिच्यायोगें आमच्या लोकांच्या अंतःकरणांतून अगदीं नाहींसा झाला आहे. ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय. स्वदेशाभिमान हा उत्तम खरा; परंतु तो मी एकटाच धरून बसल्यानें काय होणार आहे; माझे सारखे त्याचे अवधारणकर्त्ते आणखी निदान शेंपन्नास तरी पाहिजेत; तेव्हां त्याचा कांहीं चांगला परिणाम होईल; असें प्रत्येक मनुष्याच्या मनांत येऊन त्याची उमेद खचण्याचा बराच संभव आहे. परंतु, बाजरीचें एक एक कणीस पाहिलें असतां फार तर पसा पसा धान्याचें असतें. अशा पसापसा धान्याची जमवाजमव करून काय होणार, असें जर कोणी ह्मणेल, तर तें शोभेल काय? पसापसा करूनच खंडी होते. तसे, एक एक करतां करतांच हजारों स्वदेशाभिमानी होतील, आणि त्यांपासून चांगलें फळ होईल. असो. आतां सध्याच्या स्थितींतच हिंदुस्थानाची सुधारणा होण्यास कोणकोणत्या गोष्टी उण्या आहेत, ह्याचा थोडासा विचार करूं.

आमचे लोकांनीं पहिली गोष्ट ही केली पाहिजे कीं, त्यांचे मनांत पूर्वापार संप्रदायावरून जीं विलक्षण वेडें भरलीं आहेत, तीं टाकून द्यावीं. स्वदेशमर्यादेचे बाहेर जाणें हें पाप आहे, हें मानणें बरोबर नाहीं. ह्यास जरी एकाद्या ऋषिवचनाचा आधार असला, तरी तें वचन ज्या काळीं ज्या ऋषीनें लिहिलें, त्या काळीं त्यास, लोकांच्या दुर्बल व अज्ञान स्थितीस योग्य वाटलें असेल. परंतु, ते

दिवस गेले. आतां प्रवास करण्यास आगगाड्या व आगबोटी पाहिजेत तितक्या आहेत; व चोंहींकडे बंदोबस्तही चांगला आहे. तेव्हां पाहिजे तिकडे प्रवास करण्यास हरकत नाहीं. जो मनुष्य आपले घरांतून बाहेर न पडण्याचा निश्चय करून चूलकोंबडा होईल, त्यास लोकांमध्यें मान प्रतिष्ठा मिळण्याचा, त्याची सुधारणा होण्याचा, व चवघांत बसल्या उठल्या पासून जें सुख मिळतें तें मिळण्याचा संभव फार कमी आहे. त्याप्रमाणें जे लोक आपणांस आपल्या देशामध्यें कोंडून घेतात, कधीं बाहेर पडत नाहींत, ते सर्वदा रानटी, अज्ञानी, आणि दुःखी राहतील; हें पक्कें समजावें. ह्याच्या उलट उदाहरण पहा. जे लोक हल्लीं सुधारणेच्या कळसास पोहोंचले आहेत, त्यांचें गमन कोणत्याही देशांत नाहीं असें नाहीं. ते सर्व देशांत जातात; तेथें कायकाय उत्पन्न होतें तें पाहतात; त्यांतून आपणांस उपयोगी परंतु दुर्मिळ असें असेल, तें स्वदेशीं आणितात; तेथल्या लोकांच्या रीतिभातींचा विचार करून, त्यांपैकीं ग्राह्य असें जें आढळेल तें तत्काळ घेतात; आपल्या देशांतले विपुल पदार्थ, जे तेथें मिळत नसतील परंतु आवश्यक असतील, ते तेथें नेऊन विकून खूब पैसा मिळवितात; असा व्यापार करतांकरतां तेथें आपलें चांगलें वजन पाडून, ते तेथच्या लोकांच्या व राजांच्या कलहांत हात घालितात; आणि "दोघांचें भांडण आणि तिसऱ्याचा लाभ" ह्या ह्मणीप्रमाणें, अपार संपत्तीच केवळ नव्हे, तर मोठें राज्य देखील संपादितात. हें आह्मीं जें आतां सांगितलें, तें सर्व इंग्लिश लोकांस

जवळच्याजवळ लावून पाहा, ह्मणजे खातरी होईल. हे जर विलायतेच्या बाहेर न पडते, तर ह्यांस हिंदुस्थानाचें एवढें राज्य मिळतें काय.? व ते इतके उत्तमावस्थेप्रत पावते काय.? ह्याप्रमाणेंच परभाषा शिकण्याचें व अनेक विद्या पढण्याचें फळ आहे. तर आमचे लोकांनीं व्यर्थ जुन्या समजुती सोडून देऊन असा विचार करावा कीं, जसें आपले घरांतून कांहीं कामानिमित्त बाहेर पडणें, तसेंच परदेशीं जाणें; जसें वेद समजण्याकरितां संस्कृत पढणें, तसेंच अनेक विद्यांचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं इंग्लिश, लातिन वगैरे भाषा शिकणें; ह्यांत काय अधर्म आहे? किंवा ह्यांत काय पाप आहे.? ह्यांत असत्य भाषण, असत्याचरण अथवा दुसऱ्यास दुःख देणें, ह्यांपैकीं कांहीं नाहीं. तेव्हां अशा गोष्टी आह्मीं कधींही वर्जूं नयेत.

आणखी एक गोष्ट नव्या रीति घेण्याविषयीं सांगतों. आमच्या धर्मशास्त्राकडे पाहावें तों, त्यांत निजणें, बसणें, उठणें, चालणें, बोलणें, शौचास जाणें, हात धुणें, पायधुणें, इत्यादि अगदीं यःकश्चित् बारीक गोष्टींविषयीं देखील नियम सांगितले आहेत. तेव्हां व्याज, व्यापाराचें पदार्थ, इतर लोकांशीं दळणवळण, ह्या मोठ्या गोष्टींचा विचार त्यांत केला असेल, ह्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु, ह्यांविषयीं आपण मनामध्यें असें ठेवावें कीं, ते लेख फार प्राचीन काळचे आहेत; ते सर्व लोकांचें हिताहित पाहून व सर्व कालांवर लक्ष्य देऊन केलेले नाहींत; ज्यास जें तेव्हां योग्य व सोईचें वाटलें, तें त्यानें नियमाप्रमाणें लिहून ठेवि-

लें; त्यास सर्व लोकांची मान्यता मिळाली होती असें नाहीं; तेव्हां दूरवर विचार करून बहुसंमतानें कोणतीही गोष्ट ठरविण्याचा पाठ अगदीं नव्हता; ह्यास्तव, त्यांनीं लिहिलेलें सर्वकाळ सर्वांनीं शिरसावंद्य मानून राहावें, आणि त्याविषयीं स्वतः कांहीं विचार करूं नये, असें नाहीं. एकंदरीनें विचार करून पाहिलें असतां, जनाच्या सोयी, सुखें व संपत्ति, हीं दिवसेंदिवस वाढत चाललीं आहेत. आणि हीं सर्व ज्ञानवृद्धीचीं फळें होत. तेव्हां, सांप्रत काळीं पूर्वींच्यापेक्षां ज्ञान अधिक वाढत चाललें आहे, असें कोणीही कबूल करील. त्याअर्थीं प्राचीन काळच्या लोकांचे व्यवहारसंबंधी लेख, आलीकडच्या लोकांच्या वास्तविक हितास किती प्रतिबंधक आहेत, हें सुज्ञ पुरुषांच्या सहज लक्षांत येईल.

आह्मीं असें ह्मणत नाहीं कीं, आमच्या लोकांचें सर्वच वाईट आहे, आणि इंग्लिश लोकांसारख्या सुधारलेल्या लोकांचें सर्वच चांगलें आहे. जशा आमच्यांत पुष्कळ समजुती वाईट आहेत, तशा त्यांच्यांमध्यें थोड्या तरी वाईट आहेतच. ह्मणजे त्यांच्यांत आमच्यांत भेद इतकाच कीं, त्यांच्यांत चांगल्या समजुती पुष्कळ; आणि आमच्यांत वाईट पुष्कळ. त्या दूर करण्यास आमचे लोकांनीं झटावें. ज्यांत धर्मसंबध आहे, त्या तूर्त एकीकडे असोत. बाकीच्यांत तरी आधीं यथाशक्ति सुधारणा करावी. प्रथमतः अभिमान सोडावा; आणि इंग्लिश लोकांत सुखावह अशी जी अपार विद्या भरली आहे, ती संपादावी.

सध्या चोहींकडे विद्याचविद्या झाली आहे, असें पुष्कळ लोकांच्या तोंडून मी ऐकतों, पण त्याचा अर्थ मला समजत नाहीं. पुष्कळ लोकांस लातिन, इंग्लिश, संस्कृत, इत्यादि भाषा चांगल्या येतात. व त्यांतील अत्यंत गहन ग्रंथही समजतात. आगगाडी अशी चालते, तारायंत्रानें अशी बातमी जाते, वाफेनें छापण्याचें काम असें चालतें, देवी अशा काढितात, ह्याप्रमाणें वाक्पांडित्य करणारे, कदाचित् शेंकडा साठांवरही निघतील. परंतु, सामान पुढें ठेवून, कसें तें करून दाखवा, असें ह्मटलें असतां पुढें सरसावणारा शेंकडा एक निघाला, तर हिंदुस्थानाचें प्रारब्ध उघडलें, असें मी मानीन. ह्यास्तव पोपटविद्या सोडून खरी विद्या संपादावी.

आणखी, प्रारब्धाची फुसकी काडी सोडून, उद्योगाची बळकट कांस धरावी. पक्का भरंवसा ठेवावा कीं, उद्योगानें सर्व साध्य आहे. आमच्या लोकांनीं नशीबावर हवाला ठेविल्यामुळेंच त्यांस ही दशा प्राप्त झाली आहे. नशीबाचेच बाप मुहूर्त होत, त्यांविषयींही लोकांचें वेडेपण गेलें पाहिजे. साखर निरंतर गोड असावयाची, ती कधीं कडू लागली आहे, असें होत नाहीं. ह्मणजे ती गोड लागण्यास सुमुहूर्त लागत नाहीं. त्याप्रमाणें दृढनिश्चयपूर्वक चांगला उद्योग केव्हांही करा, त्यापासून सुफल प्राप्त झाल्यावांचून राहावयाचें नाहीं, हें निःसंशय समजावें.

स्त्रियांस विद्या शिकाविली असतां अनर्थ होतील, अशी वेडी समजूत आमच्या लोकांत आहे, ती त्यांनीं टाकि-

ली पाहिजे. ही मूर्खपणाची समजूत त्यांचे मनांत भरून गेलेली पाहून मला मोठा चमत्कार वाटतो. कारण विद्येपासून मनुष्याचें हितच व्हावयाचें; अहित कदापि व्हावयाचें नाहीं, हें खचीत समजावें. विद्येच्या योगानें स्त्रियांचे हातून अनर्थ होण्याचा जसा संभव आहे, तसा पुरुषांच्या हातूनही होण्याचा संभव आहे, इतकेंच नव्हे, तर, त्यांचे हातचे अनर्थ आपण अहोरात्र पाहात आहों. तर, अनर्थांच्या भयामुळें बायकांस विद्या न शिकाविणें, हा अन्याय नव्हे काय ? ह्या गोष्टीचा विचार आमचे लोकांनीं करावा. आपल्या स्त्रियांस, बहिणींस, मुलींस, व इतर आप्त बायकांस विद्या शिकवावी. ह्मणजे त्यांचें फार हित होईल.

आणखी स्त्रियांस हलकें लेखण्याची व दासींप्रमाणें वागविण्याची चाल जी आमचे लोकांत फार आहे, ती अगदीं वाईट आहे. पुरुष हा शेतकरी, स्त्री हें शेत; अथवा पुरुष हा दोरा आणि बायको ही सूय. नुसता शेतकरी किंवा नुसता दोरा काय कामाचा? तो काय करणार ? त्यांस यथानुक्रमें शेत आणि सूय हीं साह्य असलीं, तरच त्यांचें सार्थक्य होणार. नाहीं तर ते व्यर्थ, असें समजावें.

मुलांचीं लग्नें लहानपणीं करण्याची वहिवाट, जी हल्लीं आपणांमध्यें फार चालू आहे, तिजपासून ह्या देशामधील लोकांचें जितकें अहित झालें आहे, तितकें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपासून झालें नसेल. मनें न मिळाल्यामुळें दादलाबायकांचें वैमनस्य पडणें, त्या-

मुळें संसाराची वाताहात होणें, गुप्तपणें उभयपक्षीं व्यभिचार वाढणें, स्त्रियांकडून गर्भपातादि घोर कर्में घडणें, इत्यादि अनर्थकारक गोष्टी लहानपणीं लग्नें केल्यापासून होतात, ह्यांचीं हजारों उदाहरणें लोकांच्या नजरेस हरहमेषा पडतात, ह्यास्तव त्याविषयीं येथें विस्तारें लिहीत नाहीं. परंतु, एक दुसरी मोठी हानि एकंदर देशाची होते, ती मनांत आणिली पाहिजे. ती हानि हीच कीं, प्रजा अप्रबुद्ध उत्पन्न होते. विचारदृष्टीनें पाहाणाऱ्या मनुष्याच्या लक्षांत असें यावयाजोगें आहे कीं, आमच्या लोकांत जीं वडील ह्मणजे पहिलीं मुलें होतात, तीं आपल्या धाकट्या भावंडांपेक्षां बुद्धीनें बहुधा फार कमी असतात. पुष्कळ मुलांच्या कुटुंबांत शोध करून पाहावा, ह्मणजे आह्मीं ह्मणतों ह्याची सत्यता, शेंकडा ९०, किंवा निदान ७५ कुटुंबांत तरी सांपडेल. ह्याचें कारण, मला वाटतें कीं, स्त्रीपुरुषांचीं मनें गर्भसंभवकाळीं एकमेकांवर फिदा किंवा मोकळीं नसतात, हें होय. आमच्या लोकांतलें पहिलें मूल लाजेखाजेचें, अबोल्याचें, अनोळखीचें, आणि भिडेचें असें असतें. तें तसेंच लाजाळू, मुखदुर्बल, आणि अप्रबुद्ध असें निपजतें; आणि पुढें सहवासपरत्वें जसा त्या स्त्रीपुरुषांच्या मनाचा मेळ बसत जातो, व लज्जा, भीड, हीं कमी होत जातात, तसीं मुलें अधिकाधिक चपल, बुद्धिमान् आणि पसंत उत्पन्न होतात. वेश्यांचीं मुलें गरतींच्यांपेक्षां, ह्मणजे इतर लोकांचे मुलांपेक्षां मोठीं चलाख, बुद्धिमान्, आणि हुशार

असतात, हें बहुधा सर्व लोकांच्या पाहाण्यांत आहे. तर, आह्मीं असें विचारितों कीं, असें कां असावें. ? तर त्यावर उत्तर हेंच कीं, त्यांची पेरणी होते तेव्हां, उभयपक्षीं मनें एकमेकांवर जशीं फिदा असावीं तशीं असतात, त्यांच्यामध्यें कांहीं पडदा राहिलेला नसतो, ह्मणून तीं मुलें चांगलीं निपजतात. आतां, मुलाचें बुद्धिबल, स्त्रीपुरुषांच्या मनांच्या मिलाफावर कां असतें. ? शेत चांगलें तयार केलें आहे, पाऊस चांगला पडला आहे, आणि पेरणी करतांना जर शेतकरी रडत चालला आहे, तर तें शेत चांगलें पिकणार नाहीं कीं काय.? असें जर कोणी विचारील, तर त्याविषयीं आमच्यानें तूर्त उत्तर देववत नाहीं. परंतु जें पाहाण्यांत आलें, व जें अनुमान कांहीं उदाहरणांनीं सिद्ध झालें, तें लिहिलें आहे. तर, मुलांस व मुलींस चांगलीं मोठीं होऊं देऊन, त्यांस विद्या शिकवून, त्यांस बऱ्यावाइटाचें पक्कें ज्ञान करून देऊन, नवरा ह्मणजे काय, बायको ह्मणजे काय, त्यांचीं परस्परांविषयीं कर्तव्यें व संबंध काय, ह्या सर्वकांहीं गोष्टी त्यांस समजून देऊन, त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचे विवाह करावे, अशी देशसुधारकांनीं तजवीज केली पाहिजे. अथवा, सध्याच्या स्थितींत तूर्त आपल्या बायकांस मोकळ्या मनानें वागवून, त्यांचें आपलें मन अगदीं एक ठेवून संसारांत नांदणें हें तरी त्यांस फार आवश्यक आहे. ह्मणजे त्यापासून पूर्वीं सांगितलेली अडचण कांहीं नाहीं तरी, बरीच दूर होईल अशी आशा आहे.

## मोहनलालाचें प्रवासवर्णन.

### विलायत.

मोहनलालानें पुष्कळ दिवस इंग्रजांच्या विलायतेंत घालविले. तेणें करून तेथच्या लोकांची स्थितिरीति त्याला बरीच माहीत झाली. तिजविषयीं त्याचा लेख आहे, तो येणेंप्रमाणें:—

इंग्लंदांतील लोकांच्या रीतिभाती अत्यंत सुधारलेल्या आहेत. ज्ञानवृद्धीच्या कामीं व आपले मुलांस शाहणे करण्याचे कामीं ह्या देशांतील लोक जितका पैसा खर्चितात, आणि जितकी काळजी बाळगितात, तितकी इतर कोणत्याही देशांतले लोक बाळगीत नसतील. मुलाला कळावयास लागलें ह्मणजे, त्याला कोणत्या प्रकारचा धंदा आवडतो, व शिकावासा वाटतो, तें विचारितात; आणि ज्यांत त्याची रुचि दिसेल व बुद्धि चालेल, तो धंदा शिकण्यास त्याला लावितात. मग तो सरकारि कामकाजाचा असो, वकिलीचा असो, शिपायाचा असो, अगर दुसरा कोणता असो. मुलानें मिळवून माझे पोटास घालावें, ह्याची कोणी फारशी इच्छा धरीत नाहीं; तर त्याची भरभर व्हावी आणि आपण पाहावी, इतक्याचीच ते वाट पाहात असतात. मुलींवर त्यांच्या आयांची सक्त नजर असते. त्यांच्या हाताखालीं त्या तयार होतात. मग बायकांच्या मंडळींत सहजच त्या प्रतिष्ठा पावतात. मुलींची राहण्याची रीत मोठ्या टापटिपिची असून वागण्याची शैली प्रतिष्ठित दिसली पाहिजे. त्यांस लिहिणें, वाचणें, नाचणें, आणि गाणें, ह्या कला अवश्य येत असून, स्वभा-

षेखेरीज, दुसऱ्या पांच चार नसल्या तरी, फ्रेंचभाषा चांगलें बोलण्यासारखी अलबत आलीच पाहिजे, असें आहे. त्यांचीं आईबापें आपले घरीं प्रसंगोपात्त मेजवानीचा थाट करून मोठमोठे लोकांस भोजनास बोलावितात. त्या प्रसंगीं एकाद्या श्रीमान्, विद्वान्, व रूपवान्, पुरुषास, आपल्या विद्वत्तेनें, चातुर्यानें, सौंदर्यानें, व चालरीतीनें, वश करण्यास जी तरुण स्त्री समर्थ होते, तिचीं आईबापें तिजविषयीं आपणांस कृतकृत्य मानितात. तथापि तिचें काम तेंवढ्यानेंच होत नाहीं. कां कीं, नवरा श्रीमान् मिळण्यास तिजपाशीं द्रव्य असलें पाहिजे, अथवा तेव्हां जवळ नसलें तरी, तिचीं आईबापें वगैरे मृत झाल्यावर तरी तिला द्रव्य मिळण्याचा संभव असला पाहिजे. तरच तिला कोणी बायको करितो; एरव्हीं करीत नाहीं. एशिया खंडामध्यें एकादी स्त्री अविवाहित राहिली, तर तिला लोक मोठी साध्वी मानितात; आणि तिचें त्यांस फार नवल वाटतें. परंतु, युरोप खंडांत अशा हजारों असतात. ह्मणून त्यांचें कोणास आश्चर्य वाटत नाहीं. त्या जरी लग्न करीत नाहींत, तरी त्यांचें राहणें विवाहित स्त्रियांप्रमाणें नीटनेटकें असतें. लग्नाची गोष्ट निघाली कीं, "तिजपाशीं कांहीं जागा आहे काय" हा प्रत्येक अविवाहित पुरुषाचा प्रथम प्रश्न असतो. आणि ती जर सधन असली, किंवा कांहीं कालानें सधन होण्याचा संभव असला, तर ती कुरूप असली तरी तिला वरितो. असें घडतें तेव्हां, हा माझा गुण नव्हे, तर माझे द्रव्याचा आहे, असें ती पक्कें जाणते. तथापि, त्यांच्या आचरणावरून व पत्र-

व्यवहारावरून एकाद्यास असें स्पष्ट दिसून येईल कीं, जणु काय, ह्यांचीं अंतःकरणेंच अगदीं एकरूप होऊन गेलीं आहेत. ह्याचें कारण असें कीं, त्यांच्यांत वहिवाटच तशी. वधुवरांचीं वयें कशींही कमजास्त असलीं, तरी चिंता नाहीं. प्रीति कोणत्याच स्त्रीपुरुषांत नाहीं, असें मी ह्मणत नाहीं. एकमेकांच्या जिवास जीव देणारीं स्त्रीपुरुषें इंग्लंदांत अनेक आहेत. येथील बहुतेक स्त्रिया हुशार निष्कपट, आणि सुशील आहेत. त्यांच्या अंतःकरणांत लबाडीस व मूर्खपणास जागा मिळत नाहीं. जर उभयतांत कांहीं भांडण उत्पन्न झालेंच, तर अपराध बहुत करून पुरुषाकडे विशेष असतो; असें माझें मत आहे.

इमानाविषयीं इंग्लिश लोक बाणा बाळगितात, व प्रतिष्ठा मिरवितात, त्याप्रमाणें ते इमानी बहुतांशीं आहेत, ह्यांत संशय नाहीं. तथापि त्यांच्या वहिवाटींत अशीं कितीएक भाषणें येऊन चुकतात कीं, तीं बोलणारा असत्य समजून बोलतो, व ऐकणाराही तीं खोटीं मानितो. परंतु, ती रूढि आहे, ह्यामुळें तसल्या भाषणाचें कोणास कांहीं वाटत नाहीं. उदाहरण. अस भेटण्याकरितां ब हा त्याचे घरीं गेला; अचे मनांत त्याला भेटावयाचें नाहीं; तर, तो आपला नौकर क ह्यास सांगतो कीं, मी घरांत नाहीं असें बला सांग. त्याप्रमाणें तो सांगतो. ह्यांत क बोलला तें खोटें, असें बला पुरें ठाऊक असलें, तरी तें भाषण तो दोषास्पद मानीत नाहीं. इतर देशांपेक्षां इंग्लंदांतही एक उत्कृष्ट गोष्ट विशेष आहे कीं, कितीही नीच पदवीचा मनुष्य असला,

तरी त्याला लिहितां आणि वाचतां हें येत असतेंच. ज्यांला ह्या दोन गोष्टी येत नाहींत, अशीं माणसें त्या देशांत फार निघावयाचीं नाहींत. मेंढरें राखणारा आणि हुजऱ्या, हे एका कोंपऱ्यांत बसून वर्तमानपत्रें वाचतांना व त्यांविषयीं बोलतांना मीं पाहिले आहेत. वाचणें हें आपलें कर्त्तव्य व करमणुकीचें उत्तम साधन आहे, असें ते समजतात. हल्लीं सरकारचे विचार काय चालले आहेत, त्यांविषयीं ते बोलतात. अशी उत्तम स्थिति आपल्या हिंदुस्थानाला कधीं प्राप्त होईल काय. ?

इतर देशांमध्यें पाहिलें तर लोकांचा वेळ जातां जात नाहीं; ह्याचें कारण काय ? तर त्यांस कांहीं उद्योग नसतो; परंतु, त्याच्या उलट स्थिति इंग्लंदांत आढळून येते. ती अशी कीं, कोणालाही एका क्षणाची फुरसद नाहीं. ज्याला त्याला पाहावें तों वेळ नाहींसा वाटतो. स्वतः माझीच गोष्ट मी सांगतों कीं, माझे मनांत ज्या ज्या गोष्टी करावयाच्या असतात, त्या करण्यास मला वेळ पुरत नाहीं.

मोठा कळवळा येण्यासारखी एक गोष्ट मीं इंग्लंदांत पाहिली; ती हीच कीं, येथें हजारों, लाखों लोक दारिद्र्यानें पीडलेले आहेत. एशिया खंडांतील देशांपेक्षां, संपत्ति व श्रीमान् लोकांची संख्या इंग्लंदांत पुष्कळ जास्त आहे. तरी अन्नवस्त्रावांचून मरणारे लोक ह्या देशांत आहेत इतके दुसरे कोठें नसतील. त्यांस आश्रय द्यावा, ह्या हेतूनें तेथें अनेक मंडळ्या स्थापिल्या आहेत, व त्या, वर्गणीचा पैसा जमवून त्यांस साह्य देतात. पण त्यानें होणार काय. ? भिकार अतिशयित असल्यामुळें कांहीं

एक पुरवठ्यास येत नाहीं. आणखी मला असें समजलें आहे कीं, ह्मातारे कोंतारे, आंधळे, बहिरे, मुके, पांगळे, थोंटे, अशा अनाथांस आश्रय देण्यासाठीं लोकांवर एक लहानसा करही बसविला आहे. तरी त्यानेंही पूर्तता होत नाहीं.

ह्या देशांतील लोकांची आदरसत्कार करण्याची उत्तम रीति पाहून मला परम संतोष झाला. आणि त्यांनीं माझें बहुत आगतस्वागत केलें, ह्मणून मी त्यांचे फारफार आभार मानितों.

## ग्रेतब्रितन व ऐर्लंद ह्यांचा संक्षिप्त इतिहास.

इंग्लंदामध्यें प्राचीन काळीं ह्मणजे आरंभीं केल्त लोक राहात असत. ते मुळीं एशिया खंडांतून येऊन युरोपाच्या दक्षिणेकडे व पश्चिमेकडे वसत गेले. नंतर त्याच्या उत्तर भागीं व पूर्व भागीं बेलजी लोक येऊन राहिले. त्यांचें मूळ स्थान एशिया खंडच होतें. ह्यांवरोबर गाथिक लोकांच्या आणखी कितीएक जाती युरोपांत शिरल्या. त्यांनीं उत्तर आणि ईशान्य ह्या दिशा व्यापून टाकिल्या. ह्या प्रकारें सर्व युरोप खंडांत वसाहात झाली. एशिया खंड हें मानवी प्राण्यांचें मूळस्थान आहे, असें विद्वज्जनमत आहे.

फिनीशियन लोक कार्नवाल येथून कथील विकत नेत असत, तें केव्हां पासून हें बरोबर सांगतां येत नाहीं. तथापि ख्रिस्ती शकापूर्वीं शेंकडों वर्षें हा व्यापार चालला असावा, असें सांगतात. जूलियस सीझरानें ख्रिस्ती सनाच्या पूर्वीं ५५ वे वर्षीं ग्रेतब्रितनावर स्वारी केली,

तेथपर्यंत त्या प्रदेशांची माहिती कांहीं समजत नाहीं. पुढें थोडथोडी कळूं लागते.

जूलियस सीझरानें ग्रेतब्रितनावर स्वारी केली, तेव्हां तेथचे लोकांस ब्रितन ह्मणत असत; देशाला ब्रितानिया असें नांव होतें; सुधारणा तर कांहींच नव्हती; लोक कातडीं पांघरत; झाडपाल्याच्या रसानें आंगें रंगवीत; फळें मुळें आणि शिकार ह्यांवर उपजीवन करीत; चिखल आणि वृक्षांच्या शाखा ह्यांनीं बांधिलेल्या ओबड धोबड घरांत राहात; अशी त्यांची स्थिति होती. तरी ते शूर असत, आणि प्रसंग पडल्यास मोठ्या शौर्यानें लढत. तेणेंकरून त्यांस जिंकण्यास जूलियस सीझराच्या सैन्यास फार श्रम पडले. ह्या मोहिमेनंतर सुमारें १०० वर्षांत रोमन लोकांकडून ब्रितनास कांहींएक इजा पोहोंचली नाहीं. पुढें इ० स० ४३ त, ब्रितनास पुरतें जिंकण्यासाठीं, क्लादियस नामक रोमन बादशाहानें मोठें सैन्य पाठविलें. तथापि ह्या गोष्टीनंतर २० वर्षांनीं, तें कार्य अग्रिकोला नांवाच्या सरदारानें सिद्धीस नेलें.

ब्रितनदेश सुमारें इ० स० ४३० पावेतों रोमन लोकांच्या अमलाखालीं राहिला. परंतु, त्याच सुमारास त्यांच्या स्वतःच्या देशावर ह्मणजे इतालीवर, उत्तरेकडील रानटी लोक हल्ले करूं लागले, ह्मणून स्वदेशसंरक्षणार्थ रोमन लोकांनीं ब्रितनांतली आपली सर्व फौज परत बोलावून नेली. तेव्हां अर्थात त्यांची सत्ता तेथें राहिली नाहीं. ह्यांच्या कारकीर्दींत लोकांच्या रीतिभातींची वगैरे बरीच सुधारणा झाली. परंतु, स्वदेशाभिमान ह्मणून जो मोठा गुण त्यांजमध्यें रानटी स्थितींतही वसत

होता, तो ह्या कालाच्या सुमारास अगदीं लयास गेला. ही गोष्ट इतिहास वाचतो त्याच्या हरहमेष दृष्टीस पडते. असें कां होतें बरें? देशसुधारणा आणि स्वदेशाभिमान ह्यांचें वैमनस्य आहे काय?

ब्रितनदेश उघडा पडला; त्यास कोणी त्राता नाहींसा झाला; असें पाहून पिक्त आणि स्कात् लोक त्यावर स्वाऱ्या करूं लागले. त्यांजपासून आपला बचाव करून घेण्यासाठीं ब्रितन लोकांनीं रोमन लोकांची प्रार्थना केली. परंतु त्यांचीच त्यांना पंचाईत पडली होती. तेव्हां ह्या बिचाऱ्यांकडे लक्ष देतो कोण? आधीं पोटोबा आणि मग विठोबा. आधीं स्वसंरक्षण, तेव्हां पुढें परोपकार. असा मानवस्वभाव असल्यामुळें ती प्रार्थना व्यर्थ गेली. नंतर, जर्मनीच्या उत्तरभागीं राहणाऱ्या साकूसन लोकांस ब्रितन लोकांनीं स्वशत्रूशीं लढण्यास सहाय करावयाकरितां बोलाविलें; आणि त्यांच्या मदतीबद्दल त्यांस थानेत हें बेट देऊं केलें. ते लोक, हेंजिस्त आणि हार्सा ह्या सरदारांसहवर्तमान, इ० स० ४४९ त ब्रितन देशामध्यें आले; आणि त्यांनीं मोठ्या शौर्यानें पिक्त आणि स्कात् ह्या लोकांस देशांतून घालवून दिलें. तेणेंकरून ब्रितन लोक स्वतंत्र आणि स्वस्थ झाले काय? नाहीं. ते चुलींतून निघाले आणि वैलांत पडले. ह्मणजे असें झालें कीं, साह्य करण्यास आलेल्याच साकूसन लोकांनीं ब्रितनावर शस्त्र धरिलें, आणि आग्नेयीकडच्या कितीएक भागांतून त्यांस काढून दिलें. देशांत साकूसन लोकांचा अंमल बसत चालला. आंग्लोसाकूसन ह्मणून त्यांच्याच जातीचे लोक जर्मनींतून निघून जाऊ-

न ग्रेतब्रितनांत राहिले. चोहींकडे आंग्लोसाक्सन लोकांचा अंमल पसरला. ह्या लोकांच्या नांवापासूनच, त्या देशाला इंग्लंद हें नांव प्राप्त झालें आहे. साक्सन लोकांनीं ह्या देशांत वेगवेगळीं सात राज्यें स्थापिलीं. तीं, इतिहासामध्यें, साक्सनराज्यसप्तक ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

साक्सन लोकांच्या तडाख्यांतून निभावून जे ब्रितन लोक पळाले, ते वेल्स प्रांतांत, आणि फ्रान्स देशामध्यें ब्रितनीनामक भागांत जाऊन राहिले. वेल्सांतले ब्रितन लोक पहिल्या एदवर्द राजाच्या कारकीर्दीपावेतों स्वतंत्र होते. त्यांच्या वंशजांस अद्यापि प्राचीन ब्रितन असें ह्मणतात.

साक्सन लोकांच्या अंमलांत ह्या देशाचें नांव, रीतिभाती, व भाषा, हीं बदललीं. लोक पूर्वीं लातिन आणि केल्त ह्या भाषा बोलत, ते साक्सन भाषा बोलूं लागले. तिजपासूनच हल्लींची इंग्लिश भाषा निघाली आहे.

इ० स० ८२७ त, राज्यसप्तकापैकीं कितीएक राज्यें मोडून, वेसेक्सचा राजा एग्बर्त ह्यानें एक मोठें राज्य स्थापिलें, व देशास इंग्लंद हें नांव दिलें. तेव्हां इंग्लंदचा प्रथम राजा एग्बर्त, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

इ० स० ८६६ त देन्स लोकांनीं इंग्लंदावर स्वारी केली; आणि इ० स० १०१७ त बहुतेक सर्व देश आपले कबजाखालीं घेतला. तेव्हां त्यांचा राजा कॅनूत हा होता. ह्या लोकांस इंग्लंदाच्या आल्फ्रेद राजानें जर्जर करून देशांतून घालवूनही दिलें.

कॅनूत ह्याचा पुत्र हार्दिकॅनूत हा इ० स० १०४२

त मरण पावला. नंतर एदवर्दधिकनफेसर नामक इंग्लंदच्या मूळ साकूसन राजकुळांतला राजा देशामध्यें राज्य करूं लागला. तो इ० स० १०६६ त वारल्यावर, त्याची गादी, त्याचा शालक हारोल्द, ह्यानें बळकाविली. परंतु, एदवर्दाच्या मृत्युपत्राप्रमाणें ह्मटलें असतां नार्मंदीचा दूक विलियम ह्यास ती मिळावयाची; ह्मणून ती त्यानें त्याच वर्षी हारोल्दास हेस्तिंग्ज येथील लढाईत मारून मिळविली. इंग्लंदच्या इतिहासांत 'नार्मन विजय' ह्मणून जी प्रसिद्ध गोष्ट आहे, ती हीच. विलियम ह्यास राज्याभिषेक झाल्यावर त्याला लोक विलियम विजयी असें ह्मणूं लागले. नार्मन राजांच्या कारकीर्दीत इंग्लंदामध्यें देशसुधारणा, कायदे, उत्तम रीति आणि लोकहिताच्या गोष्टी वृद्धि पावल्या. नार्मन विजयापासून आजपावेतों इंग्लंदच्या राज्यांत ज्या गोष्टी अत्यंत महत्वाच्या झाल्या, त्यांपैकीं मुख्य मुख्य सांगतों.

१; दुसऱ्या हेनरीच्या कारकीर्दीत, इ० स० ११७२ मध्यें, ऐर्लंदचें राज्य इंग्लंदच्या राज्याशीं जोडलें. २; जान राजानें, इ० स० १२१५ त, 'माग्नाचार्ता' ह्या नांवाच्या प्रजेच्या स्वातंत्र्याच्या सनदेवर सही केली. ३; तिसरा एडवर्ड आणि पांचवा हेनरी ह्यांनीं फ्रान्सावर स्वाऱ्या केल्या. ४; ख्रिस्ती शकाच्या पंधराव्या शतकांत यार्क आणि लांकास्तर ह्या घराण्यांचीं युद्धें झालीं. ५; इ० स० १६०३ त पहिला जेम्स गादीवर बसला, तेव्हां इंग्लंदाच्या व स्कात्लंदाच्या राज्यांची एकत्रता झाली. ६; पहिल्या चार्लस राजाच्या व त्याच्या प्रजेच्या लढाया होऊन लोकांनीं त्याचा वध केला, नंतर

१६४९ त क्रामवेल ह्यानें प्रजासत्ताक राज्य स्थापिलें. ७; इ० स० १६६० त दुसरा चार्लस राजा गादीवर बसून, पुनः पूर्ववत् राजसत्ता चालूं लागली. ८; इ० स० १६८८ त राज्यक्रांति होऊन दुसऱ्या जेम्सानें राज्य सोडिलें. ९; इ० स० १७०७ त इंग्लंद आणि स्कातूलंद येथच्या पार्लमेंतसभा निराळ्या होत्या, त्या मोडून त्यांची एक झाली. १०; इ० स० १७१४ त, हानोवर घराण्यास राज्यप्राप्ति झाली. ११; इ० स० १७७६ पासून १७८४ पर्यंत अमेरिकेशीं लढाई. १२; फ्रान्सांतल्या बंडाबरोबर लढाई, इ० स० १७९३ पासून १८१५ पर्यंत. १३; ग्रेताब्रितन आणि ऐर्लंद येथील कायदे करणाऱ्या मंडळ्यांचें एकीकरण, इ० स० १८०० पर्यंत झालें.

नार्मन विजयापासून आजपावेतों जे राजे इंग्लंदाच्या गादीवर बसले, त्यांची याद, त्यांच्या राज्यारंभाच्या सनासह लिहून हा विषय पुरा करितों.

| | | | |
|---|---|---|---|
| पहिला विलियम. | १०६६. | तिसरा रिचर्ड. | १४८३. |
| दुसरा विलियम. | १०८७. | सातवा हेनरी. | १४८५. |
| पहिला हेनरी. | ११००. | आठवा हेनरी. | १५०२. |
| स्तीफन. | ११३५. | साहावा एदवर्द. | १५४७. |
| दुसरा हेनरी. | ११५४. | पहिली मेरी राणी. | १५५३. |
| रिचर्ड. | ११८९. | इलिझाबेथ राणी. | १५५८. |
| जान. | ११९९. | जेम्स, | १६०३. |
| तिसरा हेनरी. | १२१६. | पहिला चार्लस. | १६२५. |
| एदवर्द. | १२७२. | दुसरा चार्लस. | १६६०. |
| दुसरा एदवर्द. | १३०७. | दुसरा जेम्स. | १६८५. |

| | | | |
|---|---|---|---|
| तिसरा एदवर्द. | १३२६. | तिसरा विलियम. | १६८८. |
| दुसरा रिचर्ड. | १३७७. | दुसरी मेरी राणी. | १६८८. |
| चौथा हेनरी. | १३९९. | आन राणी. | १७०२. |
| पांचवा हेनरी. | १४१३. | पहिला जार्ज. | १७१४. |
| साहावा हेनरी. | १४२२. | दुसरा जार्ज. | १७२७. |
| चौथा एदवर्द. | १४६१. | तिसरा जार्ज. | १७६०. |
| पांचवा एदवर्द. | १४८३. | चौथा जार्ज. | १८२०. |
| | | चौथा विलियम. | १८३०. |

विक्तोरिआ राणी, १८३७, ती राज्य करीत आहे.

ऐर्लंद.—येथेंही फिनिशियन लोक कथिलाकरितां, प्राचीनकाळीं येत असत, असें दिसतें. ह्यांत प्रथमतः केल्त लोकच राहात.— १५ व्या शतकांत ह्या देशामध्यें संतपात्रिक ह्यानें ख्रिस्तीधर्म नेला —देन्स लोकांनीं हें इ० स० ८४५ त जिंकिलें होतें. तथापि, तें सोडून त्यांस लवकरच जावें लागलें.—दुसऱ्या हेनरीच्या वेळीं, इसवी सन ११७२ त, ऐर्लंद इंग्लंदाशीं जोडिलें. पहिल्या जेम्साचे वेळीं कितीएक इंग्लिश मंडळ्या ऐर्लंदांत गेल्या. तेणेंकरून तेथें सुधारणा व न्याय हीं चांगलीं झालीं.—इ० स० १६४१ त, ऐर्लंद राजाशीं लढाई करण्यांत गुंतलें होतें. तिचा शेवट क्रामवेलानें केला. १८४७ त मोठा दुष्काळ पडला होता. त्या वर्षीं बटाटे मुळींच पिकले नाहींत.—आलीकडे सुधारणा पुष्कळ झाली आहे.—इ० स० १८४९ त विक्तोरिआ राणीसाहेब ऐर्लंद पाहण्यास गेल्या होत्या. तेव्हां तेथील लोकांस अत्यानंद झाला.

## असत्य भाषण.

प्लेतोचा शिष्य आणि शिकंदराचा विद्वान गुरु जो आरिस्तातल, त्यास एके समयीं कोणीं असें विचारिलें कीं, "खोटें बोलण्यानें मनुष्यास काय प्राप्त होतें?". त्यानें उत्तर दिलें "अविश्वास ह्मणजे नापत." खरें आहे. अमुक मनुष्य खोटें बोलतो, असें एकदा आपले अनुभवाला आलें, ह्मणजे तो जरी दुसरे वेळीं खरें सांगूं लागला, तरी त्यावर आपला विश्वास बसत नाहीं.

जो ढुंगणाचें सोडून डोक्यास गुंडाळतो, अशा निर्लज्ज व हलक्या मनुष्यास देखील, आपण सत्य बोलतों अशा आख्येची आवड असते. दुर्गुणी जनांस समानशील स्नेही मिळतात. अमली पुरुषास मंडळीचा तोटा नाहीं; कां कीं गांवांत कोणी पांच चार तरी तसे असतात; आणि त्यांच्या मध्यें पहिल्या धडक्यास चिलमीची राख केल्यानें, अथवा प्रसंगीं अमलासाठीं घरांतील भांडें मोडिल्यानें शाबासकी मिळते. अट्ठल चोर, उचल्ये, द्रव्यार्थ मनुष्यास जिवें मारणारे, हे तर दुष्टशिरोमणीना? त्यांतही जो हजारपांचशें माणसांसमक्ष एकाद्या मोठ्या दागिन्यास उपटा देऊन आपल्या मंडळींत घेऊन येतो, त्याची त्याचे सोबती पाठ थापटितात. पण तेंच जर त्यांस न कळूं देतां एकटाच बळकावून बसेल, तर ते त्याला पुनः आपले मंडळींत घेतील काय? इतर पुष्कळ दुर्गुणांत मनुष्यें एकमेकांवर वरचढ होऊं इच्छितात, परंतु असत्य भाषणाविषयीं असें कोठें आढळतें काय? ज्या दुर्गुणाचा समावेस दुर्गुणशिरोमणींच्या

मंडळींतही होऊं सकत नाहीं, त्या असत्यभाषणानें विचारी पुरुषानें आपलें पवित्र मुख विटाळावें काय ?

असत्य भाषण करणारास सर्व सोडितात. त्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं. सज्जन जे आहेत, ते असत्य बोलणाराचा द्वेष कारितात, हें प्रसिद्धच आहे; आणि वर सिद्ध केल्याप्रमाणें, दुर्जनही त्याला आपणाजवळ येऊं देत नाहींत; तेव्हां जगांत त्याला ज्यानें त्यानें झिडकरावें, असें झालें कीं नाहीं ? ह्याहून अधिक नीचत्व तें कोणतें ? सरथामस ब्रौन ह्मणून एक इंग्लिश ग्रंथकार होऊन गेला. त्यानें आपले पुस्तकांत जनाला लक्षून असें ह्मटलें आहे कीं, "अरे, सैतान देखील एकमेकांशीं असत्य भाषण करीत नाहींत; आणि नरकवास कंठणाऱ्यांस देखील सत्यावांचून परिणाम नाहीं." ह्यावरून, सत्य भाषणाची आवश्यकता मनुष्यास किती आहे, हें सहज लक्षांत येईल. हा दुर्गुण इतका द्वाड आहे, त्या अर्थीं तो टाळण्याविषयीं होईल तितकी सावधगिरी ठेवणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. निदान, त्याच्या स्वीकारानें जो लाभ होणार, तो त्यापासून होणाऱ्या हानी इतका आहे कीं नाहीं हें तरी पाहावें. आणि असा लाभ घडोघडी आढळेल, असेंही वाटत नाहीं.

असें आहे तरी जन पावलोपावलीं असत्य बोलतात. मनुष्य समाजांत असतो तेव्हां, मला वाटतें, त्याच्या कानीं असत्य भाषण पडल्या वांचून त्याची एकही घटिका जात नसेल. त्या भाषणापासून ह्मणजे लोकांस दुःख व्हावें, आणि आपुणास सुख व्हावें, असा बोल-

णाराचा कांहीं एक हेतु नसतो. तर, गोष्टी निघाल्या ह्मणजे, 'आठ हात लांकूड आणि नऊ हा ढलपी' अशा गप्पा माराव्या, अशी मनुष्यास सवयच पडून गेली आहे. तिजपासून आपलें कांहीं हित नाहीं, असें त्याला उघड कळत असतांही, तो त्या दुष्ट सवयीचा त्याग करीत नाहीं. तेव्हां त्याला काय ह्मणावें ? वाणी आपल्या मालाची किंमत सांगतो, अथवा कोणी मनुष्य आपल्या शत्रूची निंदा करितो, तेव्हां, ह्यांत खचीत लबाडी आहे, असें तात्काळ ऐकणाराच्या मनांत येतें; व त्यांतलें तथ्य काय तें बाहेर काढण्याविषयीं तो उद्योग करितो. कां कीं, त्यांत धनप्रतिष्ठादिकांस धक्का असतो. परंतु उगेंच सामान्य गोष्टींत जर कोणीं तिखट मीठ घातलें, तर त्यापासून नफा नुकसान कांहीं नसल्यामुळें त्याविषयींचा फारसा शोध करण्यास कोणाला बनत नाहीं; व आवडतही नाहीं. आणखी त्यापासून दुसरें असें आहे कीं, गप्पा मारणाराची हौस बिनखर्चानें पूर्ण होते, व बुद्ध्या गोड केलेली गोष्ट श्रोत्यांसही बरीच मनोरंजक वाटते. ह्या कारणामुळें अशा असत्यभाषणाचा प्रकार जनांत फार वाढला आहे. तो इतका कीं, त्याच्या योगानें कितीएक मनुष्यें कांहीं दिवस पावेतों बहुभाषपणा करून लोकांची मर्जी संपादितात. तरी, केव्हांनाकेव्हां तरी त्यांची लबाडी बाहेर पडते. आणि ती बाहेर पडली ह्मणजे जी त्यांची नापत व मानहानि होते, ती सांगतां पुरवत नाहीं.

आणखी एक असत्याचा प्रकार आहे. मुक्तमाला, रत्नप्रभा, इत्यादि पुस्तकांत लिहिणारांनीं जें लिहिलें आ-

हे, तें खरें नाहीं; असत्य आहे. तथापि त्यापासून वा- ईट परिणाम व्हावयाचा नाहीं. कां कीं, तें खरोखर घडलेलें नाहीं तरी त्यांतल्या गोष्टी होण्यास शक्य आहे- त, व त्यांपासून मनुष्यास सुबोध प्राप्त होण्याजोगा आहे, ह्मणून तीं वाचावीं, असा ग्रंथकारांचा उद्देश लोकांत व्यक्त आहे. ह्यावरून एक चमत्कारिक गोष्ट मनांत येते. ती अशी. सत्यामध्यें जर थोडें असत्य मिसळलें, तर जनांत मोठें पाप मानितात; परंतु, मुक्तमालेप्रमाणें जर सबंद असत्य लिहिलें, तर त्याचें कांहीं नाहीं. ह्याचें कारण काय? आपण आपल्या सत्यभाषणांत जें असत्य भाषण मिळवितों, तें सत्य मानण्याविषयीं जनांस आग्रह करितों, ह्मणजे त्यांस फसवायास पाहतों, ही आपली लबाडी, ह्मणून तें पाप होय; आणि मुक्तमालेसारख्या गोष्टींत तसा कांहींच प्रकार नसतो; ह्मणजे ती असते खोटीच, परंतु, ती खोटी समजूनच लोकांनीं वाचावी असा ग्रंथकाराचा हेतु असतो; तेव्हां तो जनांस ठकवूं पाहात नाहीं, हें उघड आहे; ह्मणून तें पाप नव्हे; व ह्मणूनच लोक त्याचा द्वेष करीत नाहींत. तस्मात् मन हेंच सत्य आहे. जसें आपल्या मनांत आलें असेल तसें सांगणें, हेंच सत्य भाषण. ह्यापरतें जें बोलणें तें असत्य होय. ह्या असत्यानें जगांत केवढाले अनर्थ मांडिले आहेत, ते कोणाच्यानेंही संपूर्ण सांगवणार नाहींत. हरहमेषा राजा नवेनवे कायदे करितो, ह्मणून लोक त्याच्या नांवानें हाका मारितात, हा राजाचा दोष नाहीं; त्यांचाच आहे. ही गोष्ट फार खोल नाहीं; ह्मणून मी ती उदाहरणानें स्पष्ट करीत नाहीं.

## मोहनलालाचें प्रवासवर्णन.

### हिरात.

ह्या शहरांत गुजरबाग ह्मणून एक स्थल प्रसिद्ध आहे, तें पाहण्यास मी गेलों. तेथें अबुइस्माल नामक महापुरुषाची कबर आहे. तो स्वपातकाचें प्रायश्चित्त करीत असतां त्याला मुलांनीं दगडमार केली. तिच्या योगानें तो इ० स० १०८८ च्या मार्च महिन्यांत मरण पावला. त्याला बारा लक्ष श्लोक तोंडपाठ येत होते, व दोन लक्ष अभंग त्यानें नवे केले, असें सांगतात. काय विलक्षण स्मरणशक्ति ! !

ह्या शहरच्या उत्तरभागीं, जेथें प्राचीनकाळीं मोठें विद्यालय होतें, तें स्थळ मी पाहावयास गेलों. त्याची इमारत पडून जमीनदोस्त झाली होती. त्या विद्यालयाचा मुख्य गुरु जेमी नामक कवि होता, असें सांगतात. जवळ नदीच्या बाजूस अमीर तैमूर ह्याची कन्या गाहरशाद, हिची कबर आहे. ही स्त्री फार रूपवती होती. तिनें लग्न केलें नव्हतें. कुराणपठणांत तिनें आपला जन्म घालविला. तिचें आचरण फार शुद्ध असे. अशी एक गोष्ट सांगतात कीं, ही स्त्री, आपल्या २०० मैत्रिणींसहवर्तमान एके दिवशीं विद्यालयांत गेली, आणि तिनें तेथच्या सर्व विद्यार्थ्यांस बाहेर जाण्यास सांगितलें. ते सगळे निघून गेले. परंतु, एक असामी एके खोलींत स्वस्थ निजला होता, त्याला हें बाहेरचें वर्तमान कांहींच समजलें नव्हतें. तो जागृत होऊन बाहेर पाहूं लागला तों, एके स्त्रीचें मुखकमल त्याचे दृष्टीस पडलें. तिचीही नजर त्याजकडे गेली.

दोघेंही कामातुर झालीं. स्त्री उठून खोलीमध्यें विद्यार्थ्याकडे गेली, आणि तिनें दार लावून घेतलें. हें वर्तमान गाहरशाद हिला समजलें. तेंव्हां ह्या तरुण स्त्रियांचा शाप वृथा आपले माथां कशाला पाहिजे, असें मनांत आणून तिनें आपल्या सगळ्या सोबतिणींचीं लग्नें त्या विद्यार्थ्यांबरोबर करून दिलीं. परंतु, त्यांचे अभ्यासांत व्यत्यय येऊं नये ह्मणून, त्यांनीं आठवड्यामध्यें फक्त एकदां आपल्या बायकांची गांठ घ्यावी, अशी मर्यादा स्थापिली.

हिरात प्रांताचें एकंदर उत्पन्न १८३०४ तोमन आहे. एक तोमन ह्मणजे पावणेसात रुपये. धान्य ३३३२० खारव्हर पिकतें. एक खारव्हर साहा मण आणि दाहाशेर, इतक्याबरोबर आहे.

ह्या शहराचा मूळ पाया लोहरास्प नामक राजानें घातला, अशी दंतकथा आहे. एका पर्शियन श्लोकांत असें सांगितलें आहे कीं, "हिरात हें लोहरास्प ह्यानें वसविलें; गस्ताप ह्यानें त्यांत पुष्कळ इमारती बांधिल्या; बहिमान ह्यानें तें पुष्कळ वाढविलें; आणि अलेक्झांदरानें तें शेवटास नेलें." शहरासभोंवती मातीचें कुसूं व बाहेरून कोरडा खोल खंदक आहे. वेशी पांच आहेत. सात धर्मशाळा आहेत. पहिली, जी मुस्ताफी ह्यानें बांधिली आहे, तींत शिकारपूरचे हिंदू व्यापारी राहतात; दुसरींत बुखारा आणि कंदाहार येथील व्यापारी असतात; तिसरींत पार्शिया व हिरात येथील उदम्यांचें राहणें आहे; आणि बाकीच्या, मोठमोठ्या श्रीमान् व्यापाऱ्यांनीं व्यापिल्या आहेत. हाजी अल्ली असकर कंदाहारी, हा व्यापारी

सर्वांत संपत्तिमान् आहे. त्यास सावकारांचा राजा असें ह्मणतात.

घरें सर्व मातीचीं बांधलेलीं, काळीं व ओंगळ दिसतात. बहुतेक घरें दुमजली आहेत. त्यांची डागडुजी अथवा स्वच्छता ह्या गोष्टी लोकांच्या स्वप्नांतही नाहींत, अशा दिसतात. दरवाजे फारच लहान असतात. तथापि, घरांत जागा पुष्कळ असते. खिडक्यांस कागद लावितात. आर्ग ह्मणजे राजवाडा ही इमारत फार बळकट व प्राचीन आहे. तिजसभोंवता लहानसा कोट असून त्याचे बाहेरचे आंगास खंदक आहे. बुरुजावर राजाचें भांडार असतें. तथापि तेथें तोफा वगैरे कांहीं नाहींत. खंदकावरून वाड्यांत जाण्यास लांकडी पूल आहे; तो रात्रींचा काढून ठेवितात. ह्या वाड्यापेक्षां इंग्लिश सरकारच्या राज्यांतले तुरुंग देखील पुष्कळ स्वच्छ, मजबूद आणि सुरेख असतात.

शहरामध्यें सुंदर काम ह्मटलें ह्मणजे एक तलावमात्र आहे. तो हिजरी सन ९२५ ह्या वर्षीं बांधिला, असा त्याजवर लेख आहे. ह्या तलावासमोर एक तुरुंग आहे. त्यास दरवाजे अगदीं लहान असून खिडक्या मुळींच नाहींत. आणि ती जागा फार दमसर आहे, तेणेंकरून कैदी बिचारे फार लवकर मरतात. त्यांची सुटका केवळ राजाच्या मर्जीवर आहे.

शहरांत घरें सुमारें ४००० आहेत. त्यांत अदमासें ६०००० लोक राहतात. त्यांत बहुतेक बरदुरानी लोक आहेत. ह्या प्रांतावर प्राचीनकाळापासून सुमारें ३९ राजांनीं राज्य केलें. हल्लींचा राजा ५८ वर्षांच्या

वयाचा आहे. त्याचेठायीं राजतेज कांहीं दिसत नाहीं. दारू, भांग, आणि अफू, ह्यांचे अंमलांत तो नेहमीं मग्न असतो. न्याय कसा तो त्याच्या स्वप्नींही वसत नाहीं. नटण्यांत त्याचा सर्वकाळ जातो. त्याची बदचाल सर्व अफगाणिस्थानभर प्रसिद्ध आहे. त्याला चार बायका, दाहा पुत्र, आणि साहा कन्या आहेत. त्याजपाशीं जवाहीर पुष्कळ आहे, तें त्यानें एका लोखंडी पेटींत घालून जमिनींत पुरून ठेविलें आहे, असें सांगतात. प्रजेपासून हरतऱ्हेनें दररोज १०० रुपये काढून खजीन्यांत जमा करण्याविषयीं त्यानें कोतवालास हुकूम केला आहे. त्याप्रमाणें तो चालतो. त्या खजीन्यांतला पैसा तो कधींही खर्चीत नाहीं. खर्चाचें कारण पडेल, तेव्हां लोकांपासून पैसा उत्पन्न करितो. त्याला इराण सरकारचें फार भय वाटतें. ह्मणून तो इंग्लिश सरकाराशीं सल्ला करावयास इच्छितो. तो आपल्या प्रधानास फार भितो; आणि त्याचे संमतावांचून कांहींच करीत नाहीं. सगळ्या अफगाणिस्थानांत त्याचे सारखा पाषाणहृदय पुरुष दुसरा कोणी नाहीं. त्यानें यःकश्चित् कारणावरून गरीब लोकांस ठार मारिलें आहे.

राजा इतका जुलुमी आहे, तरी हिरातांतले लोक फार चैनी आहेत. बागांत जाऊन खाणेपिणें, नाचतमाशे, रंग, ह्यांत ते पुष्कळ दिवस घालवितात. बायका सुंदर आहेत. त्या शहरांत असतात तोंपर्यंत मात्र डोक्यापासून तों पायांपावेतों अगदीं बुरखलेल्या असतात. परंतु, एकदां वेशीच्या बाहेर पडल्या, ह्मणजे त्यांस लज्जा नाहींशी होते. रस्त्यांतून जाणारांच्या त्या अशा थट्टा करितात कीं, ते निमूटपणें खालीं मान घालून पुढें चा-

ळते होतात. बहुतेक स्त्रियांस नृत्य येत असतें. त्या आपले नवरे व इतर आप्त खेरीज करून, बाकी सर्व लोकांसमक्ष खुशाल नाचतात.

हिरात येथें रेशमी काम फार चांगलें करितात. त्यांत चाबुकांविषयीं तर फारच आख्या आहे. तेथील चाबूक सुरेख असून टिकाऊ असतात. हा प्रांत पिकाऊ आहे. ह्याचे चार सुभे आहेत. १ ओबी, २ घर्यान, ३ कर्ख, आणि ४ सावझवार. ओबी सुभ्यांत धातूच्या खाणी अनेक आहेत. आणखीं त्यांत एक उष्णोदकाचा झरा आहे. त्यांत आजारी मनुष्यानें स्नान केलें असतां तो तत्काळ बरा होतो. ह्यांत बहुधा इमकलोक राहतात. ते लुटारू आहेत. दुसरा प्रांत घर्यान, हा सपाट मैदान आहे. ह्यांत हिंगाचीं झाडें मनस्वी आहेत. तेथें तो पुष्कळ उत्पन्न करितात. त्याची रीति अशी. काक्रिस नामक अफगाणजातीचे लोक आपल्या बायकामुलांसह त्या वनांत येतात; आणि त्या झाडांस चाकूनें वगैरे भेगा पाडितात; आणि त्यांवर सूर्यकिरण पडूं नयेत ह्मणून कांहीं दगड किंवा चिखल ह्याचा आडवसा करून ठेवितात. रात्रीं त्या झाडांवर दहिंवर पडून त्या भेगांतून चिखालसारखा कांहीं पातळ पदार्थ बाहेर येतो. तो वाऱ्यानें अमळसा वाळला ह्मणजे, सकाळच्या प्रहरीं ते लोक गळ्यांत कातड्याच्या पिशव्या अडकवून तेथें येतात, आणि तो काढून घेतात. हें झाड सुमारें दीड यार्ड लांब असतें. ह्याचीं पानें मोठीं असतात.

ह्या प्रांताची लांबी सुमारें १२० मैल, व रुंदी सुमारें ९० मैल आहे.

जुलै. १८३३.

## नवी रीति.

प्राणी जन्मतात तेव्हां शरीरानें ओबडधोबड व अव्यवस्थित असतात. तद्वत् अपूर्व चांगल्या रीति अथवा गोष्टी, ह्या वेळरूप स्त्रीच्या कन्या होत, त्याही आरंभीं अगदीं सरासरीच असतात. सुईण चांगली कुशल असली ह्मणजे तिच्या हातवटीनें व कालगतीनें प्राण्यांच्या शरीरांस जसें सुरेखपण प्राप्त होतें, त्या प्रमाणें चांगल्या गोष्टी अथवा रीति ह्या विचारी पुरुषांच्या हातानें कालगत्या उत्तमता पावतात. मोठा पराक्रम करून जो पुरुष स्वकुलास नीचदशेंतून काढून सन्मान्य पदवीस आणितो, तो, त्याही पेक्षां मोठ्या मोठ्या वैभवशाली त्याच्या वंशजांपेक्षां सुपूज्य होय. मराठी राज्याची स्थापना करणारा राजा शिवाजी भोंसला, हा स्ववंशजांपेक्षां किती एक गुणांहीं जरी कमी होता, तरी, सर्व मराठे लोक, केवळ त्यालाच नव्हे, तर त्याचे हातची भवानी नामक जी प्रसिद्ध तरवार, तिलाही अद्यापपर्यंत देव समजून भजतात. त्या प्रमाणेंच जनांतील चांगल्या गोष्टींचें आहे; ह्मणजे, त्यांचा ज्यांनीं पाया घातला, ते पूज्य होत. ह्याचें कारण असें कीं, पूर्वींच्या पैशाचा व्यापार करून तो वाढविणें हें शाहाणपणाचें काम आहेच; परंतु, पूर्वींची पुंजी नसून नवी कमाई करून ती वाढवून श्रीमान् होणें, हें मोठ्या अकलेचें काम आहे, असें

जन समजतात. तद्वत्, पूर्वीचा कित्ता नसतां, एकादी अचानक नवीन गोष्ट करणें, आणि तींत यश मिळविणें हें खचीत मोठ्या पराक्रमाचें व स्तुत्य कर्म होय. स्वभावतः अशी एक मनुष्याला वाईट खोड लागून गेली आहे कीं, जें पूर्वीपासून प्रचारांत आहे, तें तसेंच पुढें चालविण्याविषयीं त्याचा बहुतेक कल असावा; आणि कांहीं नवें ह्मटलें ह्मणजे तें त्यास आवडूं नये. ही गोष्ट रीतिभाति व धर्म ह्यांस विशेष लागू पडते. उदाहरणासाठीं लांब जावयास नको. क्षणभर आपले हिंदू लोकांकडे लक्ष दिलें ह्मणजे पुरे. परंतु चांगली रीत पाडण्याविषयीं मनुष्याच्या मनांत जी बुद्धि प्रथम उत्पन्न होते, ती भारी प्रबल असते, एवढें बरें आहे. असें नसतें, तर जग सुधारतें ना. नवीन भूमि शोधून काढण्याविषयीं कोलंबसास जो सद्विचार सुचला, तो इतका जबरदस्त होता कीं, त्याच्या योगानें त्याला अप्रतिष्ठेची लज्जा व जीवाची भीति ह्या कांहींच वाटत नाशा झाल्या. वाफेच्या बलानें गाडी चालविण्याविषयींचा उपयुक्त विचार स्तीफनसन साहेबानें प्रथमतः लोकांस कळविला. तेव्हां त्याची फार थट्टा झाली, तरी तो दबला नाहीं. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. पूर्वापार चालत आलें तेंच बरें, आणि नव्याचा आपण स्वीकार करावयाचा नाहीं, असें जर मनुष्य ह्मणेल, तर औषधें जितकीं आहेत, तितकीं त्यास नव्या सारखीं, ह्मणजे पूर्वी न घेतलेलीं अशीं असतात; कारण, कोणी मनुष्य जन्मतःच सर्व रोगांचें घर आणि सर्व औषधें घेणारा असतो असें नाहीं. जेव्हां जो रोग होईल, तेव्हां त्याचें औषध घ्यावें, अशी रीत

आहे. आणि कोणी माणसास एकादा रोग झाला, व त्यास औषध देण्याची तयारी केली, आणि तो ह्मणेल कीं, "हें औषध मीं पूर्वीं कधीं घेतलें नाहीं, ह्मणून हें आतां माझ्यानें घेववत नाहीं," तर तो तसाच बरा होईल काय? त्याच्या विचाराचें खंडन करण्यास त्याला इतकेंच विचारावें कीं, "हा रोग तुला पूर्वीं कधीं झाला होता काय?" त्यानें "नाहीं" ह्मटल्यावर त्यास सांगावें कीं, "हा दर्द तुला पूर्वीं कधीं झाला नाहीं, ह्मणून हें औषध तूं पूर्वीं घेतलें नाहीं; परंतु आतां झाला आहे, ह्मणून घेतलें पाहिजे." असें जर न केलें तर कसें होईल बरें? एक मनुष्य पूर्वीं फार गरीब आणि रानटी होता; त्यास कंदमूळें खाऊन आणि झाडाच्या साली पांघरून राहावें लागत असे; त्याला दैवयोगेंकरून चांगलें अन्नवस्त्र मिळालें, तें जर तो न घेईल, तर त्याचे इतका दुसरा कोणी मूर्ख नाहीं.

कालमहात्म्येंकरून दिवसेंदिवस प्रपंचांत मनुष्यास दुःखप्रद अशा गोष्टी अधिकाधिक होत चालल्या आहेत. त्यांचें निवारण जर शाहाणपणाचे उपायांनीं केलें नाहीं, तर मनुष्याची काय गति होईल? आह्मी ह्मणतों हें खरें किंवा खोटें, हें ज्यास समजून घेणें असेल, त्यानें हल्लींच्या सरकारच्या राज्यव्यवस्थेकडे लक्ष द्यावें. सांप्रत प्रत्येक इलाख्यांत कायदे करणारी मंडळी नेमिली आहे. ती दरमहा निदान एक दोन नवे कायदे करिते. त्यांत राज्यव्यवस्थेचे थोडे, आणि नाना प्रकारच्या अपराधांची चौकशी करण्याचे, व ते न होतील अशा बंदोबस्ताविषयींचे फार. ह्यावरून काय अनुमान होतें, तें

वाचकांनींच पाहावें. बरें, जर अशा दुष्ट गोष्टी जनांत वाढत आहेत, तर, नवे जुने न पाहातां, जे योग्य उपाय असतील, ते योजावे, हें कोणीही नाकबूल करणार नाहीं.

हें खचीत आहे कीं, लोकांमध्यें जी रीति प्राचीन काळापासून चालत आलेली असते, ती त्यांस फार योग्य वाटते; व तिचा इतर रीतींशीं फार चांगला मेळ असतो. पहा. आपणांमध्यें स्त्रियांस विद्या न शिकविण्याची, व त्यांचीं लग्नें लहानपणीं करून त्यांस दासींप्रमाणें नवऱ्यांनीं वागविण्याची चाल आहे. ह्या दोनही चाली एकमेकींशीं किती मिळण्यासारिख्या व साधक आहेत, ह्यांचा विचार सुज्ञांनीं करावा. त्यांस चांगली विद्या आली, तर आईबापें जो वेडावांकडा नवरा देतील त्याच्या बटकी होऊन त्या आपल्या अमूल्य स्वातंत्र्याचा नाश करून घेतील काय. ? असो. सर्व जुन्या रीतींचा बहुधा अशा प्रकारें आंतलेआंत मेळ असतो. नव्या रीतीचें असें होत नाहीं; ह्मणजे ती इतरांशीं जमत नाहीं. ती उपयोगी व चांगली आहे, असें जरी लोकांस वाटलें, तरी इतर वहिवाटींशीं तिचा मेळ नसल्या कारणानें त्यांना तिचा त्रास येतो. मुलींस विद्या शिकविण्याची व मुलांचीं लग्नें मोठेपणीं करण्याची रीत चांगली, असें पुष्कळ समजदार लोक कबूल करितील, परंतु इतर रीतींशीं विसंगत असल्यामुळें तिचा अव्हेर होतो. नव्या चांगल्या रीति ह्या आपल्या पाहुण्यांप्रमाणें आपण लेखितों. ह्मणजे त्यांस वाखाणितों पुष्कळ, पण आपले घरीं नेहमीं राहून घेत नाहीं. हा प्रकार,

कालचक्रासमवेत मानवस्थितिचक्र फिरत नसतें, तर सुखावह होता. परंतु, तसें नसल्यामुळें त्यापासून फार हानि होते. जुन्या रीति टाकून नव्या घेतल्यामुळें, कधींकधीं इतका त्रास होतो कीं, तो सांगतां पुरवत नाहीं. ह्याचा अनुभव सांप्रतकालीं हिंदू लोक आणि पारसी लोक इंग्लिश लोकांच्या राज्यांत राहतात, त्यांच्या रीतींच्या फेरफारावरून सहज लक्षांत येईल.

नवीन रीति प्रचारांत आणणारांनीं कालचक्राचा कित्ता घेतला पाहिजे. ह्मणजे तें जसें कोणाच्या दृष्टोत्पत्तीस अथवा अनुभवास न येतां सर्वदा तिळतीळ हळूहळू फिरत असतें, तद्वत् नवीन रीतीचा प्रवेश जनांमध्यें हळूहळू झाला पाहिजे. ह्मणजे तीस कोणी हरकत करीत नाहीं. ह्याचें कारण असें कीं, तो अल्पांश जरी लोकांला दोषसा वाटला, तरी अल्प ह्मणूनच त्यांचें त्याजकडे दुर्लक्ष्य होतें. आणि तो अल्पांश वृद्धि पावतांपावतां, शेवटीं ती सर्व रीत लोकांत शिरते, व सहवासेंकरून त्यांस पसंतही पडते.

परंतु, रीति चांगली आहे, अशी पक्की खातरी झाल्यावर तिचा लोकांत प्रवेश होण्याविषयीं प्रयत्न करावा. नाहींतर हित न होतां उलटें अहित होईल. लोकरीति बदलणें, हेंच सुधारण्याचें साधन, असें धरून चालूं नये; तर सुधारण्यास कोणकोणत्या रीति बदलल्या पाहिजेत, व नव्या घेतल्या पाहिजेत, ह्याचा आधीं पुरता विचार करावा.

## हिंदुस्थानांतील कांहीं संस्थानांचें वर्णन.

निजामाचें राज्य.—हें दक्षिण प्रांतामध्यें आहे. ह्याच्या चोहीं बाजूंस ब्रितिश सरकाराचें राज्य आहे; ह्याची लांबी ४७५ मैल; व रुंदी सुमारें तितकीच आहे व क्षेत्रफळ ९५२०३७ चौरस मैल आहे. ह्यांत मोटे सुभे चार आहेत. १ हैदराबाद; २ औरंगाबाद; ३ बेदर; आणि ४ वऱ्हाड. ह्यांपैकीं वऱ्हाड प्रांत निजाम सरकारानें फौजेच्या खर्चाबद्दल आलीकडे इंग्लिशांस दिला आहे. ह्या राज्यांतून गोदावरी, वर्धा, कृष्णा, तुंगभद्रा, इत्यादि नद्या वाहतात.—तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, वगैरे धान्यें होतात.—कापूस, नीळ, ऊंस हे व्यापाराचे पदार्थ होतात.—मुसलमान, मराठे, तैलंग, व गोंड, ह्या जातींची प्रजा आहे.—राजधानीचें शहर हैदराबाद. ह्याशिवाय, शिकंदराबाद, औरंगाबाद, जाफराबाद, जालनें, गोंवळकोंडें वगैरे शहरें आहेत.—गोंवळकोंड्याचे किल्ल्यांत निजामाचा खजीना असतो. गोंवळकोंड्याचे हिरे फार प्रसिद्ध आहेत.—राज्याचा वसूल १५५००००० रुपये आहे. राजाचा किताब निजाम उल्मुलूक असा आहे. पहिला निजाम औरंगाबादेचा सरदार होता. त्याचाच वंशज हल्लीं गादीवर आहे. तो आपले राज्यांत पाहिजे तें करण्यास मुखत्यार आहे. तथापि त्याचा व इंग्लिशांचा तह ठरलेला आहे, त्याप्रमाणें तो त्यांच्या आश्रयानें असतो. त्याच्या राजधानीजवळ इंग्लिशांच्या रेसिदेंताचें ठाणें असतें, व त्याजपाशीं कांहीं फौजही असते.

शिंद्याचें राज्य.—ह्याची आकृति अगदीं वांक-

डी आहे. ह्याची लांबी २४६ मैल, रुंदी १७० मैल, व क्षेत्रफळ २३११९ चौरस मैल आहे.—तापी व चंबळा ह्या ह्यांतून वाहतात. तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, मका, हीं धान्यें; व, तमाखु, आणि कापूस, ह्यांची लागवड होते. अफूसाठीं खसखस लावितात. मुख्य व्यापार अफूचा. प्रजा मुसलमान व हिंदू. तेथील हिंदूंमध्यें मराठे, बुंदेले, रजपूत, जाट, असे भेद आहेत. राजधानीची जागा ग्वाल्हेर शहर. शिवाय उज्जनी बऱ्हाणपूर, चंदेरी, इत्यादि शहरें आहेत.

राज्याचा मूळ स्थापक राणोजी शिंदा. तो बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या पदरीं मोठा सरदार होता. त्याचाच वंशज हल्लीं गादीवर आहे.—ह्याला इंग्रजांचा आश्रय आहे. त्यांचा रेसिदेंत त्याचे दरबारीं असतो. ह्या शिवाय संरक्षणार्थ इंग्रजांकडची फौज आहे. तिचा खर्च शिंदे सरकार देतें.

होळकराचें राज्य.—ह्याचा मुलूख सलग नाहीं; कांहीं हिकडे कांहीं तिकडे असा तुटून आहे. सगळें क्षेत्रफळ ८३१८ चौरस मैल आहे. गहूं, ऊस, खसखस, तमाखू, कापूस वगैरे ह्या मुलखांत पिकतात. प्रजा हिंदू, मुसलमान, गोंड, भिल्ल, ह्या जातींची आहे. गादीची जागा इंदूर शहर. ह्याखेरीज मंडळेश्वर, रामपूर, भानपूर, वगैरे प्रसिद्ध गांव आहेत. मूळराज्य स्थापणारा मल्हारराव होळकर. त्याचा वंशज हल्लीं गादीवर आहे. ह्या राजास इंग्रजांचा आश्रय आहे. त्यांचा रसिदेंत त्याचे दरबारीं असतो.

गायकवाडाचें राज्य.—ह्याचाही मुलूख सलग नाहीं.

ह्याचें क्षेत्रफळ ४३९९ चौरस मैल आहे. लोकसंख्या ३२५५२६ आहे. आणि वसूल ६६८७४४० रुपये आहे. ह्यास इंग्रजांचा आश्रय आहे. व त्यांची फौज त्याचें चाकरीस आहे.—ह्या राज्यांतून नर्मदा, साबरमती, मही, वनास, इत्यादि नद्या वाहतात.—राजधानीचें शहर बडोदें. प्रजा हिंदू, मुसलमान, पारसी, ह्या जातींची आहे—कबीरवड ह्मणून नर्मदेच्या कांठीं एक फार मोठा वडाचा वृक्ष आहे. तो दुरून लहानशा डोंगराएवढा दिसतो; व त्यानें सात बिघे जमीन झांकिली आहे. त्याच्या पारंब्या इतक्या दाट आहेत कीं, नदीला महापूर आला असतां गांवांतील लोक त्यांच्या आश्रयास जाऊन राहतात.

सांवतवाडी.—हें संस्थान दक्षिणेंत कोंकणामध्यें आहे. ह्याची लांबी ५० मैल, रुंदी ३० मैल, आणि क्षेत्रफळ ८०० चौरस मैल आहे. ह्यांत खांचीखळगे, डोंगर, रानें फार आहेत. मुख्य पीक तांदुळांचें आहे. नारळ पुष्कळ बाहेर जातात.—नक्षीचें, रंगीत, लांकडी वगैरे काम फार चांगलें होतें. गंजिफांची तर फारच प्रसिद्धि आहे. लोकसंख्या १२०००० आहे. ती प्रजा बहुतेक मराठी आहे.—तेथील अधिकारी सरदेसाई आहेत. त्यांचें आडनांव सावंत असें आहे. हल्लीं संस्थानाची वहिवाट इंग्रजांकडे आहे.

कोलापूरचें राज्य.—हें मुंबई इलाख्यांत आहे. ह्याची लांबी ९५ मैल, रुंदी ६५ मैल, व क्षेत्रफळ ३४४५ चौरस मैल आहे. ह्यांतून कृष्णा व वारणा ह्या नद्या वाहतात. लोकसंख्या ५०००० आहे.—वसूल सुमारें

१५०४१९६ रुपये आहे.—राजधानीचें शहर कोलापूर. राजा मराठा आहे.

जाहागीरदार.—वर सांगितलेल्या संस्थानांखेरीज जे मोठमोठे प्रसिद्ध जाहागीरदार आहेत, त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| अकलकोटकर. | पंतप्रतिनिधी. |
| पंतसचीव. | निंबाळकर. |
| डफळे. | शेखमिरा. |
| जमखंडीकर. | कुरुंदवाडकर. |
| मिरजकर. | मुधोळकर. |
| सांगलीकर. | |

## आसम.

हा पुरुष प्रथमतः मोठा संपत्तिवान् होता. तो सर्व मनुष्यांशीं प्रीतीनें व नम्रपणानें वागत असे. क्षुधितांस पोटाला घालावें, उघड्यांस वस्त्र द्यावें, दुःखित जनांची पीडा निवारावी, अशा सत्कर्मीं त्यानें आपलें बहुतेक आयुष्य व सगळें वित्त घालविलें. जेव्हां तो हीं धर्मकृत्यें करी, तेव्हां मनांत ह्मणत असे कीं, आज मी ह्यांस साह्य करितों, तसें, प्रसंग पडल्यास, मलाही जन साह्य करतील. परंतु, जगदीशसंकेतानुरूप त्याला काल प्रतिकूल झाला, तेव्हां जग कसें आहे, हें त्याला समजलें. त्याजकडे कोणी ढुंकून देखील पाहीना. भरभरीच्या वेळीं जे स्तुति करीत होते, ते निंदूं लागले; जे भीत होते ते चेष्टा करूं लागले; जे प्रामाणिकसे वाटले होते, ते लबाडसे प्रत्ययास आले; जे मानीत

होते ते अवमानूं लागले; आणि जे स्नेही ह्मणवीत असत, ते अगदीं परके किंवा शत्रु, असे अनुभवास आले. कोणी साह्य करीना, हें पाहून त्याला अत्यंत खेद व पश्चात्ताप झाला. एके वेळीं तो एकांतीं बसून आपणाशींच ह्मणतो.–

आर्या.

त्यांत पळहि न वसावें, ज्यांत दुरितभीति धर्म नय नाहीं.
तृणचर मुखें सुखें अवलोकावीं खळमुखें न नयनांहीं.

मोरोपंत.

अशी साधुवाणी आहे, ती खरी आहे. आतां ह्या दुष्ट, पातकी, कृतघ्न जनांत आपण राहूं नये. अरण्याची वाट धरावी. आणि ज्या स्थलीं ह्या अधम प्राण्यांचें ( मनुष्यांचें ) वारें नसेल, त्या निर्बाध स्थलीं जाऊन राहून, आपले आयुष्याचें बाकी राहिलेले दिवस घालवावे.

असा विचार करून, तारिस नामक पर्वताच्या गगनचुंबित शिखरावर किर्र झाडी होती, तींतून सिंहव्याघ्रादि हिंस्र पशूंचे भयंकर शब्द ऐकूं येत, घों घों वारा वाहतअसे, धो धो धबधबे पडत असत, खळ खळ नद्यांचे प्रवाह वाजत होते, अशा भयानक एकांत स्थलीं स्वजातिबंधुद्वेष्टा आसम गेला. तेथें एक लहानशी गुहा होती, तींत तो राहिला. तेणेंकरून वारा, पाऊस ह्यांपासून त्याचा बचाव होत असे. दिवसा बाहेर जाऊन मोठ्या कष्टानें कंदमूलें आणावीं; आणि पाणोथा पाहून तेथें तीं भक्षून पाणी प्यावें, प्राणरक्षणार्थ इतर अवश्य ज्या गोष्टी त्या कराव्या, विश्रांतीसाठीं निजावें, आणि बाकी राहि-

लेला वेळ विचारांत, व दुष्ट, कृतघ्न जनांच्या साह्यावांचून आपणास आपला जीव जगवितां आला, ह्या गोष्टीच्या अनंदांत घालवावा, असा क्रम त्यानें चालविला. त्या शिखराच्या पायथ्यास एक मोठें सरोवर होतें. त्यांत वरच्या सर्व प्रदेशाचें प्रतिबिंब पडून, तें मोठ्या मजेचें दिसे. तें पाहण्याकरितां तो केव्हां केव्हां तेथें जाई. वरून खालीं उतरतांना, सृष्टिसौंदर्य पाहून जो आनंद त्याला होई, त्याचें वर्णनही करतां येत नाहीं. त्या आनंदभरांत तो आपले मनाशींच वारंवार ह्मणे कीं, "अहा हा! परमेश्वराची करणी किती रमणीय आहे!! हें केवळ अरण्य आहे, तरी किती सुंदर दिसत आहे! ह्याचा उपयोग पाहूं लागलों तर, हें सौंदर्य त्याच्या पुढें कांहींच नाहींसें होतें. ह्यांत शेंकडों नद्या उत्पन्न होऊन खालीं वाहत जातात; त्यांच्या योगानें अनेक देशांत पीक होऊन तेथील लोक सुख पावतात. हें अरण्य कोट्यवधि प्राण्यांस अन्न व आश्रय पुरवितें. हें अरण्य अनंत वनस्पतींनीं भरलें आहे; त्यांच्या योगानें प्राण्यांचे रोग दूर होतात. सारांश परमेश्वराची करणी अगाध आहे. हें सगळें चांगलें आहे, परंतु, ह्या सृष्टींत दुष्ट, अधाशी, कृतघ्न, व अधम असा एक प्राणी आहे; तो कोणता ह्मणाल तर मनुष्य. जितके दुर्गुण, तितके ह्याचे ठायीं भरले आहेत. महापूर, विद्युल्लता, धरणीकंप, चंडवात, ज्वालामुखी, ह्यांचाही एकवेळ ह्या जगास चांगला उपयोग घडतो, परंतु मनुष्याचा कांहीं उपयोग नाहीं. जिच्या दुष्ट कृत्यांपासून न्यायी परमेश्वराच्या करणीस बट्टा लागतो, अशी जी मानवजाति,

तींत मी हतभाग्य कशाला जन्मलों. जर माणसाच्या आंगांत एवढे दुर्गुण नसते, तर ही सृष्टि एकसारखी निष्कलंक राहिली असती. माझ्या न्यायी परमेश्वराच्या हातचें जग त्याप्रमाणें निर्दोष असावें, हेंच त्याला भूषण आहे. हे सर्वसाक्षिन् दयालो विश्वपते, मला दीनाला अशा या अज्ञानांधकारांत, संशयांत, आणि निराशेंत कां गचंगळ्या खायास लाविलें आहे? मजकडे कृपादृष्टीनें पहा." असें ह्मणत आसम खालीं सरोवरावर आला. आणि "हा जीव राखून ठेवून तरी काय करावयाचें आहे." असें मनांत आणून तो जलसमाध घेण्याच्या निश्चयानें तयारी करून पुढें सरसावला. आणि आतां तो उडी घालणार, इतक्यांत, गंभीरमुद्रेचा एक वृद्ध मनुष्य पाण्याच्या पृष्ठभागावरून चालत आपणाकडे येत आहे, असें त्यानें पाहिलें. तेव्हां त्याला इतका चमत्कार वाटला कीं, उडी टाकण्याचें भान मुळींच राहिलें नाहीं; आणि हा कोणी देवपुरुष आपणास दर्शन देण्यासाठीं येत आहे, असें त्याला वाटलें.

तो पुरुष आसमाजवळ येऊन त्यास ह्मणाला, "अरे पुरुषा, जरा दम धर; असा अविचार करूं नको. सर्वद्रष्ट्या विश्वपालकानें तुझें सदाचरण, प्रमाणिकपणा, आणि दुःख हीं पाहून, तुझें सांत्वन करण्याकरितां मला तुजकडे पाठविलें आहे. हा माझा हात धर; आणि जिकडे मी जाईन, तिकडे तूं माझे मागून ये. भिऊं नको. मी तुझ्या सर्व संशयांची निवृत्ति करितों."

हें ऐकून आसम त्याचे मागून चालला. सरोवराच्या मध्यभागीं जाऊन तो देवदूत पाण्याच्या खालीं खा-

लीं जाऊं लागला. त्याप्रमाणें आसमही जाऊं लागला. असें पुष्कळ खोल गेल्यावर त्यांना एक नवीच सृष्टि लागली. ती पाहून आसमास पराकाष्ठेचें नवल झालें. ती सृष्टि, रचनेनें, हुबेहुब ह्या सृष्टीसारखी होती.

आसम परम आश्चर्यभरित झाला आहे असें पाहून तो देवदूत ह्मणतो, "अरे मित्रा, एका भक्ताला तुजप्रमाणेंच मानवस्वभावाविषयीं संशय प्राप्त झाला होता, तो नाहींसा करण्यासाठीं जगदीश्वरानें हें जग निर्माण केलें. ह्यांतील मनुष्यें तुझे इच्छेप्रमाणें दुर्गुणरहित केलीं आहेत; हें जग बाकीच्या इतर सर्व गोष्टींनीं तुझ्या पहिल्या जगाप्रमाणेंच आहे; परंतु, ह्यांतील मनुष्यें कधीं पाप करीत नाहींत, एवढेंच काय तें ह्यांत विशेष आहे. हें जर तुला पसंत वाटलें, तर खुशाल येथें राहा. पण ह्याची पूर्ण माहिती तुला होई तों पर्यंत जे जे संशय तुला येतील, ते ते फेडण्यासाठीं मी तुझ्या बरोबरच असतों."

आसम ह्मणतो, "अगा साधो, हें जग दुर्गुणरहित आहेना.!! अहाहा परमेश्वराची मजवर केवढी कृपा ही! त्यानें माझ्या इच्छेप्रमाणें मला राहायास स्थान दिलें! फार उत्तम गोष्ट आहे. हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस.!" हें ऐकून घेऊन देवदूत ह्मणतो, "आधीं जरा दम धर आपले सभोंवती पाहा आणि त्याविषयीं तुला जें कांहीं विचारायाचें असेल, तें मला विचार." असें भाषण होतां होतां ते गांवांत गेले. तेथें पाहातात तों, वाटा अगदीं अरुंद, त्यांतही गवत वाढलें आहे; घरें ह्मटलीं, तर

तीन तीन हात उंच झोंपड्या गवतपाल्याच्या बांधिले-ल्या; शेतें नाहींत; मळे नाहींत; बागा नाहींत; बाजार नाही; लोकांचें एकमेकांशीं फारसें दळणवळण नाहीं. त्यांस पुरती भाषा आहे कीं नाहीं, ह्याचा संशय; त्यांच्या आंगांवर वस्त्रें नाहींत; असें त्याच्या दृष्टीस पडलें. व हिंस्र पशु इकडे तिकडे हिंडतांना व गुरकतांना त्यांनीं पाहिले. तेव्हां आसम बोलतो, "माझें पूर्वीचें जग आणि हें जग ह्यांच्या मध्यें मला इतकाच फरक दिसतो कीं, तें पुष्कळ सुधारून उत्तमावस्था पावलें आहे; आणि हें अगदीं आपल्या बाल्यावस्थेंत ह्मणजे, रानटी व अज्ञान दशेंत आहे. तेथच्या प्रमाणें बलवान प्राणी दुर्बल प्राण्यांवर येथेंही जुलूम व अन्याय करितात ना.? अरेरे! काय करावें? जर परमेश्वर माझ्या सांगण्याप्रमाणें वागणारा असता, तर असे दुसऱ्यास त्रास देणारे प्राणी मी ह्या जगांतून समूळ काढून टाकविले असते.! ह्या दुःखभागी दुर्बल प्राण्यांची मला फार कींव येते. पण उपयोग काय! कोणी कोणाला त्रास न देतां सर्व सबल दुर्बल प्राणी ह्या जगांत स्वस्थ राहतील, तर ती किती आनंदाची गोष्ट होईल!" ह्यावर, तो देवपुरुष उत्तर करितो, "आसमा, तूं मोठा दयाळू आहेस. परंतु पहा; सर्व प्राण्यांचें उपजीवन चालण्यास नुसत्या वनस्पति पुरणार नाहींत; ह्मणून कितीएकांनीं आपला निर्वाह इतर प्राण्यांवर करावा, असा ईश्वरी संकल्प आहे. हा जर नसता, तर कितीएक प्राणी अन्न अन्न करून मेले असते. असो, चला आपण पुढें जाऊं." ते दोघे कांहींसे पुढें गेले, तों, दोन तीन मांजरें एका माणसाच्या मागें लागलीं

आहेत, आणि तो धूम पुढें पळत चालला आहे, असें त्यांनीं पाहिलें. तेव्हां, आसम आश्चर्य भरित होत्साता देवदूतास ह्मणतो, "अहो, हा पुरुष, ह्या यःकश्चित् प्राण्यांस भिऊन कां पळतो बरें?"! इतक्यांत, दुसरा एक मनुष्य कुत्रा मागें लागल्यामुळें पुढें पळतांना त्यांच्या दृष्टीस पडला. त्याला पाहून तर आसमची अक्कल अगदीं गुंग होऊन गेली. आणि तो त्या देवदूताकडे वळून पुनः म्हणाला, "अहो महाराज, हें आहे तरी काय, तें मला सांगा." त्यानें उत्तर दिलें, "अरे आसमा, ह्यांत कांहीं मोठा चमत्कार नाहीं. येथील लोक तुजसारखेच मोठे दयाभूत आहेत. ते असें ह्मणतात कीं, ह्या क्षुद्र प्राण्यांचा इच्छाभंग करून त्यांस त्रास देऊं नये; त्यांस यथेच्छ वागूं द्यावें; त्यांस यत्किंचित दुखविणें हें महत्पात आहे; तेणें करून हे प्राणी पराकाष्टेचे प्रबल व असंख्यात झाले आहेत; ते ह्या प्रमाणेंच मनुष्यांस सर्वदा त्रास देत असतात." आसम ह्मणतो, "नाहीं नाहीं, त्यांना इतकें प्रबल होऊं देतां कामा नये; त्यांस मारून टाकिलें पाहिजे; नाहीं तर तुह्मीच पाहा, त्यांच्या पासून काय परिणाम होतात ते." तें ऐकून जरासें हंसून देवदूत ह्मणतो, "कां, महाराज आसमराय, क्षुद्र प्राण्यांविषयीं जी आपणाला एवढी मोठी कींव वाटत होती, ती आतां कोणीकडे गेली? ती न्यायबुद्धि इतक्यांतल्या इतक्यांत आपण विसरलां काय? प्राण्यांस दुःख देणें हा मोठा अन्याय आहेना?" आसम, शुद्धीवर आल्यासारखें करून मान हालवून ह्मणतो, "नाहीं, नाहीं, नाहीं, गुरो, मी चुकलों; जें मी मघाशीं बोललों तें सर्व

व्यर्थ आहे. जर जगामध्यें आपणास सुखानें राहाव-याचें आहे, तर आपणांहून नीच जातींच्या प्राण्यांवर अन्यायानें जुलूम केल्याचें पातक आपलेमाथां घेतल्यावां-चून गत्यंतर नाहीं, अशी माझी आतां खातरी झाली." देवदूत उत्तर करितो, "इतर प्राणी आणि मनुष्यें ह्यांचा हा संबंध असो; पण, आतां आपण मनुष्यांमध्येंच कांहीं चमत्कार पाहूं"

पुढें चालतांचालतां आसम देवपुरुषास ह्मणतो, "हे लोक असे अज्ञान व रानटी स्थितींत कां बरें राहतात.? ते आपणांत सुधारणा कां बरें करीत नाहींत.?" त्यानें उत्तर केलें, "तुला ह्या गोष्टीचें नवल वाटावयास नको. हे लोक ह्याच आपल्या पूर्वस्थितींत तृप्त आहेत. प्रत्ये-कास त्याच्या कुटुंबापुरतें एक एक झोंपडें आहे, तेंच त्याला पसंत वाटतें; मोठमोठे सुंदर बंगले उठविल्यास आपण गर्विष्ठ होऊं, व लोक आपला मत्सर करितील, त्या अर्थीं ते नकोतच, असें ते समजतात; जें जें कांहीं कधीं ते करितात, तें डौलासाठीं अथवा ऐष आरामासाठीं करीत नाहींत; तर त्यांचा सगळा रोख निर्वाहाकडे असतो." आसम ह्मणतो, "तर मग त्यांच्यामध्यें लोहार, सुतार, रंगारी, गौंडी, पाथरवट, इत्यादि कारागीर मुळींच नसतील. असो, चिंता नाहीं. पण तुह्मीं मला अशा ब्रह्मज्ञानी मनुष्यांच्या पवित्र जगांत आणिलें, ह्मणून मी तुमचे फारफार उपकार मानितों. आणि तुह्मांला मी खचीत सांगतों कीं, ज्ञानासारखी दुसरी कोणतीही गोष्ट मला प्रिय नाहीं." देवदूत ह्मणतो, "काय? ज्ञान.? अं:, त्याची येथें काय गरज आहे.? आपण

लोकांशीं कसें वागावें?, स्वहित कसें साधावें,? आणि जनाच्या दुष्टत्वापासून आपला बचाव कसा करावा,? हेंच कायतें ज्ञानना.? त्याची तर येथें बिलकूल आवश्यकता नाहीं. का कीं, येथचे सर्व लोक स्वभावतः सन्मार्गवर्ती आहेत. ते आपलीं कर्तव्यें कधींही चुकत नाहींत. निर्वाहाहून जास्त सुखाकरितां अथवा कर्मणुकीकरितां जें पोकळ ज्ञान तुझ्या पूर्वींच्या जगांत फार वाढलें आहे, त्याची हे लोक गरज ठेवीत नाहींत." आसम ह्मणतो, "एकूण येथचे लोक एकलकोंडये, आहेत; ते एकमेकांकडे जातयेत, बोलत चालत नाहींत, असें वाटतें." देवदूत ह्मणतो, "होय, तूं ह्मणतोस तें खरें आहे. एकमेकांकडे जाणें येणें, मंडळींत मिळून राहणें, स्नेह जोडणें, हें सर्व, एकाद्या भयापासून किंवा संकटापासून आपलें रक्षण होण्यास आपणास साह्य मिळावें, ह्मणूनच मुख्यत्वें करायाचें कीं नाहीं.? तर येथें सर्वच सत्यमार्गी असल्यामुळें भयाचा व संकटाचा संभव नाहीं. तेव्हां दळणवळणाचें व स्नेहाचें प्रयोजन काय?" आसम ह्मणतो, "बरें तर, मला, येथें आपलें एवढें आयुष्य घालवायाचें आहे, त्यापक्षीं कला कौशल्य, मंडळी व इतर ज्ञान कांहीं नसलें, तरी एक मित्र तर निदान बोलाचालायास पाहिजे कीं नाहीं.?" देवदूत ह्मणतो, "पण तो तरी कशाला पाहिजे.? येथें स्तुति करणें व ऐकणें हीं दोनही वर्ज्य आहेत; आणि ज्या गोष्टीवांचून अडत नाहीं, तिचा स्वीकार करणें, हें महत्पाप आहे, असें लोक समजतात." हें ऐकून आसम ह्मणतो, "तर, आमच्या जगांतल्यापेक्षां येथचे लोक फार सुखी

असतील, असें मला वाटतें. कांकीं ते केवळ निर्वाहा-पुरत्या थोडक्या वस्तूंनीं तृप्त होतात, आणि तृप्ति हेंच सुखाचें स्थान, असें ह्मटलें आहे. आणि त्यांस सुखाची फार हांव नसल्यामुळें त्यांचे हातून परोपकार बहुत होत असतील, नाहीं बरें.?" हें तो बोलतो आहे, इतक्यांत गरीब, अनाथ, क्षुधेनें पीडित, अशा एका मनुष्याची दीनवाणी त्याचे कांनीं पडली. तेव्हां तो लागलाच त्याच्या समाचारास त्यापाशीं गेला. आणि पाहतो तों, भुकेनें त्याचा अगदीं आंकडा वळून गेला आहे. त्यास पाहून आसम ह्मणतो, "अहो, दुर्गुण-रहित मनुष्यांस दुःख व्हावें, आणि अशा सद्गुणी ह्मणविणाऱ्या लोकांनीं त्यांस पाहूं देखील नये, हा मोठा चमत्कार नव्हे काय."? हें ऐकून तो दुःखित मनुष्यच ह्मणतो, "येथें ज्या त्या पाशीं फक्त त्याच्या पुरतें मात्र अन्न आहे. आणि तेवढ्यांत तो तृप्त आहे; तर त्यानें आपले तोंडचा घांस काढून मला देणें आणि आपला जीव मारणें, हा तरी अन्याय नव्हे काय. ?" आसम ह्मणतो, "त्यांनीं आपल्या निर्वाहाहून पुष्कळ जास्त कां मिळवून ठेवूं नये."? असें बोलून गेल्यावर स्मरल्या-सारखें करून मान हालवून ह्मणतो, "हो, हो; मी विस-रलों; असें जास्त मिळवून ठेवणें' हाच हांवरेपणा, हाच अधाशीपणा; बोललों त्यांत मींच आपलें खंडण केलेंसें झालें. मीच मनुष्यास अधाशीपणावरून अत्यंत नीच मानीत नसें काय. ? मी पूर्वीं ह्मणत होतों काय, आणि आतां ह्मण-तों काय ? सगळा घोंटाळा आहे. कांहींच समजत नाहीं. कृतघ्नता नसणें हा देखील येथें कोणाला सद्-

गुण वाटत नाहीं; कांकीं कधीं कोणी कोणाच्या उपकाराची गरज ठेवीत नाहीं. असो. तरी त्यांस स्वदेशाभिमान फार असेल, असें मला वाटतें. देवदूत ह्मणतो, "ऐक; आसमा, असा भुलूं नको; अरे, ज्या आपलपोट्या मनोवृत्तीनें, लोकांच्यापेक्षां स्वतःचें हित अधिक करावें असें वाटतें, तिजपासून स्वदेशाभिमान उत्पन्न होतो. पहा कीं, सर्वांभूतीं सारखी दया करणें, हा गुण मात्र अगदीं निर्दोष आहे, आणि तोच ह्या लोकांत पूर्णपणें वसत आहे. मग त्यांस परदेशांपेक्षां स्वदेशाचें हित जास्त व्हावें, असा पक्षपाताचा विचार कसा स्पर्शेल. ?" हें ऐकून आसम अगदीं निराश होऊन उष्ण श्वास टाकून ह्मणतो, "काय दुर्दैव हें. ! मी ह्या असल्या जगांत राहून काय करूं. ? येथील लोक निर्वाहतृप्त आहेत, हाच काय तो ह्यांचा सद्गुण; तो क्षुद्र प्राण्यांच्याठायींही असतो. धैर्य, औदार्य, स्नेह, ज्ञान, संभाषण, देशाभिमान, ह्या गोष्टी ह्यांच्या स्वप्नींही नाहींत. ह्यावरून असें दिसतें कीं, सद्गुण कोणता, हें न समजणें, हाच मोठा दुर्गुण आहे; अथवा, जो सद्गुण कोणते ते जाणील, तोच दुर्गुण कोणते हें जाणील. आतां, हे देवदूता, ज्या जगाचा मी इतका द्वेष करीत होतों, त्या पूर्वींच्या माझ्या जगांत मला परत ने. मी आपल्या हातानें आपणास त्रास आणला, ह्मणून मी ही विपत्ति भोगितों. मीं परमेश्वराच्या करणीस नांव ठेविलें हें महत्पाप केलें. मी अज्ञान आहें. मला पूर्वींच्या माझ्या जगांत पोंचीव. मी तुझ्या पायां पडतों." असें तो बोलतो आहे तों दिशा धुंद झाल्या; आकाश

मेघांनीं भरलें; मेघगर्जनेचे कडकडाट चालले; आणि विजा चमकूं लागल्या. तेणेंकरून आसम ह्यास क्षणमात्र देहभान नाहींसें होऊन, अगदीं स्तब्ध झाला. आणि कांहीं पळांनीं पुनः शुद्धीवर येऊन पाहतो तों, आपण त्या सरोवराच्या पाळीवर एक पाय आंत सोडून उभे आहों, असें त्याला दिसलें. आणि जें पाहिलें तें सारें स्वप्न कीं काय, असें त्याला वाटून, तो मुकाट्यानें तेथून उठून पुनः स्वग्रामीं आला. तेथें त्यानें व्यापार धंदा करून पुष्कळ द्रव्य मिळविलें, नवे मित्र जोडिले, जुन्यांस ओळखी दिल्या, आणि खर्चवेंच बेताबाताचा ठेवून राहिलेलें आयुष्य सुखांत व सदाचरणांत घालविलें. अशी आसम ह्याची गोष्ट आहे.

## श्लोक.

आहे विचित्र करणी परमेश्वराची;
तेथें मनुष्यमति कुंठित होय साची;
त्यानें दिले नियम घालुनि जे सुभावें;
ते मानवीं सकल मानित नित्य जावें.॥ १ ॥

## कोळी.

प्राण्यांच्या स्थितीकडे ज्या विचारी विद्वानांचें विशेष अवलोकन आहे, ते असें सांगतात कीं, प्राणी ज्या मानानें आपण होऊन कळप करून एकत्र राहतात त्या मानानें त्यांची बुद्धि कमजास्त असते. हा नियम प्रायः खरा आहे. हत्ती हा त्याच्या मूळच्या वन्य स्थितींत ज्यांनीं पाहिला आहे, त्यांस त्याच्या शाहा-

णपणाचें नवल वाटतें. परंतु, तोच त्याच्या कळपांतून काढून मनुष्यांनीं आपणांत आणिला, ह्मणजे अगदीं निर्बुद्ध आणि आळशी असा होतो. बीवराचेंही तसेंच आहे. तो आपल्या कळपांत स्वच्छंद असला ह्मणजे जसा काय पटाईत गौंडीच, तसें आपलें घर बांधितो. तोच मनुष्यानें पकडून आणिला ह्मणजे तो केवळ वेडा होतो, जणु काय मनुष्याच्या सहवासानें त्याची अक्कल गुंग होते.

कृमिकीटकादिकांमध्येंही ह्याप्रमाणेंच आहे. मुंग्या आणि मधमाशा ह्या पराकाष्ठेच्या उद्योगी असतात, असें सर्वांस माहीत आहे. पण उद्योगी केव्हां ? त्या आपल्या मंडळींत असतात तेव्हां. त्यांचा थवा फोडून त्या वेगळ्या ठेवा. ह्मणजे त्यांचें शाहाणपण व उद्योग कोणीकडच्या कोणीकडेच जाऊन, त्या अन्न-अन्न करून मरतील.

हा कीटकादिकांचा नियम कोळ्यास लागू नाहीं. तो एकटा असला तरी इतक्या चतुराईचीं कामें करितो, कीं तीं सांगितलीं असतां खरीं देखील वाटावयाचीं नाहींत. ह्या कीटकानें, केवळ परक्यांशींच नव्हे, तर आपल्या जातीच्या प्राण्यांशींही भांडून झगडून आपलें रक्षण करावें, अशा संकेतानें त्याची शरीररचना परमेश्वरानें केली आहे. त्याचें डोकें आणि छाती ह्यांजवरील कातडी इतकी भक्कम असते कीं, तींत कोणत्याही कीटकाची नांगी शिरावयाची नाहीं. आणि त्याच्या पोटाची कातडी इतकी सुळसुळीत असते कीं, कोणाचीही नांगी तिजवरून सुळकर निघून गेल्या

वांचून राहात नाहीं. त्याचे पाय लांब असून त्यांच्या शेवटीं नखें असतात. तेणें करून त्याच्या कीटकशत्रूंस त्याजवर एकाएकीं चाल करवत नाहीं. त्याला डोळे पुष्कळ असून ते नखासारख्या कांहीं कठिण पदार्थानें आच्छादिलेले असतात. तरी त्याला कमी दिसतें असें नाहीं. कां कीं, तें आच्छादन पूर्ण पारदर्शक आहे. ह्याशिवाय त्याला त्याच्या तोंडाच्या पुढच्या आंगास एक चिमटा असतो; त्यानें त्याला आपलें भक्ष्य धरितां, मारितां, व जाळ्यांत आणून ठेवितां येतें. अशी त्याची युद्धसामग्री आहे.

दुसऱ्या कीटकांस पकडण्याचें त्याचें बळकट साधन ह्मटलें ह्मणजे जाळें होय. तें उत्कृष्ट करण्यासाठीं तो फार मेहनत घेतो. त्याच्या शरीरामध्यें परमेश्वरानें कांहीं एक चिकटसर पदार्थ ठेविला आहे; तो आपल्या पश्चिमद्वारावाटे तो काढितो; आणि ज्या प्रकारचें जाळें विणण्याची त्याची इच्छा असते, त्याप्रमाणें जाड किंवा बारीक त्याचे धागे तो काढितो. पहिला धागा भिंतीला किंवा तशा दुसऱ्या कोणत्या पदार्थाला तो आरंभीं चिकटवितो; तो तेथून कधींही सुटूं नये ह्मणून त्यावर तो आपला चीक घालून फार बंदोबस्त करितो; नंतर त्या धाग्याचें दुसरें टोंक जेथें चिकटवावयाचें असेल, तेथें तो जातो; तों पर्यंत तो दोरा तसाच त्याच्या पोटांतून निघत असतो. ह्या दुसऱ्या ठिकाणीं गेल्यावर, तो धागा चांगला ताठ राहील, अशा मजबुदीनें तो तेथें अडकवितो. आणि ह्याप्रमाणें सर्व धागे आडवे उभे विणून सर्व जाळें तयार करितो. ते धागे अगदीं ताजे व ओल-

सर असल्यामुळें एकमेकांस चिकटण्यास कांहीं अडचण पडत नाहीं. जाळें फाटण्याचें जेथें विशेष भय असतें, तेथें हा छोटा शिल्पकार, साहासाहापट धागे लावितो, असें पाहण्यांत आलें आहे. !

कोणा एका ग्रंथकाराचा लेख ह्याविषयीं फार चमत्कारिक आहे. तो असें ह्मणतो कीं, "सुमारें चार वर्षांमागें, एके दिवशीं एका कोळ्यानें माझे दिवाणखान्याच्या एका कोंपऱ्यास एक जाळें बांधिलें. तें, माझ्या झाडणाऱ्या मोलकरणीनें दोन वेळा झाडून टाकिलें. तरी पुनः त्यानें तें तसें विणिलें. तेव्हां, तें झाडून टाकूं नको, असें मीं तिला सांगितलें. तें करण्यास तो दोन दिवस खपत होता. तें पूर्ण झालें तेव्हां त्याला मोठी हुशारी आली, असें त्याच्या चालचर्येवरून मला स्पष्ट दिसून आलें. त्या जाळ्यांत त्याला जी पहिली शिकार सांपडली, ती त्याच्याच जातीच्या प्राण्याची होती. तो कोळी, ह्या माझ्या कोळ्यापेक्षां शरीरानें मोठा होता; परंतु त्याजमधील घर बांधण्याचें सर्व द्रव्य सरून जाऊन त्यास राहायास थारा नाहींसा झाल्या मुळें, तो ह्या कोळयाच्या जाळ्यावर हल्ला करण्यास आला होता. तो तेथें प्राप्त होतांच दोघांचें युद्ध सुरू झालें. त्यांत, माझा कोळी हटेल, असें मला प्रथमतः वाटलें. कारण, तो आपल्या शत्रूशीं अमळसा लढून लागलाच आपल्या जाळ्याच्या भोंकांत परत येऊन बसे. त्यानें बाहेर येऊन समोर लढावें, ह्यासाठीं दुसऱ्या कोळ्यानें होतेतितके इलाज करून पाहिले. पण हा आपल्या किल्ल्याच्या अगदीं बाहेर असा पडला नाहीं. तेव्हां शत्रूनें मझ्या कोळ्याचें

जाळें तोडण्यास आरंभ केला. तेव्हां माझा कोळी जिवावर उदार होऊन त्यावर गेला; आणि त्याशीं लढून त्याचा ह्यानें प्राणच घेतला."

"पुढें तीन दिवसपर्यंत त्याला कांहीं एक शिकार सांपडली नाहीं. तरी तो खाण्यापिण्यावांचून स्वस्थपणें आपल्या जाळ्याची डागडुजी करीत होता. तिसरे-दिवशीं निळ्या रंगाची एक मोठी माशी येऊन त्याचे जाळ्यांत अडकली. ती इतकी बळकट होती कीं, तें ती तोडून सहज निघून गेली असती. पण ती सुटून जाण्यास फडफड करीत आहे, व बरीच गुरपटली आहे, असें पाहून, तो कोळी आपल्या भोंकांतून लवकर लवकर बाहेर पडून त्या माशीजवळ गेला; आणि तिज-सभोंवतीं त्यानें आपल्या धाग्याचे भराभर शेंपन्नास वेढे दिले. त्यांच्या योगानें तिची धडपड वगैरे सर्व राहून ती बिचारी लवकरच प्राणास मुकली; आणि त्या राज-श्रींच्या भक्ष्यस्थानीं पडली. ती त्याला आठदिवस पुरली."

"एके दिवशीं मीं एक गांधीलमाशी धरून त्याच्या जाळ्यांत टाकिली. तिला धरण्यासाठीं तो नेहमीं प्रमाणें मोठ्या त्वरेनें आला. परंतु, हा प्राणी आपणास भारी आहे, असें पाहून, त्यानें आपल्या जाळ्याचे धागे तटातट तोडून त्या माशीला मोकळें केलें. ती निघून गेल्यावर, हा आतां आपलें जाळें नीट करण्याच्या कामास लागेल, असें मला वाटलें होतें; परंतु त्यानें तें सगळेंच मोडून टाकून, तीन दिवसांत पुनः नवेंच तयार केलें."

"एक कोळी आपलें जाळें कितीदा बांधूं शकतो, हें

पाहावें असें माझे मनांत आलें; ह्मणून मीं त्याचें तें घर मोडिलें. त्यानें पुनः बांधिलें, तेंही मीं काढून टाकिलें. तेव्हां त्याचा सगळा सांठा सरला. त्यानंतर त्यानें ज्या संरक्षणाच्या युक्ति केल्या, त्या फारच चमत्कारिक होत्या. तो आपले पाय आंगाशीं गुंडाळून घेऊन लहानशा गोळीसारखा कांहीं तास पावेतों निश्चेष्ट पडे; तरी फार सावध राहून, एकादी माशी टप्यांत आलीशी झाली, ह्मणजे तिला चटकन धरी आणि खात बसे."

"पुढें ह्या स्थितीचा त्याला फार कंटाळा आला. तेव्हां त्यानें शेजारच्या कोळयाच्या जाळयास तीन दिवस पर्यंत वेढा घालून, त्याच्या धन्यास ठार मारून तें घेतलें; आणि त्यांत ज्या माशा वगैरे अडकून सांपडत, त्यांजवर आपला निर्वाह चालविला. हा प्राणी तीन वर्षे वांचला. ह्याचे आंगाची कातडी आणि पाय, हीं दरवर्षास जुनीं जाऊन नवीं येतात. त्याचा एखादा पाय तोडला, तर तो पुनः तीन दिवसांनीं जशाचा तसा वाढतो. हा लवकर माणसाळतो. माझ्या कोळयास प्रथम हात लावण्यास मी गेलों, तेव्हां तो भिऊन जाऊन घरांत बसला परंतु, असें पांचचार वेळा झाल्यावर त्याची माझी इतकी लगट जमली कीं, तो माझे हातावरून मारलेल्या माशा खुशाल उचलून नेत असे."

"ह्या प्राण्यांत नरांपेक्षां माद्या फार असतात. त्या आंडीं घालितात, त्यांत जीवंत पिलें असतात. तीं आंडीं घालतेवेळीं, त्यांचे खालीं त्या आपलें जाळें पसरितात. आणि त्यांत त्यांस गुंडाळून ठेवितात, व उबवितात. संकटसमय प्राप्त झाला असतां, हीं आंडीं घेव-

त्यावांचून त्या घरा बाहेर पडत नाहींत; पण तेणेंकरून त्या कधींकधीं प्राणांसही मुकतात."

"पोर आंड्याबाहेर पडल्यावर लागलेंच धागे काढूं लागतें. तें एका दिवसाचें झालें, ह्मणजे माशा वगैरे आपलें भक्ष्य मिळवूं लागतें. तें तीन चार दिवस अन्नापाण्यावांचून राहतें. तरी त्याच्या वाढींत कमतरता पडत नाहीं. त्याची वाढ फार जलद आहे. ती इतकी कीं, तें दोन दिवसांत दुप्पट होतें. ही वाढ त्याच्या पूर्ववयांत मात्र चालते; ह्मातारपणीं चालत नाहीं. तरी त्याचे पाय लांब लांब होत जातात. वार्द्धक्यामुळें अन्न मिळविण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें, ह्मणजे तो उपास काढतां काढतां मरून जातो."

## सिसरो.

ह्या रोमन वक्त्याचें नांव विद्वज्जनांत प्रसिद्ध आहे. त्याची वक्तृत्वाविषयीं व लिहिण्याच्या उत्तम शैलीविषयीं फार ख्याति होती. त्यानें आपल्या महासाध्वी तरेन्शिआ नामक प्रियकर पत्नीला जीं पत्रें परदेशांतून पाठविलीं, तीं फारच प्रेमल, सुरस, व त्हृदयाला कळवळा आणणारीं अशीं आहेत. त्यांपैकीं कांहींकांहींची सरणी मी पुढें दर्शवितों.

### ( पत्र पहिलें. )

हे परम प्रिये,

तुझ्या गुणांविषयीं, धैर्याविषयीं, व लोकहितार्थ अखंड श्रमांविषयीं माझ्या मित्रांच्या पत्रांवरून व लोकवार्तेवरून मला सर्व हकीकत समजते. हर हर! हे जिवलगे,

किती मी दुष्ट ? किती मी हतभाग्य ? धिक् माझें जिणें. ! माझ्या करितां तुजसारख्या सुशील साध्वीला अत्यंत दुःसह दुःखें भोगावीं लागतातना ! काय सांगावें. ? माझी लाडकी कन्या तुलिओला, हिचें माझे हातें लालनपालन व्हावें, तें कोणीकडेसच राहून माझ्यामुळें तिला उलटे हाल सोसावे लागतात. ? काय माझें दुर्दैव हें. ! माझा लहान बाळ सिसरो, ह्यास पाळण्यांतच विपत्तीनें गांठिलें, आणि त्याचें कारण काय तो मी, असें मनांत आलें ह्मणजे माझ्या अंतःकरणास जी व्यथा होते, ती मी काय सांगूं. ? तूं ह्मणतेस त्याप्रमाणें हा विपत्काल आपणांस केवळ दैवेंकरूनच जर प्राप्त होता, तर तो मला इतका दुःसह होता ना. परंतु, हीं सगळीं माझ्या कर्मांचीं फळें. ! मला तेव्हां अशी कशी तरी भूल पडली. ? जे लोक अंतर्यामी मजविषयीं दुष्ट वासना वागवून बाह्यात्कारें माझी मर्जी संपादीत होते, त्यांस मी मित्र मानिलें; आणि जे निर्मलांतःकरणानें माझा स्नेह इच्छीत होते, त्यांस जवळ येऊं दिलें नाहीं.—आतां, माझ्या पुनरागमनाची कांहीं आशा अद्याप आहे, असें कितीएक मित्र ह्मणतात; अझून मी आपलें शरीरप्रकृतीस जपून आहें. पुनः आपण सगळीं एकत्र जमूं, असें फ्लान्सियसाचें अनुमान आहे. हे जिवलगे, असा दिवस येऊन, भगवत्कृपेनें, तुझी माझी गांठ पडेल, आणि तू मला आलिंगन देशील, त्या समयीं माझें सर्व पुण्य फळास आलें, असें मी समजेन. घरदार विकण्याविषयीं तूं मला विचारितेस, त्यास, तरेनूशिये, पुरता विचार करून काय करणें तें कर. परिणाम पाहा. प्रिये, आप-

णाला कांहींना कांहीं ह्मणून वतनवाडी आहे, तरी देखील आपली ही दशा. मग माझ्या बाळाला जर कांहींच न राहिलें, तर त्याची काय अवस्था होईल बरें. ? शिव शिव !! काय दुःख हें. ! आतां माझ्या नेत्रांतून अश्रुधारा फार वाहूं लागल्या, ह्मणून माझ्यानें पुढें लिहिवत नाहीं. व आणखी दुःख काढून तुला कष्टी करावें, हें ही नीट नव्हे. आपला बाळ आपण सध्यातर फार दुःखांत पाडिला आहे; तरी त्यास पुढें कांहीं सुख होईल अशी तजवीज करून ठेविली पाहिजे. वयांत आल्यावर त्याचेठायीं एकादा गुण असला, तर त्यास तो दारिद्र्यापासून मात्र वांचवील. परंतु, त्याचे जोडीला जर थोडी बहुत मालमत्ता असेल, तर ती त्याला मोठ्या योग्यतेस चढवील.—शरीरप्रकृतीस जपत जा. हमेषा पत्रें पाठवून वर्तमान कळवीत अस. मुलांस माझे आशीर्वाद सांग. लोभ असूंदे, हे आशीर्वाद.

(पत्र दुसरें.)

हे प्रिये,

एकाद्या मित्राकडून लांबच लांब पत्र आलें, आणि त्याचें उत्तर तपशीलवार लिहावेंच लागलें, तर मात्र मी तुझ्या पत्राइतकें लांब पत्र लिहितों. एरव्हीं कोणास लिहीत नाहीं, हें पक्कें समज. ह्याचें कारण असें आहे कीं, पत्रें लिहिण्यास सध्या मला कांहीं सुचत नाहीं. आणि सांप्रतच्या अवस्थेंत लिहिणें ह्मटलें ह्मणजे माझ्या अगदीं जीवावर येतें. त्यांत, तुजविषयीं, व प्रिय तुलिओलेविषयीं लिहूं लागलों, ह्मणजे तर कंठ दाटून येऊन नेत्रांतून घळघळां आश्रुधारा वाहूं लागतात. कारण,

तुह्मां उभयतांस म्यां सुखांत पाहावें, असें मी इच्छीत होतों, व त्यासाठीं महत्प्रयत्नही करीत होतों. परंतु काय प्रारब्ध पाहा ! तुह्मी परमसंकटांत आहां, असें ऐकण्याचा प्रसंग दुर्दैवानें मला आणिला आहे. ! असो ! मर्जी परमेश्वराची. ! माझ्या मुक्तेकरितां तू धैर्य धरून प्रीतिपूर्वक अतिशयित प्रयत्न करितेस, हें मला समजलें. व तसें तू करशील ह्याविषयीं मला पूर्वींच खात्री होती. जीं दुःखें तूं मज करितां भोगीत आहेस, त्यांनीं मात्र माझ्या दुःखाचा भार कमी व्हावा, दुसरा उपाय राहूं नये, असा वेळ परमात्म्यानें आणिला, असें मनांत येऊन तर मला पराकाष्ठेच्या मनोवेदना होतात. पण हे जिवलगे, काय करूं. ? इलाज चालत नाहीं. आपल्या व्हालिरियसाचें पत्र पोहोंचलें. त्यांत, तूं जें कांहीं मजकरितां रोम येथें केलें, त्याचें यथार्थ वर्णन आहे. तें वाचतांना तर मला असे रडें आलें कीं, तें माझ्यानें आंवरेना. हे प्रिये, ज्या तुझा लोभ संपादण्यास थोडेच दिवसांपूर्वीं पुष्कळ मोठमोठे लोक लाळ घोंटीत होते, ती तूं केवळ मजसाठीं दुःखार्णवांत पडून लोकांमध्यें धायमाय मोकलून रडत फिरतीस. ! अहारे दैवा! असें कांरे निष्ठूर झालेंस! तेरेनूशिये, हें सगळें दुःख माझ्यामुळें ना ? मी लोकांच्या नादीं लागून फसलों. घर विकण्याविषयीं तूं विचारतेस, त्यास, आधींच माझ्या वियोगामुळें तुला दुःख झालें आहे; आणि त्यांत, घरासारखी आवश्यक वस्तु माझे सुटकेसाठीं विकून माझे जिवापलीकडचे माणसांनीं अधिक संकटांत पडावें, हा विचार मला इतकें दुःख देतो कीं, तो माझ्यानें मनांत

देखील आणवत नाहीं. बरें; इतकेंही करून माझी सुटका झाली तर बरी; घरदार पुनः जमवूं. पण दुर्दैवानें पाऊल पुढें नच पडूं दिलें, तर हातीं आहे तें जाऊन जास्त विपत्ति मात्र होणार आहे, नव्हे काय ? नको तर, माझे प्रिये, हातचें गमावूं नको. जे माझे श्रीमान् मित्र मजसाठीं पैसा खर्चण्यास समर्थ व सिद्ध आहेत, त्यांसच तें काम करूं दे. तूं ह्या भरीस पडूं नको. मी जवळ नाहीं ह्मणून तूं चिंताक्रांत होऊं नको, तुझी प्रकृति अधिक बिघडेल; कारण तूं आधींच अशक्त झाली आहेस. तूं मला अहोरात्र डोळ्यांपुढें दिसतेस. परमचिंताग्रस्त तूं आहेस, असें मला वाटतें. तूं नेहमीं अशी काळजी वाहाशील, तर तिच्या भारानें एकादे दिवशीं भलतेंच करून बसशील. परंतु, तूं धैर्यशाली आहेस, कांहीं झालें तरी डगमगणारी नाहींस, हें मी जाणतों. तर शरीरप्रकृतीस जपत जा, आणखी आपले उद्योग सतत चालीव. जगदीशकृपेंकरून यश येईल.— लोभ असूं दे हे आशीर्वाद.

( पत्र तिसरें. )

हे प्रिये,

आरिस्ताक्रितस ह्यानें तुझीं तीन पत्रें मला दिलीं; तीं वाचतांवाचतां माझ्या अश्रुपातांनीं अगदीं भिजून चिंब्न झालीं. हाय हाय ! माझे प्राणसखे तेरेनूशिये, मला आतां बिलकूल शक्ति राहिली नाहीं. मला आपल्या स्वतःच्या दुःखांपेक्षां तुझीं दुःखें अगदीं दुर्वह झालीं आहेत. तुजवर तर दुःखाचा डोंगर कोसळला

आहे; तरी तुझ्यापेक्षां मी अधिक दुःखी आहें. ह्याचें कारण हेंच कीं, जरी उभयतां आपण समदुःखी आहों; तरी ह्या सर्व दुःखांस मूळकारण मी, माझ्या अज्ञानानें हा संकटप्रसंग ओढवला, असें वारंवार माझे मनांत येतें. मला देशांतून घालवून दिलें, त्यापेक्षां माझा जीव घेतला असता तर बरें होतें. मी केवळ दुःखसमुद्रांतच बुडालों आहें, असें नाहीं; तर लज्जाही इतकी प्राप्त झाली आहे कीं, मला आतां जगांत तोंड दाखविण्यास जागा नाहीं, असें मला वाटतें. मी आपल्या बायकामुलांच्या कल्याणास्तव झटलों नाहीं, ह्याची मला लाज वाटते. तूं नेहमीं रडत, कण्हत, किंवा आजारी, अशी माझे नजरेपुढें दिसतेस. ह्यावरून तुझी माझी गांठ पडण्याची मला कांहीं आशा नाहीं. तथापि तुला आशा आहे तोंपावेतों, तूं सांगशील तसा वागण्यास मी सिद्ध आहें. तूं ज्यांविषयीं लिहिलें, त्या मित्रांचे मी आभार मानिले; व त्यांच्या खटपटी तूं मला कळविल्या हेंही त्यांस मीं कळविलें आहे. पिसो हा माझ्या बऱ्यासाठीं आपली पराकाष्ठा करून राहिला आहे, हें मी जाणतों. असा जांवाई आणि आपण सर्व मुलेंबाळें एकत्र होऊं, असा दिवस परमेश्वर कधीं दाखवील ! तूं मजकडे येण्याविषयीं विचारतेस; त्यास तूं इकडे येऊं नको; आहेस तेथेंच ऐस. रोमामध्यें तुजवांचून माझा खरा जिवाचा हितकर्ता दुसरा कोणी नाहीं. तुझे यत्न सफल झाले, तर तुझी माझी भेट; नाहीं तर —आतां माझ्यानें आणखी लिहिवत नाहीं. शरीरप्रकृतीस जपत जा. तुझे इतकें प्रिय ह्यापूर्वीं मला कांहीं

झालें नाहीं, व सांप्रत होत नाहीं, हें तूं पक्कें समज. तूं आतां माझ्या डोळ्यांपुढें मला दिसतीस तेणेंकरून हा हुंडका माझ्यानें गट्ट करवला नाहीं. लोभ असूंदे हे आशीर्वाद.

( पत्र चवथें. )

हेप्रिये,

मजकडून जितकीं पत्रें तुला जावीं तितकीं जात नाहींत ह्याचें कारण असें कीं, तुजकडील आलेलीं पत्रें वाचणें अथवा तुला लिहिणें ह्मटलें ह्मणजे मला परमदुःख होतें. हे जिवलगे, ज्यांची तूं एकनिष्ठपणें सेवा करितेस, ते देव, व ज्यांच्या बऱ्याकरितां मी अहोरात्र झटलों, ते लोक जर आपल्या ह्या संकटाचें निवारण करण्यास समर्थ नाहींत, तर आतां वाट पाहून तरी काय फळ ? होऊं दे एकदां तुझी माझी भेट; आणि मरूं दे मला तुझ्या गळ्यास शेवटची मिठी मारून. ! किती मी हतभाग्य. ! किती मी दुष्ट. ! दुःखानें गांजिलेल्या अबलेस, तूं मजपाशीं येऊन राहा, असें मी ह्मणतों काय ? न ह्मणून तरी काय करूं ? हे प्राणसखे, हा जीवमीन त्वत्सहवासोदकासाठीं तडफडत आहे. मला तुज वांचून पलभर देखील राहवत नाहीं. पण काय करूं. ? पल कोणीकडेसच राहिलें; महिन्यांचे महिने घालविणें कपाळीं आलें आहे. माझ्या पुनरागमनाची कांहीं आशा असली, तर तूं होतील तितके उपाय करून पाहा. आणि आशा नसलीच, तर मजकडे येण्याचें तरी कांहीं संधान कर. मी स्वदेश पुनः ह्या डोळ्यांनीं पाहीन, असें मला तर आतां वाटत नाहीं. हें खचीत समज कीं, तूं माझ्या जवळ असलीस ह्मणजे

मी दुःखी आहें, असें मला वाटणार नाहीं. -हें सगळें खरें, पण आपल्या तुलाओलेची वाट काय करावी. ? ह्याविषयीं मला आतां कांहीं कळत नाहीं. तुला बरें वाटेल, तसें तूं कर. आपलें कांहींही होवो. त्या लहान मुलीची सर्व तजवीज बरोबर लावणें आपणांस भाग आहे. धाकटा सिसरो, त्याला मी संभाळीनच. आतां, ह्या हुंडक्यापुढें माझ्यानें जास्त लिहवत नाहीं. तूंच आतां स्वतःला सांभाळून मला टेंका देशील तो खरा. आपण पुष्कळ सुखें पाहिलीं आहेत. आतां आपणांवर जो हा प्रसंग गुदरला आहे, तो आपल्या अंगच्या दुर्गुणामुळें गुदरला आहे असें नाहीं; तर केवळ प्रारब्धानें प्राप्त झाला आहे. असो. शरीरप्रकृतीस फार जपत जा. माझ्या स्वतःच्या विपत्तीपेक्षां तुझ्या विपत्तीचें मला फार दुःख होतें. ईश्वर तुला निश्चित करो. लोभ असावा हे आशीर्वाद.

## उष्णतेच्या मानावरून देशांचें वर्णन.

उष्ण देश.— भिन्न भिन्न देशांमध्यें प्राणी, वनस्पति आणि खनिज पदार्थ, हे वेगवेगळे प्रकारचे असतात. त्यांत सृष्टिकर्त्या कारागिराचें असें अतर्क्य चातुर्य दिसून येतें कीं, ज्या देशांतील प्राण्यांस जे पदार्थ अगदीं आवश्यक असतील, ते तेथल्या हवेत उत्पन्न व्हावे, अशी योजना त्यानें करून ठेवली आहे. पाहा. उष्णदेशांमध्यें साखर, खारीख, नारळ, खजूर, लिंबूं, नारिंग, अननस, इत्यादि पदार्थ, कीं जे खाल्यानें, उष्ण-

तेनें तप्त झालेल्या मनुष्यास थंडगार वाटावें, आणि समाधान व्हावें, असे उत्पन्न होतात. जमिनीवर असणारा अति मोठा प्राणी हत्ती, हा उष्णदेशांत सांपडतो. हत्ती १० फुटांपासून १२ फूट पावेतों उंच, व १३ किंवा १४ फूट लांब असून, ६ किंवा ७ हजार पौंड भरतो. तो शरीरानें इतका अवजड आहे तरी, एका दिवसांत ६०।७० मैलांची मजल सहज करितो. तो ६०० पौंडांचें ओझें घेऊन १० तासांत ६० मैल जातो. उष्ण प्रदेशांत उंटें नसतीं, तर कितीएक प्रांत मनुष्यांस दुर्गम झाले असते. शहामृग हा एक मोठा पक्षी उष्ण प्रदेशांत आढळतो. त्याची उंची जमिनीपासून तों त्याच्या पाठीपर्यंत ७।८ फूट भरते. त्याचे पंख अगदींच आंखूड परंतु फार सुंदर असतात. कसाही जलद घोडा असला, तरी त्यास चालण्यामध्यें हा पक्षी मागें टाकितो. बोआकान्स्ट्रक्तर ह्मणून जी अजगर सर्पजाति ३०।४० फूट लांब असते, ती मूळची उष्ण देशांतील होय. ह्या सर्पानें मनुष्यासच काय, परंतु एकाद्या ताठर बैलासही जर मिठी घातली, तर त्याच्या हाडांचे तुकडे तुकडे होऊन जातात. आणि तो ते तसेच गिळितो.—उष्णदेशांतले लोक समशीतोउष्ण देशांतल्या लोकांइतके बळकट व चपळ नसतात. तथापि, तेथील जमीन चांगली पिकाऊ असल्यामुळें अल्प श्रमानें उत्तम धान्यें व फळें उत्पन्न होतात. झाडें व शेतें चोहोंकडे नेहमी हिरवीं चार दिसतात. हवा अत्युष्ण असल्यामुळें तेथील लोकांस जाड व जड कपडे आंगावर घेववणार नाहींत, हें जाणून विश्वपालकानें तेथें रेशमाचे किडे पुष्कळ

निर्माण होण्याची तजवीज ठेविली आहे. तेणेंकरून लोक बारीक रेशमी कपडे पांघरून सुखानें राहतात.

समसीतोष्ण देश.—ह्यांत मनुष्यांस उपयोगीं पडणारे प्राणी पुष्कळ होतात. घोडा, बैल, आणि मेंढा, हीं जनावरें येथें चांगलीं निपजतात. मनुष्यांला खावयाला मांस व पांघरायाला उबदार वस्त्रें मिळून, तीं त्यांचीं ओझीं वाहातात. ह्यांत गुरांकारितां गवत व मनुष्यांकारितां धान्य हीं येथें यथेच्छ पिकतात. वर सांगितलेले प्राणी शीतप्रदेशांत जगत नाहींत. आणि कोणी घोडा तिकडे नेलाच तर त्याची अवलाद अगदीं बेढब व खुरटी होऊन जाते. गाय ही उष्णदेशांत समसीतोष्ण देशाप्रमाणें उपयोगीं पडत नाहीं; आणि तेथें मेंढी नेली तर तिच्या आंगावर उपयुक्त मऊ लोंकर येईनाशी होऊन, निरुपयोगी रांठ केस उगवूं लागतात. इतर प्रदेशांपेक्षां ह्यांत नानाप्रकारच्या अनेक उपयोगी वनस्पति उत्पन्न होतात. कोळसा, लोखंड, शिसें, तांबें, इत्यादि धातु, ह्यांत पुष्कळ सांपडतात. हे मनुष्यांच्या सुखास फार अवश्य असल्यामुळें त्यांचा व्यापार येथें फार चालतो. येथील लोकांचा बांधा मध्यमप्रतीचा असतो. ते फळें, धान्यें, व मांस खाऊन राहतात. येथें वनस्पतींच्या उत्पन्नावर लोक फारसे राहात नाहींत.

सीतदेश.— यांतील जमीन पिकाऊ नसते. उन्हाळा फार थोडा असल्यामुळें फळें व धान्यें पुरतीं पिकत देखील नाहींत. झाडें व वनस्पति कमी. लोक बहुधा मांसावर उपजीविका करितात. तें त्यांस तेथें यथेच्छ सांपडतें. पशूंच्या सकेश चर्मांचीं ते वस्त्रें करितात.

तेणें करून त्यांस थंडीची बाधा होत नाहीं. रेनदीर ह्मणून एक प्रकारचीं हरणें तेथें पुष्कळ असतात. तीं तेथील लोकांस घोडा, बैल, मेंढी, गाय, ह्यांचे जागीं उपयोगीं पडतात. तेथल्या लोकांची संपत्ति कायती त्यांतच असते. कुत्राही त्यांस पुष्कळ कामास लागतो. तेथले कुत्रे लहानशी गाडी एका दिवसांत सुमारें ५० कोस ओढून नेतात. गाडीवर बसणाऱ्यानें बर्फ पडूं लागल्यामुळें जरी आपले डोळे मिटले, तरी ते वाट सोडीत नाहींत. त्यांचें मांस हें तेथले लोक मिष्टान्न मानितात तथापि त्या प्राण्यांची ते इतकी किंमत समजतात कीं, यजमानावर तसाच विकट प्रसंग गुदरल्यावांचून तो आपल्या कुत्र्यांस हात लावीत नाहीं. सीतदेशामध्यें व्हेल व सील हे प्रचंड मत्स्य सांपडतात. त्यांवरही कितीएक लोकांची उपजीविका चालते. येथील लोक खुजे परंतु बळकट व उद्योगी असतात, ते आपलीं शरीरें सकेश चर्मानें आच्छादितात.

येणें प्रमाणें तीन प्रकारच्या देशांचें सामान्य व संक्षिप्त वर्णन आहे.

## नारायणराव पेशवा ह्याचा शेवट.

बाळाजी बाजीराव ऊर्फ नाना साहेब ह्याचा मुलगा नारायणराव, हा इ० स० १७७२ त पेशवाईचे गादी वर बसला. तो इ० स० १७७३ त मारला गेला. त्याची हकीकत चमत्कारिक आहे. ती येणें प्रमाणें:—.

इ० स० १७७३ च्या आगस्त महिन्याच्या ३० व्या तारखेस नारायणराव पेशवा भोजन करून आपल्या

रंगमहालामध्यें सुखशय्येवर स्वस्थ निजला होता. इतक्यांत वाड्यामध्यें एकाएकीं मोठी गडबड झाली. तिच्या योगानें तो जागृत झाला. दंगा कशाचा ह्मणून तो बाहेर पाहतो तों, गारदी लोक त्याच्या दृष्टीस पडले. तेंव्हांच त्याच्या मनाला धक्का बसला; आणि इकडे तिकडे पाहातो इतक्यांत, ते सर्व जमून आपले अंगावर चालून येत आहेत, असें त्यानें पाहिलें. मग तर त्याच्या काळजानें ठाव सोडिला. मग काय पुसावयाचें आहे. ? तो घाबऱ्या घाबऱ्या पळत पळत, आपला चुलता राघोबा दादा ह्याजकडे गेला. आणि त्याचे कमरेस मिठी मारून बोलिला, "काका, काका, माझा जीव वांचवा" हें तो बोलतो आहे, तोंच सुमेरसिंग गारदी त्या खोलींत येऊन थडकला. त्यास नारायणरावाला न मारण्याविषयीं राघोबा दादानें पुष्कळ सांगितलें. परंतु, तो कांहीं ऐकेना. आणि तो शेवटीं बोलिला कीं, दादा साहेब, सरकाराला आपण सोडून देऊन दूर व्हावें, नाहीं तर हा सुमेरसिंग उभयतांचेही प्राण घेईल; विचार पाहा. हें भाषण ऐकतांच राघोबादादानें त्याला सोडून आपण गच्चीची वाट धरिली. नारायणरावही तिकडे पळत चालला. इतक्यांत रघुनाथरावाचा हत्यारबंद चाकर तुळाजी, ह्यानें नारायणरावास पाय ओढून जमिनीवर पालथें पाडिलें. त्याचे आंगावर सुमेरशिंग तरवार उपसून धांवला. तेंव्हां नारायणरावाचा परमविश्वासू नौकर चांफाजी टिळेकर हा, आपल्या धन्याच्या रक्षणार्थ त्याच्या आंगावर पडला. त्या उभयतां स्वामिसेवकांस तुळाजीनें व सुमेरशिंगानें, तरवारीच्या वारांनीं

तेथेंच ठार मारिलें. हें कृत्य राघोबादादानें करविलें असा पुष्कळांस संशय आला. रामशास्त्री ह्यांनीं तर ह्या गोष्टीचा फार बारीक रीतीनें शोध केला; आणि त्याविषयींचें खुद्द त्याचे हातचें पत्र मिळविलें. तें पत्र घेऊन ते एके दिवशीं राघोबादादाकडे गेले; आणि बोलिले कीं, तुह्मी कांहीं ह्मणा, हें कृत्य तुमचेखेरीज दुसरे कोणीं केलें नाहीं, हें मला पक्कें समजलें. तेव्हां आतां चोरून कांहीं उपयोग नाहीं, असें पाहून त्यानें शास्त्रीबावांस असें सांगितलें कीं, मीं पत्रामध्यें धरावा असें लिहिलें होतें, मारावा, असें लिहिलें नव्हतें, तो धचा मा कोणीं केला हें मला ठाऊक नाहीं. तेव्हां, हें कर्म आनंदीबाईचें, ह्मणजे राघोबाच्या बायकोचें असेल, असा सर्वांनीं अजमास केला. नंतर राघोबानें शास्त्रीबावांस असें पुसलें कीं, कोणत्याही पर्यायानें असो, परंतु हें पातक माझ्या माथां आलें, ह्यास प्रायश्चित्त काय करावें.? त्यावर त्या निस्पृह पुरुषानें उत्तर दिलें कीं, ह्यास देहांत प्रायश्चित्त पाहिजे. कारण, ह्यापुढें तुमचे हातून सद्वर्तन होण्याचें लक्षण दिसत नाहीं; आतां तुमच्या राज्याची व तुमची धडगति नाहीं; तुह्मी राज्य करीत असाल तोंपर्यंत मी ह्या शहरांत पुनः येणार नाहीं; आजपावेतों मी सरकारचा आश्रित होतों, तो आतां नव्हे; असें भाषण करून तो ब्राह्मण सटकर उठून गेला.

हा पेशवा आपले वयाचे १८ वेवर्षीं मारला गेला. तेणेंकरून त्याचे गुणावगुण पुरतेपणें बाहेर पडले नव्हते; व जे पडले होते ते प्रसिद्धीस आले नव्हते.

## चमत्कारिक गोष्टी.

१. दोस्तमहंमद हा बुखाराप्रांतांत गेल्यावर, तेथील खानानें त्यास आपल्या दरबारांत बोलावून नेलें; मग तो आपल्या हातीं सांपडला, असें खचीत झाल्यावर, त्यास कैदेदाखल प्रतिबंधांत ठेविलें; तेथून त्यानें रखवालदारांस लांच देऊन आपली सुटका करून घेतली; आणि एक उझबेक वाटाड्या आणि एक आपण असे दोघे खुलुमाकडे येऊं लागले. वाटेनें एक लिहिण्याजोगी नक्कल घडली, ती अशी. दोस्तमहंमदाचा घोडा किंचित् लंगडूं लागला, ह्मणून तो आपल्या सोबत्यास देऊन आपण त्याचें मजबूत लहानसर तट्टू होतें, त्याजवर बसून चालला. तो त्याचा सोबती, आपण महंमदास पळविलें हें प्रसिद्ध झालें असतां आपणावर खानाचा राग होईल, ह्मणून मनांत भय मानीत होता, आणि कोणी खानाकडील लोक भेटल्यास, दोस्तमहंमद ह्यास त्यांच्या स्वाधीन करून आपलें कार्य साधण्याविषयीं त्याच्या मनांत लोभ उत्पन्न झाला होता. इतक्यांत त्यास कोणी दोस्तमहंमदाच्या विरुद्धपक्षाचे स्वार भेटले. त्यांशीं त्याविषयीं व फिरंग्यांविषयीं गोष्टी बोलत असतां तो त्यांस ह्मणाला, "तुह्मांस बक्षीस पाहिजे असल्यास तो सरदार जातो आहे तो पहा; तो दोस्तमहंमद आहे. तो आतांच बुखाऱ्याच्या राजाच्या कैदेपासून सुटून चालला आहे." हें ऐकून ते ह्मणाले, "तूं लबाड आहेस; दोस्तमहंमद दरिद्री तट्टावर, आणि तूं त्याचा सोबती मातबर पाठाळावर, असें कसें घडेल ! तूंच दोस्तमहंमद. चल आमच्याबरोबर बुखाऱ्यास."

हे शब्द ऐकतांच त्याचें तोंड उतरलें, हें त्या लोकांनीं भयाचें चिन्ह जाणून त्यास धरून नेलें. आणि दोस्तमहंमद खुशाल खुलुमाकडे गेला. (इ. स. १८४०).

हिंदुस्थानांतील इंग्लिशराज्याचा इतिहास.

२. एका शहरांत एक श्रीमान् सावकार राहात होता. त्याला तीन पुत्र होते. सृष्टिक्रमानुसार सावकार मरण पावला. त्यानें मरावयाच्या पूर्वीं आपल्या मृत्युपत्रांत आपल्या जिनगीची अशी व्यवस्था करून ठेविली होती कीं, वडील पुत्रानें सर्व जिनगीचा निमे हिस्सा घ्यावा, मधल्यानें सर्व जिनगीचा तिसरा हिस्सा घ्यावा, आणि कनिष्ठानें नववा हिस्सा घ्यावा. ह्याप्रमाणें बापाचा स्वदस्तूरचा लेख पाहून स्थावर जंगम सर्व जिनगी हिस्सेरशीनें तिघांनीं वांटून घेतली. शेवटीं घोडे १७ उरले. त्यांची यथाभाग वांटणी करावयास ते लागले. परंतु एक दोन घोडे कापल्या खेरीज हिस्से बरोबर पडतना. शेवटीं भांडत भांडत ते शहरच्या राजाकडे गेले. परंतु, राजाचीही अक्कल त्या कामांत अगदीं चालेनाशी झाली. तेव्हां त्यानें न्यायाधीशास बोलावून आणून त्या खटल्याचा निवाडा करावयास सांगितलें.

न्यायाधीशानें मृत्युपत्र चांगलें लक्ष लावून वाचिलें. परंतु तंटा मिटण्यासारखा त्यांत त्याला आधार कांहीं दिसेना. हा गृहस्थ मोठा चतुर व न्यायाच्या कामांत फार निष्णात होता. कांहीं तरी युक्ति काढिल्या वांचून त्या मूर्खांची समजूत व्हावयाची नाहीं; असा

विचार करून त्यानें तिघांजणांसही आपले समोर उभें केलें. आणि खालीं लिहिल्याप्रमाणें सवाल केले.

न्यायाधीश.— काय हो, तुमचा काय तंटा आहे. ?

तिघे पुत्र.— महाराज, तंटा ह्मणून इतकाच कीं, आमच्या बापानें लिहून ठेविल्या प्रमाणें यथाविभाग ह्या घोड्यांची वांटणी आह्मांस मिळाली पाहिजे. ठरलेल्या हिशांत कमी होतां कामास नये, आणि घोडे सबंद मिळाले पाहिजेत.

न्याया.—एवढेंचना ? ह्यांत काय आहे. ? बरें अगोदर हें सांगा कीं, तुमच्यांतून प्रत्येकास तुमच्या वाजवी हिशापेक्षां जास्ती भाग जर मिळाला, तर त्याला तुह्मी कबूल आहां कीं नाहीं. ?

ति.— होय महाराज, आमचें बरेंच झालें.

न्या.— आणा तर मग तुमचे कोठें आहेत ते १७ घोडे, आणि करा माझ्या समोर उभे.

हे शब्द ऐकतांच तिघांसही मोठा आनंद झाला. आणि आज्ञेप्रमाणें सर्व घोडे आणून त्यांनीं न्यायाधीशापुढें उभे केले. ते पाहून न्यायाधीशानें मोतद्दारास हाक मारिली, आणि त्याकडून आपला खासगी घोडा आणून त्या घोड्यांच्या रांगेंत उभा केला. नंतर त्यानें त्या तिघांजणांतून वडील मुलास एकंदर घोडे किती झाले ह्मणून विचारिलें.

वडील पु.— महाराज १८ झाले.

न्यायाधी.— (तिघांजणांस पुढें उभे करून) पाहिलेंरे बाबा ! हे १८ घोडे आहेत. हे सर्व तुमचेच आहेत, असें क्षणभर समजा. (नंतर वडील मुलास ह्मणतो), तूं निम्मे हि-

ह्याचा वांटेकरी आहेस, नव्हे;? 'घे तर ह्यांतले ९ घोडे. ( मधल्यास ) तुझी तिजाई आहे; घे हे आपले ६ घोडे. (धाकट्यास) नववा हिस्सा तुझा ना.? घे तर आपले २ घोडे. आतां बाकी राहिला एक; हा तर बाबा माझा आहे. मी काय ह्मणून आपला घोडा तुह्मांला देईन.? हा मी आपला घेऊन जातों.

ह्या प्रमाणें त्या पुरुषानें घोड्यांच्या जीवांस धक्का न लावतां प्रत्येकास वाजवीपेक्षां जास्त हिस्सा देऊन त्या मूर्खांची समजूत केली. आणि त्यांस त्यांच्या घरीं जाऊं दिलें. हें चातुर्य व ही समयसूचकता पाहून राजा फार खुष झाला. आणि न्यायाधीशास त्यानें मोठें इनाम दिलें.

सारांश 'क्रियेवांचून ज्ञान पंगू,' अशी जी लोकांत ह्मण आहे, ती अक्षरशः खरी आहे. आपणांस पुष्कळ गोष्टी माहित आहेत, व आपण मोठे विद्वान आहों. पण त्या ज्ञानाचा उपयोग जर प्रसंगीं न करतां येईल, तर तें असून आणि नसून सारखेंच आहे.

मराठी ज्ञानप्रसारक.

३. आफ्रिकेंतील मुंग्यांचे असे थव्यांचेथवे बाहेर पडतात कीं, जशी काय जमीनच चालत आहे, अशी भासते. ह्यांपैकीं एका थव्यानें एका हत्तीवर चाल केली. आणि आठ तासांनीं आह्मीं पाहूं लागलों तों तेथें अस्थिपंजर मात्र दृष्टीस पडला. पहा. हे प्राणी लहान खरे. तरी 'दसका लकडी एक्का बोजा' ह्या न्यायानें हें एवढें कृत्य झालें.

४. आयुष्याची परिमिति.— अनुभवावरून समजलें

आहे कीं, ३२१० मनुष्यांत एक मनुष्य १०० वर्षें वांचतें. दाईकडून पाजिलेल्या १००० मुलां पैकीं ५०० मरतात; तितकींच जर आईनें पाजिलीं तर ३०० मरतात. दरिद्री लोकांपेक्षां सुखी लोक जास्त दिवस जगतात. जीवंत जन्मलेल्या मुलां पैकीं $\frac{1}{4}$ अकरामहिन्यांचीं होण्या पूर्वीं मरतात; $\frac{1}{3}$ तेवीस महिन्यांचीं होण्यापूर्वीं मरतात; $\frac{1}{2}$ आठवे वर्षापूर्वीं मरतात. सर्व जनाचे $\frac{2}{3}$ एकुणचाळिसावे वर्षापूर्वीं, व $\frac{3}{4}$ एकावन्नावे वर्षापूर्वीं मरतात. फार झालें तर १२००० मनुष्यां पैकीं १ मनुष्य १०० वर्षांहून जास्त दिवस वांचतो. बफन.

मार्चांत माणसें फार मरतात; त्याच्या खालोखाल आगष्टांत व सप्तंबरांत; आणि नोवेंबर, दिसेंबर, व फेब्रुवारी, ह्यांत फार थोडीं मरतात. विवाहित स्त्रिया अविवाहित स्त्रियांपेक्षां फार दिवस जगतात.

८. इंग्लंदांत मानमथ प्रांतामध्यें एका मोठ्या मैदानांत कोलोना ह्या नांवाचा पुरुष हवा खात फिरत होता. त्यानें एक खार जमीनीवर बसलेली पाहिली. ती तात्काळ विजेसारखी जवळच्या ओक वृक्षावर चढली, त्याच्या शेंड्यास गेली, आणि तेथून एक फळ घेऊन खालीं आली. तें तिनें तेथें थोडीशी माती उकरून पुरून टेविलें. ह्या प्रमाणें, कोलोना जों पावेतों तेथें पाहात होता, तों पावेतों, ती एक सारखें करीत होती. अशीं तिनें पुष्कळ फळें पुरून टेविलीं. ही तिची हिंवाळ्याची खाण्याची तजवीज असावी, असें वाटतें. जितकीं फळें हा प्राणी पुरून ठेवितो, तितक्यांच्या

जागा त्याच्या स्मरणांत राहातात असें नाहीं. पुष्कळ चुकतात. आणि जीं फळें अशा विस्मरणानें जमिनींत राहातात, त्यांचे कदाचित् मोठमोठे वृक्षही होतात. केवढा ह्या प्राण्याचा उद्योग, आणि काय ईश्वरी कौतुक पाहा. ! ज्या ओक वृक्षाविषयीं इंग्लंद इतका गर्व वाहतें, तें झाड एवढ्याशा प्राण्याच्या श्रमांचें व विस्मरणाचें फळ आहे.!

## सूड उगविणें.

सूड उगविण्याची खोड फार वाईट आहे. तिजपासून जनांमध्यें चांगलें कांहीं होत नाहीं; वाइटाचे मात्र पर्वत पडतात. दुष्टबुद्धीनें आपणांस कोणीं दुखविलें, ह्मणजे तात्काल त्याला दुप्पट दुखवावें, असें आपल्या मनांत येतें. पण तें करणें चांगलें काय. ? त्यापासून कोणाचें तरी हित होईल काय. ? एकाद्यानें आपलें घर जाळिलें; तर त्याबद्दल आपण त्याचें जाळूं नये. कां तर त्यापासून फायदा कोणाचाच नाहीं, आणि जगांत नाशाची मात्र वृद्धि होते. आणखी असें आहे कीं, सामान्यतः कोणत्याही प्रकारें मनुष्यास दुःख देणें, हें अत्यंत नीच होय. तें एकाद्यानें आपणास दिलें, तर तो दुष्ट खराच. आपण उलट जर त्याला दिलें, तर तो आणि आपण एक सारखेच पापकर्मे झालों; आपणांकडे श्रेष्ठत्व आलें नाहीं. मांजर द्वाडपणानें एकाद्या सुज्ञ मनुष्यास डसलें, तर, सूड उगविण्याकरितां त्यानें त्याला उलट डसावें. ? कोणी मोठा पुरुष रस्त्यांतून चालला असतां, एकाद्या हल;

ऱ्या मनुष्यानें येऊन एकाएकीं त्याचे तोंडांत मारिली, तर तो उलट त्याला मारील काय. ? अथवा सरकारांत फिर्याद जाईल काय. ? नाहीं. तर, त्याचप्रमाणें आपण दुष्टाचे अपराधांची क्षमा करून त्याचा सूड उगवूं नये, हें आपणांस उचित आहे.

मनुष्य एकांतीं विचार करीत असतां देखील, स्वपक्ष कसाही असला तरी त्याला तो खरासा वाटतो. मग उघडपणें दुसऱ्याशीं वाद लागल्यावर तो आपला पक्ष खरा करून दाखविण्याविषयीं भगीरथ प्रयत्न करील, ह्यांत कांहीं नवल नाहीं. शाहणा आणि मोठा कायतो मी, असें प्रत्येकाला वाटत असतें. आणि तसें जो कोणी आपणास मानीत नाहीं, तो आपला वैरी, असें तो समजतो, व त्याचा सूड उगविण्याची संधि पाहात असतो.

कधीं असें घडतें कीं, एकाद्यानें दुसऱ्याचा कांहीं थोडासा अपराध केला, ह्मणजे दुसरा त्याला लागलेंच शासन करितो. तेव्हां त्याला असें वाटतें कीं, माझा अपराध एवढा नसतां, ह्यानें बुद्धिपूरःसर मला दुखविण्यासाठीं इतकी इजा केली. असें मनांत आल्यावर जास्त वाटलेल्या शिक्षेचा सूड तो पुनः दुसऱ्यावर काढितो. तेव्हां दुसऱ्याला असें वाटतें कीं, मीं जशासतसें केलें, आतां हा उगीच मागें लागला आहे. ह्यामुळें तो पहिल्याला फार रागानें आणखी दुखवितो. वैमनस्यें ह्याप्रमाणें वाढतात. शेवटीं त्यांचा परिणाम अतिभयंकर होतो.

ज्या गोष्टी घडून गेल्या, त्यांवरून पुढें सावध राह-

ण्याविषयीं मात्र जपावें. ह्यापलीकडे त्यांच्या विचारांत फायदा नाहीं, असें विद्वज्जनांचें मत आहे. कारण, विद्यमानीं चाललेल्या व पुढें प्राप्त होणाऱ्या गोष्टींचा विचार, जो अगदीं आवश्यक आहे, तो करण्यास देखील आपलें आयुष्य पुरत नाहीं; तेव्हां, चर्वितचर्वणांत काय लाभ आहे. ? लोकांस दुःख देणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें कोणीही समजत नाहीं. परंतु, कांहीं नफा, संतोष, समाधान, इत्यादिकांच्या लोभानें मनुष्य परपीडेस प्रवृत्त होतो. ह्यांत कांहीं विशेष नाहीं. कां कीं, स्वसमाधानाचा उपाय करण्याची इच्छा यावत् प्राण्यांमध्यें जन्मतःच असते. तर तिला वश होऊन जो पुरुष सारासार विचार न पाहतां वागतो, त्याचा राग करून किंवा सूड उगवून उपयोग काय. ? त्यापासून ती दुष्ट वासना मात्र जास्त होणार.

स्वहित नसतां केवळ दुष्टबुद्धीनें जो पुरुष दुसऱ्यास दुःख देण्यास प्रवृत्त होतो, तो एक कंटकच समजावा. पाहा. कांट्याचा उपयोग दुसऱ्यास भोंसकण्यावांचून दुसरा कांहीं आहे काय. ? नाहीं. तद्वत्, अशा दुष्टांचे हातून दुसरें कांहीं एक न घडतां परपीडा मात्र व्हावयाची. ज्या अपराधाचा बंदोबस्त सरकारच्या कायद्यानें होत नाहीं, त्याबद्दल सूड घेतला, तर एकवेळ शोभेल. परंतु, ज्यांचा बंदोबस्त कायद्यानें होतो, त्यांचा सूड उगविल्यास तक्षकपणाचा एक, व राजाज्ञाभंगाचा एक, असे दोन दोष माथां येतात. आणखी शिवाय शत्रूस जास्त चेव येतो.

कोणी मनुष्य सूड घेतो, तेव्हां आपल्या वैऱ्यास इजा व्हावी, इतकाच त्याचा सर्वदा हेतु असतो, असें नाहीं. तर त्याला दुःख सोसतांना कृतकर्मांची आठवण होऊन, पश्चात्ताप व्हावा, असेंही त्याचे मनांत कधीं कधीं असतें. हा मनोधर्म फार चमत्कारिक आहे. अपराध्यास शिक्षा करून मनुष्याची तृप्ति होत नाहीं; तर ती शिक्षा, जें दुःख तूं मला दिलें त्याबद्दलची आहे, असें शत्रूस कळविण्यानें त्याला फार समाधान होतें. हें एक प्रकारें बरें. परंतु भितरे सूड उगविणारे लोक जे आंतमाऱ्यानें दुःख देतात, ते परम दुष्ट होत. बाहेरून स्नेहभाव दाखवून घात करणारे जे चांडाळ, त्यांचें मुखावलोकनही करूं नये; व अशांच्या अपराधांची कधीं क्षमाही करूं नये. शत्रूस क्षमा करावी, असें नीतिशास्त्राचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे; परंतु मित्रास क्षमा करावी, असें वचन कोठें आढळत नाहीं. कांकीं, क्षमेस पात्र अपराध कोणता.? बुद्ध्या केलेला काय.? नव्हे. तर चुकून झालेला. आणि जो आपला खरा मित्र आहे, तो आपणास बुद्धिपुरस्सर दुःख देईल काय.? नाहीं. तेव्हां त्याला क्षमा करण्याचें प्रयोजनच नाहीं. ह्मणूनच नीतिशास्त्रानें त्याविषयीं मौन धरिलें असावें.

सूड उगविण्याचा स्वभाव फार वाईट आहे. तो ज्याचेठायीं असतो, त्याचें मन हितकारक गोष्टींकडे न लागतां, त्यास ज्यानें छळिलें असेल, त्याचा सूड घेण्यास कोणत्या रीतीनें कशी संधि साधावी, ह्या विचारांत भ्रमत असतें. अशापासून कांहीं फायदा नाहीं.

उलटा तोटा आहे. तो असा कीं, आपल्या शत्रूंनीं आपला अपमान वगैरे करून जें कांहीं दुःख आपणास दिलें असेल, त्याची आपणास सर्वदा आठवण होते, आणि तिच्या योगानें मागील दुःखांची पुनःपुनः आवृति मात्र होते, दुसरें कांहीं नाहीं. तस्मात् सूड उगविण्याची जी आपली दुर्बुद्धि, ती नेहेमी आपण दाबीत असावें, हेंच आपणास उचित होय.

सूड घेण्याच्या बुद्धीपासून अनेक नाश होतात. ह्यांचीं उदाहरणें ग्रंथांतरीं व लोकांच्या तोंडीं पुष्कळ आहेत. त्यांवरून आपण सावध व्हावें. ही दुर्बुद्धि जशी आपले मनांत उद्भवूं देऊं नये, तशीच ती आपणाविषयीं दुसऱ्याचे मनांतही उत्पन्न होऊं देऊं नये. नाहीं तर आपली मोठी हानि होईल. दुसऱ्याचें वाईट आपण केलें नाहीं, आणि त्याचें वाईट व्हावें असें मनांत आणिलें नाहीं, ह्मणजे आपणाविषयीं दुष्टबुद्धि कोणीही धरणार नाहीं, हें पक्कें समजावें.

दावेदाऱ्याचा सूड उगविण्याविषयीं मनुष्याच्या मनाचा एकदां निर्धार झाला, ह्मणजे किती दुष्ट परिणाम घडतात, हें दाखविण्यासाठीं एक लहानशी गोष्ट सांगून हा विषय समाप्त करितों.

पोतोसीचा सुभेदार लायसेंशियादो इस्क्विव्हल ह्यानें एका पलटणीस तकमन राजधानीस निघून जाण्याविषयीं हुकूम केला, आणि अशी सक्त ताकीद दिली कीं, ओझीं वगैरे नेण्याच्या बिगारीस इंदियन लोकांस बिलकूल धरूं नये. आपली ताकीद नौकरलोक कशी मानितात, हें पाहण्यासाठीं इस्क्विव्हल एका लहानशा

खोलींत दडून बसला होता. स्पानियर्द लोक आपले बोजे इंदियन लोकांच्या डोक्यांवर चढवून चालूंही लागले, तरी तो प्रथमतः कांहीं बोलला नाहीं. शेवटची टोळी निघाली, तेव्हां त्याच्यानें राहवेना. तो खोलींतून फटकर बाहेर आला. तेव्हां अग्वायर नामक अमलदारानें दोघां इंदियनांच्या डोक्यांवर ओझीं लादलीं आहेत, असें त्यानें पाहिलें. तेणें करून त्याला इतका संताप आला कीं, त्यानें अग्वायर ह्यास एकदम कैद केलें. नंतर कांहीं दिवसांनीं त्याच्या अपराधाची चौकशी करून त्यास इस्किव्हल ह्यानें २०० फटके मारण्याची शिक्षा ठरविली. अग्वायर हा मोठा माणूस होता. त्यानें आपले मित्रांकडून सुभेदारास, ही लाज आणणारी शिक्षा रद्द करण्याविषयीं नानाप्रकारांनीं सांगितलें. सुभेदारानें तीच शिक्षा अंमलांत आणण्याविषयीं दुराग्रह धरिला. तो तो कांहीं केल्यानें सोडीना. अग्वायरानें अर्ज केला कीं, मला देहान्त शिक्षा सरकारानें द्यावी, ह्मणजे हें काळिमा लागलेलें तोंड घेऊन जनांमध्यें मला जावयास नलगे. सुभेदार पाषाणहृदयाचा पडला; त्याला कशाची दया ? त्यानें परम क्रोधाविष्ट होऊन असा सक्त हुकूम केला कीं, फटक्यांची शिक्षा आतां, ह्या घडीस बजाविली पाहिजे. हें बाहेर समजतांच शहरचे सर्व लोक जमा झाले. त्यांनीं अग्वायराची शिक्षा कमी करण्याविषयीं, अथवा निदान सध्या तकूब ठेविण्याविषयीं सुभेदारास विनंती केली. त्यानें शिक्षा ८ दिवस तकूब ठेवण्याविषयीं हुकूम दिला. तो घेऊन ते लोक तुरुंगाकडे गेले. तों, अग्वायर ह्यास,

पहिल्या हुकुमाप्रमाणें गाढवावर बसवून फटके मारण्यासाठीं नुकतेंच बाहेर काढिलें होतें, त्यास त्यांनीं पाहिलें. तेव्हां ते मोठ्या घाईनें त्याजपाशीं जाऊन ओरडून ह्मणाले, "हां हां राहूंद्या, राहूंद्या, शिक्षा सध्या तकूब झाली आहे; हा हुकूम पाहा." हें अग्वायरानें ऐकिलें तेव्हां तो बोलला, "गाढवावर बसण्याचा व उघड्या आंगानें जनांपुढें येण्याचा जो लाजिरवाणा संस्कार, तो ह्या देहास न घडावा, ह्मणून मी इतका धडपडत होतों. तो तर आतां होऊन चुकला. त्यापक्षीं मला आतां ती शिक्षा सोसूंद्या. शिक्षा होण्याच्या भीतीनें ज्या वेदना मला आठ दिवसांत सोसाव्या लागतील, त्या, आतांच्या साक्षात् शिक्षेच्या वेदनांपेक्षां, दुःसह आहेत, त्या मला नकोत. व ह्या वेळीं शिक्षा होऊन गेली, ह्मणजे माझे मित्रांस मजसाठीं आणखीं खटपट करणेंही नको. आणि मला पक्कें माहीत आहे कीं, कोणीं कांहीं केलें तरी सुभेदार माझी शिक्षा तीळभर देखील कमी करीत नाहीं. मग वृथा शीण कशाला पाहिजे?" असें ह्मणून त्यानें पाठ पुढें केली, आणि हूं-का चूं न करितां फटाफट दोनशें फटके घेतले.

नंतर अग्वायर ह्यानें सरकारची नौकरी सोडली, आणि औदासिन्य धरिलें. त्यास चिंताक्रांत पाहून त्याचे मित्र त्याला दुःख विसरण्यास नानाप्रकारचे उद्योग कर ह्मणून सांगत. तेव्हां तो ह्मणे कीं, "आतां कशाचें दुःखविस्मरण? पाठीचे वण गेले, परंतु अंतःकरणास जे घाव लागले आहेत, ते बरे न होतां, उलटे वृद्धि पावत आहेत. हें दुःख माझें जन्माचें सोबती झालें आहे.

मी मरेन तेव्हांच तें नष्ट होईल. आणि ह्यापासून सुटका लवकर व्हावी, ह्मणून मी मृत्यु येण्याविषयीं होईल तितका प्रयत्न करीन. तुह्मीं कोणीं माझे नादीं लागूं नये.

पुढें, इस्किव्हल हा कामावरून निघे तों पर्यंत अग्वायर हा पिरू देशांत स्वस्थ राहिला. तो कामावरून निघतांच त्यास ठार मारण्याचा निर्धार करून अग्वायर बाहेर पडला. हें वर्तमान इस्किव्हल ह्यास कळलें. तेव्हां त्याच्या भयानें लासरिज येथें साडेचारशें कोसांवर त्यापासून दूर जाऊन राहिला. आणि इतक्या दूरच्या पल्लयावर अग्वायर कशाचा येतो, अशा घमंडींत तो होता. इतक्यांत १५ दिवसांमध्यें अग्वायर त्या ठिकाणीं दाखल झाला. ही खबर इस्किव्हलास समजतांच तो तेथून निघून, सुमारें ६५० कोसांवर क्विंतो ह्या शहरीं येऊन राहिला. अग्वायर लासरिज येथून उघडा आणि अनवाणी निघाला. तो थोडक्याच दिवसांत त्या शहरास आला. ह्या प्रमाणें पळ आणि पाठलाग एक सारखे सवातीन वर्षें चालले. तेणें करून इस्किव्हल थकला; आणि अग्वायर ह्यापासून आपलें रक्षण होण्यास कोस्को शहर चांगलें, असें समजून तेथें राहिला. कारण तेथचा सुभेदार मोठा कर्डा आणि निष्पक्षपाती होता. तेथें देखील इस्किव्हल मोठ्या सावधगिरीनें वागत असे. तो आंगरख्याचे आंत चिलखत घाली, व जवळ जंब्या, कट्यार, तरवार, हीं हत्यारें बाळगी. एके दिवशीं संधि साधून अग्वायर त्याचे घरांत शिरला. तों इस्किव्हल एका कोंचावर स्वस्थ निजला होता. त्यास

त्यानें आपल्या तरवारीनें वार करून ठार मारिलें. तेंव्हां अग्वायर ह्याचा राग शमला. हा परिणाम सूड उगविण्याचा. ! केवढा अनर्थ. !

कोणतीही वाईट वासना मनांत उद्भवल्या बरोबर तिचें उत्पाटन केलें पाहिजे. जर ती वाढूं दिली, तर ती नाश केल्यावांचून कदापि राहणार नाहीं.

## गरीबी.

ह्या जगामध्यें गरीबी पुष्कळांस प्राप्त होते. पण कोणत्या रीतीनें वागलें असतां तिजमध्यें आपला निभाव लागेल, हें जाणणारे फारच थोडे असतात. दारिद्य हें महासंकट आहे. इतर संकटांपासून-ही दुःख होतें, परंतु, तें ह्याच्या इतकें नाहीं. गरीबी कपाळीं आली असतां, अन्न नाहीं; वस्त्र नाहीं; कोणी नुसतें ये बस देखील ह्मणत नाहीं; अशी मनुष्याची स्थिति होते. एकाद्या महारोगी मनुष्याप्रमाणें त्याला श्रीमंतजनांपासून दूरदूर बसावें लागतें; तो कोणाचे घरीं गेला असतां, त्यास कोणी घरीं असूनही भेटत नाहींत, जणु काय भितात, अशासाठीं कीं, हा आला ह्मणजे कांहीं ना कांहीं तरी मागत सुटणार; तो जो जो उद्योग करतो, त्यांत त्याचा पाय मागें; असें असून घरीं कुटुंब मोठें असलें, ह्मणजे त्या पापास जोडा नाहीं. देवा, मरण दे, पण ही गरीबी नको, असें त्याला होतें. सारांश, अशा अवस्थेमध्यें दिवस काढ-णें फार कठीण आहे. ह्यास्तव त्याविषयीं ज्या थोड्या-शा सूचना अवश्य दिसतात, त्या लिहितों.

लाज.—मागें ह्या लोकांत मोठ्या डौलानें व इतमामानें मी वागत असें, तो आतां येथेंच अशा दीनवेनें कसा वागूं, हा जो विचार आहे, तो गरीबी प्राप्त झाल्यावर मनांत आणतां कामास नये. जो प्रसंग येईल, तो कसा तरी घालविणें भाग आहे. त्यापक्षीं, ज्या गोष्टींपासून आपलें किंवा लोकांचें अहित होतें, त्या वर्जून, प्रसंगोपात्त, कोणतीही एकादी गोष्ट विचारपूर्वक करणें, हें अगदीं योग्य आहे. अमुक कर्म निर्दोष आहे, पण तें हलकें असून अझून पर्यंत कोणीं कधीं केलें नाहीं, असें वारंवार मनांत येतें; तथापि त्यास न जुमानितां स्वहिताचें काम करण्यांत आपलें पाऊल कधींही मागें घेऊं नये. आणि फारच दुःख वाटूं लागलें, तर असा विचार करावा कीं, आजपावेतों तशा कामास हात घालण्याचा प्रसंग आला नाहीं, ती ईश्वराची कृपा होती; व तें आतां करावें लागतें, ही त्याचीच इच्छा आहे. ह्मणून त्याविषयीं कुरकुरणें अथवा लाज धरणें, हें अगदीं वेडेपण आहे. पंचपक्वान्नी मधुर भोजन नित्य सेविणाऱ्या राजास जर ज्वर आला, तर त्यालाही काडेचिराइताचा कडू काढा घ्यावा लागतो. तात्पर्य, मनुष्य केवढा कसाही असो, त्यास आपल्या स्थितीप्रमाणें कृति बदलणें प्राप्त आहे.

आर्जव.—गरीबीमध्यें सर्वांशीं मोठ्या आर्जवानें वागलें पाहिजे. त्यांत दुर्जनाशीं तर फारच. कारण, गरीबास त्यांची मर्जी संपादून, लोकांच्या नाशाविषयीं उद्युक्त असें जें त्याचें दुष्ट मन, तें आपणास न बाधे

असें करावयाचें असतें. ह्याचा बंदोबस्त यथाकालीं न केला तर, जसें मिठाच्या एका लहानशा खड्यानें हंडाभरही दूध नासतें, तसें त्याच्या अल्प दुष्टकर्मानेंही, आपणावर लोकांनीं कितीही उपकार केले, तरी ते निरुपयोगी होतात. यास्तव दुर्जनास सदां वंदून राहिलें पाहिजे.

कर्ज.—गरीबीमध्यें कोणत्याही कामासाठीं कर्ज करूं नये. कारण, 'कर्जाच्चियेपाठीवरीअसेअसत्याचीस्वारी' अशी ह्मण आहे; आणि असत्य हें सर्व दुःखांचें मूळ आहे. कर्ज काढील त्यास कांहीं तरी दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. एखादी हलकी देखील चाकरी पतकरावी, अथवा वेळेस आपल्या घरची चीजवस्त असेल ती विकावी, निदान भीकही मागावी, पण दरिद्री मनुष्यानें कर्ज असें काढूं नये. श्रीमंत व उत्पन्नवाल्या पुरुषास देखील कर्जापासून मुक्त होण्याची पंचाईत पडते; ह्याचीं उदाहरणें, जाहागीरदार, जमीदार वगैरे लोकांकडे लक्ष पुरविलें असतां, पुष्कळ आढळतील. असें आहे, तर मग तेथें गरीब लोकांचा पाड काय. ?

स्तुति.—गरीबानें कोणत्याही कामासाठीं कोणाचीही उगीच स्तुति करूं नये. त्यानें एखाद्याच्या गुणांचें खरें वर्णन केलें, तरीसुद्धां हें कांहीं तरी मागण्यासाठीं लाघव आहे, असें एकदम जनांच्या मनांत येतें. मग खोट्या स्तुतीनें त्यांस तसें वाटेल, ह्यांत कांहीं नवल नाहीं. पहा, ही चांडाळीण गरीबी फुका खरें देखील बोलूं देत नाहीं. ! जनांत खऱ्या स्तुतीस पात्र असे गुणी

लोक फार थोडे असतात. तेव्हां अर्थात मूर्ख धनांधांची वाहवा करण्यांत याचक असत्य भाषणाच्या दोषांत पडतो. हा त्याचा एक तोटा. आणि दुसरा असा कीं, त्या खोटया स्तुतीनें ते मूर्ख धनिक फुगून स्वतःची खरी स्थिति विसरतात; लुच्चे, कार्यवादू, पैसा काढू लोक थापा देऊन त्यांस नागवितात; त्यामुळें ते शेवटीं धुळीस मिळतात. ह्यास कांहीं अंशीं खोटी स्तुति कारणीभूत होते. ह्यास्तव सुज्ञ पुरुषानें ती सर्वथा वर्जावी. जे श्रीमंत लोक गोरगरिबांस पैसा देतात, त्यांच्यामध्यें केवळ धर्मबुद्धीनें गरीबांची दया येऊन देणारे फारच थोडे; स्कीर्ती करितां देणारे असे पुष्कळ असतात.

निंदा.—गरीबानें कोणालाही वाईट ह्मणूं नये. कोणाच्या निंदेच्या गोष्टी त्याचे समक्ष निघाल्या, तर त्यानें त्या एके कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून द्याव्या; त्यांविषयीं त्यानें अक्षर देखील बोलूं नये. कां कीं, त्यास लहान, मोठे, उंच, नीच, सज्जन, दुर्जन, ह्या सर्वांची गरज लागणार. आणि हें सर्व जग तर त्यांनींच भरलें आहे.

सहनशीलता.—हा मोठा गुण गरीबास आवश्यक आहे. ज्याचे ठायीं सहनशीलता नाहीं, तो दांडगा असा जनांचा समज आहे; ह्मणून त्यास साह्य करण्याविषयीं त्यांची प्रवृत्ति होत नाहीं. आणि गरीबाला तर त्यांची क्षणक्षणीं गरज. ह्यास्तव कोणी कसेंही बोलला तरी तें यानें सोसून द्यावें. त्याविषयीं मनांत फार राग आला, तर तो बाहेर न दाखवितां ती वेळ

विनोदानें मारून न्यावी. तसें न करितां उलट भाषण केल्यास, लोकांस वाईट वाटून ते प्रतिकूल होतील. मग गरीबाचें कसें चालेल.?

पोषाक.—गरीबांनीं आपल्या मगदुराप्रमाणें वस्त्रें घेऊन तीं अगदीं साध्या रीतीनें पांघरावीं. त्यांत चट्टीपट्टी बिलकूल करूं नये. कारण, तिच्या योगानें स्वभाव ढौली दिसतो, तो कोणालाही आवडत नाहीं. आपण लोकांस आवडलों तरच ते आपणांस मदत देतील, हें सांगावयास नको. आणखी, आपणांस पंचा नेसण्याचें सामर्थ्य असून, दैन्य दाखविण्यासाठीं जर आपण लंगोटी लावून फिरूं लागलों, तर त्यालाही लोक नांवें ठेवितील व लबाडी ह्मणतील, हें गरीबांनीं लक्षांत ठेवून वागावें.

खाणेंपिणें.—गरीबांनीं आपलें खाणेंपिणें फार माफक ठेवावें. 'असेल तेव्हां दिवाळी, आणि नसेल तेव्हां शिमगा,' असा उधळेपणा त्यांनीं करूं नये; जें थोडेंबहुत मिळेल तें पुरवून पुरवून खावें; ऋण काढून सण करूं नये. उंच पदार्थांवर वासना गेली, तर ती विचारानें दाबावी; आणि मनांत असा विचार करावा कीं, उंची पदार्थांपासून सुख काय तें ते तोंडांत आहेत तोंपर्यंत; ते खालीं उतरले ह्मणजे ते रुचिकर होते आणि नव्हते सारखेच.

साधारण वागणूक.—गरीबांनीं लोकांशीं आंत बाहेर सारख्या रीतीनें वागावें; प्रतारणा करूं नये. कोणतेंही काम करणें तें विचारपूर्वक करून आपणांस हितावह होईल तें करावें. उद्योगानें सर्व साध्य आहे,

असा भरंवसा धरावा. अहोरात्र चांगला उद्योग करावा; ईश्वरावर भाव ठेवावा; त्याची नित्य एकाग्रचित्तानें प्रार्थना करावी; त्यापाशीं आपल्या पापांची क्षमा मागावी; आणि त्याच्या आज्ञा पाळाव्या.

ह्याप्रमाणें वागल्यावर कोणाही गरीबास गरीबी दुःसह होणार नाहीं. त्याला लोक मदत करतील. आणि उद्योगाचे बळानें कदाचित् तो गरीबीपासून लवकर मुक्तही होईल.

## मृत्यु.

लहान मुलें स्वभावतःच अंधेरांत जाण्यास भितात, आणि ज्याप्रमाणें त्यांचें तें भय नानाप्रकारच्या बाऊंच्या गोष्टींनीं वाढतें, त्याचप्रमाणें मृत्यूविषयीं मोठमोठ्या मनुष्यांची गोष्ट आहे. ह्मणजे, मरणाचें भय त्यांचे मनांत पूर्वींचें असतेंच. परंतु, तें प्रेतसंस्कार पाहिल्यानें व तद्विषयीं पुष्कळ गोष्टी केल्यानें व ऐकल्यानें वृद्धि पावतें. मरण हें स्वपातकाचें फळ व परलोकीं जाण्याचें द्वार आहे, हा विचार पवित्र आणि धर्मनिष्ठास योग्य होय. सृष्टिक्रम आहे तदनुरूप मरावयाचें अवश्य आहे तर, मग तें मनांत आणून त्यापासून भय पावणें, हें फार वाईट आहे. मरणाच्या दुःखाची कल्पना मनांत आणून देण्यासाठीं, कोणी एक पुरुष असें ह्मणतो कीं, आपलें बोट जर उगाच थोडेंसें कोणीं दाबिलें, तर त्यापासून आपणास ज्या वेदना होतात, त्यांवरून, सर्व शरीर नाशाप्रत पावविणारा जो मृत्यु, त्याच्या तडाख्यांच्या वेदनांची

कल्पना मनुष्यांनीं मनांत आणावी. तथापि, करांगुळी चिंवळिल्याच्या दुःखाइतकेंही दुःख न होतां मनुष्यें प्राण सोडितात, अशीं कितीएक उदाहरणें घडून येतात. सेनिका ह्मणून एक मोठा रोमन विद्वान होऊन गेला. तो ह्मणत असे कीं "स्वतः मृत्यूपेक्षां प्रेतसंस्कार फार भयंकर आहे." सत्य आहे. मध्यें शव पडलें आहे, आणि त्याच्या सभोंवतीं माणसें बसून दुःखाचा आक्रोश करीत आहेत, असें दृष्टीस पडल्यानें मृत्यूचें फार भय वाटतें. तथापि हाही चमत्कार खरा आहे कीं, मनुष्याच्या कितीएक मनोवृत्ति मरणाच्या भीतीस देखील गुंडाळून एकीकडे ठेवितात. पाहा. सूड उगविण्याचा दृढ निश्चय मरणास मोजीत नाहीं. ह्याचें उदाहरण ह्याच पुस्तकांत अग्वायराच्या हकीकतीवरून दिसून येतें. ममतापाशानें मरणाचें कांहीं वाटत नाहीं. ह्याचीं उदाहरणें, आई मुलासाठीं जिवावर उदार होते, चांफाजी टिळेकर नारायणरावाचे आंगावर पडून मेला, इत्यादि अनेक देतां येतील. कीर्तीच्या लोभापुढें मरणाची परवा वाटत नाहीं. ह्याचीं पुष्कळ उदाहरणें रजपूत लोकांच्या गोष्टींत आढळतात. आतां आपणांस अतिशयित दुःख होणार, असें वाटलें ह्मणजे मनुष्यें मृत्यूचा आश्रय करितात; पतिमरणानंतर स्त्रियांवर वैधव्यप्रसंग आल्यामुळें त्यांनीं प्राणनाश करून घेतल्याच्या अनेक गोष्टी लोकांत प्रसिद्ध आहेत. अब्रूची चाड ही मरण भीतीस खाते; दिवाळें वाजण्याचा प्रसंग आल्यामुळें अनेक सावकारांनीं विष खाऊन प्राण सोडिले आहेत, हें

कोणी नाकबूल करणार नाहीं. ह्यावरून, मनुष्याच्या मनोवृत्ति मरणभीतीस जिंकितात, हें सिद्ध झालें. मनुष्य मरण्यास सिद्ध होतो, तो जीवास कंटाळतो ह्मणून होतो; मृत्यूस तो भीत नाहीं ह्मणून होतो, असें नाहीं. प्राण जाण्याच्या पळापावेतों मनुष्याचा स्वभाव बदलत नाहीं. ह्याविषयीं औरंगजेब बादशाहाची गोष्ट साद्यंत वाचिली असतां खातरी होईल. मरण ही एक परमेश्वराची देणगी आहे, असें समजून मरतो तो मोठा पुण्यवान ह्मणावा. जनन आणि मरण हीं परमेश्वराधीन आहेत. आणि तीं दोन्ही परम दुःखप्रद आहेत. तीं सोसल्यावांचून जीवांस अन्य गति नाहीं.

मृत्यूविषयीं निरंतर सूक्ष्म विचार करीत गेलें असतां, त्याची भीति नाहींशी होते. आपलें जें कांहीं आयुष्य गेलें, तें सारें स्वप्नवत् आहे; आणि पुढें जें राहिलें आहे त्यावर भरंवसा ठेवणें, ह्मणजे खपुष्पाची आशा करणें आहे; फक्त चालली आहे घडी ती आपली. असें समजून, हे मानवा, आपले आयुष्याचा एक क्षणही व्यर्थ घालवूं नको. विचार कर.

श्लोक.

बा अंतकाळ तुज येइल जाण जेव्हां,<br>
होतील व्यर्थ सगळे हि उपाय तेव्हां;<br>
जाणें पडेल बहु सोडूनि हा पसारा,<br>
सत्कारणीं खरच ह्यास्तव काळ सारा. ॥

## जन.

ह्या संसारांतील पुष्कळ कामें करावयाचीं फार कठीण आहेत. त्यांत जनांकडून चांगलें ह्मणून घेण्याइतकें कोणतेंच कठीण नसेल. पाहा, जन कसे आहेत ते.! आजपावेतों ह्या पृथ्वींत अनेक सज्जन होऊन गेले; पण त्यांत ज्याची कधीं कोणीं निंदा केली नाहीं, असा एक तरी सांपडेल काय? तुह्मी पाहिजे तितके कां जपून वागाना; यच्च यावत् मनुष्यें तुह्मांला वाखाणितील, असें कधीं घडणार नाहीं. कोणी-ना कोणी तरी तुमची निंदा करणारा निघेल. श्रीमं-ताचा खर्च बातावेताचा असला ह्मणजे कृपण, करंटा, रक्षक, भोगील कोणाचें, सराफ, असें ह्मणावें; तो खूप पैसा उडवून चैन करीत असला, ह्मणजे त्याला दिवा-ळखोर, भगली, बाजीराव, अशीं नांवें ठेवावीं; अशी प्रत्येक गोष्टींत जनाची चमत्कारिक रीति आहे.

आणखी जनांचा स्वभाव असा आहे कीं, कसेंही असलें, तरी, जें प्रिय तें चांगलें, आणि जें अप्रिय तें वाई-ट, असें त्यांस वाटतें. ह्मटलें असतां जें चांगलें तें प्रिय, आणि जें वाईट तें अप्रिय, असें असावें, पण तसें नाहीं. ह्यामुळें जें खरोखर स्वभावतःच वाईट, त्यास चांगलें ह्मणून त्याचें ग्रहण करावें लागतें; आणि जें खरोखर स्वभावतःच चांगलें, तें वाईट ह्मणून कधीं कधीं झिट-कारणें प्राप्त पडतें, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. जनांमध्यें सध्या दुर्गुणांची वृद्धि होत चालली आहे; ती जर एकाद्यास न रुचली, आणि जर तो तिला अनुकूल न झाला, तर, त्याच्या विरुद्धपक्षाचा समाज मोठा असल्याकारणानें, तो मूर्ख ठरतो; त्याला मित्र

फार थोडे मिळतात; आणि कधीं कधीं त्याचें नुकसानही होतें. ह्या गोष्टी हरहमेष दृष्टीस पडतात. ह्यामुळें लुब्रे लोक प्रसंग पडेल त्याप्रमाणें बऱ्यास वाईट व वाइटास बरें ह्मणून, ग्राह्याग्राह्य विचार न पाहतां आपली वेळ साधितात. परंतु, जे नीतिदेवतेचे निस्सीम भक्त आहेत, ते हरएक दुःख सोशितात, पण आपला बाणा सोडीत नाहींत.

दुसऱ्याचे दोष बाहेर काढण्याची व त्यांबद्दल त्याला शासन करण्याची जितकी मनुष्याला हौस आहे, तितकी त्याच्या गुणांबद्दल त्यास बक्षीस देण्याची इच्छा नाहीं. पाहा. चोरी, चाहाडी, व्यभिचार, इत्यादि अनेक दुर्गुणांपासून तुह्मीं जन्मभर दूर राहिलां, आणि एक दिवस चुकून कोठें तुमचें वांकडें पाऊल पडलें, ह्मणजे पुरे; लोक तुमची तेवढ्याबद्दल अप्रतिष्ठा करण्याला चुकणार नाहींत. तात्पर्य, जन हे दोषदृष्टि आहेत, गुण दृष्टि नाहींत. नीति व सदाचरण ह्यांचेंच केवळ अनुसरण मी करीन, जनरीतीनें वर्तणार नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर त्याचें लोकांत चालावयाचें नाहीं. ह्मणजे असें कीं, जो कोणी तसा वर्तेल, त्यास व्यवहार करतां येणार नाहीं. कारण, सर्व जनच तसे बनले आहेत.

जन हे पैशाचे आहेत. ज्यापाशीं द्रव्य, त्याला ते भजतात. गरीब आणि श्रीमंत ह्यांच्या संबंधानें एकच क्रियेस त्यांनीं वेगवेगळीं नांवें दिलीं आहेत. पुष्कळ खाणारा श्रीमान असला ह्मणजे तो भोक्ता; गरीब असला ह्मणजे खादाड. शरीरसंपत्तिसंपन्न श्रीमंत

असला ह्मणजे तो निरोगी, निकोप शरीराचा, दुल-दुलित; तोच गरीब असला ह्मणजे लाटण्या, लट्ठेश्वर, दंडोक्या. ह्या प्रमाणें सर्व समजावें. सध्याचे काळीं पैशाला जसा मान आहे, तसा कशासही नाहीं. वित्ता-पेक्षां विद्या श्रेष्ठ, असें लोक तोंडानें बोलतात मात्र. त्याप्रमाणें ते खरोखर मानीत नाहींत. ह्याचीं उदाह-रणें देणें नकोत. कारण, तीं हरहमेषा जनांत दिसून येतात. ह्याचें कारण उघड आहे. तें हें कीं, श्रीमाना-च्या द्रव्यापासून लोकांस जितका तात्काल उपयोग होतो, तितका विद्वानाच्या विद्येपासून होत नाहीं. ह्यास्तव विद्या प्राप्त करून घेण्यासाठीं एकाद्यानें आपलें सगळें द्रव्य खर्चून बसावें हें योग्य नाहीं. सुख हो-ण्यास वित्त आणि विद्या हीं दोन्ही पाहिजेत.

सामान्यदृष्टीनें पाहिलें असतां, आपणावर पुष्कळ लोक प्रीति करतात, असें मनुष्यास वाटतें; परंतु, ती भ्रांति आहे. कितीएक जन स्वहित साधण्यासाठीं दुस-ऱ्याची हांजीहांजी करितात, व कितीएक जन आपलें नुकसान न व्हावें, ह्मणून त्याची मर्जी धरितात. परंतु, खरा मित्र असा थोडा. प्रसंगीं उपयोगीं पडणारा असा फार विरळा. हें मनुष्यास अनुभवांतीं कळतें. आधीं खरें वाटत नाहीं. ह्यास्तव शाहण्यानें पहिल्यापासून सावध राहावें. फारसें लोकांच्या भिस्तीवर जाऊं नये. जी वस्तु आपणापाशीं नाहीं, ती आपल्याला कोणी द्यावयाचा नाहीं. तीच आपले जवळ असली, ह्मणजे तोंड हालविल्याबरोबर सर्व आपापली पुढें करितात. ही गोष्ट साधारण द्रव्यास लावून पाहा.

इतक्या गोष्टी सांगितल्या, तरी आणखीं पुष्कळ राहिल्या आहेत. परंतु लेखाची इयत्ता भरली, ह्मणून संपविणें भाग पडतें. वर सांगितल्या सर्व रीति लक्षांत ठेवून मनुष्यानें वागावें. लोकांनीं आपणाशीं ज्या रीतीनें वागावें, असें आपण इच्छितों, त्या रीतीनें-च आपण त्यांशीं वागावें. खरें बोलावें; सदाचरण करावें; कोणास दुखवूं नये; आपल्या देशाचें हित शोधावें; आणि ऐहिक पसारा व्यर्थ समजून, एकांतीं एकाग्र चित्तानें जगत्कर्त्या विश्वंभराला अनन्यभावें करून शरण जावें, आणि त्यापाशीं सुबुद्धि व पातका-ची क्षमा मागावी; आणि शेवटीं ईश्वरीं एक भाव ठेवून प्राण सोडावा. हेंच जन्माचें सार्थक्य होय

---

## ज्ञानसंपादन.

### श्लोक.

जो ज्ञानहीन नर तो पशुतुल्यजाणा,
ऐसा सदर्थ कवि सांगतसे शहाणा;
तो सत्य सत्य, लवलेश न त्यांत खोटें,
ध्यानीं धरा हित घडेल तुह्मांस मोठें ॥ १ ॥

आपलें ज्ञान वाढविणें हें आपलें मोठें कर्तव्य आहे, असें सर्वदा सर्वांनीं लक्षांत ठेवावें. बसतां, उठतां, काम करतां, देतां, घेतां, बोलतां, चालतां, खातां, पितां, घरांत किंवा बाहेर, विचार करण्यास प्रतिबंध होत नाहीं, आणि विचार चाललेला असला

---

१ भर्तृहरि.

ह्मणजे ज्ञान सहज वाढतें. अंधेरामध्यें एकटा असतांही, आपल्या मनोवृत्ति कशा आहेत, त्या कोणत्या प्रसंगीं कशा उद्भवतात, त्यांचे परिणाम काय, जन्मास येऊन आपण केलें काय आणि करावें काय, इत्यादि अनेक चित्तवेधक विषयांवर प्रत्येकानें आपल्या अंतःकरणापाशीं संवाद करावा. तेणेंकरून जो आनंद होतो, तो अवर्णनीय आहे. मंडळींत जनाचे गुण, दोष, स्वभाव, वासना, सत्कृत्यें, दुष्कृत्यें, आणि आचरणें हीं पाहून, त्यांपासून आपणास उपयोगीं पडण्यासारखा बोध प्राप्त करून घ्यावा. ईश्वराविषयींचें ज्ञान तर सर्वोत्तम, व सर्वोपयोगी आहे. त्याचे खालोखाल उपयुक्त ह्मटलें ह्मणजे मानवस्वभावाचें ज्ञान होय; तें केवळ विचारशील अवलोकनानें मात्र प्राप्त व्हावयाचें.

तुह्मी शहरांत असतां तेव्हां मनुष्याच्या कलाकौशल्याचे पदार्थ पाहून जसें तुमचें मन रमतें, त्याप्रमाणें बाहेर रानांत असतां तेव्हां पृथ्वी, आकाश, वनस्पति, पशुपक्षी, इत्यादि अनेकविध सृष्ट पदार्थांत ईश्वराचें जें अद्भुत चातुर्य दिसतें तें मनांत आणा ह्मणजे तुह्मांला परम आश्चर्य व आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच, ह्या दोनही प्रकारच्या वस्तूंची तुलना करून पाहिल्यानें, मनुष्यास अनुभवजन्य ज्ञानापासून किती सुख झालें आहे, व कालेंकरून तें किती वाढेल; मनुष्याच्या व जगदीश्वराच्या करणींत किती अंतर आहे; देव किती थोर आहे; व मनुष्य किती हलका आहे; ह्या गोष्टी लक्षांत येऊन तुह्मांला

परमानंद होईल. तर, जें कांहीं तुह्मी पाहतां, ऐकतां, अथवा समजतां, त्यापासून ज्ञान वृद्धिंगत होण्यासारखा कांहीं विचार काढावा, हें तुह्मांस उचित आहे.

मेघ, नक्षत्रें, सूर्य, चंद्र, आणि ग्रहांच्या गति, हीं लक्ष्यपूर्वक अवलोकून त्यांचा विचार करावा. पृथ्वीच्या उदरांत काय काय आहे, तें कशाच्या उपयोगीं आहे, व तें माणसाच्या हातीं कसें येतें, हें मनांत आणावें. फळें, फुलें, आणि वृक्ष, ह्यांतील चमत्कार पाहावे. पशु, पक्षी आणि इतर कीटक ह्यांचीं शरीरें व जीवनस्थिति ह्यांजकडे अतिसूक्ष्म दृष्टि पुरवावी; तेणेंकरून पुष्कळ ज्ञान प्राप्त होईल, व त्हृदय प्रेमानंदानें भरून जाईल.

पळें, घटिका, दिवस, मास, अयन, वर्ष, हीं एकामागून एक कशीं निमूटपणें चाललीं आहेत, व तीं आपणास मृत्यूच्या भयंकर जबड्याकडे कशीं हळू हळू नेत आहेत, हें मनांत आणावें; आणि आपलें आयुष्य फुकट न घालविण्याचा निश्चय करून तो बळकट धरावा.

शिकंदर, अकबर, औरंगजेब, अशा अशा पराक्रमी पुरुषांचीं राज्यें, कुटुंबें, व धनें, कालचक्राखालीं चिरडून जाऊन धुळीस मिळालीं; तेथें आपला गरीबाचा काय पाड; संसार व संपत्ति ही दोनप्रहरची सावली आहे, केव्हां पाठमोरी वळेल ह्याचा नेम नाहीं; सर्व क्षणिक आहे; असा विचार करून ताठा, गर्व, मीपणा, अभिमान, ह्यांचा त्याग करावा. आणि लोकांचीं मरणें पाहून व ऐकून, आपणालाही असेंच एक दिवस एकाएकीं जाणें पडेल, ह्याचें स्मरण धरावें.

लोकांचें आचरण पाहून जें वाईट व दुर्विपाक असेल, त्यापासून दूर राहावें; आणि जें चांगलें व सत्परिणाम आढळेल, त्याचा स्वीकार करावा. लोकांचीं दुःखें आणि विपत्ति ह्यांजकडे लक्ष्य देऊन, तशीं परमेश्वरानें आपल्यामागें लाविलीं नाहींत, ह्मणून त्याचे आभार मानावे. ईश्वरकृपेनें जेवढें आपणास प्राप्त असेल, तेवढ्यांत तृप्ति मानून, आपल्या दुःखित बांधवांस यथाशक्ति साह्य द्यावें.

देवानें तुह्मांला हात, पाय, डोळे, ज्ञान, बुद्धि, हीं अशासाठीं दिलीं आहेत कीं, त्यांपासून तुह्मीं स्वतःचें हित करून घेऊन लोकांचे कामीं पडावें, हें लक्षांत ठेवा. आपण सदां दरिद्री व दुःखी आहों, ह्यावरून आपल्या पदरीं दोष किती मोठा असावा, त्याचें स्मरण धरा. आणि इतके पातकी असतांही परमेश्वर दयालुत्वें आपलें संरक्षण करितो, एकदम नाश करीत नाहीं, ह्याबद्दल त्याचे मोठे उपकार माना; व सर्वकाळ त्याची स्तुति करा.

कोठेंही व कोणत्याही कामांत तुह्मी असलां तरी ज्ञानसंपादन चालूच असावें. थिओबाल्दिनो, हा लांकडांचे खरेदीकरितां लहानपणीं नोर्वेच्या अरण्यांत गेला होता. तेथें त्यानें आपलें काम साधून, शिवाय, वनस्पतिज्ञान पुष्कळ संपादिलें; आणि, फिन्स ह्मणून जे रानटी लोक त्याला आढळले, त्यांची सर्व हकीकत मिळवून, ती लिहून, 'रायलसोसायती' नामक विद्वत्सभेकडे पाठविली. दुसऱ्या, प्युतोली नामक एका गृहस्थास, तुर्कलोकांनीं धरून आपले बरोबर मक्केस नेलें.